SPEAK | READ | WRITE



# माय मराठी ३
# My Marathi 3

अभ्यासपुस्तक | WORKBOOK FOR COMMUNICATIVE MARATHI



दृकश्राव्य डीव्हीडी सहित
INCLUDING AUIDO-VISUAL DVD

SUHAS LIMAYE  MADHURI PURANDARE
JYOTSNA BHIDE  BHARATI KELKAR
ZAMEER KAMBLE

UNIVERSITY OF MUMBAI

RAJYA MARATHI VIKAS SANSTHA

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास

सुहास लिमये / Suhas Limaye
माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare
ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide
भारती केळकर / Bharati Kelkar
जमीर कांबळे / Zameer Kamble

# माय मराठी ३

# My Marathi 3

अभ्यासपुस्तक / Workbook for Communicative Marathi

**संपादक / Editor**

विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

**संकल्पना आणि निर्मिती / Concept and Production**

जर्मन विभाग, मुंबई विद्यापीठ / Department of German, University of Mumbai

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई / Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

**ISBN No.: 978-93-5351-823-3**
**First Edition : 2020**
**पहिली आवृत्ती : २०२०**

क्रिएटिव्ह कॉमन्स ॲट्रिब्यूशन - शेअर अलाईक लायसन्स (CC BY-SA 4.0)
Published under Creative Commons Attribution - ShareAlike License (CC BY-SA 4.0)
https://creativecommons.org/licenses/by-sa/4.0/

- **प्रकल्प समन्वयक / Project Co-ordinator**
  विभा सुराणा / Vibha Surana

- **लेखक / Authors**
  सुहास लिमये / Suhas Limaye, माधुरी पुरंदरे / Madhuri Purandare,
  ज्योत्स्ना भिडे / Jyotsna Bhide, भारती केळकर / Bharati Kelkar,
  जमीर कांबळे / Zameer Kamble

- **सहलेखक / Co-authors**
  सोनाली गुजर / Sonalee Gujar, कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale

- **संपादक / Editor**
  विभा सुराणा / Vibha Surana, आनन्द काटीकर / Anand Katikar

- **संपादकीय मंडळ / Editorial Team**
  सोनाली गुजर / Sonalee Gujar, मेहेर भूत / Meher Bhoot,
  प्र॰ना॰परांजपे / P.N. Paranjape, कृत्तिका भोसले / Kruttika Bhosale,
  गौरी ब्रह्मे / Gauri Brahme, जुईली म्हात्रे / Jueli Mhatre,
  गिरिषा टिळक / Girissha Tilak, सायली थारळी / Sayali Tharali

- **मराठीसाठी तांत्रिक साहाय्य / Technical Support for Marathi**
  वूडस्टॉक स्टुडिओ / Woodstock Studio, कन्फ्युशिअस इन्स्टिट्यूट, मुंबई विद्यापीठ / Confucius Institute, University of Mumbai, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ / Department of Marathi, University of Mumbai, अश्वमेध सॉफ्टवेअर सोल्युशन्स / Ashwamedh Software Solutions,
  गुरुनाथ कलमकर (मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ) / Gurunath Kalamkar (Department of Marathi, University of Mumbai), पूजा चितळे / Pooja Chitale,
  मनीष बावकर / Manish Bawkar, तुषार घाटे / Tushar Ghate

- **चित्रे / कला, मांडणी, अक्षर जुळणी**
  **Illustrations / Layout Design**
  दत्तात्रय पाडेकर / Dattatraya Padekar, सौरभ भोसले / Saurabh Bhosale,
  गिरिषा टिळक / Girissha Tilak, सायली थारळी / Sayali Tharali

- **प्रकाशक / Publisher**
  मुंबई विद्यापीठ / University of Mumbai, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई /
  Rajya Marathi Vikas Sanstha, Mumbai

- **संकेतस्थळ / Website**
  www.rmvs.marathi.gov.in www.mu.ac.in https://www.learn-marathi.com

- **ई-पत्ता / E-mail Address :** rmvs_mumbai@yahoo.com

Online Access Link : https://mu.ac.in/mymarathi3
Textbook, Workbook, Glossary and Free DVD **₹ 1250 $ 25 € 20**

# प्रस्तावना

अन्यभाषक भारतीय त्याचप्रमाणे परदेशी तरुण आणि प्रौढ व्यक्तींना मराठी भाषा शिकण्यासाठी 'माय मराठी' हे तृतीय स्तराचे पाठ्यपुस्तक आहे. सर्वसमावेशक सामग्रीतून संवादात्मक, कृतिशील अशा पायाभूत आधारावर ह्या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली आहे. मराठी भाषेचे काटेकोर पण परिणामकारक अध्ययन करण्याकरता हा एक अद्ययावत पद्धतीने भाषा शिकवण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांना आकलन, संवाद, वाचन तसेच लिखाण यांद्वारे मराठी भाषेतून योग्य रीतीने आणि परिणामकारक संवाद कसा साधावा याचे शिक्षण दिले जाते.

ह्या अभ्यासक्रमाच्या अध्यापन सामग्रीत प्रामुख्याने तीन पुस्तके आहेत १. डीव्हीडीसहित पाठ्यपुस्तक, २. सराव, चाचणी आणि उत्तरसंच असणारे अभ्यासपुस्तक आणि ३. मराठी - इंग्रजी आणि हिंदी, असा शब्दसंग्रह.

'माय मराठी पातळी ३' च्या ह्या खास पाठ्यपुस्तकात विषयानुरूप छायाचित्रे, रेखाचित्रे, मजकूर, कविता आणि गाणी, म्हणी आणि वाक्प्रचार, व्याकरण, साचेबद्ध सराव, 'करा आणि शिका' स्वाध्याय आहेत. तसेच खेळाद्वारे शिकवणे, समर्पक अर्कचित्रे, नवीन शब्दांवर दृष्टिक्षेप, सराव करण्यास उपयुक्त श्राव्य आणि दृक्श्राव्य चित्रफिती आहेत. सोबत विनामूल्य दिल्या गेलेल्या दृक्श्राव्य डीव्हीडीसह हे पाठ्यपुस्तक वापरायचे आहे. हा प्रकल्प पूर्णपणे शैक्षणिक तत्त्वावर राबवला जात आहे. परिपूर्णपणे भाषा शिकण्यास मदत व्हावी ह्या हेतूने ह्या डीव्हीडीमध्ये श्राव्य ध्वनिफिती तसेच निरनिराळ्या माध्यमांतून निवडलेल्या वैविध्यपूर्ण दृक्श्राव्य चित्रफिती समाविष्ट केल्या आहेत. शिक्षकांनी बहुपर्यायी प्रश्न आणि इतर प्रकारच्या प्रश्नावली वापरताना ह्या डीव्हीडीची मदत घेणे अपेक्षित आहे.

'माय मराठी पातळी ३'च्या अभ्यासपुस्तकात पाठ्यपुस्तकातील प्रत्येक धड्याखालील स्वाध्याय आहे. त्यासोबतच १. 'पातळी २'च्या उजळणीसाठी 'मागील भागात' या सरावाच्या धड्यानंतर एक विस्तृत चाचणी, २. प्रत्येक दोन धड्यांसाठी चाचणी आणि शेवटी ३. संपूर्ण 'पातळी ३'च्या अभ्यासक्रमाची एकत्रित चाचणी यांचा समावेश आहे.

शब्दसंग्रहात कठीण शब्दांची लिंगानुसार, तिन्ही वचनांनुसार आणि सामान्यरूपांनुसार विस्तृत माहिती समाविष्ट केलेली आहे. शिवाय इंग्रजी आणि हिंदी भाषेत त्या शब्दांच्या अर्थासह वाक्यांमध्ये उपयोग करून दाखवला गेला आहे.

'पातळी ३'चा संपूर्ण अभ्यासक्रम म्हणजे साधारणपणे १२० तासांची शिकवणी आहे. तथापि, ह्याचे अध्यापन करताना शिक्षकाला ह्यातील प्रत्येक धड्यासाठी साधारणपणे १२ तासांचा अवधी लागेल. ह्या सामग्रीत सराव आणि चाचणीसाठी पुरेशी सामग्री समाविष्ट केलेली असली, तरी प्रत्यक्ष शिकवताना संबंधित शिक्षकाला अभ्यासक्रमाव्यतिरिक्त अवांतर माहितीही द्यावी लागणार आहे. विद्यार्थ्यांसाठीही एक सूचना आहे की, योग्य तऱ्हेने मराठी बोलण्यासाठी त्यांनी एकवचन, अनेकवचन, सामान्यरूप तसेच लिंगानुसार नामांचा अभ्यास करण्याचा सराव करावा. सदर पुस्तके ही वर्गात शिक्षकांकडून समजून घेऊन शिकण्याच्या स्वरूपाची असली, तरी स्वयं-अध्ययन करणाऱ्यांना दिलेल्या सामग्रीतील विस्तृत शब्दसंग्रहाच्या आधारे ती समजून घेऊन शिकता येईल.

हा अभ्यासक्रम शिकवणाऱ्या शिक्षकांसाठी असा सल्ला आहे की, त्यांनी भाषाध्यापन-प्रशिक्षण घ्यावे, तसेच ह्या संदर्भात त्यांनी संपादक वा राज्य मराठी विकास संस्थेशी संपर्क साधावा.

प्रकल्पातील इथवरची ही अध्यापन सामग्री तयार करण्यासाठी कष्ट घेऊन हे सारे पूर्णत्वास नेण्यास साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आभार.

इंग्लिश आणि जर्मनप्रमाणे मराठीदेखील संपन्न आणि पूर्वपरंपरा असणारी इंडो-युरोपीय भाषा आहे. ह्या भाषेचे अध्ययन करून तिच्यावर सर्वसामान्य निजभाषकाइतके प्रभुत्व मिळवण्याकरता किमान ६ पातळ्यांची म्हणजेच अंदाजे ८०० तासांची आवश्यकता आहे. पुढील तीन पातळ्यांसाठी यथायोग्य सामग्री तयार करणे हे आमचे पुढील उद्दिष्ट आहे. या प्रकल्पांतर्गत स्वयं-अध्ययन करणाऱ्यांसाठी आम्ही संगणक आणि सहध्वनीद्वारे वापरली जाणारी मोबाईल ॲप्लिकेशन्सही बनवणार आहोत.

या कामात बहुमोल साहाय्य करणाऱ्या राज्य मराठी विकास संस्थेचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे आम्ही आभारी आहोत.

कुलगुरू सुहास पेडणेकर आणि प्र-कुलगुरू रवींद्र कुलकर्णी यांच्या नेतृत्वासह कार्यशील अशा मुंबई विद्यापीठाच्या अधिकाऱ्यांचे, तसेच हा प्रकल्प सुरळीत चालण्यासाठी साहाय्य करणाऱ्या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

विभा सुराणा, आनन्द काटीकर
संपादक
२०२०

# Preface

My Marathi is the level 3 course book particularly meant for non-native teens and adults, for both Indian and foreign Marathi language learners. It is prepared using an integrated communicative, task-based approach. It is a modest attempt to apply latest language teaching tools to facilitate the learning of Marathi systematically and effectively. It teaches the learners how to communicate correctly and effectively in Marathi by imparting understanding, speaking, reading as well as writing skills.

This course material consists of three books, namely 1) a textbook with a free DVD, 2) a workbook with exercises, tests and answer keys and 3) a Marathi Glossary in English and Hindi.

This particular textbook My Marathi for Level 3 consists of units such as thematic images and illustrations, texts, poems and songs, idioms and proverbs, grammar, pattern drills (saraav), 'do and learn' exercises, learning games, cartoons, audios and audio-visual components with exercises, vocabulary overview (drishtikshep) per chapter, as well as learner self-evaluation in all chapters. The textbook is to be used along with the free audio-visual DVD attached to it, which is meant purely for educational purpose. It consists of the audio section and a wide spectrum of audiovisual clips from the media which have been collated in accordance with the topic of the chapter and language proficiency level of the learners. The teachers are expected to use audio-visual material along with specific MCQs and other questions (written & oral).

The workbook of My Marathi for Level 3 consists of exercises for each chapter as well as the following tests 1) a comprehensive test for level 2 after mageel bhagat, 2) a test after every two chapters and 3) a comprehensive test for level 3 at the end.

The glossary or shabdasangraha gives a detailled list of new words with their gender in singular and plural forms as well as their oblique forms or samanyarupe. English and Hindi word meanings are given along with the usage of these words in sentences.

The entire Communicative Marathi Level 3 Course is designed for approximately 120 teaching hours. Thus, the teacher may take about 12 hours for each of the 10 chapters. Though enough exercises and tests have been given, the teacher is expected to give not only regular dictations but also supplementary material as and when required. The learners are advised to learn the nouns along with their gender with singular and plural forms as well as the oblique forms in order to

learn to speak correct Marathi. Though the book is meant for classroom teaching, self-learners too can make use of it with the help of the comprehensive glossary. The teachers using this book are advised to undergo rigorous teachers' training for the integrated communicative approach and may contact the editors or Rajya Marathi Vikas Sanstha for the same. It has taken sustained intensive work to prepare this material and we are extremely thankful to the entire team for making it happen.

Like English and German, Marathi too is a rich and old Indo-European Language and similarly requires at least 6 levels of language learning, i.e. approx. 800 hours for near native language proficiency. Preparing standardized material for further 3 levels for learning Marathi is a daunting task ahead of us and requires resources. Computer and Mobile applications (Apps) for self learners are also being prepared under this project. Such enterprises require expert inputs from diverse domains.

We are extremely thankful to the employees of Rajya Marathi Vikas Sanstha for their valuable cooperation.

We thank the authorities of the University of Mumbai led by the Vice Chancellor Suhas Pednekar and Pro-Vice Chancellor Ravindra Kulkarni to facilitate the smooth running of this project.

Vibha Surana, Anand Katikar
Editors
2020

# आभार | Acknowledgements

Abhijeet Ranadive
Aditya Badle
Amit Varandekar
Amruta Sudame
Anagha Mandavkar
Anuradha Mishra
Anil Sakpal
Ashish Sawant
Bharti Chatre
Disha Gudulkar
Disha Palkar
Gurudutt Kamath
Kadambari Bhandare
Kamala Ganesh
Madhura Gawande
Neha Thombare
Pradnya Dalvi
Prathmesh Jagtap
Prachi Sharma
Rajesh Wadekar
Ravindra Kulkarni
Shaleen Sharama
Shweta Redekar
Smita Shukla
Suhas Pednekar
Tanvi Paradkar
Vishal Bait

### Permission from copyright holders

Ashok Gole / Nilubhau Limaye Foundation
D. M. Mirasdar Pratishthan
Dr. Prakash Amte
Girish Kuber / Loksatta
Harshit Bongarde
Hemant Joglekar
Hridaynath Mangeshkar
Kiran V. Shantaram / Rajkamal Kalamandir
Mauj Prakashan
Naina Mehendale
Neha Ghatpande
New 18 Lokmat
Ramdas Bhatkal / Popular Prakashan
Ravindra Lakhe
Rohan Prakashan
Sachin Kundalkar
Shobha Bhagwat
Sumitra Madgulkar
Vijay Darda / Lokmat
Yashvantrao Mukt Vidyapith

### Excerpt / Text acknowledgement

Abhijit Gholap / Devisha Films
BBC News Marathi
Chandrashekhar Gokhale
Charuhas Pandit / Prabhakar Wadekar
Dr. Rajiv Sharangpani
Kavi Anand
Kedar Shinde / A.R.K. Productions
Kokan now
Mrunmayi Shivapurkar
Prasad Shirgaonkar
Purple Pebbles Pictures
Raanvata
Raja Badhe
Sachin Pilgaonkar / Sushriya private limited
S. D. Phadnis
Smita Talwalkar
Tomato FM
V. M. Kulkarni
Vijaya Rajadhyaksha

### Cover Page

Nagesh Sirsal

### ♦ विशेष तज्ज्ञ / External Experts

सुजाता महाजन / Sujata Mahajan, कलिका मेहता / Kalika Mehta

# अनुक्रमणिका


| पाठ | विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | मागील भागात | ९ |
| | चाचणी : मागील भागात | २४ |
| १ | व्यक्ती आणि वल्ली | ३३ |
| २ | कार्यक्षेत्र | ४९ |
| | चाचणी १-२ | ६७ |
| ३ | राहणीमान | ७६ |
| ४ | नखशिखान्त | ९१ |
| | चाचणी ३-४ | १०४ |
| ५ | पर्यावरण | ११२ |
| ६ | जागतिकीकरण | १३० |
| | चाचणी ५-६ | १४६ |
| ७ | विज्ञान, तंत्र,मंत्र | १५३ |
| ८ | सणवार | १६९ |
| | चाचणी ७-८ | १८३ |
| ९ | महाराष्ट्रातील प्रमुख शहरे | १८८ |
| १० | सामाजिक समस्या आणि सामाजिक मूल्ये | २०० |
| | चाचणी ९-१० | २२३ |
| ११ | पूर्ण चाचणी | २३१ |
| १२ | ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे अनुलेखन | २४६ |
| १३ | उत्तरसंच | २६५ |

# मागील भागात









## चला, उजळणी करू या...

- मराठी भाषा आणि मराठी भाषेचा अभ्यास
- साधा वर्तमानकाळ, साधा भूतकाळ, साधा भविष्यकाळ
- उभयान्वयी अव्यये, शब्दयोगी पदे
- विकारी आणि अविकारी विशेषणे, क्रियाविशेषणे
- प्रश्नशब्द : कसाय, कशीय, कशायत, कसं होतं इ.
- 'चा', 'ची', 'चे'
- सामान्यरूपे
- क्रियापद + 'ऊन'
- विभक्तिप्रत्यय

## मागील भागात

### १ उजळणी का करायची?

**योग्य अर्थ अधोरेखित करा.**

१. अरे, नाही तर 'पुढचं पाठ, मागचं सपाट' अशी गत होईल.

क. पुढच्या माणसाला पाठ दाखवणे.

ख. मागच्या माणसाला सपाट करणे.

ग. नवीन शिकणे, पण जुने विसरणे.

२. नीट लक्ष दे, नाही तर, 'नळी फुंकली सोनारे, इकडून तिकडे गेले वारे' असे होईल.

क. सोनाराला काम करायला नळी लागणे.

ख. सोनाराकडे वारा घ्यायला पंखा नसणे म्हणून नळी वापरणे.

ग. लक्ष न देता ऐकल्यामुळे काहीच डोक्यात न राहणे.

३. मी इतकं सांगूनही तू उजळणी केली नाहीस, म्हणजे 'पालथ्या घड्यावर पाणी'.

क. पाण्यामुळे घडा पालथा होणे.

ख. कोणी कितीही सांगितले, तरी त्याचा काही परिणाम न होणे.

ग. पालथ्या घड्यावर नेहमी पाणी टाकणे.

### २ साधा भूतकाळ

**१. रिकाम्या जागी क्रियापदाचे साध्या भूतकाळातील रूप लिहा..**



अनुश्री दुपारी फिरायला (जाणे) गेली. रस्त्यात तिला भूक (क) (लागणे) -----------------. तिने इकडे तिकडे (ख) (पाहणे) --------------. तिला एक टपरी (ग) (दिसणे) ------------. ती पटकन तिथे (घ) (जाणे) ------------ आणि तिने एक चहा (च) (मागवणे) ------------ . ती भरभर चहा (छ) (पिणे) --------------, तिने पैसे (ज) (देणे) ---------------- आणि ती पुढे (झ) (जाणे) ----------------.

**२. जुन्या मुंबईचे हे वर्णन रिकाम्या जागी ‘असणे’ आणि ‘नसणे’ ह्या क्रियापदांची योग्य रूपे भरून पूर्ण करा.**

पन्नास वर्षांपूर्वी मुंबई खूप वेगळी होती. इतकी माणसे (क) ---------------. लोकल ट्रेन (ख) -------------, पण गर्दी (ग) ---------------. रस्ते मोकळे (घ) ----------------, राहायला जागा (च) ----------------, ट्राम (छ) ----------------, बसेसना गर्दी (ज) ----------------. धक्काबुक्की (झ) -----------------, हवा शुद्ध (ट) -----------------, पाणी स्वच्छ (ठ) -----------------. कुठे गेली ती मुंबई?






**३. खालील चित्र नीट बघा आणि पुढे दिलेली गोष्ट साध्या वर्तमानकाळात आणि साध्या भूतकाळात पूर्ण लिहा.**



सकाळचे सहा वाजतात. अजून उजाडलेलं नसतं, तेवढ्यात दारावरची घंटा वाजते ...

सकाळचे सहा वाजले होते. अजून उजाडलं नव्हतं, तेवढ्यात दारावरची घंटा वाजली ...

## ३ अव्यये

**१. रिकाम्या जागा भरा.**

(जेव्हा - तेव्हा, जरी - तरी, जसं - तसं, जशी - तशी, जेव्हा - तेव्हा, ज्याला - त्याला)

क. मी -------------- बाजारात गेले होते, -------------- मला तो भेटला.

ख. -------------- मला वेळ नव्हता, -------------- मी त्याच्याशी दोन शब्द बोलले.

ग. त्याला -------------- हवं होतं -------------- करायला मी नकार दिला.

घ. -------------- मी निघाले, -------------- त्यानं मला अडवलं.

च. -------------- मी आज आहे, -------------- मी पूर्वी नव्हते.

छ. -------------- मी आज घाबरते आहे, -------------- मी पूर्वी धमकी दिली होती.

२. आमची बाग.

**योग्य जागी शब्दांची योग्य ती जोडी वापरून बागेचे वर्णन पूर्ण करा.**

(जिथे – तिथे (× २), ज्याच्या - त्याच्या, ज्याने - त्याने, जर - तर, जो - तो)

हे जमिनीत रोवलेले पिवळे खांब दिसतायत ना तुम्हाला? (क) ------------ हा खांब असेल, (ख) ---------- मोठी झाडं लावायचीयत. (ग) ----------- मोठी झाडं लावेल, (घ) --------- कायम त्यांची काळजी घेईल. (च) ------------ मोठी झाडं लावाल, (छ) ------------ लहान फुलांचे वाफे करू नका. (ज) ------------ फुलझाडांची जबाबदारी घेतलीय, (झ) -------------------- ती शेवटपर्यंत पाळायचीय. (ट) ------------- तुम्हाला काही शंका आल्या, (ठ) ----------- मला मनमोकळेपणाने विचारा. एक लक्षात ठेवा, (ड) ---------- मुळे आपल्याला ही बाग फुलवायची संधी मिळालीय, (ढ) ------------ विश्वासाला आपण तडा जाऊ द्यायचा नाही.




## ४ विशेषणे

१. **वर्गातील कोणत्याही एका विद्यार्थ्याचे फक्त तीन विशेषणे वापरून वर्णन करा. इतर विद्यार्थी तो किंवा ती कोण आहे हे ओळखतील. योग्य ते उभयान्वयी अव्यय वापरा.**

उदा. ह्या व्यक्तीचे डोळे मोठे आहेत / काळे आहेत. तिने निळे कपडे घातले आहेत ...

२. **खालीलपैकी कोणत्याही एका किंवा तुमच्या आवडत्या इतर कोणत्याही प्रसिद्ध व्यक्तीचे चार किंवा पाच विशेषणे वापरून वर्णन करा. वर्गातील इतर विद्यार्थी त्या व्यक्तीला ओळखतील.**






## ५ मला झालंय तरी काय?

१. चित्रे आणि आजारांच्या जोड्या लावा.



क


ख


ग

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | डोळे येणे | ३ | ताप | ५ | खोकला | ७ |
| दातदुखी | २ | सर्दी | ४ | कंबरदुखी | ६ | पोटदुखी |

घ




च



छ



ज



उदा. ज – २

## ६ नामांची व सर्वनामांची सामान्यरूपे

१. खालील वाक्यांमध्ये काही शब्द चुकून जोडले गेले आहेत. योग्य त्या ठिकाणी शब्द वेगळे करून मूळ वाक्य पुन्हा लिहा.

**शशीलापुण्यातनोकरी लागली, म्हणून ती भारी खूश झाली.**
**पण पुण्यातमराठीशिवाय थोडे अवघड होणार, याविचारामुळेतिने मराठी भाषा शिकण्याचे**
**ठरवले. मग तिने ऑनलाईन मराठी वर्गांचीमाहिती मिळवली.**
**भरपूर वाचन आणि सराव करून तिनेवर्षभरातमराठी भाषेवरप्रभुत्व मिळवले.**
**तिच्याया मेहनतीमुळेचती आता अस्खलित मराठी बोलू लागली आहे.**

उदा. शशीला पुण्यात नोकरी लागली, ..............................................

...............................................................................

...............................................................................

...............................................................................

**२. खालील वाक्य वाचून पाहा.**

रामाच्या दु कानात उ त्तम चि वडा मिळतो.

**आता, वेगळी झालेली अक्षरे योग्य ठिकाणी जोडून अर्थपूर्ण वाक्य लिहा.**

**३. नामांची व सर्वनामांची सामान्यरूपे तुम्ही ह्याआधीच शिकला आहात. तेव्हा खाली कंसात दिलेल्या अक्षरांच्या साहाय्याने सामान्यरूपाची व्याख्या लिहा.**

(ला, ना, च्या, तील, त, ला, च्या, ला)

क) वाक्या ------- (ख) नामा ------- किंवा (ग) सर्वनामा ------- विभक्तिप्रत्यय किंवा शब्दयोगी अव्यय (घ) जोडता -------, त्या (च) नामा ------- किंवा (छ) सर्वनामा ------- मूळ (ज) रूपा ------- जो बदल होतो, त्या (झ) बदला ------- सामान्यरूप असे म्हणतात.

**४. खालील वाक्यांचा अर्थ लागत नाहीये. वाक्यातील अधोरेखित नामांना व सर्वनामांना योग्य विभक्तिप्रत्यय जोडून वाक्य पुन्हा लिहा.**

उदा. बिरबल -------- बादशाह -------- प्रश्न -------- योग्य उत्तर दिलं. बादशाह -------- तो -------- खूप कौतुक वाटलं.

बिरबलाने बादशाहाच्या प्रश्नाला योग्य उत्तर दिलं. बादशाहाला त्याचं खूप कौतुक वाटलं.

क. राजू एकदा अभ्यास -------- बसला तेव्हा तो -------- आई -------- अगदी धन्यच वाटलं.

ख. सखी -------- आई -------- बरं वाटत नव्हतं, म्हणून ती -------- आई -------- दवाखाना -------- नेलं.



ग. मी -------- ताई दिवाळी -------- दारासमोर मस्त रांगोळी काढते. आम्ही -------- चाळ -------- लोक -------- ती -------- फार हेवा वाटतो.

घ. ती साप बघून घाबरली, म्हणून ती -------- आरडाओरडा केला.

च. कुठला सण कसा साजरा करावा, हे जो -------- तो -------- ठरवावं.

छ. मुसळधार पावसामुळे गाड्या रस्ता -------- अडकल्या.

ज. हिंदू धर्मातले लोक देऊळ -------- जाण्याआधी चपला देवळाबाहेर काढून ठेवतात.

झ. आमच्याकडे ईद -------- बिर्याणी बनवतात. अर्थात शिरखुर्मासुद्धा.

ट. ते -------- प्रेमविवाह आहे, हे ते -------- ह्या कान -------- त्या कान -------- कळू दिले नाही.

ठ. कोणी कुठे कुठल्या प्रकारचे कपडे घालावेत, हा जो -------- तो -------- प्रश्न!

## ७ साधा भविष्यकाळ

**१. आई गावाला गेली की ऊर्जित काय काय करेल? उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहा आणि संवाद पूर्ण करा.**

आई : ऊर्जित, लक्षात राहील ना मी सांगितलेलं सगळं? मी इथे नसताना तुला काय काय करायचंय? घर साफ ठेवायचंय, स्वयंपाकाच्या बाईंना रोज भाजी आणून द्यायचीय, शाळेत वेळेवर जायचंय, अभ्यास करायचाय, मधल्या वेळचा डबा न विसरता न्यायचाय, सकाळी आणि दुपारी दूध प्यायचंय, चहा नाही. चंदाशी भांडायचं नाहीये. खूप टीव्ही बघायचा नाहीये. मला पत्र लिहायचंय.

ऊर्जित : हो गं आई, मी सगळं करीन / करेन.

क. ____________________

ख. ____________________

ग. ____________________

घ. ____________________

च. ____________________

छ. ____________________

ज. ____________________

झ. ____________________

ट. ____________________

**२. २०२५ मध्ये आपलं आयुष्य कसं असेल? उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करा.**

उदा॰ शहर – रस्ते – जागा : शहरांमध्ये रस्त्यांवर गाड्या चालवण्यासाठी जागा उरणार नाही.

क. दूषित हवा – लोक – मास्क

ख. जेवणाऐवजी – माणसे – व्हिटॅमिन

ग. प्राणवायू – विकत घेणे


घ. संगणक – रद्दीत जमा होणे

च. दुकान ही संकल्पना – नाहीशी होणे



## ८ शब्दयोगी पदे

**१. पुढील चित्रांमधील फरक ओळखा पाहू.**



(खुर्ची, घड्याळ, लॅम्प, टेडीबेअर, सोफा, आरसा, खेळण्यातली गाडी, पुस्तके, टेबल, कुंड्या, रोपटी, कंदील, टेलिफोन, टीव्ही, रेडिओ, चित्र, बाटली, मूर्ती, फुलदाणी, फोटो इ॰)

**दोन विद्यार्थी एकत्र येतील आणि पुढे कंसात दिलेले शब्द वापरून खालीलप्रमाणे संवाद साधतील आणि तो फरक शोधून काढतील.**

**विद्यार्थी १:** सोफ्यासमोर एक छोटंसं टेबल आहे, बरोबर?

**विद्यार्थी २:** बरोबर. सोफ्यासमोर एक टेबल आहे.

**विद्यार्थी १:** त्या टेबलावर दोन पुस्तकं आहेत, बरोबर?

**विद्यार्थी २:** बरोबर. त्या टेबलावर दोन पुस्तकं आहेत.

**२. खाली सुचवलेल्या गोष्टी पूर्ण करा.**

उदा॰ एकदा पाऊस (ऊन्ह) उन्हाच्या प्रेमात पडला. त्याला उन्हाची रोज स्वप्नं पडू लागली. उन्हाशिवाय जगणं त्याला कठीण वाटू लागलं...

क. एकदा (पाणी) ------------------- आपणसुद्धा कधी कोरडं व्हावं...

ख. एकदा (झाड) ----------------- वाटलं, आपणच (आपण) -----------------
(सावली) ----------------- निवांत पडावं...

ग. एकदा एक (रस्ता) ------------------- (खड्डे) ------------------- प्रेमात पडला...


घ. एकदा (दार) ---------------- वाटलं, आपण (घर) --------------- सोडून जावं...

३. **योग्य ते प्रत्यय लावून रिकाम्या जागा भरा.**

**रानातली झोपडी.**



संध्याकाळ होताच बबननं (क) गाई------ गोठ्यात बांधलं आणि (ख) घोड्या------ पागेत नेलं. बाकीच्या (ग) गुराढोरां-------- त्यांच्या जागी पोचवल्यावर (घ) त्या------ बरं वाटलं. रानात वाघ आल्याची बातमी ऐकल्यापासून त्याचा जीव थाऱ्यावर नव्हता. त्याने अजून (च) वाघा—— पाहिलं नसलं, तरी काल रात्री त्याची डरकाळी ऐकून बबनची गाळण उडाली होती. तो आवाज ऐकून बबनच काय, सगळ्या जनावरांचापण थरकाप झाला होता. गायी-म्हशी हंबरायला लागल्या होत्या आणि घोडा खिंकाळायला! (छ) बबन------ (ज) गायीम्हशीं------ कडबा दिला आणि (झ) घोड्या------ चारा घालून तो डबा खायला बसला. त्याच्या आईनं (ट) त्या------ झुणकाभाकर बांधून दिली होती. (ठ) लक्ष्मी------, त्याच्या (ड) बायको------, भाकरी थापणं अजून जमत नव्हतं; पण शेतीची कामं करण्यात ती तरबेज होती. जेवण झाल्यावर हात धुवायला बबन बाहेर आला, तर झोपडीत आणलेली शेळीपण बें बें करत धडपडत त्याच्या मागे आली आणि काही कळायच्या आतच कुठूनतरी वाघानं उडी घेतली आणि (ढ) शेळी------ ओढत जंगलात नेलं. घाबरलेल्या (ण) बबन------ काय करावं ते सुचेना. बाहेर जायची सोय नव्हती. झोपडीत एकट्यानं बसायचीही खूप भीती वाटत होती. खूप विचार केल्यावर (त) बबन------ एक युक्ती सुचली.



शेजारीच बसलेल्या कुत्र्याच्या म्हणजे मोतीच्या गळ्यात त्यानं एक चिठ्ठी बांधली : "रानात वाघ आलाय, मी एकटा आहे, माझ्या मदतीला या!" आणि मोतीला थोपटून, झोपडीचं दार किलकिलं करून (थ) त्या------ दिलं सोडून. (द) त्या------ खात्री होती, मोती वेगानं धावत गावात जाईल आणि मदत घेऊन येईल. तो नाही सापडणार वाघाच्या तावडीत!

४. **खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

क. गाय कुठे राहते?

---------------------------------------------------------------------------------

ख. घोडा कुठे राहतो?

---------------------------------------------------------------------------------

ग. शेळी कुठे होती?

---

घ. वाघ कुठे होता?

---

च. बबन आज कुठे राहणार होता?

---

छ. गायीम्हशी काय खातात?

---

ज. घोडा काय खातो?

---

झ. बबननं काय खाल्लं?

---

ट. घोड्याच्या ओरडण्याला काय म्हणतात?

---

ठ. गायीच्या ओरडण्याला काय म्हणतात?

---

ड. शेळी कसं ओरडते?

---

**५. बरोबर उत्तरावर खूण करा.**

क. जीव थाऱ्यावर नसणे : (१) कशातच लक्ष न लागणे / अतिशय अस्वस्थ वाटणे (२) जीव जाणे (३) जीव देणे

ख. गाळण उडणे : (१) चहा गाळणे (२) हातातली गाळणी पडणे (३) खूप भीती वाटणे

ग. थरकाप होणे : (१) थरथरण्याचा आजार होणे (२) खूप घाबरणे (३) थंडी वाजणे

घ. कामात तरबेज असणे : (१) काम तयार असणे (२) ठरावीक काम करण्यात हुशार असणे (३) काम न आवडणे

## ९ तुलनात्मक शब्द

**१. खालील पर्यायांचा तुलनेसाठी वापर करून रिकाम्या जागा भरा.**

(हून (× ५), सर्वात (× ४), सर्वात जास्त, खूप, जवळजवळ तेवढीच (× २), जवळजवळ तेवढाच)

क. मकरंद ---------- जोरात धावतो, पण त्याच्या --------- जोरात मिलिंद धावतो. अक्षय ---------- हळू धावतो.

ख. मला गणितात ९० मार्क मिळाले. सावीला किती मिळाले? काय, ९५? म्हणजे माझ्या ------------- जास्त?

ग. अमेय किती गोरा आहे ना! हो, पण राधिका ---------------- -------------- गोरी आहे. तिच्या --------- जास्त गोरं कोण असेल? ---------------- ----------------- गोरी अमला आहे.

घ. सर्व प्राण्यांत हुशार कोण? मला वाटतं ------------- हुशार हत्ती असतो. हो, पण कोल्हाही ---------------- -------------- हुशार असतो. पण कबुतर नक्कीच ------------- ढ असतं.

च. आमच्या घरात सगळेच उंच आहेत. आई ------------- उंच मी आहे, माझ्या ------------- उंच ताई आहे, पण ------------- उंच बाबाच आहेत.

## १० खालील शब्द वापरून रिकाम्या जागा भरा.

(रात्रीच्यारात्री, मागच्यामागे, जिथल्यातिथे, वेळच्यावेळी, आत्ताच्याआत्ता, आजच्याआज, रोजच्यारोज, जसंच्यातसं)

१. मुलांनी ------------------------ व्यायाम करावा.
२. हे काम ------------------------ झालं पाहिजे.
३. आजारी माणसांनी ------------------------ औषध घ्यावं.
४. तू ------------------------ इथून जा.
५. त्याने ------------------------ चित्र काढलं.
६. तिने ------------------------ काम पूर्ण केलं.
७. तो ------------------------ पळून गेला.
८. सर्व वस्तू ------------------------ ठेवाव्या.



## ११ हाती, पायी आणि हातीपायी

**चित्र पहा, विचार करा आणि गाळलेल्या जागा भरा.**



१. एवढा खटाटोप करून माझ्या ------------ शेवटी काहीच लागलं नाही .



२. आमची शाळा आमच्या घरापासून बरीच दूर होती. ------------ गेलात तर जायला निदान अर्धा तास तरी लागला असता.



३. राघव लबाडीने जिंकलाय, ह्याचा तुझ्याकडे काय पुरावा आहे? शेवटी ज्याच्या -------------- ससा तो पारधी!



४. इतक्या पावसात घरी येऊ नकोस, ऑफिसातच थांब. उशीर झाला तरी चालेल, पण -------------- धड घरी पोहोच म्हणजे झालं.



५. आत्ताच ------------- आलेल्या बातमीनुसार गडावर चढणारी सर्व मुले गडमाथ्यावर सुखरूप पोहोचली आहेत.



६. मला अचानक घरी आलेला पाहून चोर ------------ लागेल ते सामान घेऊन पसार झाले.



७. हे बघ, तुला नक्की काय हवंय ते आधी ठरव, नाही तर ‘तेल गेलं तूप गेलं ------------ धुपाटणं आलं’ अशी गत होईल.



८. मी लाख गाडीची स्वप्नं पाहिली, पण देवाच्या मनात मी ------------ चालावं असंच होतं, त्याला कोण काय करणार?

## १२ शब्दकोडे

**ह्या शब्दकोड्यात कोणते खाद्यपदार्थ लपले आहेत ते ओळखा. जे शब्द सापडतील त्यांच्याभोवती वर्तुळ करा. बघू, कोण जास्तीत जास्त शब्द शोधतो.**

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री | था | लि | पी | ठ | म | शे | व | ला | डू |
| खं | च | क | ली | पो | खि | च | डी | आ | क |
| ड | ट | द | पो | हे | र | ता | क | म | ड्डा |
| सा | ख | र | ळी | र | भा | क | री | टी | कॉ |
| जि | ल | बी | मा | स | र | ब | त | मा | फी |
| मी | ठ | दू | पा | व | भा | जी | लो | ण | च |
| भ | जी | ध | न | मी | सो | ल | क | ढी | हा |
| जी | पे | र | गी | ठ | को | शिं | बी | र | बा |
| गो | ज | स | ठे | व | डा | चि | व | डा | सुं |
| कों | ब | डी | चा | र | स्सा | व | र | ण | दी |

## १३ 'ज्याच्यात, त्याच्यात, त्यांच्यात, ह्यांच्यात, तुझ्यात, माझ्यात (× २), आपल्यात (× २), ज्यात त्यात, ज्यांच्यात' ह्या शब्दांचा रिकाम्या जागांमध्ये वापर करून वाक्ये पूर्ण करा.

उदा. दोन वाट्यांमध्ये बासुंदी आहे. जिच्यात कमी आहे तिच्यात अजून थोडी घाल.

१. ---------------- जो अभ्यासूपणा आहे तो मला आवडतो. ---------------- मात्र हा गुण नाही.

२. त्यानं प्रामाणिकपणे काम करावं अशी अपेक्षा होती. पण ---------------- असलेल्या अप्रामाणिकपणामुळे त्याची नोकरी गेली.

३. ---------------- नाक खुपसायची तिची सवय तिला कधी तरी गोत्यात आणेल.

४. ---------------- निळ्या रंगाच्या छटांचा वापर जास्त केलेला आहे, ते चित्र मला आवडले.

५. "तुझ्यात आणि ---------------- काही मतभेद असू नयेत, कारण ---------------- तसे मतभेद असतील तर आपण एकत्र काम कसं करू शकू?"



६. कुठल्याही शुभकार्याला सुरुवात करताना देवदर्शनाला जाण्याची प्रथा -------------- आहे.

७. “अरे, सगळी मुलं बाहेर खेळतायत. घरात एकटाच बसण्यापेक्षा ---------------- खेळायला जा की!”

८. ---------------- हिंमत असेल त्यांनी नदी ओलांडून पलीकडे जावे.

९. “आत्ताच ह्यांची चर्चा मी ऐकली. काही अर्थ नाही रे ----------------. कुठल्याच मुद्द्याला धरून ते बोलत नव्हते.”

## १४ नाम + क्रियापद

**१. खाली दिलेल्या क्रियापदांना कोणती नामे लागू शकतात ते लिहू या. एकच नाम अनेक क्रियापदांनाही लागू शकते.**

(आजार, टिंगल, उशीर, उत्साह, दुरुस्ती, गोंधळ, स्वयंपाक, लाज, फजिती, आश्चर्य, पोपट, ओढाताण, नट्टा-पट्टा, काळजी, नमस्कार, अभिमान, दमछाक, अभिनंदन, स्वागत, आदर, सर्दी, खोकला, कौतुक, आनंद)




________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

________________________________________________

**२. खाली दिलेली क्रियापदे कोणत्या नामांबरोबर आणि इतर शब्दांबरोबर आली आहेत ते पाठ्यपुस्तकातील तत्त्वांचा अभ्यास करून लिहा.**

क. वाटणे :

ख. होणे :

ग. करणे :

घ. लावणे :

**३. चुकीच्या नामावर काट मारू या.**

उदा. लावणे : झाडे / रंग / ~~उत्तर~~ / कुंकू / सामान

क. घेणे : आढावा / निरोप / औषध / सत्कार / निर्णय

ख. देणे : अभिनंदन / भेट / शुभेच्छा / आशीर्वाद

ग. काढणे : काम / खोड्या / छेड / आयुष्य / विचार

घ. होणे : आनंद / दु:ख / राग / त्रास

**४. चुकीच्या क्रियापदांवर काट मारू या.**

क. काम : करणे / सांगणे / देणे / काढणे / ठरवणे / घेणे / लावणे / लागणे / घालणे / वळणे / चालणे / पळणे / उठणे / होणे / असणे / तपासणे / शिकणे / विकणे / दिसणे / लिहिणे /

ख. आनंद : होणे / वाटणे / देणे / घेणे / करणे / दिसणे / ठरवणे / लावणे / काढणे / चालणे / विकणे / तपासणे / उठणे / पळणे / सांगणे / दाखवणे / लिहिणे

**५. रिकाम्या जागा भरू या. अनेक उत्तरे शक्य आहेत.**

क. त्याला शिष्यवृत्ती मिळाली म्हणून त्याच्या शिक्षकांना खूप आनंद ------------------.

(होणे / लागणे / वाटणे )

ख. अचानक कोणी तरी “इथे बॉम्ब आहे!” असं म्हटल्यावर एकच गोंधळ ---------------

(उडणे / होणे / करणे)

ग. पर्यावरण वाचवायचे असेल तर प्रत्येकाने एक तरी झाड ------------------ पाहिजे.

(लागणे / लावणे / जगवणे)

घ. आजीने सर्दीचं औषध ------------------. (देणे / घेणे / बनवणे)

**६. ‘करणे’ हे क्रियापद पाठ्यपुस्तकात कोणत्या दोन विरुद्धार्थी नामांच्या बरोबर वापरले आहे? ती नामे लिहा.**

# तोंडी परीक्षा

एकूण गुण ३०

## १ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)

**१. खालील उतारा मोठ्याने वाचून दाखवा.** **(३)**

जर्मन, फ्रेंच, स्पॅनिश ह्या युरोपीय भाषांबरोबरच आता चिनी, जपानी ह्यांसारख्या आशियायी भाषासुद्धा अन्यभाषकांना आकर्षित करू लागल्या आहेत. कारण अर्थातच ह्या देशांनी घेतलेली आर्थिक झेप, वैज्ञानिक, तांत्रिक, औद्योगिक क्षेत्रात केलेली प्रगती आणि आंतरराष्ट्रीय बाजारात सिद्ध केलेलं स्वत:चं वर्चस्व. त्यामुळे अर्थातच ह्या भाषांना आणि पर्यायाने ह्या भाषांच्या जाणकारांनाही आज अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त होताना दिसतंय. भारत आणि चीन ह्या देशांत चालणारा आणि दिवसेंदिवस वाढत जाणारा व्यापारही हेच दर्शवतो की केवळ भारत चीनसाठी मोठी बाजारपेठ नसून चीनही भारतासाठी एक एक्स्पोर्ट डेस्टिनेशन बनलंय. आणि मग अशा सुवर्णसंधीचा फायदा आपण का बरं करून घेऊ नये? चिनी भाषा शिकूनही आज उत्तमोत्तम संधी उपलब्ध होतायत. तुम्ही अनुवादक / दुभाषी, क्रॉस कल्चरल ट्रेनर, भाषा प्रशिक्षक / शिक्षक म्हणून काम करू शकता. ह्याशिवाय सरकारी क्षेत्र, टुरिझम आणि हॉस्पिटॅलिटी तसेच हॉटेल मॅनेजमेंट ह्या क्षेत्रांमध्येही चिनी भाषेचे जाणकार, दुभाषी ह्यांना अनेक संधी उपलब्ध आहेत व उपलब्ध होत राहणार आहेत. शिवाय वैज्ञानिक शोध प्रकल्पांमध्ये, सिनेमा, वेब सिरीजच्या सबटायटलिंगसाठी, विविध बी॰पी॰ओज॰, कॉल सेंटर्स ह्यांमध्येही चिनी भाषातज्ज्ञांची गरज सतत असणार आहे.

**२. चूक की बरोबर ते लिहा.** **(२)**

क. युरोपीय भाषांपेक्षा आशियायी भाषांना हल्ली जास्त मागणी आहे.

ख. चिनी भाषातज्ज्ञांचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत जाणार आहे.

**३. खालील प्रश्नांची तोंडी उत्तरे द्या.** **(२)**

क. वरील उताऱ्याला समर्पक शीर्षक द्या.

ख. चिनी भाषेच्या जाणकारांना कोणत्या संधी उपलब्ध आहेत?

ग. तुम्हाला एखादी परकीय भाषा शिकायला आवडेल का? कारण द्या.

## २ संवाद साधा. (एकूण गुण १०)

**१. पुढीलपैकी एक प्रसंग निवडा आणि दोन-दोन जणांचा एक संवाद सादर करा.**

क. तुम्ही कामानिमित्त पॅरिसला आला आहात आणि तुमचा पासपोर्ट हरवलाय.

ख. बाबांचा ६० वा वाढदिवस येतोय. त्यांच्यासाठी एक सरप्राईज पार्टी ठेवायचीये.


ग. स्वयंपाक करण्याचा आईला कंटाळा आलाय आणि बाहेरचं आजीला चालत नाही.
घरात बाबा, दादा आणि तुम्ही आहात. कोण करणार स्वयंपाक?

## ३ चित्रवर्णन (एकूण गुण ५)

खालीलपैकी एक चित्र निवडून पुढील प्रश्नांच्या मदतीने वर्णन करा.
प्रश्न : चित्रात कोण दिसत आहे? त्यातील व्यक्ती काय करत आहेत? त्यात इतर काय दिसत आहे?
त्यात कोणता विषय मांडला आहे? त्या विषयासंबंधीचे तुमचे काय मत आहे?


क


ख


ग


घ


च


छ

## ४ श्रुतलेखन (परीक्षकासाठी उतारा शेवटी दिला आहे) (एकूण गुण ५)

# लेखी परीक्षा

एकूण गुण ७०

१ पुढील उतारा वाचा आणि त्यावर विचारलेल्या प्रश्नांची योग्य उत्तरे लिहा. (एकूण गुण १२)

खरं तर रीमा रोज उशिरा उठते. पण काल ती नेहमीपेक्षा लवकर उठली. बाहेर अजूनही अंधारच होता. आकाशात तिला चांदण्याही स्पष्ट दिसल्या. रीमाला आश्चर्यच वाटलं. तिने अशी पहाट प्रथमच पाहिली. नेहमी तिला सूर्योदयानंतर जाग येते. पण काल पहाटे पहाटे कोणीतरी रस्त्यावरच्या कुत्र्यांना दगड मारला आणि त्या कुत्र्यांच्या भुंकण्यानं रीमाला जाग आली. तिनं पुन्हा झोपण्याचा प्रयत्न केला पण तिला पुन्हा झोपच लागली नाही. म्हणून ती उठून बाल्कनीत उभी राहिली. ती रोजच त्या बाल्कनीत तासनतास उभी राहते. तिला फार आवडते ती बाल्कनी. तिथून समोरचा सगळा रस्ता, कडेची झाडं, रस्त्यापलीकडची शेतं आणि त्यापलीकडचा डोंगरही दिसतो. रस्त्यावरची रहदारी पाहताना तिचा वेळ मजेत जातो. दिवसभर खूप गोंगाट असतो रस्त्यावर. काल पहाटे मात्र त्या रस्त्यावर कुत्र्यांशिवाय कोणीही नव्हतं. झाडंही शांत होती. रस्त्यावर, शेतांमध्ये, सगळीकडे खूप शांतता होती. थोड्या वेळाने पक्ष्यांचा आवाज येऊ लागला. आणि मग तिला डोंगरामागे आकाश लाल होताना दिसलं. हळूहळू डोंगरामागून सूर्याचा लालभडक गोळा वर आला. सूर्याचा प्रकाश सगळीकडे पसरू लागला. रीमाने सूर्योदय होताना प्रथमच पाहिला. ती त्या कोवळ्या सूर्याच्या प्रेमातच पडली आणि तेव्हाच रीमानं निश्चय केला, 'मी आता रोजच सूर्योदय बघायला उठणार!'

**१. पुढीलपैकी कोणते वाक्य बरोबर आहे?** ---------------------- **(१)**

क. रीमा रोज उशिरा उठते.

ख. काल रीमा सूर्योदयानंतर उठली.

ग. काल रीमा नेहमीसारखी वेळेत उठली.

**२. पुढीलपैकी कोणते वाक्य चूक आहे?** ---------------------- **(१)**

क. कुत्र्यांच्या भुंकण्याने रीमाला जाग आली.

ख. पहाटे रस्त्यावर खूप रहदारी होती.

ग. रीमाने सूर्योदय प्रथमच पाहिला.

**३. उताऱ्यात कोणते क्रियापद वर्तमानकाळ, भूतकाळ आणि भविष्यकाळ या तीनही रूपांत आले आहे?** -------------------- **(१)**

**४. बाल्कनीतून रीमाला काय काय दिसते?** **(२)**

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

**५. पुढील वाक्यांमध्ये कंसातील सूचनेप्रमाणे बदल करून वाक्य पुन्हा लिहा. (३)**

क. बाहेर अजूनही अंधारच होता. (क्रियापद वर्तमानकाळात लिहा.)

-------------------------------------------------------------------------------

ख. रस्त्यावरची रहदारी पाहताना तिचा वेळ मजेत जातो. (क्रियापद भूतकाळात लिहा.)

-------------------------------------------------------------------------------

ग. झाडंही शांत होती. (ठळक शब्दाचे वचन बदला.)

-------------------------------------------------------------------------------

**६. वरील उताऱ्यात आलेल्या कोणत्याही दोन विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या लिहा. (४)**

-------------------------- * --------------------------

-------------------------- * --------------------------

२ पुढील संवादात रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा. (गुण ५)

(कधीतरी, रोजच्यारोज, वेळच्यावेळी, अनेकदा, रात्रीबेरात्री)

मनीष : हाय, शीतल! तू इथे? कशीयेस?

शीतल : हाय! मी रोजच येते इथे जॉगिंगला. पण तुला कधी पाहिलं नाही याआधी.

मनीष : मी ---------------------- नाही येत. ---------------------- येतो.

शीतल : माझी सकाळी साडेसहाची वेळ ठरलीये. तासभर जॉगिंग केलं की मग पंधरा मिनिटं प्राणायाम. सगळं कसं ---------------------- करते मी.

मनीष : मला ---------------------- ऑफिसमधून यायला खूप उशीर होतो. मग जेवण, झोप, सगळ्यालाच उशीर. त्यामुळे मला रोज येणं जमत नाही.

शीतल : पण असं ---------------------- जेवणं तब्येतीसाठी चांगलं नाही.

मनीष : खरंय तू म्हणतेस ते. म्हणूनच दिनक्रम बदलायचं ठरवलंय मी आता.

शीतल : अरे वा! शुभेच्छा!

३ पुढील वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील शब्दांची योग्य रूपे लिहा. (गुण ५)

१. आज छायाच्या (घर) ---------------------- पाहुणे येणार आहेत.

२. (ते) ---------------------- यायला थोडा उशीर होईल.

३. पाहुणे म्हणजे (छाया) ---------------------- सर आणि (ते) ---------------------- पत्नी येणार आहेत.

४. म्हणून (छाया) ---------------------- आज खास आवराआवर केली आहे.

४ पुढील तक्ता पूर्ण करा. (गुण १४)

| | नाम | लिंग | वचन | सामान्य रूप |
|---|---|---|---|---|
| १. | कान | ------------------- | एकवचन | ------------------- |
| २. | रेघ | ------------------- | ------------------- | रेघां- |
| ३. | झाड | ------------------- | अनेकवचन | ------------------- |
| ४. | विहीर | ------------------- | एकवचन | ------------------- |
| ५. | लाडू | ------------------- | ------------------- | लाडवा- |
| ६. | तळे / तळं | ------------------- | ------------------- | तळ्या- |
| ७. | नदी | ------------------- | अनेकवचन | ------------------- |

५ पुढील वाक्यांतील अधोरेखित शब्दांच्या जागी कंसातील योग्य समानार्थी शब्द लिहून वाक्ये पुन्हा लिहा. (गुण ५)

(सगळीकडे, उत्तम, काळोख, महान, ठेंगणी)

१. हिवाळा सुरू झाला, लवकर अंधार पडायला लागला आता.

-----------------------------------------------------------------------

२. चार्ली चॅप्लीन एक थोर कलाकार होता.

-----------------------------------------------------------------------

३. मनोजच्या यशाची कीर्ती सर्वत्र पसरली.

-----------------------------------------------------------------------

४. जपानी माणसे काहीशी बुटकी असतात.

-----------------------------------------------------------------------

५. ‘रुचकर’ भोजनालयात मराठी पद्धतीचं उत्कृष्ट जेवण मिळतं.

-----------------------------------------------------------------------

६ पुढील वाक्यांचा योग्य क्रम लावून उतारा पुन्हा लिहा. (गुण १०)

१. श्रीधरने खूप मेहनतीने हे यश मिळवले.
२. आज श्रीधर पेढे घेऊन घरी गेला.
३. पण मनासारखी नोकरी मिळाली नव्हती.
४. कारण कंपनीने त्याला दुसऱ्याच दिवशी बंगळुरूला यायला सांगितले.
५. त्याला बंगळुरूमध्ये एका मोठ्या बहुराष्ट्रीय कंपनीत नोकरी मिळाली.
६. गेली दोन वर्षे त्याने अनेक ठिकाणी नोकरीसाठी अर्ज केले.
७. त्यामुळे तो खूप खूश होता.
८. पण त्याला काही इलाज नव्हता.
९. शेवटी आज बंगळुरूहून मेलद्वारे त्याला नोकरी मिळाल्याचे कळले.
१०. श्रीधरच्या आईला त्याला नोकरी लागल्याचा आनंद झाला पण थोडे वाईटही वाटले.

७ योग्य ते शब्द वापरून वाक्य पूर्ण करा. एक शब्द एकदाच वापरा. (गुण १०)

(कारण, म्हणून, त्यामुळे, आणि, शिवाय, पण, किंवा, तरी, जर - तर, की)

१. झोपेची गरज व्यक्तीप्रमाणे बदलत असली, --------------------------- किमान ७ ते ८ तासांची झोप प्रत्येकाला आवश्यक असतेच.
२. नेहमीची लोकल चुकली माझी, --------------------------- उशीर झाला.
३. संजिदा एक यशस्वी गायिका आहे. ती उत्तम चित्र काढते. --------------------------- गिर्यारोहणाचीही आवड आहे तिला.
४. तुम्ही पन्हं घेणार --------------------------- कोकम सरबत?
५. ती डॉक्टर झाली, --------------------------- तिच्या वडिलांची तशी इच्छा होती.
६. मी एकतर कपडे वाळत घालेन --------------------------- भांडी घासेन. सगळी कामं माझ्याच्याने होणार नाहीत.
७. --------------------------- तू येणार असशील --------------------------- आई मला पाठवेल.
८. उद्या विजेचं बिल भर --------------------------- हा चेकही बँकेत जमा करून ये.
९. मी गेलं वर्षभर मुंबईत राहतोय, --------------------------- अजूनही या शहराची सवय नाही झाली.
१०. ज्योतीचा स्वभाव जरा विचित्र आहे. --------------------------- तिचं कोणाशी पटत नाही.

८ विध्यर्थी रूप वापरून नकारार्थी किंवा होकारार्थी सल्ला / सूचना द्या. (गुण ५)

१. खोटे बोलणे ---------------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------

२. उशिरा उठणे ---------------------------------------------
---------------------------------------------
---------------------------------------------

३. मोठ्यांशी उद्धटपणे बोलणे ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

४. सावकाश खाणे ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

५. भरभर बोलणे ------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

------------------------------------------------

## ९ जोड्या जुळवा. (गुण ४)

| | |
|---|---|
| १. मी आज मित्रां -------------------------- जेवायला जाणार आहे. | क. मागे |
| २. आमच्या घरा ------------------------- छोटीशी टेकडी आहे. | ख. शिवाय |
| ३. बॉस खूप चांगलं बोलत होते तुझ्या -------------------------. | ग. बरोबर |
| ४. अमितचा बाहेरचं खाल्ल्या -------------------------- एकही दिवस जात नाही. | घ. बद्दल |

# परीक्षकांसाठी

**श्रुतलेखनासाठीचा उतारा**

पॅरिस हे कलेचं माहेरघर मानलं जातं. इथे लहानपणापासून वस्तुसंग्रहालयामध्ये लहान मुलांचीही शैक्षणिक अभ्याससहल नेली जाते. त्यांना कलेची गोडी लागण्याकडे लक्ष पुरवलं जातं. उदाहरणार्थ लूव्रमध्ये त्यांना चित्रकलेविषयी शिकवलं जातं. कलासंस्कृतीविषयीची जाणीव त्यांच्यात रुजवली जाते. त्यामुळं त्यांना कलेविषयी माहिती मिळते. महाविद्यालयात त्यांच्या आवडत्या कलाप्रकाराचा अभ्यास करून प्रकल्प सादर करायचा असतो. कलेला प्रोत्साहन देण्यासाठी इथल्या प्रशासनाने पॅरिसमध्ये राहणाऱ्या तरुणाईसाठी गेल्या दोन वर्षांपासून 'पॅरिस इन कार्ड' हा उपक्रम सुरू केला आहे. ४-५ वर्षांपासून १५-१६ वर्षांपर्यंतच्या मुलांना दिल्या जाणाऱ्या या कार्डामुळे विविध कलाप्रदर्शनांच्या शुल्कात सवलत मिळते. इथे अभिव्यक्तिस्वातंत्र्य खूप आहे. त्यामुळे इथे विद्यार्थ्यांनाही मतस्वातंत्र्य आहे आणि ते आपापली मतं मांडत असतात. मुळात फ्रेंच लोकांना आपली मतं मांडणं, न पटलेल्या एखाद्या गोष्टीचा निषेध करणं हे अतिशय प्रिय आहे. तो त्यांच्या संस्कृतीचा जणू एक भागच आहे. बहुतांशी हा विरोध शांततापूर्ण मार्गाने केला जातो. ते बाळकडू विद्यार्थ्यांना आपोआपच मिळतं. कलात्मक ग्राफिटी खूप केली जाते. सध्या तरुणाईच्या कलाविष्काराला प्रोत्साहन देण्यासाठी इमारतींच्या भिंतींवर मोझॅक आर्टवर्क केलं जात आहे.

# व्यक्ती आणि वल्ली

१








## चला, शिकू या...

- व्यक्ती आणि वल्ली : स्वभाव, गुणवैशिष्ट्ये, सवयी
- स्त्री-पुरुष : पूर्वग्रह, नात्यांमधील अडचणी, पुरुष आणि घरकाम, स्त्रिया आणि नोकरी
- भाववाचक नामे
- अपूर्ण वर्तमानकाळ, रीती वर्तमानकाळ
- शब्दयोगी पदांप्रमाणेही वापरली जाणारी विशेषणे व क्रियाविशेषणे : योग्य, लायक, सारखा इ.
- असं-तसं, असंच-तसंच, अशी-तशी, असंतसं

## ९ व्यक्ती आणि वल्ली

**ओळखा बरं!**

माणसाच्या कपड्यांवरून, राहणीवरून, देहबोलीवरून आपण त्या व्यक्तीविषयी अंदाज बांधतो. ते कधीकधी अचूक ठरतात, तर कधीकधी सपशेल चुकतात. पण तरीही आपण अंदाज बांधणं कधी सोडत नाही.

**१. कामाचे टेबल, व्यक्ती आणि कार्यक्षेत्र यांच्या जोड्या लावा, आणि त्या व्यक्तींचे अपेक्षित गुणधर्म पुढे दिलेल्या यादीची मदत घेऊन लिहा.**

(व्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा, शिस्तप्रियता, कल्पकता, बुद्धिमत्ता, कामसूपणा, हुशारी, तरतरीतपणा, श्रीमंती)

| कामाचे टेबल | व्यक्ती | कार्यक्षेत्र | व्यक्तींचे अपेक्षित गुणधर्म |
|---|---|---|---|
| क.  | १.  | क. लिपिक / कर्मचारी / अभियंता | |
| ख.  | २.  | ख. विभाग प्रमुख / कारखानदार | |
| ग.  | ३.  | ग. कवी / कलाकार / लेखक | |

**२. वरीलपैकी एका व्यक्तीचे थोडक्यात व्यक्तिचित्रण लिहा.**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**३. शब्द ऐका व योग्य जागी विसर्ग घालून शब्द पुन्हा लिहा.**

उदा. निसंको:च - निःसंकोच

क. स्वःत ---------------------------

ख. अंतकरःण ---------------------------

ग. दुखः ---------------------------

घ. मःनपूर्वक ---------------------------

च. निस्वार्थीपःणा ---------------------------

**४. क. योग्य ते जोडाक्षर योग्य त्या जागी लिहा आणि शब्द पूर्ण करा.**

(ष्क, स्य, ष्णु, द्धि, ग्र, त्व, त्स, ह्य, र्य, द्द)

उदा. र - रद्द

१. सहिता ---------------------------

२. सामंज ---------------------------

३. पूर्वह ---------------------------

४. बारेषा ---------------------------

५. बुमत्ता ---------------------------

६. प्रौढ ---------------------------

७. माधु ---------------------------

८. वाल्य ---------------------------

९. निर्ष ---------------------------

**ख. आता वरील शब्द ऐकून आपली उत्तरे बरोबर आहेत का ते तपासा व शब्द म्हणून दाखवा.**

## २ भाववाचक नामे

**१. शब्द आणि अर्थ ह्यांच्या जोड्या लावा.**

| शब्द | अर्थ |
|---|---|
| क. हिरवाई | १. खूप अभ्यास करून मिळवलेले ज्ञान. |
| ख. आळशीपणा | २. शूर असण्याचा, साहसी असण्याचा गुण. |
| ग. शौर्य | ३. पैसा, संपत्ती इ॰ खूपच कमी असणे. |
| घ. श्रीमंती | ४. भाषा लिहिता-वाचता न येणे. |
| च. रखरखीतपणा | ५. पैसा, संपत्ती, विचार, कल्पना खूप असणे. |
| छ. कामसूपणा | ६. दाट, हिरवागार निसर्ग. |
| ज. डरपोकपणा | ७. आवश्यक काम करण्याचाही कंटाळा. |
| झ. निरक्षरता | ८. काम करत राहण्याची आवड. |
| ट. दारिद्र्य | ९. भित्रेपणा, भित्रा स्वभाव, साहसी वृत्तीचा अभाव. |
| ठ. पांडित्य | १०. पाण्याअभावी, अतिकडक उन्हाने झालेली स्थिती |

**२. वरील नामे योग्य जागी भरून वाक्ये पूर्ण करा.**

उदा॰ गुरुनाथ सारखा पुस्तकात डोकं घालून बसलेला असतो. खूप माहिती आहे त्याला. एवढं पांडित्य असूनही आणखी शिकण्याची भूक त्याला स्वस्थ बसू देत नाही.

क. गोव्याहून आलेल्या माधवीला तिथला निसर्ग आणि तिथली ------------------- नेहमी आठवायची.

ख. महेश सतत काही ना काही करण्यात मग्न असतो. त्याचा ------------------- सर्वांनाच माहीत आहे.

ग. दोन वर्षे गावात पाऊस नाही. त्यामुळे आलेला ------------------- आता फारच जाणवतोय.



घ. मोहिंदरला ते पदक त्याने युद्धात दाखविलेल्या --------------- साठी मिळाले आहे.

च. स्वयंपाकाच्या बाईंची ------------------- पाहून मिताली विचारात पडली. आपण घरात नसताना ठेवलेली चिठ्ठी त्या कशा वाचणार आणि स्वयंपाक कसा करणार?

छ. कोणी मागे लागले नाही, तर संजना इकडची काडी तिकडे करत नाही. तिचा ------------------- तिला एक दिवस अडचणीत आणणार आहे.

ज. अनीशचा ------------------- पाहून मोहिनीला आश्चर्यच वाटलं. साध्या पालीला घाबरत होता तो!

झ. अशी ही मुंबईनगरी! एकीकडे टोलेजंग इमारतीत राहणाऱ्यांची ------------------- तर दुसरीकडे झोपडपट्टीतले कमालीचे -------------------.

**३. खालील शब्दांना 'वा, आई, गिरी, पण, पणा, य, त्व, ता, ई' हे प्रत्यय लावून भाववाचक नामे लिंगासहित लिहा. काही शब्दांना एकापेक्षा अधिक प्रत्यय लागू शकतात.**

उदा. मोठा ते मोठेपण / तो मोठेपणा

क. गोड ------------------------------------

ख. नवल ------------------------------------

ग. गुलाम ------------------------------------

घ. शांत ------------------------------------

च. सुंदर ------------------------------------

छ. गंभीर ------------------------------------

ज. महान ------------------------------------

झ. मित्र ------------------------------------


ट. भिक्षुक ------------------------------------

**४. पुढील वाक्यांमधील भाववाचक नामे ओळखून अधोरेखित करा.**

उदा. एक पाऊस झाला आणि उकाडा कमी होऊन हवेत गारवा आला.

क. कारल्याच्या फोडी मिठाच्या पाण्यात बुडवून नंतर पिळून घेतल्या की त्यांचा कडूपणा कमी होतो.

ख. ज्यांच्या खेळात सातत्य नाही अशा खेळाडूंना संघातून काढून टाकलं.



ग. समुद्रप्रवास अनेकांना एकसुरी वाटतो, पण इरेनला त्याचा कधीच कंटाळा येत नाही.

घ. मामाकडे जाणे मी शक्यतो टाळत असे. त्याच्या स्वभावातला तुसडेपणा आणि खोटारडेपणा मला सहन होत नसे. पण सतत तणाव आणि अपमान सहन करणाऱ्या, सोशिकपणा हाच सर्वात मोठा गुण मानणाऱ्या मामीचा त्याहून जास्त राग येई.

च. ह्या महान चित्रकाराची चित्रनिर्मिती म्हणजे सृजनशील बंडखोरीचा उत्सवच होता. मात्र, आपल्या कलेशी त्याने कधीच बेइमानी केली नाही .

**५. शब्दकोडे**

वरील स्वाध्यायात तुम्ही अधोरेखित केलेली काही भाववाचक नामे आडवी लिहून हे शब्दकोडे सोडवा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | खो | री | |
| | कं | टा | | |
| | | र | वा | |
| तु | | डे | | |
| | | प | | |
| | | णा | व | |

## ३ उपेक्षित व्यक्ती

**१. श्रुतलेखन.**

आमच्या घरासमोरच्या (क) -------------- एक मनोरुग्ण रोज ठरावीक वेळी जात असतो. (ख) -------------- स्वत:शीच बोलत असतो. कोणी त्याच्याकडे दयेच्या नजरेने बघत असतात, कोणी त्याची टिंगल करत असतात, तर कोणी त्याला आपल्या (ग) -------------- पुढे जायला सांगत असतात. पण त्याला मात्र कशानेच फरक पडत नसतो. तो (घ) -------------- तंद्रीत काहीतरी बडबडत असतो. आमची आजी म्हणते, “त्याची बडबड (च) ---------- अजिबात नसते. अगदी (छ) -------------- असते.” पण आम्हाला त्याच्याबद्दल काहीच माहीत नसल्याने ती (ज) -------------- आणि वेड्यासारखी वाटत असते.



**२. तुम्हाला माहीत असलेल्या अशा एका उपेक्षित व्यक्तीविषयी थोडक्यात लिहा.**

## ४ घरकाम आणि मूल्यशिक्षण



मोठ्या माणसांनी लहान मुलांवर संस्कार करायचे असतात ही गोष्ट पूर्वीपासूनच सर्वमान्य आहे. कोणते संस्कार करायचे त्यांचीही यादी परंपरेतूनच तयार झाली आहे. त्या यादीत जे मुद्दे नाहीत, त्यांपैकी 'स्त्री-पुरुष समानता' हा एक प्रमुख मुद्दा आहे. ह्या नसलेल्या मुद्द्याच्या आधारानेच रोजच्या व्यवहारातील कामांची आणि जबाबदाऱ्यांची स्त्री-पुरुषांमध्ये वाटणी झाली आहे. त्याची जाणीव मुलांना जवळपास जन्मापासूनच करून दिली जाते. 'मुलगी आहेस तू. घरातली ही कामं तूच करायची असतात.' किंवा, 'मुलांचं स्वयंपाकघरात काय काम आहे रे? हो बाहेर! बायल्या कुठला!' अशी वाक्ये पूर्वी सरसकट ऐकू येत.

काळ बदलला. बायका शिकल्या; घराबाहेर पडल्या; पैसे मिळवू लागल्या. आता परंपरागत समजुती बदलायला हव्यात अशी जाणीव समाजाला होऊ लागली किंवा करून दिली गेली. समानतेची मूल्ये लहान वयातच मुलामुलींमध्ये रुजवण्यासाठी शिक्षणपद्धतीत काही बदल झाला का? शिक्षकी पेशातील काही व्यक्तींना प्रश्न विचारून हे समजून घेण्याचा हा एक प्रयत्न.

**घरकामात स्त्री-पुरुष असा फरक करू नये, हे तुम्ही मुलांना कसे सांगता?**

* शहरात अगदी बालवाडीत असल्यापासून मुले-मुली एकत्रितपणे खाद्यपदार्थ करायला अगदी आनंदाने शिकतात. 'मी मुलगा आहे, मी हे करणार नाही,' असे सहसा कुणी म्हणत नाही. आवडच नसलेला मुलगा असू शकतो तशी मुलगीही असू शकते.
* नवनवीन पदार्थ करायला शिकण्याचा आणि हल्ली त्यांची सजावटही करण्याचा उत्साह अगदी नववीत जाईपर्यंत मुलामुलींमध्ये टिकून राहतो.
* ग्रामीण भागात सात-आठ वर्षांपर्यंत मुलामुलींचा हा एकत्रित उपक्रम आवडीने चालू राहतो. त्यानंतर मात्र मुलांमध्ये 'मुलगा' असल्याची जाणीव अचानक जागी होते. ह्याला त्याच्या घरातील आणि आसपासचे वातावरण कारणीभूत असते. तिथे शाळेचे काही चालत नाही.

**पालकांच्या प्रतिक्रिया कशा असतात?**

* शहरातील पालक कधीच हरकत घेत नाहीत. पूर्ण सहकार्य करतात.
* पंधरा-वीस वर्षांपूर्वी ग्रामीण भागात थोडी नाराजी होती. 'आमच्या मुलांना ही बायकी कामं कशाला?' वगैरे. पण आता तसे होत नाही.
* ग्रामीण भागात बायका पुरुषांच्या बरोबरीने शेतात काम करतात. त्यामुळे पुरुषही थोडेफार घरकाम, मुलांचा अभ्यास घेणे इ॰ कामे करताना दिसतात.

**काही काळानंतर मुलांमध्ये कायमस्वरूपी काही बदल झाल्याचे जाणवते का?**

* निदान शाळेत तरी स्वयंपाकाबरोबरच शाळेची स्वच्छता, साहित्य आवरून ठेवणे वगैरे कामे ती नियमित करतात; पण घरी मात्र अशी कामे करत नाहीत, अशी पालकांची तक्रार आजही असते. घरात वडील ती कामे करताना सहसा दिसत नाहीत म्हणून असेल. शिवाय कुटुंब लहान असल्याने आणि सगळेच बाहेर कामे करणारे असल्याने घरकामासाठी नोकरमाणसे आणि यंत्रे असतातच. त्यामुळे घरकाम न करणाऱ्या मुलींचीही संख्या वाढते आहे.
* ग्रामीण भागातील ज्या शाळांमध्ये ह्या विषयाबद्दल संवेदनशीलतेने सतत बोलले जाते, तिथे मुलगे रोजचे घरकाम करत नसले, तरी त्यांच्या वागण्यातली आक्रमकता आणि हिंसा खूपच कमी झाल्याचे स्पष्ट जाणवते. समानतेचे तत्त्व चांगल्या प्रकारे समजलेल्या कुटुंबातील स्त्री कामानिमित्त बाहेरगावी गेली किंवा आजारी पडली, तर नवरा आणि मुले मिळून घर व्यवस्थित सांभाळतात. शिवाय अशा घरातील मुले पुढे स्वत:च्या संसारात समानतेच्या तत्त्वाने वागतानाही दिसतात.

**१. चूक की बरोबर?**

| | चूक | बरोबर |
|---|---|---|
| क. शाळेत स्त्री-पुरुष समानता शिकवण्याला पालकांचा विरोध असतो. | ☐ | ☐ |
| ख. मुले-मुली एकत्र पदार्थ बनवायलाही शिकतात. | ☐ | ☐ |
| ग. समानतेचे तत्त्व नीट समजलेल्या मुलांच्या वागण्यातली आक्रमकता आणि हिंसा कमी झाल्याचे जाणवते. | ☐ | ☐ |
| घ. मुलींना जन्मतःच घरकामाची आवड असल्याने त्या आनंदाने ते करतात. | ☐ | ☐ |
| च. परंपरेनुसार मुलांवर जे संस्कार करायचे असतात, त्यांत मुख्य संस्कार ‘स्त्री-पुरुष समानता’ हा असतो. | ☐ | ☐ |
| छ. शहरी आणि त्याचप्रमाणे ग्रामीण भागातही काही शाळांनी आपल्या अभ्यासक्रमात समानतेच्या मूल्यांचा समावेश केलेला आहे. | ☐ | ☐ |

**२. ह्या विधानांमागे कोणते कारण आहे ते लिहा.**

क. 'मुलांचं स्वयंपाकघरात काय काम आहे रे? हो बाहेर! बायल्या कुठला!'

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ख. त्यानंतर मात्र मुलांमध्ये 'मुलगा' असल्याची जाणीव अचानक जागी होते.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ग. घरकाम न करणाऱ्या मुलींचीही संख्या वाढते आहे.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

घ. मुलगे रोजचे घरकाम करत नसले, तरी त्यांच्या वागण्यातली आक्रमकता आणि हिंसा खूपच कमी झाल्याचे स्पष्ट जाणवते.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**३. खालील चित्रे आणि व्यवसाय ह्यांच्या जोड्या लावा.**

(अंतराळवीर, नर्तकी, खाणकामगार, स्त्रीरोगतज्ज्ञ, पाणबुड्या, पाळणाघरचालक, भरतकामतज्ज्ञ, आचारी)



क. -----------------



ख. -----------------



ग. -----------------



घ. -----------------



च. -----------------



छ. -----------------



ज. ----------------



झ. ----------------

**४. वरीलपैकी कोणते व्यवसाय तुमच्या मते पुरुषांनी किंवा स्त्रियांनी करू नयेत ते लिहा आणि तुमच्या व इतरांच्या उत्तरांवर चर्चा करा. व्यवसायांमध्ये स्त्री-पुरुष असा भेदभाव करणे योग्य आहे का ह्या मुद्द्यावरही चर्चा करा.**

**५. खालील परिच्छेद पुढील शब्द वापरून पूर्ण करा.**

(जेवढा – तेवढा, जसेजसे – तसातसा, जेव्हा – तेव्हा, ज्यांनी – त्यांनी, ज्या – त्या, जिथे – तिथे)

आज गावात सर्वांचा लाडका रुद्रमणी कुस्तीची स्पर्धा जिंकून परत येणार आहे. लोकांनी मोठ्या उत्साहानं गाव सजवलं आहे. जिथे पाहाल तिथे रुद्रमणीची चित्रं दिसतील. (क) ------------------ उत्साह आज गावकऱ्यांत दिसतोय (ख) ------------------ पूर्वी कधी दिसला नव्हता. स्वागत समारंभ गावातील मुख्य मैदानात आहे. (ग) -------------------- तुम्ही त्या दिशेनं जाल (घ) -------------------- लोकांचा वाढणारा उत्साह तुम्हाला जाणवेल. रुद्रमणीला (च) ---------------------- प्रोत्साहन दिलं (छ) ---------------------- खूप आनंदात असणं साहजिक आहे, पण आज सगळं गावच आनंदित झालंय. (ज) ---------------------- रुद्रमणीनं कुस्तीच्या सरावाला सुरुवात केली (झ) ---------------------- तो अवघा बारा वर्षांचा होता. आज तो बावीस वर्षांचा तगडा जवान आहे. (ट) ---------------------- व्यक्तींनी त्यावेळी त्याच्यावर विश्वास दाखवला (ठ) ---------------------- व्यक्तींचा सत्कार करणंही आज उचित ठरेल!

## ५ अपूर्ण वर्तमानकाळ

**१. अपूर्ण वर्तमानकाळ वापरून ह्या सामन्याचे धावते वर्णन करा.**

**क्रिकेट - क्रिकेट - क्रिकेट**

उदा॰ ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत हा सामना आता सुरू होतोय. / होतो आहे.

क. आपला संघ आता मैदानात (उतरणे) ----------------------.

ख. सर्वांचे निळे कपडे उठून (दिसणे) ----------------------.

ग. सर्वात पुढे विराट (चालणे) ----------------------.

घ. त्याच्यामागे पंड्या (जाणे) ---------------------- हा अजिंक्य का मध्येच थांबला?



च. अजिंक्य खाली वाकून बुटाची लेस (बांधणे) ---------------------. त्याच्याबरोबर हा कोण आहे? अरे, हा तर रोहित शर्मा!

छ. रोहित अजिंक्यला मदत (करणे) ----------------------.

ज. ते बघा, सगळे पंच त्या बाजूने (येणे) ----------------------.

झ. त्यांच्यामागून ऑस्ट्रेलियाचा संघही प्रवेश (करणे) ----------------------.

ट. पंच आता यष्टीची पाहणी (करणे) ----------------------.

ठ. आणि आता सामना सुरू (होणे) ----------------------.

## ६ रीती वर्तमानकाळ

**१. कंसातील क्रियापदांची रीती वर्तमानकाळ वापरून योग्य ती रूपे लिहा.**

- दर गुरुवारी गणिताचा तास असतो. तेव्हा मागच्या बाकावरच्या मुली अखंड (बोलणे) बोलत असतात. नीरजा कसलीतरी चिठ्ठी लिहून वृंदाला (क) (देणे) ----------------------------. वैदेही, मुग्धा आणि प्रिया खाली मान घालून (ख) (खिदळणे) ----------------------------. सगळ्याच वर्गाला ह्याचा त्रास (ग) (होणे) ----------------------------, पण त्यांना त्याचे काहीच (घ) (न वाटणे) ----------------------------.

- मुसळधार पाऊस (क) (पडणे) ----------------------------. विजा (ख) (कडाडणे) ----------------------------. ढग (ग) (गडगडणे) ----------------------------. सोसाट्याचा वारा (घ) (वाहणे) ----------------------------. अशावेळी एक घोडेस्वार जंगलातून (च) (जाणे) ----------------------------. पावसाच्या माऱ्यामुळे त्याला काहीच (छ) (न दिसणे) ----------------------------.

**२. रीती वर्तमानकाळ वापरून रिकाम्या जागा भरा.**





गुप्तहेर श्री. धडाके एका खुनाची चौकशी करत होते आणि समोर येणाऱ्या प्रत्येक माणसाचा त्यांना संशय येत होता. गुप्ते आजोबांवरपण त्यांनी संशय घेतला. आजोबा असे चिडले, की त्यांनी एकच नाही, तर न विचारताच दहा प्रश्नांची उत्तरे दिली. आपण त्यांना मदत करू या आणि उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये पूर्ण करू या.

**श्री. धडाके** : गुप्ते, १३ तारखेला सकाळी सात वाजता तुम्ही काय करत होता?

**आजोबा** : उदा. रोज सकाळी ७ वाजता मी वर्तमानपत्र वाचत असतो.

क. सकाळी नऊ ही माझी (नाश्त्याची वेळ असणे) ----------------------------------------

ख. सकाळी अकरा ते बारा मी (डुलकी काढत असणे) ----------------------------------------

ग. दुपारी एक वाजता मी (जेवत असणे) ----------------------------------------

घ. दुपारी तीन ते संध्याकाळी सहा मी मित्रांबरोबर (पत्ते खेळत असणे) --------------------
--------------------------------------------------------------------------------

च. संध्याकाळी दोन तास मी (बागेत फिरत असणे) ----------------------------------------

छ. रात्री आठ वाजता मी (जेवत असणे) ----------------------------------------

ज. रात्री साडेआठ ते दहा मी (दूरदर्शनमालिका बघत असणे) ------------------------------
--------------------------------------------------------------------------------

झ. रात्री दहा वाजता मी (औषधे घेत असणे) ----------------------------------------

ट. रात्री साडेदहा माझी (झोपण्याची वेळ असणे) ----------------------------------------

## ७ शब्दयोगी पदांप्रमाणेही वापरली जाणारी विशेषणे

**१. कंसातील योग्य तो पर्याय वापरून रिकाम्या जागा भरा.**

(लायक, योग्य, सारखी, योग्य, सारखा, योग्य, सारखा )

स्टीफनला मुंबईत त्याच्यायोग्य नोकरी मिळाली, म्हणून त्याने मुंबईत स्थायिक होण्याचे ठरवले. स्टीफन मुंबईत आल्यापासून जागा शोधत होता, पण त्याच्या (क) मना------------ जागा काही त्याला मिळत नव्हती. त्याच्या मतानुसार जशी भाडी असायला हवी त्याच्या दुप्पट



तिप्पट भाडी दक्षिण मुंबईत होती. (ख) त्याच्या ----------- माणूस राहील असा शेजार त्याला बऱ्याच ठिकाणी सापडला नाही. एक घर त्याला आवडलं, पण तिथे गाडी (ग) ठेवण्या ------------- जागा नव्हती. शेवटी त्याच्या मित्राने सुचवलेली जागा घ्यायचा विचार त्याने पक्का केला. एका छोट्या कुटुंबाने (घ) राहण्या ------------- ही जागा होती. त्याच्या बायकोमुलांना (च) आवडण्या ------------- शेजार होता, आणि मुख्य म्हणजे मुंबईत क्वचितच आढळणारी शांतता होती. असा विचार केला तर हीच जागा (छ) राहण्या ---------होती.

**२. कंसातील योग्य तो पर्याय वापरून रिकाम्या जागा भरा.**

(लायक / योग्य (२), सारखं (२), सारखी)

**मी ठरवलंय...** उदा. माझ्यालायक / योग्य नोकरी मिळेपर्यंत मी बेकार राहीन.

क. माझ्या मना ---------------- मुलगी मिळेपर्यंत मी अविवाहित राहीन.

ख. माझ्या मना ---------------- घर मिळेपर्यंत मी बेघर राहीन.

ग. या आलिशान घरा ---------------- सामान मिळेपर्यंत मी रिकाम्या घरात राहीन.

घ. मला करण्या ---------------- काम मिळेपर्यंत मी बसून राहीन.

च. माझ्या मना ---------------- जेवण मिळेपर्यंत मी उपाशी राहीन.

## ८ असणे - नसणे

**१. असणे - नसणे ह्या क्रियापदांची योग्य ती रूपे वापरून वाक्ये पूर्ण करा.**

उदा. नाटक / सिनेमा चालू असताना मोबाईल वापरायचा नसतो. तेव्हा तो सायलेंटवर ठेवायचा असतो.

क. दवाखान्यात शांतता पाळायची --------------. तिथे आवाज करायचा --------------

ख. बससाठी रांगेत उभं राहायचं --------------. रांग सोडून पुढे घुसायचं --------------.

ग. पाण्याचं काम झाल्यावर नळ नीट बंद करायचा ----------------. वाहणाऱ्या पाण्याकडे दुर्लक्ष करायचं ----------------.

घ. नवीन झाडे लावायची ----------------. चांगली झाडे उगाच तोडायची ----------------.

च. शिक्षकांना आदर दाखवायचा ---------------. त्यांना उलट उत्तर द्यायचं ---------------.

**२. लाल रेघांच्या जागी योग्य ते प्रश्नशब्द - का, कोण, कसं, काय, कोण, काय, कशाला आणि काळ्या रेघांच्या जागी 'असणे, नसणे' चे योग्य रूप घालून रिकाम्या जागा भरा.**

क. रोज सकाळी इतक्या भसाड्या आवाजात ---------------- गात ---------------- ?

प्रतीक?

नाही नाही, तो मी ----------------, तो निरंजन ----------------.

ख. बघावं तेव्हा जतिन ---------------- खात ---------------- ?

नाही, मी खात ----------------. माझ्या तोंडात च्युईंगगम ----------------.

ग. मेघनाची मुलगी सारखी रडत किंवा झोपलेली ---------------- ---------------- ?

मेघनाचं तिच्याकडे कधीच ---------------- लक्ष ---------------- ?

घ. सध्या घाटात सतत पाऊस पडत ----------------. तू---------------- तिथे जात ---------------- ?

च. जेकब सतत फोनवर ---------------- बोलत ---------------- ? पलीकडून ---------------- त्याची बडबड ऐकत ---------------- ?

## ९ 'ट' की 'ठ'?

**१. ही दोन अक्षरे ज्यांमध्ये आहेत असे शब्द पुढील वाक्यांमध्ये आहेत. अर्थानुसार वाक्यात त्यांतील कोणता ठेवायचा? नको असलेल्यावर काट मारा.**



उदा. शाळेकडे पाठ / पाट करून उभी राहिलीस तर समोर एक जुनी चाळ दिसेल.

क. मावशीकडे एकच चांदीचे ताठ / ताट होते.

ख. ज्या मजकुरावर काठ / काट मारली आहे तो टाइप करू नये.

ग. "केवढा वाकून उभा राहतोयस रे! ताट / ताठ उभा राहत जा की!"

घ. थंडीत अंगाला साबणाऐवजी उटणे / उठणे लावावे. त्वचा मऊ राहते.

च. "वरदा, एक तरी पाठ / पाट राहू दे घरात! खुर्चीवर बसून का पूजा करणार आहात?"

छ. "त्या निळ्या साडीचा काठ / काट ह्या साडीला हवा होता, नाही?"

ज. "एक लिटर दूध आठवायचं / आटवायचं असतं गं, पण इतकं? एक वाटीभरही शिल्लक राहिलेलं नाहीये."

झ. "हं, लिही. रोज पहाटे साडेपाचला उटणे / उठणे..."

ट. रझिया दिसली की तिने माझ्यापायी खाल्लेला मार मला हमखास आठवायचा / आटवायचा आणि स्वतःची लाज वाटायची.

**२. पुढे दिलेल्या वाक्यांतील काही शब्दांमधून एक अक्षर वगळले आहे. ते 'ट' असेल की 'ठ'? वाक्याचा अर्थ लक्षात घेऊन योग्य अक्षर लिहा. शब्दाचे लिंग, वचन, सामान्यरूप वगैरेही लक्षात घ्यावे लागेल.**

क. ह्या खेळात एक अ--------- आहे. तुम्हाला दिलेल्या दोराची गा--------- एकाच हाताने मारावी लागेल आणि त्यासा--------- तुमच्याकडे वेळ आहे एक मिनि---------.

ख. "दादा, मी तुम्हाला दोनशे रुपयांची नो--------- दिली. तुम्ही फक्त सा--------- रुपयेच परत दिलेत!"

ग. "जिन्याचा क---------डा पुरेसा उंच नाहीये. आणि अ---------रा पायऱ्या करायला सांगितलं होतं. सतराच कशा केल्या आहेत?"

घ. "जेवणाचं ता--------- वाढण्याची एक रीत असते. चटणी, कोशिंबीर, लिंबाची फोड वगैरे डावीकडे; वर मध्यभागी मी---------; भाज्या, आम--------- ची वा---------, गोड पदार्थ उजवीकडे; मधल्या मोकळ्या जागेत भात किंवा पोळी, कळलं?"

च. "वा! श---------वर निळे ---------पके, को--------- गुलाबी, पँ--------- पिवळी आणि बू------- जांभळे! शिन्या, आपल्या ना-------कात विदूषकाचं पात्र नाहीये रे!"

**३. नाम आणि क्रियापदांच्या खालील जोड्यांपैकी योग्य जोडी योग्य वाक्यासाठी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(बोध होणे, नाटक करणे, माल खपवणे, उसळी मारणे, मत मांडणे, अस्तास जाणे)

उदा. जगभरातील मोठ्या राजसत्तासुद्धा कालांतराने संपल्या.
जगभरातील मोठ्या राजसत्तासुद्धा कालांतराने अस्तास गेल्या.

क. शिक्षक अनेक प्रकारे मुलांना सांगत होते, पण मुलांना काही समजत नव्हते.

---------------------------------------------------------------------------

ख. आजारी पडल्याचे दाखवून स्पर्धेला येण्याचे त्याने टाळले.

---------------------------------------------------------------------------

ग. सकाळपासून संध्याकाळपर्यंत गिऱ्हाइके शोधून आपल्या वस्तू विकण्याचा तो प्रयत्न करत होता.



---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

घ. गळाला लागलेला मासा ओढून किनाऱ्यावर वाळूत टाकल्याबरोबर त्याने एकदम हवेत उडी घेतली.

---------------------------------------------------------------------------

च. तुला काय वाटतं ते सांगायला अजिबात घाबरू नकोस.

---------------------------------------------------------------------------

**४. क्रियाविशेषण + क्रियापदाच्या खालील जोड्यांपैकी योग्य जोडी योग्य वाक्यासाठी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(बहाल करणे, टवकारून बघणे, अचंबित होणे)

क. सचिन तेंडुलकरला भारतरत्न हा किताब दिल्यावर भारतीयांना अतिशय आनंद झाला.

-----------------------------------------------------------------------

ख. अजिंठा - वेरूळची लेणी पाहून परदेशी पर्यटक थक्क झाले.

-----------------------------------------------------------------------

ग. प्राणिसंग्रहालयात पिंजऱ्यातील माकड आमच्याकडे एकसारखे बघत होते.

-----------------------------------------------------------------------

**५. खालील नामांबरोबर कोणती क्रियापदे वापरली जातात ते लिहा.**

| | |
|---|---|
| क. दाणादाण | |
| ख. शक्कल | |
| ग. झेप | |
| घ. वाद | |
| च. बित्तंबातमी | |
| छ. हेवा | |

**६. खालील शब्द किंवा शब्दसमूहाला कोणते क्रियापद वापरले जाते, ते लिहा.**

क. मन मोकळे ------------------

ख. तोंड पाहावे ------------------

ग. हुसकावून ------------------

**७. खालील क्रियापदांबरोबर कोणते शब्द वापरता येतील ते लिहा.**

क. करणे : १. --------------- २. --------------- ३. ---------------

ख. पडणे : १. --------------- २. ---------------

ग. घालणे : १. --------------- २. ---------------

**८. 'वाटणे'' हे क्रियापद या पाठात 'हेवा वाटणे' या जोडीमध्ये आले आहे. याआधीही हे क्रियापद तुम्ही शिकला आहात. अजून कोणत्या नामांबरोबर ते वापरतात ते आठवून लिहा.**

# २ कार्यक्षेत्र









## चला, शिकू या...

- मजूर, कामगार, रोजंदार ह्यांच्याविषयी वाचणे, बोलणे आणि लिहिणे
- रेझ्युमे (परिचयपत्र) आणि अर्ज
- कामाच्या ठिकाणी येणाऱ्या समस्यांविषयी बोलणे
- शब्दयोगी पदे : कडून, वरून, खालून, मधून
- अपूर्ण व पूर्ण वर्तमानकाळ, अपूर्ण व पूर्ण भूतकाळ
- धातुसाधिते किंवा कृदन्ते

## १ कार्यक्षेत्र

**१. कार्यक्षेत्र ह्या विषयातले अनेक शब्द आपण शिकलो आहोत. असे शब्द असलेल्या पुढील यादीतून कोणतेही पाच शब्द निवडा आणि त्यांचा तुमच्या कार्यक्षेत्राशी कसा संबंध येतो ते लिहा.**

प्रमाणपत्रे पद पगार कौशल्य खेळीमेळीचे वातावरण
शैक्षणिक पात्रता डबा अनुभव छंद रोजगार अर्ज
सहकारी ताण बॉस नोकरी प्रवेश सुट्टी ओळख
मुलाखत व्यवस्था आत्मविश्वास जाहिरात संधी
माहिती देहबोली तांत्रिक अंग आकर्षक स्पर्धा कष्ट
कल्पनाशक्ती पदविका धोका उमेदवार अपेक्षा बोनस
दडपण चुणचुणीतपणा इंडस्ट्री पोशाख औपचारिकता
नियम कर्ज करार सहल निवड सहजता व्यक्तिमत्व
हुशारी रेझ्युमे दाखले घरकाम

| **शब्द** | **ह्या शब्दाचा माझ्या कार्यक्षेत्राशी असलेला संबंध** |
|---|---|
| उदा. खेळीमेळीचे वातावरण | मला वाटते, नोकरी आनंददायक होण्यासाठी खेळीमेळीचे वातावरण आवश्यक असते. |

२. क. 'कार्य' हा शब्द खालील शब्दांना योग्य ठिकाणी जोडून अर्थपूर्ण शब्द तयार करा.

| | | | |
|---|---|---|---|
| संस्कृती | प्रणाली | पद्धती | समाज |
| प्रक्रिया | तत्पर | क्षमता | देश |
| क्षेत्र | क्रम | जीवित | कक्ष |
| दक्ष | भार | वाही | कारी |
| लग्न | शाळा | कुशलता | गृह |

______________________________________________

______________________________________________

ख. वरील शब्द ऐकून आपली उत्तरे तपासून पाहा आणि शब्द म्हणून दाखवा. कोणते शब्द ऐकले नाहीत? न ऐकलेले शब्द अधोरेखित करा.

## २ व्यवसाय, नोकरी, घरकाम

१. तुमच्या मते खालील वर्णनाचे प्रत्येकी एक काम लिहा.

क. अवघड काम : ______________________

ख. जोखमीचे काम : ______________________

ग. जिकिरीचे काम : ______________________

घ. किळसवाणे काम : ______________________

च. सर्जनशील काम : ______________________

छ. आव्हानात्मक काम : ______________________

२. खाली काही व्यवसायांचे स्वरूप दिले आहे आणि खालील चौकोनात त्या व्यवसायांची नावे दिली आहेत. योग्य जोड्या लावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १. कामवाली बाई / कामवाला पुरुष | २. पोस्टमन | ३. लोहार | ४. न्हावी |
| ५. खाटीक | ६. खाणकामगार | ७. कोळी | ८. चांभार |
| ९. वाणी | १०. भाजीवाला | ११. सफाईकामगार | १२. भंगारवाला |
| १३. गवंडी | १४. गिरणी कामगार | १५. शेतमजूर | १६. सुतार |
| १७. मेकॅनिक | १८. वीटभट्टी कामगार | १९. शिंपी | २०. कुंभार |
| २१. रंगारी | २२. माथाडी कामगार | २३. पिंजारी | २४. वाहनचालक |

| | | | |
|---|---|---|---|
| क. बांधकामाच्या ठिकाणी काम करणे | ☐ | ख. रस्त्यावरचा कचरा साफ करणे | ☐ |
| ग. भाज्या विकणे | ☐ | घ. मजुरीवर शेतात काम करणे | ☐ |
| च. घरांचे रंगकाम करणे | ☐ | छ. लाकडी फर्निचर बनवणे | ☐ |
| ज. जुने सामान विकत घेणे आणि विकणे | ☐ | झ. कापड गिरणीत काम करणे | ☐ |
| ट. गाड्यांची दुरुस्ती करणे | ☐ | ठ. वाहनात माल चढवणे व तो उतरवणे | ☐ |
| ड. वाहन चालवणे | ☐ | ढ. कापूस पिंजणे | ☐ |
| ण. वीटभट्टीवर विटा उचलणे | ☐ | त. चपला शिवणे आणि दुरुस्त करणे | ☐ |
| थ. कपडे शिवणे | ☐ | द. मातीची भांडी बनवणे | ☐ |
| ध. किराणा माल विकणे | ☐ | न. खाणीत खोदकाम करणे | ☐ |
| प. लोखंड वितळवून निरनिराळ्या वस्तू बनवणे | ☐ | फ. केस कापणे, दाढी करणे | ☐ |
| ब. मासे पकडणे आणि विकणे | ☐ | भ. धुणीभांडी करणे | ☐ |
| य. पत्र पोचवणे | ☐ | र. मटण कापणे आणि विकणे | ☐ |

**३. दोन पात्रांचे एक प्रसंगनाट्य लिहा आणि पुढच्या तासाला वर्गात सादर करा.**

पात्र १ : मालक

पात्र २ : कर्मचारी

**प्रसंग** : नोकरीसाठी मुलाखत, कामाबद्दल तक्रार करणे, पगाराविषयीचा वाद, इ०



## ३ रेझ्युमे (परिचयपत्र) आणि अर्ज




१. आपल्या आवडीचे एक काल्पनिक कार्यक्षेत्र निवडा आणि त्यासाठी सुयोग्य रेझ्युमे लिहा. हा रेझ्युमे वर्गासमोर वाचून दाखवा. इतर विद्यार्थ्यांनी त्यात सुधारणा कराव्यात.

२. खालील अर्जाचा नमुना रिकाम्या जागा भरून पूर्ण करा.

दिनांक : ---------

------------------

श्रीमती सुजाता सहस्रबुद्धे
संचालिका
वंचित विकास मंच

-------------- : लेखाधिकाऱ्याच्या पदासाठी नोकरीचा अर्ज

--------------

मी सुमेध सप्तर्षी, राहणार पुणे, आपल्या संस्थेत लेखाधिकारी म्हणून काम करू --------------.

अकाऊंटन्सी हा विषय घेऊन मी नुकतेच एम॰ कॉम॰ केले आहे. मला लेखाधिकाऱ्याच्या कामाचा अनुभव नसला, तरी -------------------------------- ---------- असं सांगू इच्छितो.

आपल्या संस्थेत काम करण्यास मी उत्सुक आहे. मला लवकरात लवकर उत्तराची अपेक्षा आहे.

या अर्जासोबत मी माझे ----------------- जोडले आहे.

--------------.

आपला ----------

सुमेध सप्तर्षी

**३. खालील तक्त्यात एका बाजूला कामात येणाऱ्या समस्या आणि दुसऱ्या बाजूला त्यांच्यावरचे उपाय दिले आहेत. त्यांच्या जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| क. माझा जॉब फारसा चांगला नाही. कामात मन रमत नाही. | १. पैशाने आनंद विकत घेता येत नाही, हे लक्षात ठेवा. |
| ख. ऑफिसमधल्या अडचणींशी सामना करताना मला माझा राग अनावर होण्याची भीती वाटते. | २. तुम्ही दररोज व्यायाम आणि प्राणायाम करा. |
| ग. माझा पगार कापला गेला, की मला फार वाईट वाटते. | ३. कामातील जो भाग आवडतो त्याचा जास्त विचार करा. सगळ्यांनाच थोडेफार न आवडणारे काम करावेच लागते हे लक्षात घ्या. |
| घ. माझे सहकर्मचारी इतरांची चहाडी करतात. मीसुद्धा अशा चहाड्यांमध्ये सहभागी होतो. | ४. तुमचा समजूतदारपणा हरवू नका. मनातल्या मनात १ ते १० आकडे म्हणा आणि शांत व्हा. |
| च. माझा बॉस मला इतरांसमोर फार रागावतो. माझा खूप अपमान होतो असे वाटते. | ५. काम आणि वैयक्तिक आयुष्य वेगळे ठेवा. कुटुंबासोबत वेळ घालवणे हा शांत होण्याचा उत्तम मार्ग आहे. |
| छ. मी घरी आल्यावरसुद्धा कामाचाच विचार करत राहतो. त्यामुळे बायकोबरोबर सतत भांडण होते. | ६. त्यांच्याशी संयमाने वागा. तुमचा स्वभाव पाहून ते परत असे करणार नाहीत. |
| ज. सतत खुर्चीवर बसून राहिल्याने माझी पाठ दुखते, कॉम्प्युटरवर काम केल्याने मान दुखते, डोळे चुरचुरतात. | ७. तुम्ही त्यांच्यासोबत तुमचा बहुमूल्य वेळ वाया घालवू नका. |

**४. 'अशी ही बनवाबनवी' या अत्यंत गाजलेल्या मराठी चित्रपटातील ही मजेशीर चित्रफीत पहा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

क. माने ह्यांच्या बॉसबद्दल लिहा.

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------.

ख. बॉसचे मान्यांबद्दल काय मत आहे?

-------------------------------------------------------------------------------.

-------------------------------------------------------------------------------.

ग. बॉसला मान्यांची कोणती गोष्ट आवडत नाही?

-----------------------------------------------------------------------------------.

घ. ही कथा पुढे कशी जाईल? कल्पना करा आणि लिहा.

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

च. 'ख'च्या उत्तराशी तुलना करा.

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

## ४ शब्दयोगी पदे

**१. 'कडून, मधून / -तून, वरून, खालून' ह्या शब्दयोगी पदांचा वापर करा आणि रिकाम्या जागा भरा. अनेक उत्तरे शक्य.**

क. आळशी (माणूस) ---------------------- कामाची अपेक्षा करणे म्हणजे आपलाच वेळ वाया घालवण्यासारखे असते.

ख. पु॰ ल॰ देशपांडे ह्यांनी जर्मन नाटककार बेर्टोल्ट ब्रेश्ट लिखित 'थ्री पेनी ओपेरा' ह्या (नाटक) ---------------------- 'तीन पैशांचा तमाशा' हे नाटक लिहिले.

ग. आयुष्यातल्या ह्या (अनुभव) ---------------------- आपण काय शिकलो, असा प्रश्न आपण सतत स्वतःला विचारला पाहिजे.



घ. भांडी हा तिच्या आयुष्याचा एक अविभाज्य भाग. कामाला लागल्यापासून अनेक प्रकारची भांडी तिच्या (हात) ---------------------- गेली आहेत.

च. माणसाचा दुटप्पीपणा त्याच्या सगळ्या (वागणे) -------------- दिसून येतो.

## ५ भूतकाळ

**१. उदाहरणाप्रमाणे क्रियापदाचे भूतकाळातील योग्य रूप वापरून वाक्य पूर्ण करा.**

उदा. आम्ही हॉटेलात अडकलो, कारण रविवारचा सबंध दिवस अखंड बर्फ पडत होते. आधीच्या बुधवारी तर म्हणे त्या वर्षातील सर्वात जास्त बर्फ पडले होते. सतरा वर्षांनतर त्या प्रदेशात एवढे बर्फ पडले, असे लोक सांगत होते.

**क. खाणे :**

१. कपाटात मागे ठेवलेली सर्व पुस्तके वाळवीने ---------------------- आणि नुसता भुसा शिल्लक होता.



२. मी स्वयंपाकघरात जाऊन पाहिले, तर मांजर वाटीमधली साय ----------------------.

३. यंदा आंबे स्वस्त असल्यामुळे मुलांनी अगदी पोटभर ----------------------.

**ख. चावणे :**

१. रविवारी थिएटरात प्रेक्षकांना डास, ढेकूण वगैरे मनसोक्त ----------------------.

२. फोन ठेवून डॉक्टर लगबगीने निघाले. डोंगरापलीकडच्या पाड्यावर एका लहान मुलाला साप ----------------------.



३. वयाच्या सहाव्या वर्षीच शहनाझला पियानो वादनाचा किडा ----------------------, आणि तिचे शिक्षण सुरू झाले.

**ग. वाळणे :**

१. सरूने गच्चीवर जाऊन पाहिले. दोरीवर बरेच कपडे ----------------------. उन्हाच्या कडाक्यामुळे मुलांचे लहान कपडे जवळ जवळ ----------------------. तासाभरातच बाकीचे कपडेही ----------------------.

**घ. जाणे :**

१. त्या दिवशी सगळे जण नाटकाला ----------------------. आत्या एकटीच टीव्ही बघत होती. थोड्या वेळाने वीज ----------------------, आणि तोही बंद झाला.

२. अखेर नळ दुरुस्त झाले. त्यांतून रोजच इतके पाणी वाया ----------------------, की तेवढे अख्ख्या पेठेला आठवडाभर पुरले असते.

## २. गिरणी कामगार

**क. साध्या भूतकाळाचा वापर करून गिरणी कामगारांच्या ऐतिहासिक संपाबद्दलचा खाली दिलेला उतारा रिकाम्या जागा भरून पूर्ण करा.**



गिरणी कामगारांना जास्त बोनस हवा (असणे) होता. १९८० साली त्यांनी संप (१) (पुकारणे) ----------------. परंतु कामगार नेते केवळ बोनसवर समाधानी (२) (न होणे) ----------------. ५८ गिरण्यांमधील अडीच लाख कामगारांना भरगच्च पगारवाढ आणि इतर काही फायदे मिळावेत, अशा मागण्या करत त्यांनी १९८२ पासून संप अधिक तीव्र (३) (करणे) ----------------. त्याला कामगारांनी प्रचंड प्रतिसाद (४) (देणे) -------------. दुसऱ्या बाजूने गिरणी मालकांनाही गिरण्या बंद ठेवण्यात रस (५) (न राहणे) -------------. गिरण्यांचे आधुनिकीकरण करण्यासाठी त्यांना भांडवल हवे (६) (असणे) ---------------. त्यासाठी आपल्या मोकळ्या जमिनी विकण्याची परवानगी त्यांनी सरकारकडे (७) (मागणे) --------------. कामगार संघटनांनी त्याला जोरदार विरोध (८) (करणे) ---------------- आणि सरकारनेही परवानगी (९) (न देणे) ----------------. अशा परिस्थितीत गिरण्या बंद कराव्या लागतील अशा धमक्या मालक देऊ (१०) (लागणे) ----------------. अखेर, दोन वर्षांत दहा गिरण्या बंद (११) (होणे) ----------------. वीस हजार कामगारांचे संसार रस्त्यावर (१२) (येणे) ----------------. मुंबईच्या कामगार चळवळीच्या इतिहासाने एक दुःखद वळण (१३) (घेणे) ----------------.

**ख. आता वरील उतारा पूर्ण भूतकाळात पुन्हा लिहा.**

**ग. सर्जनशील लेखन**

चंद्रशेखर गोखले ह्यांनी गिरणी कामगारांच्या प्रश्नावर एक चारोळी लिहिली आहे. तिच्या तीन ओळी खाली दिल्या आहेत. त्या वाचून चौथी ओळ लिहा.

गिरणीचा तो गप्प धुरांडा

ओकीत नाही आता धूर

परि भोंग्याची उगा भैरवी

------------------------------------------------------------

**शब्दार्थ**

धुरांडा : धूर बाहेर जाण्यासाठी वापरली जाणारी चिमणी

धूर ओकणे : बाहेर सोडणे

परि : पण

उगा : उगीच

भैरवी : शास्त्रीय संगीतातला एक राग, जो सामान्यतः संगीत मैफल संपवताना सादर केला जातो.


## ६ धातुसाधिते किंवा कृदन्ते

**१. कर्त्याप्रमाणे आणि कर्माप्रमाणे धातुसाधिते किंवा कृदन्ते तयार करा.**




ती मुलगी बटाटे उकडत आहे.


उदा. बटाटे उकडणारी मुलगी / बटाटे उकडत असलेली मुलगी
उकडत असलेले बटाटे / उकडलेले बटाटे

क. ती गृहिणी साड्या विकत घेते.

_______________________________________________

_______________________________________________




ख. ती शिक्षिका व्याकरण छान शिकवते.

_______________________________________________

_______________________________________________




ग. तो भाजीवाला भाजी स्वस्त विकतो.

---------------------------------------------


---------------------------------------------




घ. ती खेळाडू नेहमी सुवर्णपदक जिंकते.

---------------------------------------------

---------------------------------------------


च. तो साधू श्लोक समजावून सांगतो.

---------------------------------------------

---------------------------------------------




छ. तो कर्मचारी खूप विड्या ओढतो.

---------------------------------------------

---------------------------------------------

**२. रिकाम्या जागी योग्य ती कृदन्ते / विशेषणे भरा.**

क. तू काल एक कविता लिहिलीस ना? कुठे आहे तू --------------------- कविता?

ख. आई, आज तू मोदक केलेस ना? मला दे ना तू --------------------- मोदक.

ग. मी सांगितलेलं गणितच सोडवतोयस ना? बघू, तू --------------------- गणित.

घ. तू सध्या एक नवीन चित्र काढते आहेस ना? मला दाखव ना तू --------------------- चित्र.

च. परवाच्या सहलीचे तू फोटो काढलेस ना? मला दाखव ना तू काढलेला फोटो.

छ. तुम्ही मागच्या वर्षी एक नाटक बसवलं होतं ना? तुम्ही --------------------- नाटक पहायचंय मला.

**३. काय केल्याने काय होते? उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करा.**

उदा. हसणे - काम करणे - लवकर होणे : हसत हसत काम केल्याने ते लवकर होते.

क. भिणे - विचारणे – कधी कधी उत्तर न मिळणे :
------------------------------------------------------------

ख. लाजणे - बोलणे - लोक हसणे :
------------------------------------------------------------

ग. गाणी ऐकणे - स्वयंपाक करणे - कंटाळा न येणे :
------------------------------------------------------------

घ. अंधारात चाचपडणे - शोधणे - वस्तू सापडणे :
------------------------------------------------------------

च. धावणे - गाडी पकडणे - दमणे :
------------------------------------------------------------

छ. हसणे - उत्तर देणे - ताण नाहीसा होणे :
------------------------------------------------------------

**४. कोणी काय आणि कसे केले ते सांगा.**

उदा. मनोज - अंघोळ करणे - नाश्ता करणे : मनोजने अंघोळ करून नाश्ता केला.

क. सोनाली - चहा पिणे - काम सुरू करणे :
------------------------------------------------------------

ख. प्रथमेश - अभ्यास करणे - खेळायला जाणे :
------------------------------------------------------------

ग. आयेशा - साडी नेसणे - कार्यक्रमाला जाणे :
------------------------------------------------------------

घ. स्मिता - सापाला पाहणे - घाबरणे :
------------------------------------------------------------

च. गौरी आणि तिचा नवरा - बाहेर फिरणे - घरी येणे :
------------------------------------------------------------

**५. उदाहरणाप्रमाणे वाक्ये तयार करा.**

उदा. काय रे, मीटिंगला जातोयस ना आज? (जमणे) जमल्यास मला सोबत घेऊन जा.

क. तू आज सिनेमाला जात (असणे) --------------------- मलापण घेऊन जा.

ख. त्या कार्यालयात माझी ओळख सांग, आणि काम होत (नसणे) ---------------------
मला फोन कर.

ग. तुझे खरेदीला जायचे (ठरणे) --------------------- मला कळव.

घ. त्या कार्यक्रमाला जायचे (असणे) --------------------- मला सांग; मी तिकीट काढतो.

च. माझे नाटकाला जायचे (ठरणे) --------------------- मी तुला फोन करेन.

**६. अधोरेखित क्रियापदांना '-णे' हा प्रत्यय लावून रिकाम्या जागा भरा आणि ऑफिसमधल्या रागिणी शर्माचे संवाद पूर्ण करा.**

क. ती बॉसची सेक्रेटरी ममता आहे ना, ती सगळ्यांशीच गोड <u>बोलते.</u> मला बाई तिचे हे --------------------- खोटे वाटते.



ख. ते माने आहेत ना, ते नेहमी कामावर उशिरा <u>येतात.</u> बॉसला त्यांचे हे नेहमी उशिरा --------------------- कसे काय चालते काय माहीत!

ग. जोशी तर कधीच काम करत नाहीत. सतत कोणाशी तरी गप्पा <u>मारत</u> असतात. त्यांना कामाचा अर्थ गप्पा --------------------- असा वाटतो का?

घ. थोरात तर बहुतेक वेळा काही ना काही तरी कारण सांगून सुट्टी <u>घेतात.</u> असे सारखे सुट्टी --------------------- बरोबर वाटते का?

च. बॉसला वाटते मी खूप गप्पा मारते, म्हणून ते मला नेहमी <u>रागावतात.</u> मला त्यांचे --------------------- आवडत नाही.

**७. रिकाम्या जागी '-त' हा प्रत्यय लावून कृदन्ते लिहा आणि प्रेमळ बॉसचे संवाद पूर्ण करा.**

क. ऑफिसला रोज (हसणे) --------------------- यावं.

ख. ऑफिसमध्ये गाणी (ऐकणे) --------------------- काम करावं.

ग. एकमेकांना विनोद (सांगणे) --------------------- काम करावं.

घ. चूक झाली तर त्याबद्दल मला (घाबरणे) --------------------- नाही, तर बिनधास्त सांगावं.

च. मला वाटतं, कुठलंही काम (हसणे-खेळणे) --------------------- करावं.



**८. रिकाम्या जागी '-ता' हा प्रत्यय लावून कृदन्ते लिहा आणि ऑफिसमधल्या गडबडींची मजा घ्या.**

क. माने काम (करणे) करता करता कधी कधी पेंगतात.

ख. राजे शुद्धलेखनाच्या इतक्या चुका करतात, की त्यांच्या चुका (सुधारणे) ---------------- तपासणाऱ्याच्या नाकी नऊ येतात.

ग. शिपाई कधीच ऑफिस नीट झाडत नाहीत. (झाडणे) ------------------- ते नुसत्या गप्पा मारतात.

घ. बॉस फार विसरभोळे आहेत. (बोलणे) ——————— आपण कशाबद्दल बोलत होतो हेच विसरून जातात.

च. चव्हाण (येणे-जाणे) ------------------- सतत टेबलावरच्या वस्तू पाडतात.

**९. खालील सूचनांमध्ये रिकाम्या जागी '-ताना' हा प्रत्यय लावून कृदन्ते लिहा आणि खडूस बॉसची वाक्ये पूर्ण करा.**

क. माने, माझ्या केबिनमध्ये या. (येणे) ------------------- मी सांगितलेल्या फायली आणा.



ख. (शिपायाला) दाजी, तेवढा कचऱ्याचा डबा रिकामा करा आणि रिकामा (करणे) ------------------- काही महत्त्वाची कागदपत्रं दिसली, तर ती मला द्या.

ग. जोशी, तुम्हाला कितीदा सांगितलं, (जेवणे) ------------------- आवाज करू नका.

घ. रोझी, इमेल (पाठवणे) ------------------- खाली माझं नाव लिहीत जा.

च. म्हात्रे, तुम्ही (वाचणे) ------------------- दोन वाक्यांमध्ये थांबत जा.

**१०. उदाहरणाप्रमाणे अधोरेखित क्रियापदांना '-ऊ' हा प्रत्यय लावून रिकाम्या जागी कृदन्ते लिहा आणि माने ह्यांच्या तक्रारी लिहा.**

उदा. त्या रागिणीबाई आहेत ना, त्या रोज गप्पा <u>मारत</u> बसतात. मारू देत. मला काय त्याचं!



क. मी उशिरा आलो की बॉस फार रागावतात. ------------------- देत. त्यांना काय माहीत, मला रोज का उशीर होतो ते!

ख. जोशी काम कमी करतात आणि खातात जास्त. ----------------- देत. स्वतःचंच खातात ना? मला काय त्याचं!

ग. बॉसची सेक्रेटरी किती गोड बोलते! --------------- दे. गोड बोलणं काही वाईट नसतं, नाही का?

घ. म्हात्रे वाचताना नेहमी मोठ्यानं वाचतात. --------------- देत. त्यांना सवयच आहे ती.

च. ऑफिसमधले शिपाई नुसते पाट्या टाकतात. --------------- देत. मी कुठे त्यांना पगार देतो!

### ११. श्रुतलेखन : किस्सा

सौ॰ घोरपड्यांनी एका चुणचुणीत तरुणाला स्वयंपाकी म्हणून कामावर ठेवले. पहिल्याच दिवशी त्या त्याला म्हणाल्या, "तुम्हाला मी अगोदरच कल्पना (क) --------------- ठेवते : साहेबांचा मोठा व्यापार आहे, त्यामुळे घरी सारखी माणसं येतजात असतात. अनेकदा साहेब न कळवता पाहुण्यांना जेवायला (ख) --------------- येतात. तुम्हांला त्यासाठी तयारीत राहावं लागेल." तरुण गोड (ग) --------------- म्हणाला, "हरकत नाही, मॅडम. मी माझं सामान (घ) --------------- तयार ठेवत जाईन..."

### १२. रिकाम्या जागी 'ऊन-' हा प्रत्यय लावून कृदन्ते लिहा.



**मुंबईतील डबेवाले**

डबेवाले हे मुंबई शहरातील नोकरदारांचे जेवणाचे डबे घरापासून कामाच्या जागेपर्यंत नेण्याचे काम करतात. डबे पोचवण्याचे काम ऐकायला सोपे वाटत असले, तरी तसे ते नसते. पण मुंबईसारख्या अवाढव्य शहरात इतक्या अचूकतेने हे काम केले जाते, की मुंबईचे डबेवाले संशोधकांच्या अभ्यासाचा विषय झाले आहेत.

क. मुंबई शहर हे विस्ताराने अवाढव्य असल्याने कामाच्या जागी वेळेवर पोचण्यासाठी नोकरदार मंडळी घरातून लवकर (निघणे) --------------- कामावर येतात.

ख. जर डबेवाल्यांची यंत्रणा अस्तित्वात नसती, तर बहुसंख्य मंडळींना सकाळचा नाश्ता व दुपारच्या जेवणाचा डबा सकाळीच (घेणे) --------------- निघावे लागले असते.

ग. डबेवाल्यांच्या यंत्रणेमुळे बहुसंख्य गृहिणी गरम जेवण (बनवणे) --------------- डबा पाठवू शकतात.

घ. एकाच भागातील डबे प्रथम एकत्र (करणे) --------------- त्यांची विभागवार पाठवणी होते.

च. कर्मचाऱ्यांची जेवणे झाल्यावर रिकामे डबे गोळा (करणे) --------------- ते पुन्हा परत पाठवण्यात येतात.

छ. डबे घराघरातून गोळा करणे व रिकामे डबे परत (नेणे) --------------- देणे ही सर्व कामे अतिशय काटेकोरपणे व वक्तशीरपणे करण्यात येतात.

**१३. रिकाम्या जागी '-लेला' प्रत्ययाची योग्य रूपे भरा.**

क. मी (सांगणे) --------------- पत्रं पोस्टात का नाही टाकलीत अजून?

ख. ऑफिस साफ केलं, असं तुम्ही म्हणालात; पण साफ (करणे) --------------- टेबल तर दिसत नाही!

ग. आठ दिवसांपूर्वी (हरवणे) --------------- छत्री आज सापडली.

घ. तुम्हाला (देणे) --------------- काम तुम्ही केलं पाहिजे; नखरे नकोत.

च. मला रोज पूर्ण (होणे) --------------- कामाचा रिपोर्ट देत जा.

**१४. सुरेश भटांच्या खाली दिलेल्या कवितेत बरीच कृदन्ते येतात. आधी कवितेचा अर्थ समजून तुम्ही शब्द सुचवा. मग 'निवडुंग' या चित्रपटातले याच कवितेचे चित्रबद्ध झालेले गाणे पहा आणि त्यातील कृदन्ते लिहा.**

केव्हा तरी पहाटे
(क) ------------ रात्र गेली
मिटले चुकून डोळे
(ख) ------------ रात्र गेली
केव्हा तरी पहाटे ...


उरले उरात काही
आवाज चांदण्यांचे
आकाश तारकांचे
(च) ------------ रात्र गेली
केव्हा तरी पहाटे ...

(हरवून, उलटून
उचलून, सुचवून
निसटून, उसवून)

सांगू तरी कसे मी
वय कोवळे उन्हाचे
(ग) ------------ श्वास माझा
(घ) ------------ रात्र गेली
केव्हा तरी पहाटे ...

स्मरल्या मला न तेव्हा
माझ्याच गीतपंक्ती
मग ओळ शेवटाची
(छ) ------------ रात्र गेली
केव्हा तरी पहाटे ...

## ७ कामाच्या ठिकाणी होणारे अपघात आणि नुकसान भरपाई



दहावीनंतर डिप्लोमा इन ऑटोमोबाईल इंजिनिअरींगचा तीन वर्षांचा अभ्यासक्रम संपल्यावर जान्हवीला एका नामांकित कंपनीत मेकॅनिक म्हणून नोकरी लागली. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे चार आकडी पगारावर ती खूश होती. जान्हवी वक्तशीर, कामात चोख आणि तत्पर होती. बघता बघता पाच वर्षांत ती नोकरीत कायम झाली. एके दिवशी एक मशीन हाताळताना काही कळायच्या आत तिच्या हाताला जोरदार झटका लागला. उजव्या हाताची तीन बोटे मशीनमध्ये अडकली आणि एका क्षणात हाताच्या तळव्यापासून तुटून दूर पडली. तिला दवाखान्यात उपचारासाठी दाखल केले गेले.

उपचार चालू असतानाच जान्हवीला तिच्या सहकारी मैत्रिणींनी सरकारी योजनेची माहिती दिली. अपघात नोकरीच्या ठिकाणी आणि नोकरीच्या वेळात काम करताना झाला असेल, तर कामगाराला उपचारांचा खर्च आणि नुकसान भरपाई मिळते हे सांगितले. त्यासाठी तक्रार दाखल करायला, अर्ज द्यायला आणि मालकाला अपघाताची नोटीस द्यायलाही त्यांनी मदत केली. तीन बोटे तुटल्यामुळे पुढे काय हा प्रश्न जान्हवीपुढे होताच; पण निदान तात्पुरती तरी तिची अडचण दूर झाली.

- तुम्ही जिथे काम करता, तिथे अशी संकटे येऊ शकतात का?
- अपघात होऊच नयेत म्हणून काही व्यवस्था केलेली असते का?
- तरीही अपघात झालाच, तर तुम्ही स्वतःच्या बाजूने काही काळजी घेतली आहे का?

उदा॰ विमा उतरवणे, नियमित बचत करणे इ॰

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ८ क्रियापदांचा वापर

**खालील क्रियापदांबरोबर कोणत्या शब्दांच्या जोड्या आहेत? पाठातील नामांशिवाय आठवतील तेवढी आधी शिकलेली त्याच क्रियापदाबरोबरची नामेही लिहा. नुसती नामे न लिहिता प्रत्येकवेळी पूर्ण जोडी लिहा.**

उदा॰ करणे : आत्मसात करणे, टीका करणे.

करणे, काढणे, असणे, पडणे, उडणे, मारणे, घालणे, बसणे, वाटणे, सुटणे

**चारोळी**

गिरणीचा तो गप्प धुरांडा
ओकित नाही आता धूर ,
परि भोंग्याची उगा भैरवी
ऐकुनी येतो भरुनी ऊर.

चंद्रशेखर गोखले



# तोंडी परीक्षा

एकूण गुण १५

## १ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)

**१. खालील उतारा मोठ्याने वाचून दाखवा. (३)**

घरकाम करणे हे बायकांचेच काम असते, असा समज आहे. त्यामुळे एखादा पुरुष घरकाम करायला लागला, की त्याला बायकासुद्धा हसायच्या. मात्र आता बायकांनी नोकरी करून कमाई करण्याची जबादारी स्वीकारली आहे. त्यामुळे ओघानेच त्यांच्या घरकामाचा काही भार पुरुषांनीही उचलावा ही अपेक्षा व्यक्त होत आहे, आणि पुरुषांच्याही ती लक्षात यायला लागली आहे. बरेच पुरुष जमेल तेवढे घरकाम करून आपल्या बायकांचा कामाचा भार हलका करत आहेत. पुरुष करत असलेल्या घरकामामुळे केवळ बायकांचाच ताण कमी होतो असे नाही, तर त्याचा फायदा पुरुषांनासुद्धा होतो, असे काही संशोधकांना आढळले आहे. जे पुरुष बायकांना घरकामात मदत करतात त्यांचा मानसिक ताण कमी होतो असे स्वीडनमध्ये करण्यात आलेल्या एका पाहणीत आढळले आहे. जे पुरुष घरकामाच्या बाबतीत कामचुकारपणा करतात, त्यांना अधीरता आणि हृदयाची धडधड अशा मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते. अशा पुरुषांच्या बायकांवर घरकाम आणि ऑफिसचे काम अशा दोन्ही कामांचा बोजा पडतो आणि त्यांची प्रकृती बिघडते.

**२. खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (कोणत्याही २) (२)**

क. 'घरकाम करणे हे बायकांचेच काम आहे', हा समज आता का दूर होऊ लागला आहे?

ख. पुरुषांनी घरकाम केल्यामुळे कोणाकोणाला फायदा होतो?

ग. कोणत्या पुरुषांना मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते?

घ. बायकांची प्रकृती का बिघडते?

## २ चित्रवर्णन (एकूण गुण ५)

**१. खाली दिलेल्या चित्रांपैकी कोणत्याही एका चित्राचे थोडक्यात वर्णन करा.**







- ह्या चित्रात कोणता विषय मांडला आहे?
- चित्रातील लोक काय करत आहेत?
- चित्रातील लोकांच्या राहणीमानाविषयी तुम्ही काही सांगू शकाल का?

३ संवाद साधा. (एकूण गुण ५)

**१. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर आपल्या जोडीदाराबरोबर संवाद साधा. मदतीसाठी काही मुद्दे दिले आहेत ते विचारात घ्या.**

**विषय : कामाच्या ठिकाणी तुम्हाला कोणत्या समस्या येतात? त्यांना तुम्ही कसे सामोरे जाता?**

- कामावर जाण्यायेण्यातील अडचणी.
- कामाच्या ठिकाणी योग्य वातावरण नसणे.
- कामाच्या ठिकाणी असणारे धोके.
- कामाच्या ठिकाणी असणारा स्त्रियांच्या सुरक्षिततेचा प्रश्न.
- काम आवडीचे असणे किंवा नसणे.

**किंवा**

**विषय : तुम्हाला आवडणारी एखादी विक्षिप्त आणि तऱ्हेवाईक व्यक्ती**

- तुम्हाला आवडणारी व्यक्ती कोणत्या बाबतीत विक्षिप्त आहे?
- ती तशी असूनही तुम्हाला का आवडते?
- त्या व्यक्तीशी तुम्ही संवाद साधता का?
- अशा व्यक्तीची जीवनशैली कशी वेगळी असते?
- समाजात ह्या व्यक्तींबद्दल काय भावना असतात?

# लेखी परीक्षा

एकूण गुण ३५

## १ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)



नाना घोडके ह्या माणसावर तसा परमेश्वराने फारच अन्याय केला होता. त्याची गावात माडी नव्हती. धंद्यात कसब नव्हते. अंगात ताकद नव्हती. रूपाने तो बेंगरूळ होता – उसाच्या चिपाडाला कपडे घालून उभे केल्यावर ते कसे दिसेल, तसा. बुद्धीच्या नावाने आनंदच होता. त्या बिचाऱ्याला देवाने रागारागाने काहीच न देता ह्या जगात पाठविले होते काय? तसे म्हणावे, तर त्याने नानाला जाता जाता विलक्षण कल्पनाशक्ती दिली होती आणि तिला वाव मिळण्यासाठी हजार हत्तींचे बळ असलेली जीभ दिली होती. सतत बडबड करत राहण्याच्या बाबतीत ह्या माणसाची प्रगती आश्चर्यकारक होती खरेच! त्याच्या जिभेला बिलकुल हाड नव्हते. आणि नव्हते तेच बरे होते; कारण त्याचा केव्हाच चुरा होऊन गेला असता.

गावातल्या सगळ्या लोकांना नाना घोडके हा माणूस भारी आवडत असे. वेळ असेल तेव्हा तो घरोघर हिंडत असे आणि गप्पा हाणीत असे. ह्या गप्पा लोकांना आवडत असत याचे कारण त्यात खरा भाग फारच थोडा असे. पुष्कळसा भाग अद्भुत आणि रोमहर्षक असे. इतरांनी ज्या गोष्टी जन्मात कधी कानांनी ऐकलेल्या नसत, त्या नानाने स्वत: डोळ्यांनी पाहिलेल्या असत. जवळपास जंगल नसले, तरी नानाला वेळी-अवेळी वाघ भेटत असे आणि नानाला बघितल्यावर एखाद्या देणेकऱ्याप्रमाणे तोंड चुकवीत असे. पौर्णिमा-अमावास्येला नानाला चारदोन भुते नाही तर पिशाच्चे हमखास भेटायला येत. नाना त्यांना खायला चुरमुरे-शेंगदाणे देत असे व त्यांच्याशी चर्चा करत असे. कधीकधी ह्या पिशाच्चांनी नानाला दिवसाढवळ्याही हटकण्याचा धट्टपणा केला होता आणि त्याबद्दल नानाच्या हातचा बेदम मार खाल्ला होता. सर्वांच्या उरात धडकी भरवणारे चोर- दरोडेखोर त्याला कधी त्रास देत नसत. उलट त्याला लवून लवून मुजरा करत. आता तुम्हीच सांगा, या गोष्टी नानाने लोकांना सांगू नयेत तर काय करावे? आणि लोकांना त्या आवडू नयेत तर काय व्हावे? नाना हा अशा प्रकारचा थोर पुरुष होता.

- द. मा. मिरासदार

**१. खालील वाक्यांशांचे योग्य अर्थ अधोरेखित करा.** **(३)**

**क. गावात त्याची माडी नव्हती.**

१. गावात त्याचे घर नव्हते.

२. त्याच्या घराला माडी नव्हती.

३. त्याचे घर माडीवर नव्हते.

**ख. धंद्यात त्याला कसब नव्हते.**

१. धंद्याची आवड नव्हती.

२. धंदा करणे आवडत नव्हते.

३. धंदा करण्याचे कौशल्य त्याच्याकडे नव्हते.

**ग. तो रूपाने बेंगरूळ होता.**

१. तो नीटनेटका नव्हता.

२. तो दिसायला बावळट आणि गबाळा होता.

३. तो उसाच्या चिपाडासारखा बेढब होता.

**घ. हजार हत्तींचे बळ असलेली जीभ.**

१. बडबड करण्याचा उत्साह असलेली जीभ.

२. बडबड करण्यासाठी न थकता चालणारी जीभ.

३. हत्तीसारखी जीभ.

**च. उरात धडकी भरणे**

१. खूप भीती वाटणे.

२. धड बोलता न येणे.

३. उरावर ओझे असणे.

**छ. अद्भुत आणि रोमहर्षक**

१. कधी न पाहिलेले.

२. अतिशय आनंद देणारे.

३. अचंबित आणि उत्साहित करणारे.

**२. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** **(२)**

क. नाना घोडके हा माणूस गावातल्या लोकांना का आवडत असे?


_______________________________________________

ख. देवाने नानाला कोणती देणगी दिली होती?

_______________________________________________

## २ व्याकरण (एकूण गुण २२)

**१. पुढील परिच्छेदातील रिकाम्या जागा रीती वर्तमानकाळ वापरून भरा.** **(४)**



आकाश संध्यारंगांमुळे सुंदर (दिसणे) ____________. समुद्रकिनाऱ्यावरून उठूच नये असं वाटतं! हो ना! बघ, लाटा नेहमी कशा एकाच लयीत (पुढे येणे) ____________. आणि परत (मागे जाणे) ____________. त्या लाटांमधून पावले उमटवत तरुण मुलं आणि मुली (फिरणे) ____________. फुगेवाले, चणेवाले, नारळवाले आपापला माल खपवत इकडेतिकडे (हिंडणे) ____________. लहान मुले वाळूचे किल्ले (बांधणे) ____________. वाऱ्यामुळे वाळू (उडणे) ____________. सूर्य हळूहळू (अस्तास जाणे) ____________.

**२. खालील उताऱ्यात कंसातील योग्य शब्द योग्य जागी लिहून उतारा पूर्ण करा. (३)**

**(कडून, वरून, मधून, आतून, बाहेरून, हातून)**

ती वस्तू नीट बांधण्याची आणि तीही आकर्षक पद्धतीने बांधण्याची जबाबदारी त्याच्यावर मॅनेजरसाहेबां -------------- सोपवण्यात आली होती. गुंडाळलेल्या रंगीत कागदा -------------- ती वस्तू दिसू नये म्हणून त्याने त्या वस्तूचे -------------- आणि -------------- आकर्षक पॅकिंग केले. -------------- त्याने नावाचे लेबल चिकटवले. नवीन उत्पादनाचे पहिले पॅकिंग आपल्या ----------होत आहे, ह्याचा त्याला फार आनंद होत होता.

**३. पुढील उताऱ्यातील रिकाम्या जागा कंसातील सूचनेप्रमाणे क्रियापदाचे योग्य रूप वापरून भरा आणि उतारा पूर्ण करा. (साधा, अपूर्ण, पूर्ण - वर्तमानकाळ आणि भूतकाळ) (८)**

मला नेहमी एक स्वप्न (पडणे-साधा वर्त०) ---------------------. मस्त पाऊस (पडणे-अपूर्ण वर्त०) ---------------------, मी माझ्याच नादात सायकल (चालवणे-अपूर्ण वर्त०) ---------------------. इतक्यात कुणाची तरी हाक ऐकू (येणे-साधा वर्त०) --------------------- आणि स्वप्नातून जाग (येणे-साधा वर्त०) ---------------------.

मग काही नाही, रोजचा दिवस सुरू (होणे-साधा वर्त०) ---------------------. आजही तसंच (होणे-साधा भूत०) ---------------------. खरं म्हणजे झोप इतकी छान (होणे-पूर्ण भूत०) --------------------- तरीही अंथरुणात (लोळत पडणे-पूर्ण भूत०) ---------------------. कशीबशी मी (उठणे-साधा भूत०) ---------------------. भराभर आवरून (निघणे-साधा भूत०) ---------------------. बघितलं, तर उशीर (होणे-पूर्ण भूत०) ---------------------. चौकात सिग्नल न बघता पुढे (जाणे-साधा भूत०) ---------------------; तर काय! पोलिसमामांनी (अडवणे- साधा भूत०) --------------------- ! सायकलच्या टायरमधली हवा (सोडणे-साधा भूत०) ---------------------. कॉलेजमध्ये (पोचणे-साधा भूत०) --------------------- तर सर वर्गात (शिकवणे-अपूर्ण भूत०) ---------------------. मला चांगलाच उशीर (होणे-पूर्ण भूत०) ---------------------. दिवसाची सुरुवात काही चांगली (न होणे-पूर्ण भूत०) ---------------------.

४. **खालील संवादामध्ये क्रियापदाची योग्य धातुसाधित रूपे (कृदन्ते) वापरा आणि संवाद पूर्ण करा. (४)**

(-ताना, -त, -ता, -आयला, -ऊन, -आयचा)

नमिता : आज वर्तमानपत्र (वाचणे) ------------ वेळच नाही झाला.

अमित : (खाणे) ------------------------ च ही बातमी वाच पटकन.

नमिता : अरे, काय रे! मला उशीर होतोय ना!

अमित : बरं, (वाचणे) वाच ------------ वाच ------------ खा. पण बातमी वाचच.

नमिता : तूच (वाचणे ) ------------ दाखव ना. नाहीतरी तुला ऑफिसला (जाणे) ------------ अजून अवकाश आहे.



अमित : लढाऊ विमान चालवणारी पायलट मुलगी (बघणे) ------------ आहे? विमानात (चढणे) ———————— केवढा आत्मविश्वास आहे तिच्या चेहऱ्यावर!

नमिता : खरंच रे! केवढे कष्ट (घेणे) ------------ तिनं हे कौशल्य मिळवलं असेल ना!

५. **योग्य, जोगा, सारखा, लायक ही अव्यये रिकाम्या जागी भरा आणि वाक्यांच्या जोड्या लावा. (३)**

| | |
|---|---|
| १. घारी ------------- लक्ष ठेवून तिने चोर पकडला आणि | क. प्लॅस्टिकच्या कचऱ्याला आळा घालून शहर राहण्या ------------- केले. |
| २. एकही अधिकारी समितीच्या अध्यक्षपदासाठी ------------- नसल्यामुळे | ख. बढतीसाठी ती ------------- इन्स्पेक्टर ठरली. |
| ३. ------------- धोरण राबवून महापालिका आयुक्तांनी | घ. गेल्या वर्षात समिती दाखवण्या -------- काम करू शकली नाही. |

## ३ शब्दसंपदा

**भाववाचक नामे भरून शब्दकोडे पूर्ण करा!** **(५)**

**उभे शब्द –**

१. झाशीच्या राणीच्या ------------- कथा आजही सांगितल्या जातात. फार शूर होती ती!

२. इंग्रजांच्या ------------- तून १९४७ मध्ये देश मुक्त झाला. किती वर्षे गुलामीत होता हा देश!

३. किती ------------- आहे ह्या मुलीच्या आवाजात! फारच मधुर गाते ही मुलगी.

४. किती गोड आहे ही मुलगी! फारच ------------- आहे तिच्या चेहऱ्यात.

५. गावात खूप ताज्या भाज्या मिळतात. हा ------------- शहरात सापडत नाही.

**आडवे शब्द –**

१. सर्वांना फसवणारा लुच्चा आहे तो. ही ------------- फार काळ चालणार नाही.


२. राणी पद्मिनीचे ------------- अतुलनीय होते. फार सुंदर होती ती.

३. पावसाची सर अंगण ओलं करते आणि अंगणाच्या मातीत तो ------------- मुरतो.

४. गंभीरपणे ऐक जरा. या गोष्टीचे ------------- लक्षात घे.

५. पावसामुळे हवा गार झालीय. पावसाची सर येऊन गेल्यावर येणारा हा सुखद ------------- मला आवडतो.

६. इथे सर्वांना समान वागणूक मिळते. पूर्ण ------------- आहे इथे.



४ श्रुतलेखन (परीक्षकांसाठी उतारा शेवटी दिला आहे) (एकूण गुण ३)



# परीक्षकांसाठी

**श्रुतलेखनासाठीचा उतारा**

मला स्वयंपाक करायचा आज कंटाळा आला आहे. मस्त हवा पडली आहे, ढगाळ आणि थंड! वातावरणात एक प्रकारची शांतता आहे. पातेली, डाव, चमचे, कप, बश्या आणि गॅसच्या लायटरचा खट्ट आवाज ह्यांनी ह्या शांततेचा भंग मला करायचा नाही आहे. रोज उठल्याबरोबर नाश्त्याची तयारी, त्याचवेळी दुपारच्या स्वयंपाकाचे विचार, दुपारपासून पुन्हा चहा, खाणं आणि रात्रीच्या जेवणाची योजना. तो भांड्यांचा खडखडाट आज मी करणार नाही. आज छानपैकी बूट घालून मी टेकडीवर फिरायला जाणार आहे. येताना कोपऱ्यावरची भेळ खाऊन येणार आहे.

# राहणीमान ३







## चला, शिकू या...

- माणसांचे राहणीमान, त्यांची जीवनशैली
- स्मार्ट सिटी, शहरांचा अहवाल
- शहर आणि गाव, दोन्हींमध्ये होणारे बदल
- रीती भूतकाळ
- स्थलांतर व परकेपणा
- शब्दयोगी पदे : आधी, नंतर, वेळी, व्यतिरिक्त, खेरीज, शिवाय, वाचून

## १ जीवनशैली

**१. खाली काही वृत्तपत्रांतील मथळे दिले आहेत. त्यांच्या योग्य चित्रांशी जोड्या लावा.**

क. सुश्मिता सेनने आणखी एका मुलीला दत्तक घेतले.

ख. 'वेगळेपण सामावताना' : समलिंगी लोकांची चळवळ

ग. बप्पी लाहिरी ह्या बॉलीवूडच्या संगीतकाराकडे नेमके किती सोने आहे?

घ. भारतातील महिला रिक्षाचालक होऊ लागल्या.

च. कोलंबियातील एक जोडपे राहते गटारातल्या जागेत.



१



२



३



४




५

**२. वरीलपैकी एक बातमी निवडा व ती पूर्ण लिहा. वर्गासमोर ती वाचा व त्यावर चर्चा घडवून आणा.**

**चर्चेसाठी काही मुद्दे :**

- तुम्ही निवडलेल्या चित्रामधील जीवनशैलीचे वेगळेपण कशात आहे? तुम्हाला हे वेगळेपण मान्य आहे का? ह्या जीवनशैलीच्या बाजूने किंवा तिच्या विरुद्ध काही मते मांडा.

**३. एका चित्रपटाचे परीक्षण वाचा.**

काळ बदलला व त्याबरोबर लग्न व संसाराच्या व्याख्याही बदलल्या. प्रेमाच्या नव्या कल्पनांचा स्वीकार आजची तरुणाई बेधडकपणे करू लागली आहे. लग्न न करता एकत्र राहण्याचा 'लिव्ह इन रिलेशनशिप'चा पर्यायही आजची पिढी सहज स्वीकारताना दिसते. मात्र सर्वांनाच हा पर्याय मान्य होईल, असे नसते. प्रेमात पडलेल्या अशाच एका जोडप्याची गोष्ट ह्या चित्रपटातून मांडण्यात आली आहे. प्रेमाच्या नव्या कल्पना, नात्यांची नवी परिमाणे, मानवी संबंधांतील नवीन प्रवाह ह्या विषयांचा वेध घेणारा हा चित्रपट आहे.

ह्या चित्रपटात कॉर्पोरेट जगात वावरणाऱ्या अभय आणि स्वरा ह्या जोडप्याची कथा दाखवण्यात आली असून पैसा, प्रसिद्धी, उच्च राहणीमान ह्या साऱ्या ऐहिक सुखांमध्ये प्रेम कसे हरवले आहे, ह्यावर भाष्य केले आहे. लग्नाच्या बंधनात न अडकता 'लिव्ह इन' मध्ये राहण्याचा निर्णय हे जोडपे घेते. चित्रपटाची कथा दमदार आहे, परंतु दिग्दर्शकाची एकूण कथेवरची पकड काही ठिकाणी निसटताना दिसते. प्रेमाचे रंग उलगडून दाखवणारी गोष्ट आणि त्याला अनुसरून असलेली चार वेगवेगळ्या धाटणीची गाणीही ह्या चित्रपटात आहेत.

**क. खाली काही शब्दांचे अर्थ दिले आहेत. हे अर्थ कंसात दिलेल्यांपैकी कोणत्या शब्दांचे आहेत ते ओळखा.**

उदा॰ ज्यामुळे वस्तू इत्यादींचे आकारमान, प्रमाण निश्चित केले जाते अशी रीत, नियम.
उदाहरणार्थ : किलो हे वजन मोजण्याचे परिमाण आहे. (परिमाण / प्रतिबिंब)

१. निःसंकोच, बिनधास्त, कसलीही भीती न बाळगता.
उदाहरणार्थ : तू हे काम ------------ कर. घाबरू नकोस. (निश्चित / बेधडक)

२. इहलौकिक, सांसारिक.
उदाहरणार्थ : संत ------------ सुखाला महत्त्व देत नाहीत. (ऐहिक / सहज)

३. बाज, शैली, तऱ्हा, पद्धत.
उदाहरणार्थ : ह्या सिनेमाच्या छायाचित्रणाची ------------ समीक्षकांना फारशी समजली नाही. (धाटणी / रंग) .

४. दिशा, धारा, ओघ.
उदाहरणार्थ : हा मराठी सिनेमा जगण्याचे, विचारांचे नवीन ----------- दाखवतो. (प्रवाह / पकड)

**ख. अलीकडे पाहिलेल्या तुमच्या आवडत्या चित्रपटाबद्दल (आशय, अभिनय, संगीत, तांत्रिक बाजू) एक परीक्षण लिहा.**

## २ शहर आणि गाव

१. खाली दिलेल्या शब्दांचे 'शहर' आणि 'गाव' ह्या विषयांनुसार वर्गीकरण करा.

मोकाट कुत्री, सांस्कृतिक कार्यक्रम, झोपाळा, शिक्षणाच्या संधी, नद्या, नोकरी-व्यवसायाच्या संधी, बावरलेपण, डांबरी रस्ते, मोर्चा, जंगल, जागतिकीकरण, विविध खाद्यपदार्थ, गर्दी, वैविध्य, तंत्रज्ञानाचे जाळे, वेग, प्रदूषण, वाहतूक, घुसमट, भ्रमंती, वस्त्या, आपुलकी, गाड्यांची रेलचेल, दाटी, व्यग्रता, काँक्रीटचे जंगल, रहदारी, उंच इमारती, झोपडपट्टी, कचरा, धूर, वास, मल्टिप्लेक्स, मॉल, नाट्यगृहे, फॅशन, गुन्हेगारी, श्रीमंती, गरिबी, आधुनिकता, पाण्याचा प्रश्न, झाडे, प्राणी, शेती, हिरवळ, विज्ञान, कट्टे, खानावळी, हॉटेले, रेस्टॉरंट, तटस्थपणा, अपघात, धावपळ, गोंगाट, शांतता, हवा, जवळीक, प्रेम, बांधकाम, आय. टी. कंपन्या, इस्पितळ, शाळा, कॉलेज, विद्यापीठ, खरेदी, देऊळ, श्रद्धा, भ्रष्टाचार, प्रगती, दुष्काळ, स्पर्धा

| शहर | गाव | दोन्ही |
|---|---|---|
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |
| | | |

**२. उदाहरणाप्रमाणे खालील व्यक्तींच्या जीवनशैलीबद्दल वाक्ये लिहा.**

उदा. दामल्यांचे शारीरिक स्वास्थ्य उत्तम आहे, कारण ते रोज व्यायाम करतात.

क. रोहितची बौद्धिक क्षमता चांगली आहे, ------------------------------------.

ख. वैभव काहीच कामधंदा करत नाही, ------------------------------------.

ग. विनोद सकाळी फार उशिरा उठतो, ------------------------------------.

घ. शलाका उत्तम गाते, ------------------------------------.

च. कुलकर्णीआजींना अनेक गोष्टी माहीत असतात, ------------------------------------.


छ. सागर लोधी उत्तम स्वयंपाक करतात, ------------------------------------.

ज. चिंटू गणितात खूप हुशार आहे, ------------------------------------.

झ. सायलीची कपड्यांची निवड अचूक आहे, ------------------------------------.

ट. सोसायटीच्या परिसरातील कुत्री नयनचे ऐकतात, ------------------------------------.





**३. धनेश एका खेडेगावात राहतो. समाजशास्त्र विषयात पदव्युत्तर शिक्षण घेण्यासाठी तो मुंबईला जाणार आहे. तो त्याच्या मुंबईच्या मित्राला इमेल लिहितो. धनेश स्वत:च्या गावातल्या आयुष्याबद्दल लिहितो आणि मुंबई शहराबद्दल माहिती विचारतो. खालील मुद्द्यांच्या आधारे धनेशचे पत्र लिहा.**

विचारपूस – स्थलांतराचा निर्णय – गावातले आयुष्य – गावातली माणसे – गावातला परिसर – गावातली दिनचर्या – निसर्ग – स्वास्थ्य – समस्या – सुविधा – शिक्षणाच्या संधी – करियर – शेतकऱ्यांच्या समस्या – शहराचे आकर्षण – शहराची भीती (गर्दी, घुसमट, परकेपणा, माणुसकीचा अभाव) – चंगळवाद – चैन – शहरात येण्यासाठी करावी लागणारी तयारी

**४. तुम्हाला शहरातल्या कोणत्या तीन गोष्टी आवडत नाहीत, कोणत्या आवडतात ते सांगा आणि तुमच्या उत्तरांची इतरांच्या उत्तरांशी तुलना करा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**५. तुम्हाला गावातल्या कोणत्या तीन गोष्टी आवडत नाहीत, कोणत्या आवडतात ते सांगा आणि तुमच्या उत्तरांची इतरांच्या उत्तरांशी तुलना करा.**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**६. तुमचा मित्र नुकताच तुमच्या शहरात राहायला आला आहे. त्याच्या प्रश्नांची उत्तरे द्या आणि तुमच्या शहरातल्या निरनिराळ्या ठिकाणांबद्दल सांगा.**

मला स्वस्त घर भाड्याने हवे आहे, परंतु परिसर स्वच्छ हवा.

उदा॰ मग तू नेरळ परिसरात घर भाड्याने घे. तिथे कमी भाड्यात घर मिळते आणि तिथला परिसरसुद्धा स्वच्छ आहे.

क. मला स्वस्त दरात किराणामाल खरेदी करायचा आहे.

______________________________________________

ख. मला शाकाहारी जेवण हवे आहे.

______________________________________________

ग. मला मांसाहारी जेवण हवे आहे.

______________________________________________

घ. मला सिनेमा पाहायचा आहे.

______________________________________________

च. मला चांगले नाटक पाहायचे आहे.

______________________________________________

छ. मला स्वस्त आणि मस्त कपडे खरेदी करायचे आहेत.

______________________________________________

ज. मला निवांत कॉफी प्यायची आहे.

---

झ. मला रात्री डिस्कोला जायचे आहे.

---

ट. मला फेरी मारायची आहे.

---

**७. तुमच्या शहरात किंवा गावात तुम्हाला वेगळ्या पद्धतीने जगणारी माणसे दिसतात का? त्यांच्या जीवनशैलीतले वेगळेपण कशात आहे? अशा पाच व्यक्तींबद्दल सांगा.**

उदा॰ आमच्या सोसायटीत एक आजी राहतात. त्या एकट्याच असतात. त्यांच्या जगण्यातलं वेगळेपण म्हणजे त्या रोज सकाळी आणि संध्याकाळी आजूबाजूच्या परिसरातील मोकाट कुत्र्यांना जेवण देतात.

---

---

---

**८. माणसांनी काय केले, की तुम्हाला त्यांचे कौतुक वाटते? काय केले, की तुम्हाला त्यांचा राग येतो? तुमचे असे दोन अनुभव लिहा आणि वर्गासमोर वाचा. तुमच्या आणि वर्गातील इतरांच्या अनुभवांवर चर्चा करा.**

---

---

---

**९. खालील चित्राचे वर्णन करा. चित्रातल्या व्यक्तीच्या बाबतीत काय घडले असेल असे तुम्हाला वाटते? तीन विद्यार्थ्यांचे गट करून एक मजेशीर गोष्ट लिहा.**



## ३ स्थलांतर

**१. सचिन कुंडलकर हे एक तरुण मराठी चित्रपट दिग्दर्शक आहेत. स्थलांतर आणि वेगळी जीवनशैली ह्यांबद्दल त्यांचा एक अनुभव वाचा.**

मी आज एक चांगला 'होम मेकर' आहे असे स्वत:बद्दल म्हणू शकतो. गेल्या अनेक वर्षांत एकट्याने किंवा कोणाहीसोबत कमी व दीर्घकाळ राहताना मी घर चालवायचे काम नेहमी आवडीने स्वत:कडे घेत आलो आहे. मला स्वयंपाक आणि घरातली छोटी कामे करायला मनापासून आवडते. पण आपण जिथे राहतो ती जागा शांत, नीटनेटकी आणि प्रसन्न ठेवण्याची कला मी अनेक लोकांचे वर्तन पाहून शिकलो. (...)

मला नुकतेच पुण्यातल्या एका भाड्याच्या घरातून हाकलून देण्यात आले. मी चाळीस वर्षांचा असल्याने माझे लग्न झालेच असेल असे घराचा व्यवहार करताना घरमालकीणबाई समजून चालल्या होत्या. मी जागेचे डिपॉझिट भरून, सामानसुमान हलवून, नवा रंग लावून, नीट स्वयंपाकघर मांडून, नवे पडदे शिवून मग घर बंद करून एका सहलीसाठी निघून गेलो. तिथे मला घरमालकिणीचा दोनच दिवसांत फोन आला. ते संभाषण थोडे विनोदी होते. माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना. त्या म्हणाल्या, "फक्त कुटुंबांना जागा द्यायची असा आमच्या सोसायटीचा नियम आहे." मी म्हणालो, "मग तर ठीकच आहे. माझं कुटुंब आहे." त्यावर त्या म्हणाल्या, "कुटुंब म्हणजे लग्नाचं कुटुंब." तेव्हा माझ्या डोक्यात प्रकाश पडला. मी त्यांना म्हणालो, "अहो बाई, तुम्ही मला हे आधीच का नाही सांगितलंत? मी तुमच्याशी व्यवहार केलाच नसता. तुमच्या सोसायटीत राहतात तशा गोड आणि निष्पाप माणसांमध्ये मलाही राहायचं नाही. पण एक विचार करा, अशी विचित्र अट घालताना ती अट आपण ज्याला घालत आहोत ती व्यक्ती कोण आहे, कशी आहे, ह्याचा विचार नको का करायला? सगळीच अविवाहित माणसं सिगरेट फुंकत, लुंग्या वर करून बाल्कनीत येऊन बायकांवर नजर ठेवणारी नसतात. काही अविवाहित माणसं नेटकी, शांत आणि मुख्य म्हणजे कामात व्यग्र असतात, जसा मी आहे. (...)

अजूनही लग्नाच्या बायकाच घर नीट ठेवतात, त्या शांतच असतात, नेटक्या असतात अशी काही तुमची समजूत आहे का? पुरुष स्वयंपाक करतात, घर आवरतात, स्वतःची काळजी घेतात, हे तुम्हाला माहीत नाही का? एकट्या माणसाची तुम्हाला भीती का वाटते? काही ठिकाणी बायका भक्कम नोकऱ्या करतात, देशभर प्रवास करतात आणि नवरे घरी बसून फ्रीलान्स काम करतात. असं जोडपं तुमच्याकडे आलं तर पुरुष घरी बसून राहणार म्हणून त्या जोडप्याचीपण तुम्हाला भीती वाटणार का?" (...)

कोणत्याही ठिकाणचे नियम पाळावेत असे मला वाटते. आमच्या मालकीणबाई वागायला अतिशय शांत आणि सज्जन होत्या. मला त्यांना दुखवावेसे वाटले नाही. माणसाची मूल्यव्यवस्था आपण इतक्या पटकन बदलू शकत नाही. त्यांना माझी बाजू घेऊन सोसायटीशी संवाद करता आला असता, पण तो त्यांना करायचा नव्हता. मी सामान हलवून आर्थिक व्यवहार रद्द करायला संमती दिली. ह्या सगळ्यात मला आणि माझ्या कुटुंबाला खूप मनस्ताप झाला. आमच्या वेळेचा अपव्यय झालाच, पण मनालाही वाईट वाटत राहिले, की इतक्या साध्या गोष्टीमुळे आपण माणसांच्या एका समूहात राहायला नालायक ठरतो! आपल्याच शहरात!

**क. वरील अनुभवकथनातल्या प्रत्येक परिच्छेदाला एक योग्य शीर्षक द्या.**

उदा॰ पहिला परिच्छेद : पुरुष होम मेकर

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**ख. वरील अनुभवकथनातल्या काही शब्दांच्या योग्य अर्थांशी जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १. होम मेकर | क. वेळ वाया जाणे |
| २. निष्पाप | ख. जगण्यासाठी मानलेली तत्त्वे |
| ३. मूल्यव्यवस्था | ग. निरागस, निर्मळ |
| ४. वेळेचा अपव्यय होणे | घ. घराची सर्व काळजी घेणारा, घर सांभाळणारा |

**ग. वरील अनुभवावर आधारित खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. सचिन कुंडलकर हे स्वत:ला एक उत्तम होम मेकर का मानतात?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**२. सचिन कुंडलकर ह्यांना एकदा भाड्याचे घर का सोडावे लागले? त्यांच्या घरमालकिणीचा काय गैरसमज झाला होता?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**३. अविवाहित आणि एकटे राहणाऱ्या माणसांबद्दल असलेले लोकांचे कोणते पूर्वग्रह कुंडलकर सांगतात?**

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**४. 'स्थलांतर' ह्या विषयाशी संबंधित कोणते महत्त्वाचे प्रश्न कुंडलकर मांडतात?**

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

**घ. तुम्ही कधी स्थलांतर केले आहे का? स्थलांतराच्या कुठल्या समस्या तुम्हाला जाणवल्या? त्यावर उपाय सुचवा. स्थलांतराचा तुमचा अनुभव सांगा.**

**२. 'स्थलांतर' ह्या विषयावर एक विशेष रिपोर्ट पाहा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**क. योग्य उत्तर अधोरेखित करा.**

१. कुडाळमधल्या कोणत्या भागातून लोक स्थलांतरित होत आहेत? (फुले नगर, आंबेडकर नगर)

२. लोकांनी कधी स्थलांतर केले? (रात्री, सकाळी)

३. ह्या स्थलांतराचे मुख्य कारण काय? (दुष्काळ, पूर)

**ख. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. या वर्षी पूर येण्याचे कारण कोणते?

---------------------------------------------------------------------------------

२. रात्री पूर आल्याने नागरिकांना कोणती भीती जाणवते आहे?

---------------------------------------------------------------------------------

३. स्थानिकांना स्थलांतर करताना कोणत्या समस्यांना तोंड द्यावे लागते आहे?

---------------------------------------------------------------------------------

**ग. कंसातील योग्य शब्द योग्य रिकाम्या जागी भरा.**

१. -------- संध्याकाळी घरांमध्ये पाणी भरायला सुरुवात झाली आणि ------------- सकाळी ते ओसरलं. (सोमवारी, मंगळवारी, बुधवारी, गुरुवारी)

२. गेली -------- वर्षे नदीला पूर आला --------. (चार, दोन, होता, नव्हता)

**३. कंसात दिलेले शब्द कवितेत योग्य जागी वापरून कविता पूर्ण करा.**

(सोबत्यांना, बागेत, सैरभैर, थबकले, गेली)



दूरदेशीची पाखरे
माझ्या ---------- खेळली
शीळ घालता घालता
पहाटेला दूर -----------

एक बापुडे सकाळी
होऊनीया -----------
चोच मिटून शोधते
----------- बागभर

इवलाल्या पावलांनी
इथेतिथे डोकावले
कुठेतरी पानाआड
काकडून -----------

- शिरीष पै

**४. कालवाचक शब्दयोगी पदे**



ताऱ्यांची चमक कधीच कमी होत नाही, हे विधान अमिताभ बच्चन ह्या भारतीय अभिनेत्याने खरे करून दाखवले आहे. पंच्याहत्तरी ओलांडलेला हा अभिनेता आजही एखाद्या तरुण मुलासारखा तरतरीत आणि उत्साही असतो. त्याचे कारण आहे त्याची दिनचर्या. अमिताभ बच्चन रोज सकाळी लवकर उठतात आणि चालायला जातात, परंतु त्याआधी ते दोन ग्लास पाणी आणि आवळ्याचा रस पितात. त्यानंतर व्यायाम करतात, आणि मगच ते नाश्ता करतात. नाश्त्यानंतर ते ग्रीन टी घेतात. त्यानंतर ते एखादे फळ खातात. काम नसेल तर दुपारी घरीच जेवतात. दुपारच्या जेवणात विविध धान्यांची पोळी, भात, डाळ आणि एखादी भाजी असते, पण त्याआधी ते सलाड खातात. रात्रीच्या जेवणात कधीकधी पनीर असते. झोपण्याआधी ते न विसरता दूध पितात.

**क. अमिताभ बच्चन ह्यांची दिनचर्या 'नंतर' हे शब्दयोगी पद वापरून लिहा.**

उदा० अमिताभ बच्चन रोज सकाळी लवकर उठतात. त्यानंतर ते चालायला जातात. त्यानंतर...

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

**ख. आता हीच दिनचर्या उलट्या क्रमाने 'आधी' हे शब्दयोगी पद वापरून पुन्हा लिहा.**

उदा० अमिताभ बच्चन रोज रात्री झोपण्याआधी दूध पितात. त्याआधी...

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

**ग. आता तुमची दिनचर्या 'नंतर' हे शब्दयोगी पद वापरून लिहा.**

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

**घ. आता तुमची हीच दिनचर्या 'आधी' हे शब्दयोगी पद वापरून उलट्या क्रमात लिहा.**

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------

**च. उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहा.**

| | | |
|---|---|---|
| उदा॰ (अण्णा, पूजा, रेडिओ) | : | अण्णांना पूजेच्या वेळी रेडिओ लावलेला चालत नाही. |
| १. (ताई, जेवण, बडबड) | : | ------------------------------------ |
| २. (आई, स्वयंपाक, टीव्ही) | : | ------------------------------------ |
| ३. (सुशांत, अभ्यास, गप्पा) | : | ------------------------------------ |
| ४. (कश्मीरा, गाणे, फोन) | : | ------------------------------------ |
| ५. (आजी, दुपारची झोप, लहान मुलांचा आवाज) | : | ------------------------------------ |

**५. व्यतिरेकवाचक शब्दयोगी पद**

**क. रिकाम्या जागी 'व्यतिरिक्त', 'शिवाय' किंवा 'वाचून' भरा आणि वाक्ये पूर्ण करा.**

१. आज मी मोबाईल घरीच ठेवून बाहेर पडले. मोबाईल------------ जगता कसं येतं, ते पाहायचं होतं मला.

२. मी ठरवलं होतं, मॉलमध्ये अनावश्यक वस्तू खरेदी करायच्या नाहीत. तरीही मी नवीन कपडे घेतले. कपडे तर घेतलेच, पण त्या------------ नवीन बूटही घेतले.

३. माझ्यासाठी माझे कुटुंब फार महत्त्वाचे आहे. माझ्या कुटुंबियां------------ माझे मित्रही महत्त्वाचे आहेत. माझ्या मित्रां------------ मी जगू शकत नाही.

४. तुला काय वाटते, तुझ्या------------ माझे काही अडते का? मुळीच नाही. मी एकटी माझी कामे करू शकते..

५. तुझी आईच तुझी सगळी कामं करते ना? तिच्या------------ कसं होणार रे तुझं!

**ख. तुमचे कोणावाचून कुठे अडते किंवा अडत नाही ते सांगा आणि उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहा.**

उदा॰ माझा नवरा खूप काळ घरी नसला, तरी त्याच्यावाचून माझे काही अडत नाही.

१. -----------------------------------------------------------------------------------

२. -----------------------------------------------------------------------------------

३. -----------------------------------------------------------------------------------

४. -----------------------------------------------------------------------------------

५. -----------------------------------------------------------------------------------

**ग. तुमच्या आयुष्यातल्या अनावश्यक गोष्टींबद्दल सांगा, आणि उदाहरणाप्रमाणे वाक्ये लिहा.**

उदा॰ माझ्याकडे दोन संगणक आहेत. त्यातल्या एकाचीच मला गरज आहे. दुसऱ्या संगणकाशिवाय माझे काम होऊ शकते.

१. -----------------------------------------------------------------------------------

२. -----------------------------------------------------------------------------------

३. -----------------------------------------------------------------------------------

४. -----------------------------------------------------------------------------------

५. -----------------------------------------------------------------------------------

## ४ रीती भूतकाळ

**फेसबुक आणि दवंडी**

**आजोबा** : काय रे जितू, मी मघापासून पाहतोय, काय करतोयस तू त्या फोनवर इतका वेळ?

**जितू** : अहो आजोबा, मी ना, माझ्या मित्रांना संदेश पाठवतोय, उद्याचा कार्यक्रम ठरवतोय आम्ही. सर्वांना वेळेवर निरोप मिळायला हवा ना! खरंच आजोबा, पूर्वीच्या काळी कसा हो पाठवायचे तातडीचा निरोप?

**आजोबा** : होतं खरं जरा कठीण. इतक्या जलद नाही मिळायचा निरोप. पण तेव्हाही लोकांनी काही ना काही मार्ग शोधून काढलेच होते.

१. उदाहरणाप्रमाणे वाक्ये बनवा.

**(आज :** व्हॉट्सॲप वर संदेश पाठवणे, फेसबुकवर लिहिणे, ब्लॉगवर लिहिणे, ट्विटर लिहिणे, एस॰एम॰एस॰ करणे, फोन करणे, स्काईप करणे)

**(पूर्वी :** दवंडी पिटणे, चित्रे आणि संदेश हातगाडीवरून फिरवणे, वर्तमानपत्रात स्तंभ लिहिणे, नियतकालिकात लेख लिहिणे, मुक्त व्यासपीठावर भाषण देणे, रात्रीच्या वेळी जाळ करून संदेश देणे, ढोलकी वाजवून संदेश पाठवणे)

**आज :** **पूर्वी :**

उदा॰ आज आम्ही व्हॉट्सॲपवर निरोप पाठवतो. पूर्वी लोक दवंडी पिटत असत.

क. ---------------------------------------------------------------

ख. ---------------------------------------------------------------

ग. ---------------------------------------------------------------

घ. ---------------------------------------------------------------

च. ---------------------------------------------------------------

**२. व्हॉट्सॲप : काल आणि आज. संवाद ऐका व रिकाम्या जागा भरा.**

**सागर** : अरे, आपण एक नवा व्हॉट्सॲप ग्रुप बनवू या का?

**तेजस** : अरे हो, आपल्याला फार गरज आहे त्याची. आपल्या ग्रुपमधल्या सगळ्यांना एकाच वेळी चटकन संदेश पाठवता येईल. नाही तर किती गोंधळ होतो! काल पाहिलंस ना, निम्मे जण पोहोचलेच नाहीत सिनेमा हॉलवर.

**सागर** : हो रे! २१ व्या शतकात आपली ही अवस्था! आपल्या आईवडिलांच्या वेळी ते काय करत असतील कोण जाणे?

**तेजस** : ते खूप स्मार्ट होते बरं! माझी आई सांगत होती, की ती आणि तिच्या मैत्रिणी फोनची साखळी करत असत. एक दुसरीला फोन (क) -------------------------- आणि दुसरी तिसरीला. असं करूनच त्या निरोप पुढे (ख) --------------------------.

**सागर** : सही आयडिया होती रे! तेंव्हा ना मोबाईल होते ना इंटरनेट. सॉलिड गोची होत असणार ना?

**तेजस** : अरे, हे तर काहीच नाही. आपले पूर्वज तसे भारीच होते. अगदी शिवाजी महाराजांच्या काळातपण त्यांनी तातडीने निरोप पोहोचवण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढले होते.

**सागर** : ते कसे?

**तेजस** : ते काय करत असत माहितेय का? एक तर ढोल वाजवून सांकेतिक तालामध्ये बातमी (ग) ----------------------------. रात्रीची वेळ असेल तर आकाशात तोफेचे गोळे (घ) --------------------------. कोंढाणा सर झाल्याची बातमी अशीच दिली म्हणे. आणि सगळ्यात सही काय माहितेय का? अरे, त्या वेळीपण महाराजांचं हेरांचं जबरदस्त जाळं होतं. त्या वेळच्या लोककलाकारांचाही ह्यात मोठा सहभाग आहे (होता). जसे वासुदेव गावोगाव फिरून निरोप आणि संदेश (च) ------------------------, कीर्तनकार कीर्तनातून आणि शाहीर पोवाड्यातून लोकजागृतीचं काम (छ) --------------------------- !

**सागर** : तुला बरं सगळं माहीत असतं!

**तेजस** : अरे, माझी आई देते मला ही सगळी माहिती. शिवाय ती ना, तिच्या आठवणी लिहून ठेवते आणि कधीकधी मला वाचायला देते.

**३. पाठ्यपुस्तकातील नाम + क्रियापद तत्त्वांचा अभ्यास करून लिहा.**

क. ज्या नामाला दोन क्रियापदे लागू शकतात अशी नामे क्रियापदासह लिहा.

-------------------------------------------------------------------------------

ख. 'सुविधा' आणि 'पिच्छा' या नामांसाठी कोणते क्रियापद वापरले आहे?

-------------------------------------------------------------------------------

ग. 'होणे' क्रियापदाबरोबर कोणते नाम आणि इतर शब्द आले आहेत?

-------------------------------------------------------------------------------

**घ. या जोड्या पूर्ण करा.**

१. व्याख्या -------------.

२. ------------- जाणे.

३. ------------- मिळणे.

४. तंबू -------------.

५. ------------- येणे.

**च. कोणत्याही तीन 'नाम + क्रियापद' जोड्यांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.**

# नखशिखान्त

## ४












## चला, शिकू या...

- शरीराचे अवयव
- अपूर्ण भविष्यकाळ
- दोघी - दोन्ही
- जुळ्यांची गंमत, 'जुळ्याचं दुखणं'
- केवलप्रयोगी अव्यये
- शरीर : आजार आणि उपाय, भारतीय परंपरेतील उपचारपद्धती : आयुर्वेद आणि योग
- करता कामा नये, केले पाहिजे
- युवा भाषा
- शब्दयोगी पदे : पुरेसा, पुरता

## १ शरीर आणि अवयव. चित्रावरून अवयव ओळखा आणि रिकाम्या जागा भरून कोडे सोडवा.




## २ अपूर्ण भविष्यकाळ

### १. अपूर्ण काळ : काल – आज – उद्या

कालचे जग कसे होते, तिथे आयुष्य कसे होते, लोक रोजच्या आयुष्यात काय करत असत ह्याबद्दल आपल्याला नेहमीच उत्सुकता असते. पुढील पानावर तीन वेगवेगळ्या काळांतील एकाच गावाची काल्पनिक चित्रे आहेत. तिथे त्या काळी रोजच्या जीवनात काय घडत होते ते उदाहरणात दाखवल्याप्रमाणे अपूर्ण काळात लिहा.



**क. अपूर्ण भूतकाळ**

(गायी - झाडाखाली चारा खाणे, बायका - डोक्यावरून ओझे वाहणे, माणसे - तीनचाकी सायकलवरून सामान विकणे, बायका - बकऱ्या चरायला नेणे, मुले - शाळेत न जाणे, मुले - रस्त्यावर खेळणे, बायका - फक्त साड्या नेसणे)

उदा॰ गायी झाडाखाली चारा खात होत्या.



१. ____________________
____________________

२. ____________________
____________________

३. ____________________
____________________

४. ____________________

५. ____________________

६. ____________________



**ख. अपूर्ण वर्तमानकाळ**

(रस्त्यात खूप वाहने दिसणे, लोक - रस्त्यावर थांबून बोलणे, मुलगी – रस्त्याच्या मधून चालणे, दुकानात दिवे चमकणे, लोक - रिक्षा जास्त वापरणे, शहर बदलणे)

उदा॰ रस्त्यात खूप वाहने दिसत आहेत.



१. ____________________
____________________

२. ____________________
____________________

३. ____________________
____________________

४. ____________________

५. ____________________



### ग. अपूर्ण भविष्यकाळ

(सर्व शहरात एकही झाड दिसत नसणे, आकाशात ड्रोन उडत असणे, जमिनीवरून वाहने न फिरणे, माणसे - कमी काम करणे, काचांची घरे बांधणे, सर्व शहर स्वच्छ दिसणे)

उदा. सर्व शहरात एकही झाड दिसत नसेल.



१. ----------------------------------------
----------------------------------------

२. ----------------------------------------
----------------------------------------

३. ----------------------------------------
----------------------------------------

४. ----------------------------------------

५. ----------------------------------------

**२. पुढील वाक्ये योग्य जागी अपूर्ण भूतकाळ / अपूर्ण वर्तमानकाळ / अपूर्ण भविष्यकाळ वापरून पूर्ण करा.**

क. गेल्या महिन्यातील गोष्ट आहे. सात दिवस सतत पाऊस (पडणे) पडत होता. गणेश गॅलरीत बसून (१) (पुस्तक वाचणे) ----------------. आत घरात मेघना बहुधा (२) (चहा करणे) ----------------, त्याचा सुगंध सगळीकडे (३) (दरवळणे) ----------------. चंदू मागच्या गच्चीत बसून (४) (अभ्यास करणे) ----------------. परीक्षा जवळ आली होती, पण अभ्यास (५) (न होणे) ----------------. काहीच काम (६) (न होणे) ----------------. कोणीही (७) (न खेळणे) ----------------.

ख. गेल्या महिन्यात सुरू झालेला पाऊस अजून पडतोच आहे. गणेश गॅलरीत बसून (१) (पुस्तक वाचणे) ----------------. आत घरात मेघना बहुधा (२) (चहा करणे) ----------------, त्याचा सुगंध सगळीकडे (३) (दरवळणे) ----------------. चंदू मागच्या गच्चीत बसून (४) (अभ्यास करणे) ----------------. परीक्षा जवळ आली आहे, पण अभ्यास (५) (न होणे) ----------------. काहीच काम (६) (न होणे) ----------------. कोणीही (७) (न खेळणे) ----------------.

ग. पुढच्या महिन्यात पाऊस थांबेल असा हवामानखात्याचा अंदाज आहे. तेव्हा मग गणेश गॅलरीत बसून (१) (पुस्तक वाचणे) ------------------------------. आत घरात मेघना (२) (चहा करणे) -------------, त्याचा सुगंध सगळीकडे (३) (दरवळणे) -------------
----------. चंदू मागच्या गच्चीत बसून (४) (मित्रांशी बोलणे) -----------------------.
परीक्षा संपल्यामुळे आणि पाऊस गेल्यामुळे खेळ (५) (रंगणे) ----------------------,
आता खेळण्याशिवाय काहीच (६) (काम न होणे) ----------------------------------,
त्यामुळे चंदू रोज सिनेमा (७) (बघणे) --------------------.

**३. भविष्यकाळात सुंदर दिसण्यासाठी ह्यांपैकी कोण काय करत असेल ते लिहा.**

उदा. बाहुबली बाहुबली जीन्स आणि टी शर्ट घालत असेल.





क. सिंड्रेला ------------------------------------

ख. आपला आवडता चिंटू ______________________________





ग. जेम्स बॉन्ड ------------------------------------------

घ. सामान्य माणूस ______________________________



## ३ दोघी - दोन्ही

**१. कंसातील योग्य शब्द निवडा आणि रिकाम्या जागा भरा.**

(दोघी, दोघांत, दोघींचे, दोघांचे, दोघे, दोघी, दोन्ही...)

क. तुम्ही ------------- जे काय ठरवाल ते मला मान्य आहे.

ख. ह्या ------------- गोष्टी एकाच वेळी करता येणार नाहीत.

ग. मला कुडी आणि बांगड्या, ------------- खूप आवडल्यायत. ------------- घेऊ का?

घ. त्यांचे ------------- मुलगे खेळात हुशार आहेत.

च. त्या ------------- एकाच मुलावर प्रेम आहे.

छ. आम्ही ------------- आज खरेदीला जाणार आहोत.

ज. आम्हा ------------- तिसरा आलेला आम्हाला खपत नाही.

झ. तू ------------ कामं एकाच वेळी करशील तर ------------ बिघडतील.



ट. त्या ------------ घट्ट मैत्रिणी आहेत.

ठ. त्या ------------ काही तरी भांडण झाले आहे.

ड. त्यांना ------------ मुलीच आहेत, मुलगा नाही.

ढ. जुळ्यात ------------ मुलगेच आहेत. मुलगी नाही.

**२. खालील दोन्ही बातम्यांना शीर्षक द्या.**



क. -------------------------

लंडन दि. ४ – ईस्ट ससेक्स भागात राहणाऱ्या पामेला फ्रेझर हिने जुळ्या मुलींना जन्म दिला, ही फारशी नवलाची गोष्ट म्हणता येणार नाही. मात्र तिच्या ह्या दोघी मुली रंगाने पूर्ण वेगळ्या आहेत. दहा लाखांत एखादीच अशी केस असते, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. मिश्र वंशांच्या संबंधांतून होणाऱ्या संततीत दोन्ही वंशांचे गुणधर्म येऊ शकतात हे खरे आहे; मात्र, जुळ्या संततीत अशा दोन वर्णांची मुले होणे हे दुर्मीळ असते.
पामेला आपल्या मुलींच्या जन्मामुळे मात्र भलतीच खूश आहे. चार आठवड्यांच्या ह्या मुलींना घेऊन ती जेव्हा मॅटर्निटी होममधून बाहेर पडत होती, तेव्हा अनेकांनी तिच्या ह्या जुळ्या मुलींमधील फरक पाहून तिला अनेक प्रश्न विचारले. केंडाईस ही वर्णाने काळी आहेच, पण तिचे केस आणि डोळेही काळेभोर आहेत; तर अलिशा युरोपिअन गोरी, भुऱ्या, मऊ केसांची आणि घारी आहे. पामेला आणि तिचा पती ओसवाल्ड हे दोघेही मिश्र वंशाचे आहेत. पामेलाच्या आईमध्ये जमैकन, आयरिश आणि आफ्रिकन वंशांचे अंश आहेत, तर वडील युरोपिअन आणि गोरे आहेत. ओसवाल्डची आई जमैकन - आयरिश वंशाची आहे, तर वडील जमैकन आहेत.

ख. -------------------------



सध्याच्या 'डिजिटल' आणि 'बायोमेट्रिक' युगात हातांचे ठसे खूपच महत्त्वाचे ठरणार आहेत; पण तंतोतंत साम्य असणाऱ्या 'आयडेंटिकल' जुळ्यांच्या ठशांचे काय? अशा जुळ्या भावंडांच्या हातांच्या ठशांमध्ये तंतोतंत साम्य असते का, आणि त्यामुळे व्यवहारामध्ये व्यक्तीची ओळख पटण्यामध्ये काही चूक होण्याची शक्यता आहे का, हे पडताळण्यासाठी कोल्हापूरमधील पत्की हॉस्पिटल अँड रिसर्च फाउंडेशन आणि डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालयातील शरीरशास्त्र विभाग ह्यांच्या पुढाकाराने एक संशोधन करण्यात आले. ह्या संशोधन प्रकल्पांतर्गत पत्की रुग्णालयामध्ये जन्म झालेल्या आणि विविध वयोगटांतल्या २८ 'आयडेंटिकल' जुळ्यांच्या बोटांचे, तसेच दोन्ही हातांचे ठसे घेण्यात आले. ह्या ठशांचा अभ्यास शरीरशास्त्रज्ञांनी लेन्सद्वारे केला. 'आयडेंटिकल' जुळ्यांत दिसण्यामध्ये साम्य असले, त्यांचा रक्तगट आणि त्यांच्यामधील जनुकीय रचनादेखील तंतोतंत सारख्या असल्या, तरी त्यांच्या हातांच्या ठशांमध्ये फरक असतो, असे ह्या संशोधनातून लक्षात आले.

**३. चूक की बरोबर?**

क. जुळी मुले दोन भिन्न वर्णाची असणे ही गोष्ट अभावाने आढळते. -------------

ख. फक्त आयरिश आणि आफ्रिकन मिश्र विवाहातील जुळी मुले वेगळ्या वर्णाची असतात. -------------

ग. जुळ्या भावंडांच्या हातांचे ठसे एकसारखे असतात, फक्त वेगळ्या वर्णांच्या जुळ्यांच्या हातांचे ठसे वेगळे असतात. -------------

## ४ केवलप्रयोगी अव्यये

**१. वरील दोन्ही उताऱ्यांतील अधोरेखित केलेली वाक्ये, त्यांच्या सुरुवातीला केवलप्रयोगी अव्यय घालून परत लिहा.**

उदा. ओहो! दहा लाखांत एखादीच अशी केस असते?

क. --------------------------------------------------------------------------------

ख. --------------------------------------------------------------------------------

ग. --------------------------------------------------------------------------------

घ. --------------------------------------------------------------------------------

च. --------------------------------------------------------------------------------

**२. योग्य ती केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यये घालून रिकाम्या जागा भरा.**

(अरेरे, बाप रे, ऑ, शी, शाब्बास, अरेरे, अरे वा, ओहो, छे छे, अरे ए ...)

क. -------------! काय सांगतोयस! बंडूला पहिला वर्ग मिळाला? तो तर पास होतो की नाही अशी चिंता वाटत होती त्याच्या आई-वडिलांना.

ख. -------------! तुझ्या चांगल्या साडीवर चिखल उडाला की गं!

ग. -------------! किती ओंगळ प्राणी आहे हा!

घ. -------------! केवढं मोठं अस्वल आहे ह्या पिंजऱ्यात!

च. -------------! अगदी वेळेवर आलास.

छ. -------------! इतक्या लहान वयात असा वाईट प्रसंग ओढवावा ना!

ज. -------------! असं अद्भुत दृश्य मी ह्याआधी पाहिलं नव्हतं.

झ. -------------! तू इथे कशी काय?

ट. -------------! हे काही बरोबर झालं नाही.

ठ. -------------! एका जागी शांत उभा रहा ना जरा!

**३. प्रत्येक वाक्यासाठी योग्य केवलप्रयोगी अव्यय निवडून पूर्ण वाक्य लिहा.**
**(अरेरे(२), अरे, शाबास, अबब, इश्शी, बाप रे)**

उदा。 दोन गाड्या - जोरात टक्कर - होणे

बाप रे! त्या दोन गाड्यांची जोरात टक्कर झाली.

क. सलोनी - वर्ग - पहिला नंबर - येणे

---

ख. नदी - मोठा - पूर - येणे

---

ग. मी - पाय - चिखल - पडणे

---

घ. जोगिंदर - कुत्रा - चावणे

---

च. सिमरन - सामना - हरणे

---

छ. बलविंदर - जास्त ताकद - असणे - तरी - कुस्ती - हरणे

---

ज. आता - कोणीही - काहीही - न बोलणे

---

**४. योग्य जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| क. कौतुक | १. अच्छा, बरं |
| ख. विरोध | २. अरेरे, अगाई |
| ग. शोक | ३. छे छे, छट्, हट् |
| घ. मौन | ४. शाबास, छान, वा वा |
| च. संमती | ५. चूप, गप |

**५. चुकीचे पर्याय खोडा.**


| | | | | |
|---|---|---|---|---|
| क. आश्चर्य | : | १) अरे | २) अबब | ३) अरेरे |
| ख. लज्जा | : | १) अय्या | २) हुर्रे | ३) इश्श |
| ग. संबोधन | : | १) अहो | २) अरे | ३) हुड्त |
| घ. शोक | : | १) हाय | २) अरेरे | ३) अहाहा |
| च. भीती | : | १) बाप रे | २) देवा | ३) मस्त |
| छ. फजिती | : | १) हॅत्तेच्या | २) ठीक | ३) हुर्रे |


**६. पुढील चित्र पाहून तुम्ही कोणता उद्गार काढाल? रिकाम्या जागेत योग्य ते केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यय लिहा.**

क.  ----------------------

ख.  ----------------------

ग.  ----------------------

घ.  ----------------------

च.  ----------------------

छ.  ----------------------

## ५ सौंदर्यासाठी काहीही!

**१. एक संवाद ऐकून त्यावरील प्रश्न सोडवा.**

**क. चूक की बरोबर ते लिहा.**

१. खोलीतून आईच्या किंचाळण्याचा आवाज आला. -------------

२. दार उघडत नसल्यामुळे ती किंचाळत होती. -------------

३. तिचा चेहरा पाहून भाई, बंटू जोरजोरात हसायला लागले. -------------


४. कॉलेजला जाण्याचा मंदिराला वैताग आला होता. -------------

**ख. संवादात ऐकलेली केवलप्रयोगी अव्यये लिहा.**

१. ------------- २. -------------

३. ------------- ४. -------------

**२. एकीकडे मंदिराची तारुण्यपीटिका लपवण्यासाठी चाललेली ही धडपड, आणि दुसरीकडे फॅशनच्या नावाखाली जगात काय काय चाललंय बघा! खालील चित्रे पहा आणि त्यांचे वर्णन लिहा.**



उदा. कृत्रिम पापण्यांचे केस नाकपुड्यांना लावून नाकातून केस बाहेर डोकावत आहेत असा भास निर्माण केला आहे.

क.  ख.  ग.  घ. 

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

**३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

क. वरीलपैकी कोणती फॅशन करायला तुम्हाला आवडेल? त्याचे कारण लिहा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

ख. हे सर्व प्रकार तुम्हाला आरोग्याच्या दृष्टीने योग्य वाटतात का? हो की नाही? दोन्हीची कारणे सांगा.

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

ग. आरोग्याच्या दृष्टीने ह्यांत कोणते धोके असू शकतील?

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ६ काय केले पाहिजे? काय करता कामा नये?

तुमच्या मित्रांना तुम्ही काय सल्ला द्याल? अशा फॅशन करताना कोणती खबरदारी घ्यावी? (त्यांनी काय केले पाहिजे? त्यांनी काय करता कामा नये?)

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

## ७ शब्दयोगी पद

**पुरेसा, पुरेशा, पुरेशी, पुरेसे, पुरता, पुरती, पुरते' ह्यांपैकी कोणतेही योग्य पद वापरून रिकाम्या जागा भरा.**

१. ------------- पाऊस पडला नाही तर शेतकऱ्यांचे हाल होतात. देवदयेने यंदा शेती-------- पाऊस पडलाय.

२. मी केवळ माझ्या ------------ बघत नाही. गावचा सरपंच म्हणून मला सगळ्या गावाचा विचार करायला लागतो.

३. मास्तर म्हणाले, “अरे लेका, निदान पास होण्या ------------ तरी अभ्यास कर.”

४. कशाचीही जास्त हाव धरू नये, असे आजी म्हणायची. आपल्या गरजे ------------ मिळाले, की ती खूश असायची.

५. सकाळी उठून थोडा वेळ सूर्यप्रकाशात बसावे. त्यामुळे आपल्या शरीराला ------------ डी - जीवनसत्त्व मिळते.

६. जेवणात ------------ भाज्या असतील तर आरोग्य चांगले राहते.

७. डोळ्यांची काळजी घ्या. त्यांना ------------ विश्रांती द्या.

८. ------------ अन्नाअभावी ती मुले कुपोषित राहिली होती. आमच्या संस्थेने त्यांच्या आश्रमाला शंभर मुलां ------------ अन्न-धान्य पोहोचवले.

९. पूर्वी लोक थोडक्यात आनंदी असायचे. जरुरी ------------ अन्नपाणी आणि राहायला घर असले, की त्यांना अधिक काही नको असायचे.

१०. ह्या महिन्या ------------ धान्य आहे ना घरात? उद्यापासून संप आहे दुकानदारांचा.

## ८ म्हणी आणि वाक्प्रचार

**मराठीत नेहमी वापरले जाणारे आणि ज्यांत ‘पुरता’ किंवा ‘पुरेसा’ ह्या शब्दांचा वापर असतो, असे वाक्प्रचार किंवा शब्दप्रयोग :**

**कामापुरता मामा, ताकापुरती आजी :** म्हणजे गरजेप्रमाणे आणि गरजेपुरतेच आपण समोरच्या व्यक्तीशी नाते जोडतो.

**१. आताच्या जीवनशैलीला सुसंगत असे वाक्प्रचार तुम्हाला सुचतात का ते पहा. (काही व्यक्तींवर, तर काही वस्तूंवर आधारित!)**

उदा. बाबा : क्रेडिट कार्डपुरते बाबा पाहिजेत.

**व्यक्ती -**

क. आई : ------------------------------

ख. मित्र : ------------------------------

ग. शिक्षक : ------------------------------

घ. सहकारी : ------------------------------

च. बॉस : ------------------------------

छ. मैत्रीण : ------------------------------

पार्टी  खाऊ  सुट्टी  फोन  मदत  पैसे  शिकवणे  बढती  पुस्तक  शाबासकी

उदा。 चार्जर : चार्जिंगपुरता चार्जर पाहिजे.

**वस्तू -**

क. पैसे : ------------------------------------
ख. शिक्षण : ------------------------------------
ग. घर : ------------------------------------
घ. नवे कपडे : ------------------------------------
च. मोटारसायकल : ------------------------------------
छ. नवा मोबाईल : ------------------------------------

झोपणे वाढदिवस नोकरी सहल आराम नटणे खाणे फोटो काढणे फिरणे राहणे गाणी ऐकणे

**२. खालील म्हणी आणि वाक्प्रचारांच्या त्यांच्या अर्थांशी जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| क. नाकाने कांदे सोलणे | १. नेहमी तयार असणे |
| ख. नखाची सर नसणे | २. आधी भरपूर जेवण, मगच इतर काम |
| ग. आधी पोटोबा मग विठोबा | ३. एखादी गोष्ट कोणालाही कळू न देता करणे |
| घ. एका पायावर तयार असणे | ४. तुलना होण्याची योग्यताच नसणे |
| च. या कानाचं त्या कानाला कळू न देणे | ५. स्वतःच्या हुशारीची बढाई मारणे |

**३. कंसात दिलेल्या शब्द + क्रियापदांच्या जोड्यांपैकी योग्य जोडी योग्य ठिकाणी, योग्य रूप वापरून उतारा पूर्ण करा.**

(धाड भरणे, गळा दाटून येणे, आरोग्य लाभणे, झोप काढणे, व्याधी जडणे, गर्दी जमणे, लचक भरणे, घृणा वाटणे, व्याधी जडणे, गप्प बसणे.)

दुपारी छान (क) -------------- --------------. उठून बघितलं तर पाच वाजले होते. “बाप रे! उशीर झाला.” ताडकन उठले तर कमरेत (ख) -------------- --------------. आई म्हणाली, “अगं, बरी आहेस ना?” मी म्हटलं, “मला काय (ग) -------------- -------------- आहे? ठीक आहे मी.” तशीच निघाले. रस्त्यात गर्दी (घ) -------------- --------------. गर्दीतून डोकावून बघितलं. एक व्यसनी माणूस फूटपाथच्या कडेला पडला होता. त्याची अवस्था पाहून (च) -------------- --------------. मुळात चांगलं (छ) -------------- -------------- असताना ही व्यसनाची (ज) -------------- -------------- त्याला -------------- -------------- होती. आणि एकदा ही (झ) -------------- -------------- की सुटणं कठीण. त्याची बायको तिथं आली. लोकांच्या एकाही प्रश्नाला उत्तर न देता ती (ट) -------------- --------------. दु:खाने आणि संतापाने तिचा (ठ) -------------- -------------- आला होता.

# तोंडी परीक्षा

एकूण गुण १५

## १ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ६)

**१. खालील उतारा मोठ्याने वाचून दाखवा. (२)**

**हँडसम असण्याचे तोटे**

सुंदर दिसण्याचे जसे फायदे असतात तसे तोटेही असतात. आता ह्या कर्मचाऱ्याचंच घ्या ना! त्याच्या दिसण्यानं त्यानं विमानातील एका प्रवाशाचं लक्ष वेधून घेतलं. मग काय, ह्या प्रवाशानं त्याचा व्हिडिओ काढून तो सोशल मीडियावर शेअर केला. हँडसम दिसत असल्यानं सोशल मीडियावर त्याची तुफान चर्चा झाली. रातोरात हा हँडसम हंक प्रसिद्ध झाला. पण ही प्रसिद्धी त्याला भोवली. परिणामी त्याच्या पगारातून जवळपास १०% रक्कम कंपनीनं दंड म्हणून कापली. त्यामुळे सुंदर दिसण्याचा त्याला जसा फायदा झाला तसाच तोटाही झाला.

त्याचं झालं असं, की हा कर्मचारी धावपट्टीवरून चालत येत होता. त्याला पाहून एका महिला प्रवाशानं त्याचा व्हिडिओ काढून व्हिबो या सोशल मीडियावर शेअर केला. अनेकांनी त्याची तुलना दक्षिण कोरियातल्या एका सुपरस्टारशीही केली. रातोरात प्रसिद्ध झालेला हा कर्मचाऱ्याचा व्हिडिओ त्याच्या कंपनीतील वरिष्ठापर्यंत पोहोचला. त्या व्हिडिओत काही वावगं नसलं, तरी एक गोष्ट मात्र कंपनीतील वरिष्ठांना खटकली. ती म्हणजे त्याचे कपडे. कंपनीच्या ड्रेसकोडप्रमाणे त्यानं योग्य रीत्या कपडे परिधान केले नव्हते. त्याचप्रमाणे, धावपट्टीवर तो ज्या प्रकारे खिशात हात घालून वावरत होता, ते कंपनीच्या नियमावलीत बसत नाही. त्यामुळे नियमभंग केल्यामुळे त्याच्यावर कारवाई करत त्याच्या पगारातली १०% रक्कम कापण्यात आली.

**क. पुढील प्रश्नांची उत्तरे द्या. (४)**

१. त्या कर्मचाऱ्याची कंपनीने केलेल्या कारवाईबाबत काय प्रतिक्रिया असेल?

२. सुंदर दिसण्याचे आणखी कोणते तोटे असू शकतात?

## २ संवाद (एकूण गुण ४)

तुमच्यापेक्षा वयाने लहान असलेल्या तुमच्या मित्राचं / मैत्रिणीचं गेल्या काही दिवसांत खूप वजन वाढलंय आणि त्यामुळे आरोग्यविषयक अनेक तक्रारीही मागे लागल्यात. त्याने / तिने काय केले पाहिजे / काय करता कामा नये? कंसातील शब्दांचा वापर करून योग्य तो सल्ला द्या.

(व्यायाम, जंक फूड, संतुलित आहार, योग, सूर्यनमस्कार)







३ प्रतिक्रिया (एकूण गुण ५)

**१. पुढील घटनांमध्ये स्वत:च्या भावना कशा व्यक्त कराल? योग्य ते केवलप्रयोगी (उद्गारवाचक) अव्यय वापरून वाक्य बनवा.**

क. दादाला नवी नोकरी लागली.

ख. तुम्ही बऱ्याच महिन्यांनी तुमच्या शहरात आला आहात. पण शहरात सर्वत्र खूप घाण व दुर्गंधी पसरलीय.

ग. रस्त्यातून चाललेल्या मिरवणुकीत खूप कर्कश आवाजात गाणी लावली आहेत.

घ. छोट्या अनयने पहिल्यांदाच फार चविष्ट कोशिंबीर केलीय.

च. प्रीतीला ऑफिसला जायला उशीर झालाय, तरीही पठ्ठी आरामात आवरतेय.

# लेखी परीक्षा

एकूण गुण ३५

१ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ७)



**चाळसंस्कृती**

आमच्या चाळीमध्ये बऱ्याच गमतीजमती पाहायला मिळत असत. चाळीत कोणा एकाच्या घरात वर्तमानपत्र येत असेल, तर तेच वर्तमानपत्र आळीपाळीने चाळीतील प्रत्येक घरात वाचले जायचे. कोणाचे लग्न किंवा कोणाचा वाढदिवस असला किंवा कोणाकडे एखादा सांस्कृतिक कार्यक्रम असला, तर आम्ही सगळे मिळून तो मोठ्या जल्लोषात साजरा करायचो. कोणताही सण असो, चाळीतले लोक प्रत्येक धर्माचे, प्रत्येक जातीचे सण अगदी भक्तिभावाने आणि धूमधडाक्यात साजरे करत असत. असा बंधुभाव सगळ्या शेजाऱ्यापाजाऱ्यांकडून जपला जायचा. फ्लॅट संस्कृतीत मात्र कोणता सण आला आणि कोणता गेला, हेही लक्षात येत नाही. चाळीत कोणतेही भेदभाव सहसा पाळले जायचे नाहीत. कोणीही कोणाच्याही घरी जात असे आणि अगदी हक्काने कपभर चहा मागत असे. आमची आई तर उन्हाळ्यात शेजाऱ्यांचा फ्रीज उघडून अगदी बिनधास्तपणे थंड पाण्याची बाटली घेऊन यायची. एखादा विशेष पदार्थ केला, तर त्याचा एकेक घास चार शेजाऱ्यांकडे पाठवणे, बाजारातून येताना आठवणीने एकमेकांसाठी मिरच्या-कोथिंबीर आणणे वगैरे प्रथा तर आता इतिहासजमाच झाल्या आहेत. फ्लॅट संस्कृतीत सर्व दरवाजे सदैव बंद असतात. शेजारच्या फ्लॅटमध्ये कोण राहतो, ह्याची खबर त्या इमारतीत राहणाऱ्या शंभर लोकांपैकी जेमतेम दहा लोकांनाच असते. त्याउलट चाळीत मात्र पहिल्या घरातल्या लोकांची बातमी चाळीतल्या शेवटच्या घरालाही सहज कळत असे. चाळीत नळावरून मात्र अनेक वेळा रामायण व्हायचे. नळावर पहिले पाणी कोण भरणार ह्याचे नंबर लागायचे, आणि मग त्यावरूनच अनेक ठिकाणी भांडणे होत असत. पण ही भांडणे तेवढ्यापुरतीच असायची. चाळीतले लोक एकमेकांची वेळप्रसंगी खूप काळजी घ्यायचे. चाळीत एखादा माणूस आजारी असेल तर सगळी चाळ त्याच्या चौकशीला घरी तंबू ठोकून बसायची. कोणी बिस्किटे, तर कोणी नारळपाणी आणायचे. चाळीतल्या लोकांची अशी जीवनशैली पुन्हा कधीही पाहायला मिळणार नाही.

**१. चाळीतल्या व फ्लॅटमधल्या आयुष्याची तुलना करा.** **(२)**

| | **चाळ** | **फ्लॅट** |
|---|---|---|
| लोकांचा स्वभाव | | |
| आनंदाचे प्रसंग | | |
| सण | | |
| प्रेम | | |

**२. कंसातील सूचनेप्रमाणे योग्य ते बदल करा.** **(२)**

क. आमच्या चाळीमध्ये बऱ्याच गमतीजमती पाहायला मिळत होत्या. (हे वाक्य रीती वर्तमानकाळ वापरून पुन्हा लिहा.)

---------------------------------------------------------------------------------

ख. एखादी प्रथा इतिहासजमा होणे म्हणजे – १) प्रथा ऐतिहासिक होणे २) प्रथा पाळणे कायमचे बंद होणे ३) प्रथा सुरू होणे (योग्य तो पर्याय निवडा.)

---------------------------------------------------------------------------------

ग. घरी तंबू ठोकून बसणे म्हणजे – १) घरी ठाण मांडून बसणे २) घरात तंबू बांधणे ३) घराला कुलूप लावून बसणे (योग्य तो पर्याय निवडा.)

---------------------------------------------------------------------------------

**३. चाळसंस्कृतीतील जीवनशैलीविषयी तुम्हाला काय वाटते ते ५-६ ओळींत लिहा.** **(३)**

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

## २ व्याकरण (एकूण १२ गुण)

**१. रिकाम्या जागी अपूर्ण भूतकाळ, अपूर्ण वर्तमानकाळ, अपूर्ण भविष्यकाळ ह्यांपैकी योग्य त्या काळाची योग्य ती रूपे वापरा. (६)**

क. काल आजी विणकाम (करणे) -------------------------.

ख. उद्या ह्या वेळी आम्ही विमानातून (उतरणे) -------------------------.

ग. ४.१४ ची चर्चगेटला जाणारी जलद लोकल प्लॅटफॉर्म क्रमांक ४ ऐवजी २ वर (येणे) -------------. प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत.

घ. काल केशव कोणाचंच (न ऐकणे) -------------------------.

च. उद्यापासून परीक्षा आहे ना? तरीपण रमा आज अभ्यास करताना (न दिसणे) ---------------------.

छ. उद्याही तू हेच काम (न करणे) --------------------- अशी मी अपेक्षा करते.

**२. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द भरून वाक्ये पूर्ण करा. (३)**

**(दोन्ही, दोघं, एकटी, दोघी, एकटा, दोघां-)**

क. प्रधानांच्या ------------- मुली सैन्यात आहेत. ------------- प्रचंड हुशार आणि धाडसी आहेत.

ख. एवढ्या मोठ्या वाड्यात ती ------------- राहते.

ग. श्वेता आणि प्रमोद, तुम्ही ------------- खरेदीचं बघा.

घ. घराच्या चाव्या आम्हा ------------- कडे असतात.

च. हा ------------- एवढ्या माणसांचा स्वयंपाक करू शकेल?

**३. योग्य ते शब्दयोगी अव्यय निवडून वाक्य पूर्ण करा. (३)**

| | | | |
|---|---|---|---|
| क. जेवणा ------------- दोन तासांनी झोपावे. | १. आधी | २. नंतर | ३. वेळी |
| ख. सध्या कामा ------------- काय चालू आहे? | १. आधी | २. वेळी | ३. व्यतिरिक्त |
| ग. किती स्वत: ------------- विचार करतेस तू! | १. पुरता | २. वाचून | ३. खेरीज |
| घ. कोणाचंही कोणा ------------- काही अडत नाही. | १. आधी | २. पुरता | ३. वाचून |

च. निघण्या---------- मला एकदा फोन कर. १. वेळी २. खेरीज ३. आधी

छ. प्रार्थनेच्या---------- सगळ्यांनी घरात हजर असलं पाहिजे. १. वेळी २. नंतर ३. पुरेसं

## ३ शब्दसंपदा (एकूण गुण ११)

**१. शब्दकोडे पूर्ण करा!** **(५)**

**उभे शब्द –**

क. व्यक्तीच्या गरजेनुसार, प्रकृतीनुसार व ऋतूंतील बदलांप्रमाणे आहाराची योजना असावी, असे --------- सांगतो.

ख. निवडणुकीआधी --------- करून लोकसंख्या निश्चित करायला हवी.

ग. संपूर्ण जगाची एका मोठ्या बाजारपेठेत रूपांतरित होण्याची प्रक्रिया.

घ. शहरातून गावात---------केल्यानंतर तिथल्या राहणीमानाशी जुळवून घेताना राघवच्या नाकी नऊ आले.

च. तरुणाईच्या भाषेतील एक शब्द. ---------

**आडवे शब्द –**


क. वाहतुकीच्या सोयी.

ख. आधी---------प्रेम करायचं आणि मग मिळालेला नकार न पचवता आल्यामुळे मुलींवर हल्ले करायचे, ह्याला काय अर्थ आहे?

ग. घर घेताना आजूबाजूला कोण राहत आहे हे पाहून घ्यावे. शेवटी--------च कामी येतो.

घ. शक्तिशाली

च. प्रचंडगड पाहताक्षणी श्रावस्तीच्या तोंडून निघाले, “---------! किती मोठ्ठाय हा किल्ला!”




**२. योग्य जोड्या लावा आणि वाक्यात उपयोग करा.** **(६)**

| | |
|---|---|
| क. कात टाकणे | १. अतिशय प्रिय असणे |
| ख. भुवया उंचावणे | २. एकदम चांगला बदल करणे |
| ग. जीव की प्राण असणे | ३. आश्चर्य व्यक्त करणे |

क. कात टाकणे - ____________________

____________________

ख. भुवया उंचावणे - ____________________

____________________

ग. जीव की प्राण असणे - ____________________

____________________

## ३-४ चाचणी

४ श्रुतलेखन (परीक्षकांसाठी उतारा शेवटी दिला आहे) (एकूण गुण ५ )



## परीक्षकांसाठी

**श्रुतलेखनासाठीचा उतारा**

आपल्या शरीरावर टॅटू काढून घेण्याचा ट्रेंड सध्या तरुणाईमध्ये भलताच लोकप्रिय झालेला दिसून येतोय. हा ट्रेंड आता प्रसिद्ध असला तरी एकेकाळी टॅटू गोंदवलेल्या लोकांकडे एका विचित्र नजरेतून पाहिलं जायचं. 'टॅटू' फक्त हिप्पी काढतात असा समज आधी होता. भारतात गोंदवून घेण्याची कला प्राचीन काळापासून प्रचलित असली तरीही ती फक्त एक प्रथा म्हणून मर्यादित राहिली. आता मात्र हाच गोंदवून घेण्याचा ट्रेंड सेलेब्रिटींपासून सर्वसामान्य लोकांपर्यंत सगळ्यांनी डोक्यावर घेतला आहे. टॅटू गोंदवून घेण्याचा हा ट्रेंड आता जगप्रसिद्ध असला तरी त्याबद्दलचे काही गैरसमज अजूनही लोकांमध्ये प्रचलित आहेत. एकदा टॅटू गोंदवल्यावर रक्तदान करता येत नाही, कारण टॅटू काढताना ती शाई तुमच्या रक्तात मिसळते व त्यामुळे ते अशुद्ध होतं. असं रक्त अन्य कोणासाठीही घातक ठरू शकतं, असं म्हटलं जातं. हे काही अंशी खरं असलं, तरी नुकत्याच झालेल्या सर्वेक्षणानुसार टॅटू गोंदवलेला माणूस सहा महिन्यांनी रक्तदान करू शकतो, असं डॉक्टरांनी मान्य केलं आहे.

# ५ पर्यावरण











## चला, शिकू या...

- पर्यावरण, समस्या आणि उपाय ह्यांविषयी बोलणे
- पूर्ण भविष्यकाळ
- तापमान, हवामान ह्यांविषयी बोलणे
- शब्दयोगी पदे : ऐवजी, पैकी
- पाण्याशी संबंधित क्रियापदे : सांडणे, शिंपडणे, लवंडणे इ.
- 'तून' / 'आतून' ह्या प्रत्ययांचा वापर
- लहानसा, छानसा, छोटासा इ.

## १ पर्यावरण

१. तुम्ही शिकलेले निसर्ग आणि पर्यावरण ह्यांच्याशी संबंधित शब्द खालील शब्दकोड्यात आहेत. तुमच्या मदतीसाठी काही अक्षरे तशीच ठेवली आहेत. उरलेली अक्षरे भरून कोडे पूर्ण करा.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | का | | | ना | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | ण | | | | | |
| | | | | | | | | स्टि | | | |
| | | | | | प | | | | | | |
| | क्षी | | न | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | ओ | | | | | के | | | | | |
| | | | | | | | | झा | | | |
| | | | | | ऑ | | | | | | |

**२. ओळखा आणि बरोबर उत्तर अधोरेखित करा.**

क. हे पूर्वी जमिनीचा १४% भाग व्यापत होते, पण १९९१ पर्यंत त्यातील जवळजवळ ५०% नाश पावले आहे.

१. पाणी　　२. रेन फॉरेस्ट (वर्षावन)　　३. डोंगर

ख. ह्याला शेतकऱ्यांचा मित्र म्हणतात.

१. गांडूळ　　२. पक्षी　　३. पाणी

ग. हा थर सूर्याच्या अतिनील किरणांपैकी ९९% शोषून घेतो आणि पृथ्वीचे रक्षण करतो.

१. धुके　　२. ढग　　३. ओझोन

घ. निसर्ग आणि पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन सूचित करण्यासाठी ह्या रंगाचा वापर करतात.

१. लाल　　२. हिरवा　　३. पिवळा

च. प्लास्टिकचे विघटन होण्यास इतका अवधी लागतो.

१. दोन महिने　　२. दोनशे पन्नास वर्षे　　३. चारशे ते चारशे पन्नास वर्षे

**३. पुढील भाववाचक नामे योग्य जागी वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(हव्यास, खबरदारी, शिडकावा, उकाडा, सामंजस्य, तीव्रता, सातत्य, ऱ्हास, चालना, वणवण, प्रोत्साहन, गजबजाट, गरिबी, जागृती, निळाई (×२))

क. वाहनांचा --------------- इतका होता, की त्याचं फोनवरचं बोलणं नीट ऐकू येत नव्हतं.

ख. पाण्याचे स्रोत आटण्याला पावसाचं प्रमाण कमीजास्त होणं, ह्यापेक्षा जंगलांचा ---------- होणं जास्त कारणीभूत आहे.

ग. वारा वाहण्याचं थांबलं, की ---------------- जास्तच जाणवतो.

घ. वस्तूंचा ---------------- सोडला, तर संसाधनांच्या कमी वापरानेही माणूस आरामात राहू शकेल.

च. पश्चिम घाटामधील रहिवाशांकडे पैशाची ---------------- असली तरी जैवविविधतेची श्रीमंती आहे.



छ. उत्तराखंडातील बेसुमार जंगलतोडीमुळे चिपको आंदोलनाला ---------------- मिळाली.

ज. कोरकू लोक आणि जंगलातील प्राणी ह्यांचे सहजीवन चांगले असण्यामागे कोरकूंचे ---------------- कारणीभूत आहे.

झ. जंगलामध्ये वावरताना तेथील नियम पाळण्याची ---------------- आपण घेतली पाहिजे.

ट. जैवविविधतेचा अर्थ आणि महत्त्व, ह्याविषयी अजूनही पुरेशी ---------------- झालेली नाही.

ठ. नळामधून विनासायास पाणी मिळणाऱ्या लोकांना हंडाभर पाण्यासाठी करावी लागणारी ---------------- कशी समजेल?



ड. जमिनीखालील पाण्याची खाली गेलेली पातळी आणि अनियमित पाऊसमान, ह्यामुळे दुष्काळाची ---------------- जाणवू लागली आहे.

ढ. पावसाचा थोडासा ---------------- सुद्धा वातावरणात एक सुखद गारवा निर्माण करतो.

ण. आकाशाच्या ---------------- मुळे जमिनीवरच्या हिरवाईला उठाव येतो, की हिरवाईमुळे ---------------- चे सौंदर्य खुलते?

त. केवळ कोणत्याही वृक्षलागवडीला ---------------- देणे पुरेसे नाही, तर देशी वृक्षांच्या लागवडीचा आग्रह धरला पाहिजे.

थ. नदीच्या प्रवाहाचे ---------------- ही गोष्ट दुर्मीळ झाली आहे.

**४. चंद्रशेखर गोखले ह्यांच्या काही चारोळ्यांची शेवटची ओळ लिहू या.**

झाडावरून प्राजक्त ओघळतो
त्याचा आवाज होत नाही
याचा अर्थ असा नाही की
--------------------------------
--------------------------------

पिंपळाचं रोप कसं
कुठेही उगवतं
कुठेही उगवतं म्हणून
--------------------------------
--------------------------------

ढगांची सावली अलगद
माझ्या अंगावरून गेली
शब्द मिळाले नाहीत तरी
--------------------------------
--------------------------------

## २ पर्यावरण : समस्या आणि उपाय

**१. कोरकूंची पर्यावरणपूरक जीवनशैली... ध्वनिफीत ऐकून त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिहा.**





**क. योग्य पर्याय निवडा.**

१. कोरकू ही आदिवासी जमात राहत असलेले जंगल कुठे आहे?

क. महाराष्ट्रात

ख. मध्य प्रदेशात

ग. मेळघाटात

२. कोरकू लोक जंगलातून काय काय गोळा करतात?

क. मोहाची फुले

ख. लाकूड

ग. पाचोळा

३. पुढीलपैकी योग्य विधान निवडा.

क. संपूर्ण गावासाठी पंधरा दिवस शिकार केली जायची.

ख. संपूर्ण गावासाठी पंधरा दिवसांतून एकदा शिकार केली जायची.

ग. संपूर्ण गावासाठी दिवसातून एकदा शिकार केली जायची.

४. कोरकू लोकांना ---------------------------------------------- परंपरागत ज्ञान असते.

क. जंगली प्राण्यांचे

ख. मोहाच्या फुलांचे

ग. औषधी वनस्पतींचे

**ख. खालील तुलनात्मक वाक्यांच्या जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १. सुख आणि आराम मिळवण्यासाठी कोरकू जंगल अतिशय जपतात. | क. शहरी जीवनशैलीमध्ये कृत्रिमता आणि सामाजिक बंधने आहेत. |
| २. कोरकूंनी जैवविविधतेचे रक्षण करून आपल्या आहारातील संतुलन राखले आहे. | ख. शहरातील माणूस सर्वस्वी बाहेरील गोष्टींवर आणि पैशावर आधारित जीवन जगतो. |
| ३. कोरकूंच्या जीवनशैलीमध्ये सहजता आणि मोकळेपणा आहे. | ग. शहरी डॉक्टरांच्या उपचारांवर अवलंबून राहावे लागते, कारण ते ज्ञान केंद्रित झाले आहे आणि त्यामुळे खर्चिक झाले आहे. |
| ४. कोरकूंना औषधी वनस्पतींची चांगली माहिती आणि जाण असते. | घ. शहरात सुख आणि आराम मिळवण्यासाठी तंत्रज्ञानाकडे धाव घेतली जाते आणि नैसर्गिक संसाधने ओरबाडली जातात. |
| ५. अन्नधान्य, पाणी, औषधे, घरे बांधणे अशा सर्व बाबतींमध्ये कोरकू स्वयंपूर्ण आहेत. | च. शहरवासीयांच्या आहारात परिसरातील जैवविविधतेचा समावेश नसतो, त्यामुळे संतुलित आहारासाठी कृत्रिम गोष्टींवर किंवा आयात केलेल्या खर्चिक गोष्टींवर अवलंबून राहावे लागते. |

**ग. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. नैसर्गिक संसाधनांचे पुनरुज्जीवन होईल ह्याची काळजी आपण घेतो का?

२. आपल्या जीवनशैलीमुळे जंगलांवर अधिकाधिक ताण पडतो. कसा ते लिहा.

**२. प्रकाश गोळे – एक पर्यावरणाचे विद्यापीठ**




'निसर्ग संवर्धनाबरोबरच निसर्गाचे पुनरुज्जीवन करण्यासाठी कृती केली पाहिजे' असे वेळोवेळी पोटतिडकीने सांगणारे, पुण्यातील प्रकाश गोळे हे मुळातले पक्षितज्ज्ञ आणि एक अर्थशास्त्राचे अभ्यासक. अर्थशास्त्र, इतिहास, समाजशास्त्रापासून ते भूगोल, भूगर्भशास्त्र, मानववंशशास्त्र, जीवशास्त्र, हवामानशास्त्र इत्यादी सगळेच विषय पर्यावरणशास्त्राशी जोडलेले आहेत, हा विचार त्यांनी मांडला. ह्या सगळ्यांचा 'होलिस्टिक' म्हणजेच ऐकात्मिक विचार झाला पाहिजे, ही गरज त्यांनी बोलून दाखवली आणि १९८२ साली 'इकॉलॉजिकल सोसायटी'ची स्थापना केली.

खास करून अर्थव्यवस्था आणि पर्यावरणाचा ऱ्हास ह्यांचा संबंध उलगडून दाखवणारे ते त्या काळातले एकमेव तज्ज्ञ होते असे म्हटले, तर चुकीचे होणार नाही. पर्यावरणशिक्षणाशिवाय ह्या विषयाची जाण लोकांना येणार नाही, हे त्यांनी ओळखले. १९९७ पासून 'इकॉलॉजिकल

सोसायटी'मध्ये त्यांनी पर्यावरणशास्त्र हा विषय शिकवण्यासाठी 'नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन' हा अभ्यासक्रम सुरू केला. ठिकठिकाणच्या पडीक जमिनींवर त्यांनी निसर्गाच्या पुनरुज्जीवनाचे यशस्वी प्रयोग केले. ते प्रयोग बघण्यासाठी परदेशातून, विशेषत: जर्मनीतून, अनेक गट आले. वेळेवर पावले उचलली, तर एखाद्या भागातील नष्ट झालेली नैसर्गिक संसाधने पुनरुज्जीवित होऊ शकतात, हे त्यांनी सप्रमाण दाखवून दिले. अनेक आंतरराष्ट्रीय समित्यांवर पर्यावरणतज्ज्ञ म्हणून त्यांनी भरघोस काम केले आणि तेही प्रसिद्धीपासून दूर राहून. पर्यावरणशास्त्र ह्या विषयावर अनेक पुस्तके मराठीतून लिहिणारे ते पहिलेच लेखक. आज ते आपल्यात नाहीत; पण हे ज्ञानदानाचे काम त्यांच्या माघारीही सुरू आहे. दरवर्षी पन्नास विद्यार्थी एक नवी दृष्टी घेऊन अनेक कामे करत आहेत.

**क. वरील उतारा वाचून महत्त्वाचे मुद्दे शोधा आणि खालीलप्रमाणे टिपणे लिहा.**




**ख. उताऱ्यातील काही मुद्दे खाली दिले आहेत. या वाक्यांमधील जो वाक्यांश चुकीचा आहे, तो खोडा.**

उदा. भूगोल आणि हवामानशास्त्र ह्या विषयांचा आणि पर्यावरणाचा ~~खूप कमी~~ संबंध आहे.

१. खास करून अर्थव्यवस्था आणि समृद्ध पर्यावरण यांचा संबंध उलगडून दाखवणारे ते त्या काळातले एकमेव होते.

२. जनजागृतीसाठी पर्यावरणाचे शिक्षण घेतले नाही तर मदतच होते.

३. त्यांनी लिहिलेल्या निसर्गचक्रावरील नाटकांचे ठिकठिकाणी यशस्वी प्रयोग झाले.

**ग. शब्द आणि अर्थांच्या योग्य जोड्या लावा.**

| | |
|---|---|
| १. पोटतिडकीने | क. सगळ्या गोष्टींचा सर्वसमावेशक विचार |
| २. ऐकात्मिक | ख. कायमस्वरूपी |
| ३. शाश्वत | ग. अत्यंत कळकळीने आणि मनापासून |
| ४. पुनरुज्जीवन | घ. पुराव्यासहित |
| ५. सप्रमाण | च. पूर्ववत अवस्थेला येण्याची प्रक्रिया |

**घ. प्रकाश गोळे ह्यांनी पर्यावरणासाठी कोणकोणते उपक्रम राबवले ते लिहा.**

---

---

---

**च. एक प्रयोग करून पहा.**

एक दिवस नळ न सोडता कामे करायची असे ठरवा. एक बादली भरून ठेवा आणि मगने पाणी घेऊन तोंड धुवा, दात घासा, दाढी करा, चहाचा कप धुऊन टाका, हात धुवा. किती पाणी वापरले त्याची निरीक्षणे नोंदवा. त्याच कामांसाठी नळाचे किती पाणी वापरले जाते तेही नोंदवा आणि दोन्हीत काय फरक लक्षात आला ते लिहा.

---

---

---

**छ. तुम्ही स्वतः पर्यावरणाच्या संरक्षणासाठी इतर कोणते प्रयोग करता ते लिहा.**

---

---

---

**३. चित्रफीत पहा.**

क. कोणती गोष्ट विचार करायला लावणारी आहे असे निवेदक म्हणत आहे?

ख. ही चित्रफीत पाहून तुम्हाला काय वाटले?

**४. आता ही चित्रफीत पुन्हा पहा आणि तीतील मुद्द्यांच्या मदतीने एका चर्चासत्राचा संवाद लिहा.**

**चर्चासत्रातील सहभागी : श्री॰** हिरवे, श्रीमती लाल आणि निवेदक.

**श्री॰ हिरवे :** ह्यांना वाटते, की टेकड्यांवर तरुण मंडळी पार्टी करत असतील तर तो त्यांचा हक्क आहे. तिथे होणारा कचरा ही काही फार मोठी समस्या नाही, असेही त्यांना वाटते.

**श्रीमती लाल :** ह्यांना वाटते, की टेकड्यांची काळजी घेतली पाहिजे. टेकड्यांवर पार्टी करून तिथे कचरा करणाऱ्या तरुणांना शिक्षा झालीच पाहिजे.

## ३ पूर्ण भविष्यकाळ

१. कारणे आणि परिणामांच्या जोड्या लावा आणि पूर्ण भविष्यकाळ वापरून वाक्ये लिहा.

| | कारणे | | परिणाम |
|---|---|---|---|
| क | जंगलतोड चालू राहणे | १. | निसर्गाचा समतोल ढळणे |
| ख | दूषित पाण्यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत राहणे | २. | जीवसृष्टीला धोका निर्माण होणे |
| ग | लोकसंख्येत वाढ होत राहणे | ३. | वातावरणातील प्राणवायूचे प्रमाण कमी होणे |
| घ | जंगले नष्ट होणे | ४. | पृथ्वीवरील जीवसृष्टी असाध्य रोगांनी पीडित होणे |
| च | कार्बन डायऑक्साईडचे पाण्यातील प्रमाण वाढत राहणे | ५. | मानसिक शांती बिघडणे |
| छ | ओझोनचा थर कमी होत राहणे | ६. | अनेक आरोग्यसमस्या निर्माण होणे |
| ज | जागतिक तापमानात वाढ होत राहणे | ७. | जमिनीचा कस नष्ट होणे |
| झ | जीवाश्म इंधनांचे ज्वलन होत राहणे | ८. | संपूर्ण पृथ्वीचे वाळवंट होणे |
| ट | ध्वनिप्रदूषण होत राहणे | ९. | पृथ्वीवरील संसाधने संपून जाणे |
| ठ | कीटकनाशके व रासायनिक खतांचा वापर होत राहणे | १०. | वातावरणात सल्फर डायऑक्साईड व कार्बन मोनॉक्साईडसारखे घातक वायू मिसळणे |

उदा. क. जंगलतोड चालू राहिल्यामुळे वातावरणातील प्राणवायूचे प्रमाण कमी झाले असेल.

ख. -----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

ग. -----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

घ. -----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

च. -----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

छ. -----------------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------------

ज. ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

झ. ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

ट. ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

ठ. ------------------------------------------------------------

------------------------------------------------------------

**२. पुढील उतारे भूतकाळात आहेत. ते पूर्ण भविष्यकाळात लिहा.**

**क. श्रमपरिहार**

१. पावसाळ्यापर्यंत वृक्षारोपणाची कामं झाली.

------------------------------------------------------------

२. सगळ्यांनी खूपच मनापासून काम केलं.

------------------------------------------------------------

३. सकाळपासून सतत काम केल्यामुळे सगळ्यांना खूप भूक लागली होती.

------------------------------------------------------------

४. जेवण आल्यावरोबर एकदम गडबड उडाली.

------------------------------------------------------------

५. ताटात पदार्थ पडल्याबरोबर सगळे फक्त खाण्यात मग्न झाले.

------------------------------------------------------------

६. एकदम शांतता पसरली.

------------------------------------------------------------

७. स्वयंपाकही चविष्ट झाला होता.

------------------------------------------------------------

८. गरमागरम जेवणावर सगळे ताव मारत होते.

------------------------------------------------------------

**ख. निवांत सुट्टी**

(१) ह्या सुट्टीत आम्ही कोकणात गेलो. (२) आंबे पिकले होते. (३) बाहेरच्या पडवीत कोकमांचा ढीग लागला होता, तर कोपऱ्यात नारळांची रास लावली होती. (४) बघता बघता सुट्टी संपली. (५) मोठ्यांच्या रजा संपल्या आणि लहानांच्या शाळा सुरू झाल्या. (६) नेहमीचा दिनक्रम पुन्हा सुरू झाला.

१. ----------------------------------------

२. ----------------------------------------

३. ----------------------------------------

४. ----------------------------------------

५. ----------------------------------------

६. ----------------------------------------

**३. कंसातील क्रियापदांची पूर्ण भविष्यकाळातील योग्य रूपे वापरून वाक्ये लिहा.**

उदा. आज पहाटेच आम्ही हरिश्चंद्रगडावरून आलो, त्यामुळे दुपारी आम्ही (झोपणे) झोपलो असू.

क. तुझ्या मैत्रिणी घरी येतील तेव्हा मी गावाला (जाणे) ------------------.

ख. हा पर्यावरणशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत मी पुढे काय करायचे ते (ठरवणे) ------------------.

ग. पर्यायी ऊर्जेचा शोध त्याने लावला आहे. थोड्याच दिवसात तो कीर्तीच्या शिखरावर (पोचणे) ------------------.

घ. सर्पमित्र म्हणून त्यांचा आज सत्कार आहे. उद्या ह्यावेळेला ते परतीच्या गाडीत (बसणे) ------------------.

**४. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये लिहा.**

उदा. पुढच्या आठवड्यात माझे पुस्तक वाचून (होणे) ------------------.

पुढच्या आठवड्यात माझे पुस्तक वाचून झाले असेल.

क. आत्ता रोपाला दोनच पाने आली आहेत, पण चारच दिवसांनी अजून चार पाने (येणे) ------------------.

ख. जरा थांब, दहाच मिनिटांत माझा पतंग आकाशात उंच (उडणे) ------------------.

ग. पावसाळ्यापूर्वी पक्ष्यांची घरटी बांधून (होणे) ------------------.

घ. ह्या तळ्याचे पाणी असेच स्वच्छ राहिले, तर पुढच्या मोसमात तळ्यात कमळे (फुलणे) ------------------.

**५. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये लिहा.**

उदा॰ (मी) – झोपणे मी झोपलो असेन.

क. (आम्ही / आपण) – पळणे ------------------------------------------------

ख. (तू) – गडावर चढणे ------------------------------------------------

ग. (तुम्ही / आपण) – जेवायला बसणे ------------------------------------------------

घ. (तो) – मातीत खूप खेळणे ------------------------------------------------

च. (ती) – पावसात चिंब भिजणे ------------------------------------------------

छ. (ते) बाळ – गवतात खेळणे ------------------------------------------------

ज. ते पक्षी (अ॰व॰) – बेघर होणे ------------------------------------------------

झ. त्या चिमण्या (अ॰व॰) – उडणे ------------------------------------------------

ट. ती (अ॰व॰) – पाखरे घरी परतणे ------------------------------------------------

## ४ तापमान, हवामान

**१. हवामान चिन्हांचे योग्य अर्थ लिहा.**

(रात्रीचा पाऊस, पाऊस आणि सूर्यप्रकाश, पावसाच्या तुरळक सरी, निरभ्र दिवस, गारांचा पाऊस, ढगाळ / अभ्राच्छादित दिवस, हिमवर्षाव, वादळ, निरभ्र रात्र, विजा)


क


ख.


ग.


घ.


च.


छ.


ज.


झ.


ट.


ठ.

उदा॰ क. : पावसाच्या तुरळक सरी

ख. ------------------------------------ ग. ------------------------------------

घ. ------------------------------------ च. ------------------------------------

छ. ------------------------------------ ज. ------------------------------------

झ. ------------------------------------ ट. ------------------------------------

ठ. ------------------------------------

२. हवामान अंदाज. योग्य जोड्या लावून वाक्ये लिहा.

| | | | |
|---|---|---|---|
| क. | ह्या आठवड्यात | महाराष्ट्र | कमी दाबाचा पट्टा निर्माण होणे |
| ख. | येत्या दोन-तीन दिवसांत | किनारपट्टीजवळच्या भाग | थंडीची तीव्रता खूपच कमी होणे |
| ग. | पुढच्या आठवड्यात | पूर्वेकडील राज्य | कमाल आणि किमान तापमानात वाढ होणे |
| घ. | येत्या चोवीस तासांत | बंगाल उपसागर | ढगाळ वातावरण तयार होणे |
| च. | १४ आणि १५ तारखेला | उत्तर भारत | पावसाचा जोर वाढणे |
| छ. | बुधवारपासून | अरबी समुद्र | गडगडाटासह पावसाच्या सरी येणे |
| ज. | ह्या महिन्याभरात | दक्षिण गोलार्ध | दाट धुके पसरणे |

उदा० क. ह्या आठवड्यात उत्तर भारतात थंडीची तीव्रता खूपच कमी झाली असेल.

ख. ------------------------------------------------------------

ग. ------------------------------------------------------------

घ. ------------------------------------------------------------

च. ------------------------------------------------------------

छ. ------------------------------------------------------------

ज. ------------------------------------------------------------

## ५ शब्दयोगी पदे (ऐवजी आणि पैकी)

**उदाहरणात दाखवल्याप्रमाणे 'ऐवजी' किंवा 'पैकी' हे शब्दयोगी पद वापरून रिकाम्या जागा भरा.**

उदा० मी कृत्रिम (धाग्यांचे कपडे) ------------------------ सुती कपडे विकत घेतो.

मी कृत्रिम धाग्यांच्या कपड्यांऐवजी सुती कपडे विकत घेतो.

क. (प्लास्टिकची खेळणी) ------------------------ मुलांना लाकडी खेळणी द्यावीत.

ख. नारळाचे पाणी आणि कोकम सरबत (हे) ------------------------ काय आवडेल प्यायला?

ग. (तुझी पुस्तके) ------------------------ तुला नको असलेली पुस्तके आपण ग्रंथालयाला देऊन टाकू.

घ. बाहेर (खाणे) ------------------------ घरीच खाणं केव्हाही चांगलं.

च. (मार्केटिंग हा विषय) ------------------------ मला पर्यावरणशास्त्र हाच विषय शिकावा असं वाटतंय.

छ. सिंहगड, राजगड आणि महाबळेश्वर (हे) ------------------------ आपण कुठे जाऊ या?

ज. ह्या (भाजीवाल्याकडच्या भाज्या) ----------------------- कुठली भाजी घ्यावी हेच माझं ठरत नाहीये.

झ. चित्रपट महोत्सवात (दाखवले जाणारे चित्रपट) ----------------------- नेमके कोणते चित्रपट बघावेत हे कळत नाहीये.

ट. तळे, समुद्र, नदी (हे) ------------------------ पाण्याचा कोणता स्रोत वाहणारा आहे?

ठ. रविवारी अभ्यास (करणे) ------------------------ मी दिवसभर भटकत राहीन, कारण तोही एक अभ्यासच आहे.

ड. वीज आणि कोळसा (हे पारंपरिक ऊर्जेचे स्रोत) ----------------------- सौर ऊर्जेचा पर्याय आता उपलब्ध आहे.

## ६ नदीचा उगम

**कंसात दिलेल्या क्रियापदाचे योग्य रूप किंवा योग्य क्रियाविशेषण गाळलेल्या जागी भरा.**

(लवंडणे, धो धो, सांडणे, रिमझिम, वेगाने, धबधबा, मुसळधार, झेपावणे)

क. मधूनच ऊन पडत होतं त्यामुळे ----------- पावसात भिजायला मजा आली.

ख. छत्री असूनही काही उपयोग झाला नाही कारण पाऊस ----------- पडत होता.

ग. माझ्या हाताचा धक्का लागून पाण्याचं भांडं ----------- आणि कागद भिजले.

घ. आधीच पाण्याची टंचाई आहे, पाणी ----------- नकोस.

च. नदीचा प्रवाह कड्यावरून खाली ----------- त्यालाच ----------- म्हणतात.

छ. ----------- पावसात बाहेर जाऊ नकोस, कारण रस्त्यांमधून पाणी ----------- वाहत असेल.

## ७ 'ऊन' चा वापर

**१. पाठ्यपुस्तकातील क्रमांक ७. मधील क्रमांक १ वर दिलेली गोष्ट पुढे लिहा. प्रत्येक नवीन वाक्यात 'ऊन' ह्या प्रत्ययाचा वापर करा.**

**२. तुमच्या घरी पाहुणी आलेली मुलगी तुम्हाला सल्ला विचारत आहे. तिला काय उत्तरे द्याल?**

**प्रश्न:** उदा॰ मी पुस्तक कुठून आणू? **सल्ला:** पलीकडच्या दुकानातून आण.

क. मी फुलं कुठून आणू? ------------------------------------

ख. मी पाणी कशातून पिऊ? ------------------------------------

ग. मुलाला कुठून आणायचंय? ------------------------------------

घ. कुत्रा कुठून धावत आला? ------------------------------------

च. ही वाऱ्याची झुळूक कुठून आली? ----------------------------------------

छ. प्राणवायू कुठून मिळतो? ----------------------------------------

ज. पोषक द्रव्ये आपल्याला कशातून मिळतात? ----------------------------------------

झ. पाणी कुठून मिळतं? ----------------------------------------

**३. कंसातील नामांना 'त + ऊन' प्रत्यय लावून वाक्ये पूर्ण करा.**

उदा॰ मी (घर) घरातून त्याच्याशी संपर्क साधला, तेव्हा त्याच्या (बोलणे) बोलण्यातून मला जाणवलं, की तो आज खूप खुशीत आहे.

क. बिबट्याने (गुरगुर) ----------------------- त्याची नाराजी व्यक्त केली.

ख. (आकाश) ----------------------- उडणाऱ्या घारीनं बिळाकडे धावणारा उंदीर झपाट्यानं पकडला, पण अरेरे! तिच्या (चोच) ----------------------- तो निसटला.

ग. वाळू मुठीत कितीही घट्ट धरली, तरी ती (मुठी) ----------------------- निसटणारच.

घ. पर्यावरण (शिक्षण) ----------------------- जागरूक नागरिक निर्माण होतील.

च. (नदी) ----------------------- आणि (तळे) ----------------------- मिळणाऱ्या माशांवर उपजीविका करणारी कितीतरी कुटुंबे आहेत.

छ. हत्तींच्या (हालचाल) ----------------------- आणि पाण्यात (खेळणे) ----------------------- त्यांचा खेळकरपणा दिसत होता.

ज. बाळाच्या (हास्य) ----------------------- दिसणारी त्याची निरागसता फार मोहक असते.

झ. पाऊस आला म्हणून (रस्ता) ----------------------- धावतपळत आम्ही एका झाडाखाली गेलो, पण झाडावरून गळणाऱ्या पाण्याच्या थेंबांनी पुरते भिजलो.

ट. (दुकान) ----------------------- औषधं आणून काय उपयोग? तू त्याला देत तर नाहीस.

## ८ छोटासा, छानसा

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे रिकाम्या जागा भरून खालील उतारा पूर्ण करा.**



ही एक (छोटी) छोटीशी टेकडी. शहराच्या बाहेर विसावलेली होती. आता ह्या मोठ्या शहराच्या विस्तारानं वेढली गेली होती. टळटळीत दुपार होती. उन्हामुळे माती भाजून निघत होती. टेकडीवर जिथंतिथं निष्पर्ण झाडं तग धरून उभी होती. (क) (लहान) ------------ रोपटी मलूल झाली होती.

(ख) (छोटी) ------------ झुडपंही त्यांचा पसारा आवरून हिरमुसली झाली होती. सगळेच पावसाची वाट बघत होते. फक्त काटेसावरीच्या झाडांवरची मोठी दिमाखदार फुलं तेवढी उठून दिसत होती. हरणदोडीच्या वेलींवर (ग) (छोटी) ----------- शिंगांच्या जोड्या आल्या होत्या. नाचण, शिपाई बुलबुल, शिंजीर ह्यांसारख्या (घ) (लहान) ------------ पक्ष्यांची सावलीसाठी झुडपात घुसून (च) (हलकी) ------------ च्युकच्युक, चिवचिव आणि दबक्या शिळा चालल्या होत्या. ह्या सगळ्या लहानग्यांमध्ये हा मोठा भारद्वाज मात्र आसमंतात घुमणारा व्हुऽप व्हुऽप आवाज काढत वाळक्या पालापाचोळ्यावरून फिरत होता. अस्वस्थ शांततेचा भंग करणारा एवढा एकच (छ) (हवा) ---------- आवाज टेकडीवर ऐकू येत होता. सगळ्यांना माहीत आहे, की पाऊस यायला अजून (ज) (थोडा) ------------ वेळ आहे.

पण काय गंमत! अचानक उन्हं सौम्य झाली, वारा सुटला आणि पावसाची एक (झ) (हलकी) ------------ सर धावून आली. पानांच्या (ट) (इवली) ------------ ओंजळी भरतायत न भरतायत तोच आली तशी ती निघूनही गेली. ओंजळी पिताना ओघळलेले (ठ) (इवले) ------------ थेंब मातीपर्यंतही पोचले नाहीत. पण टेकडीवर एकदम चैतन्य सळसळलं. (ड) (इवली) ------------ पोपटी पालवी झळाळून उठली. (ढ) (नाजूक) ------------ मोहोराचा सुगंध आणि मातीचा सुगंध एकमेकात मिसळले आणि त्या (त) (छान) ------------ सुगंधानं टेकडी सुखावली.

तिची नजर शेजारच्या (थ) (लहान) ------------ ढिगाकडं गेली. पावसाची सर निघून गेल्यावर पुन्हा ऊन आलं होतं, आणि त्या उन्हात ढिगातील वस्तू चकाकत होत्या. काय होतं त्या ढिगात? काचेच्या बाटल्या, प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या, थर्मोकोल, टेट्रापॅक अशा असंख्य वस्तू. दिवसागणिक तो (द) (लहान) ------------ ढीग वाढत वाढत मोठा झाला. आता तो टेकडीकडे पाहू शकत होता. एक दिवस त्यानं टेकडीला विचारलं, “काय गं, माझ्यावर उगवतील का तुझ्यासारखी झाडं, निदान (ध) (इवली) ------------ रोपं, (न) (लहान) ------------ झुडपं?”

टेकडी गंभीर झाली. सुस्कारा सोडून म्हणाली, “खरं सांगू? ह्या पोपटी, हिरव्या रंगाची आशा तू सोड. तुझ्यावर काही उगवू शकणार नाही. तुला जीवनही नाही, आणि मरणही नाही.” कचऱ्याच्या ढिगानं निराशेनं विचारलं, “काय? मरणही नाही?”

## ९ नाम + क्रियापद

१. खाली नाम आणि क्रियापदांच्या जोड्या दिल्या आहेत. त्यात काही नामांपुढील क्रियापदे चुकली आहेत. प्रत्येक नामापुढे योग्य क्रियापद लिहा.

| | नाम + क्रियापदांच्या दिलेल्या जोड्या | नाम + क्रियापदांच्या योग्य जोड्या |
|---|---|---|
| क. | उपमा लावणे | |
| ख. | समावेश देणे | |
| ग. | आजार टाकणे | |
| घ. | नजर घालणे | |
| च. | चालना करणे | |
| छ. | विल्हेवाट लावणे | |
| ज. | आवर जडणे | |
| झ. | तलखी टाळणे | |
| ट. | अंदाज वर्तवणे | |



२. पाठ्यपुस्तकात दिलेल्या इतर शब्द + क्रियापद या तक्त्यातील कोणते शब्द खालील क्रियापदाबरोबर असतात ते लिहा.

क. होणे

ख. जाणे

झाडावरून प्राजक्त ओघळतो
त्याचा आवाज होत नाही
याचा अर्थ असा नाही की
त्याला इजा होत नाही

पिंपळाचं रोप कसं
कुठेही उगवतं
कुठेही उगवतं म्हणून
त्याचं कसंही निभावतं

ढगांची सावली अलगद
माझ्या अंगावरून गेली
शब्द मिळाले नाहीत तरी
मी त्यावर कविता केली

- चंद्रशेखर गोखले



# ६ जागतिकीकरण












## चला, शिकू या...

- जागतिकीकरण : फायदे, तोटे
- बातम्या वाचणे, समजणे
- रीती भविष्यकाळ
- वादविवाद करणे
- बहुसांस्कृतिकता, वंशभेद, रंगभेद
- निश्चय, संकल्प, योजना ह्यांबद्दल
- ऐतिहासिक घडामोडी आणि पैशाचे राज्य
- शब्दयोगी पदे आणि क्रियाविशेषणे : आसपास, भोवती, पाशी, शेजारी, बाजूला, बाजूने, पाठीमागे
- की आणि का ह्या शब्दांचा वापर
- गावोगावी, देशोदेशी, घरोघरी इ.

## १ जागतिकीकरण

**१. 'इक' प्रत्यय जोडून खालील नामांची विशेषणे तयार करा. शब्दकोशात पाहून तुमची उत्तरे तपासा.**

क) सहज  ख) स्थान  ग) अर्थ  घ) उद्योग  च) समाज  छ) संस्कृती
ज) सर्वजन  झ) प्रतिनिधी  ट) भाषा  ठ) शिक्षण  ड) तुलना  ढ) निसर्ग
ण) प्रकृती  त) जीव  थ) आयुर्वेद  द) बुद्धी  ध) स्वभाव  न) क्षण
प) चमत्कार  फ) जग / जगत्

उदा. जग - जागतिक

-----------------------------------------------------------------------------

-----------------------------------------------------------------------------

**२. क. उदाहरणाप्रमाणे खालील नामांची विशेषणे तयार करा. शब्दकोशात पाहून तुमची उत्तरे तपासा.**

१. धोरण  २. नकार  ३. तंत्रज्ञान  ४. संवाद  ५. रचना  ६. अपवाद
७. होकार  ८. संस्था  ९. सकार

...आत्मक ⟷ उदा. सकारात्मक

**ख. ध्वनिफीत ऐकून तुमची उत्तरे तपासा व शब्द मोठ्याने बोलून सराव करा.**

**३. क. 'करण' हा प्रत्यय जोडून खालील विशेषणांची नामे तयार करा.**

१. आंतरराष्ट्रीय  २. औद्योगिक  ३. खाजगी  ४. उदार  ५. जागतिक

...करण ⟷ उदा. जागतिकीकरण

**ख. ध्वनिफीत ऐकून तुमची उत्तरे तपासा व शब्द मोठ्याने बोलून सराव करा.**

**४. खालील अग्रलेख वाचा आणि त्यावरील स्वाध्याय सोडवा.**

### महागाईचे जागतिकीकरण

जागतिकीकरणामुळे महागाई वाढते असा सर्वसाधारण लोकांचा समज असतो. विकसनशील देशांची प्रगती होताना दिसत असली, तरी जागतिकीकरणामुळेच युरोपमधील देशांची अर्थव्यवस्था कोलमडत आहे. अमेरिकेत मंदी आहे. त्याचा फटका बसून आपल्याकडे, म्हणजेच भारतात महागाई दिवसेंदिवस वाढत आहे, असेही अनेकांना वाटते. त्यात भर पडते ती आर्थिक असाक्षरतेची. बँकांत ठेवलेल्या मुदतठेवींवरचं व्याज आणि चलनवाढ यांतली तफावत लक्षात न घेता 'बँकेत पैसे वाढतात' ह्या भ्रमात आपण वावरत असतो.

जागतिकीकरण ही काही वाटते तितकी अलीकडची घटना नाही. अगदी फार फार पूर्वीही ढाक्याची मलमल जगाच्या बाजारात होती आणि आपल्याकडच्या साड्या कशा काडेपेटीतसुद्धा मावायच्या, ह्याच्या दंतकथा सर्वदूर पसरलेल्या असायच्या. जग ही बाजारपेठ पूर्वीपासूनच आहे. नव्यानं घडलं, ते हे, की पूर्वी देशोदेशांना व्यापारासाठी एकमेकांशी करार करायला लागायचे. हे स्वरूप बदललं पहिल्यांदा 'गॅट' – म्हणजे 'जनरल ॲग्रीमेंट ऑन ट्रेड अँड टेरिफ' – ह्यामुळे. नंतर ह्याच्यातूनच जन्माला आलेल्या 'वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन', म्हणजे डब्ल्यू॰टी॰ओ॰मुळे. ज्या देशांना एकमेकांशी व्यापार करायचा आहे, त्यांच्यासाठी सामायिक कराराची व्यवस्था झाली. देशांना प्रत्येक देवाणघेवाणीसाठी प्रत्येकाशी करार करायची गरज संपली. ह्याला डब्ल्यूटीओ संघटनेनं संस्थात्मक स्वरूप दिलं. म्हणजे जो कोणी ह्या संघटनेचा सभासद होईल, तो आपोआप ह्या संघटनेच्या सभासद देशांशी व्यापार करू शकेल अशी व्यवस्था झाली.

डब्ल्यू॰टी॰ओ॰मुळे जागतिकीकरणाला गती आली. आता त्याबाबतही अनेकांची तक्रार असेल. ते केलंच कशाला? पण हाच वर्ग बाजारात गेल्यावर चिनी बनावटीच्या वस्तू आनंदाने खरेदी करत असतो. मग त्या गणपतीच्या आराशीत लागणाऱ्या विजेच्या माळा असोत वा दिवाळीतील आकाशकंदील असोत. त्या वस्तू बाजारात आल्यामुळे आपल्याला स्वस्त पर्याय उपलब्ध झाला. युरोप किंवा अमेरिकेत प्रचंड थंडी पडली तरीही तेलाचे भाव वाढतात. कारण अतिथंडी म्हणजे पेट्रोल आणि डिझेलच्या मागणीत वाढ. मागणी वाढली की जास्त दामही येणार. तेव्हा थंडीत वर गेलेच म्हणून समजा तेलाचे भाव. म्हणजे वाढलीच महागाई.

जागतिकीकरणाच्या अर्थकारणाचा दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इंधनाचा. कोणत्याही उद्योगासाठी ऊर्जा हे पहिलं भांडवल असतं. खनिज तेलाच्या रूपातून मिळणाऱ्या ऊर्जेसाठी आपल्याला इतरांवरच अवलंबून राहावं लागणार. ह्याचाच अर्थ, तेलाचे दर वाढले की आपल्याकडे महागाई वाढणार.

वास्तविक ह्यांपैकी कोणत्याही कारणाशी आपल्या चंद्रपूर किंवा लातूर किंवा आणखी कुठेही राहणाऱ्याचा थेट संबंध नाही. तरीही पेट्रोल आणि डिझेलच्या वाढलेल्या दराचा त्याला फटका बसतो. हे असं होणारच आणि त्याला पर्याय नाही. असलाच तर एकच पर्याय आहे, जगापासून फटकून जंगलात जाऊन राहायचं. पण ते सगळ्यांना शक्य नाही. तेव्हा ह्या परिस्थितीला जास्तीत जास्त शहाणपणानं तोंड देणं, हाच एक मार्ग उरतो.

- गिरीश कुबेर (लोकप्रभा, दि॰ ३/६/२०१२)

**क. रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्द लिहा.**

(गरज, जुनी, येईल, करावा, गैरसमज)

१. जागतिकीकरणामुळे महागाई वाढते हा सर्वसाधारण लोकांचा ---------- आहे.

२. जागतिकीकरण ही तशी फार ---------- घटना आहे.

३. देशांना आता प्रत्येक देवाणघेवाणीसाठी प्रत्येकाशी करार ---------- लागत नाही.

४. जो कोणी ह्या संघटनेचा सभासद होईल, त्याला आपोआप या संघटनेच्या सभासद देशांशी व्यापार करता ----------.

५. कोणत्याही उद्योगासाठी उर्जेची ---------- पडते.

**ख. समानार्थी शब्दांच्या जोड्या लावा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गती | क. | असमानता |
| २. | कोलमडणे | ख. | बाजाराची उलाढाल मंदावण्याची क्रिया |
| ३. | दाम | ग. | वेग |
| ४. | तफावत | घ. | किंमत |
| ५. | मंदी | च. | कोसळणे |

**ग. योग्य जोड्या लावून 'जागतिकीकरण' ह्या विषयाशी संबंधित शक्य तेवढी वाक्ये तयार करा.**

| | |
|---|---|
| जागतिकीकरणाची चाहूल केव्हा लागली? जेव्हा... | देशादेशांमध्ये व्यापार सुरू झाला तेव्हा. |
| जागतिकीकरणामुळे... | एकछापी संस्कृती निर्माण झाली किंवा संस्कृतीचे सपाटीकरण झाले. |
| उत्पादनांमध्ये एकसुरीपणा आला, कारण... | एकाच प्रकारच्या वस्तू प्रचंड प्रमाणात उत्पादित होऊ लागल्या. |
| तंत्रज्ञानामध्ये अफाट प्रगती झाली, त्यामुळे... | मागासलेल्या देशांमधील नैसर्गिक संसाधनांचे शोषण मोठ्या प्रमाणात होऊ लागले. |
| आहाराचे सपाटीकरण झाल्यामुळे... | स्थानिक भाषांचे महत्त्व कमी झाले. |
| सर्व शहरांचा तोंडवळा एकसारखाच झाला, कारण | लोकांच्या कामाच्या वेळा २४ तास झाल्या. |
| जागतिकीकरणाला पूरक अशा शिक्षणपद्धतीमुळे... | बलाढ्य देशांनी सर्व क्षेत्रांमध्ये प्रमाणीकरण सुरू केले. |
| | माणसे मोठ्या प्रमाणात शहराकडे येऊ लागली. |
| | शेतीतील पिकांचे वैविध्यही घटले. |
| | संस्कृतीमधील विविधता लोप पावत चालली. |
| | गरजा निर्माण केल्या जाऊ लागल्या. |
| | एकाच प्रकारचे खाणे, एकाच प्रकारचे पोशाख आणि एकाच पद्धतीची वाहने असे चित्र दिसू लागले. |
| | जशा इमारती मुंबईत, तशाच पुण्यात, तशाच कोल्हापुरात आणि तशाच इतर शहरांत उभ्या राहिल्या. |
| | परक्या भाषेतून शिक्षण देणे सुरू झाले. |
| | आपल्या परिसराची ओळख, स्थानिक इतिहास, भूगोल ह्यांच्या ज्ञानाची गरज वाटेनाशी झाली. |

उदा. जागतिकीकरणाला पूरक अशा शिक्षणपद्धतीमुळे परक्या भाषेतून शिक्षण देणे सुरू झाले.

१. ----------------------------------------------------------------

२. ----------------------------------------------------------------

३. ----------------------------------------------------------------

४. ----------------------------------------------------------------

५. ----------------------------------------------------------------

६. ----------------------------------------------------------------

७. ----------------------------------------------------------------

८. ----------------------------------------------------------------

९. ----------------------------------------------------------------

१०. ----------------------------------------------------------------

११. ----------------------------------------------------------------

१२. ----------------------------------------------------------------

१३. ----------------------------------------------------------------

१४. ----------------------------------------------------------------

१५. ----------------------------------------------------------------

## २ साधा आणि रीती भविष्यकाळ

**१. आजी आणि प्रथमेश. उदाहरणाप्रमाणे वाक्ये पूर्ण करा.**



**प्रथमेश** : आजी, मी चाललो हं मित्रांसोबत बाहेर फिरायला. आजी, मी चाललो फिरायला. आजीऽऽऽ, ऐकतेयस ना, मी चाललो.

**आजी** : हो, ऐकलंय मी!

**प्रथमेश** : मग काही उत्तर नाही दिलंस, टीका नाही केलीस, माझ्या पसारा घालण्यावर काही बोलली नाहीस?

**आजी** : काय बोलू आता? माझे किती दिवस राहिलेत? माझ्या मागेही तू असाच (वागणे) वागत राहशील ही खात्रीच पटलीय माझी.

**प्रथमेश** : म्हणजे?




**आजी** : म्हणजे तू अशीच बेपर्वाई (क) (करणे) -----------. अभ्यासाकडे असंच दुर्लक्ष (ख) (करणे) -----------. तुझ्या खोलीतला पसारा असाच (ग) (वाढणे) -----------. तू नको त्या मित्रांची संगत (घ) (धरणे) -----------. त्या संगतीमुळे तुला वाईट सवयी (च) (लागणे) -----------. सांगायला कोणी नसल्याने त्या सवयींचा वाईट परिणाम (छ) (होणे) -----------. आणखी काही सांगायला हवं?

**प्रथमेश** : आजी, उगीच अतिरेक करू नकोस. असं काही होणार नाहीये. तू अजून खूप वर्षं जगणार आहेस. अजून बरीच वर्षं तू माझ्यावर अशीच (ज) (चिडणे) -----------. मी जसजसा मोठा होईन, तसतशा माझ्या ह्या सवयी (झ) (सुटणे) -----------. मी शहाणा आणि सुज्ञ (ट) (होणे) -----------. घराण्याचं नाव काढेन. मग तूच माझे गुण (ठ) (गाणे) -------------. आईपण म्हणते असं. बरं, तर मग जाऊ मी?

## ३ वादविवाद करणे

**१. कंसात दिलेल्या सूचनेनुसार वादविवाद करण्यासाठी योग्य वाक्ये लिहा.**

**क. नैसर्गिक संसाधनांचा आणि जागतिकीकरणाचा काही संबंध नाही. (विरोध करा.)**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**ख. भरपूर पगारासाठी मी रात्री काम करायलाही तयार आहे. (सहमती दाखवा.)**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**ग. फावला वेळ मिळाला पाहिजे. (सहमती दाखवा.)**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**घ. वेगळा छंद कशाला पाहिजे? टीव्ही बघणे हाच माझा छंद आहे. (विरोध करा.)**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

च. सपाटीकरणामुळे किंवा एकछापी असण्यामुळे सर्व माणसांत समानता येते. (वेगळे मत मांडा.)

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

छ. जग म्हणजे आता एक मोठे खेडे झाले आहे. (विरोध करा.)

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ज. देशी वस्तू असणे, आपल्याच देशात उत्पादन होणे, हे शक्य नाही. (सहमती दाखवा.)

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

झ. एकसुरीपणा, वेळीअवेळी काम, चंगळवाद जोपासण्यासाठी जीवघेणी स्पर्धा, ह्या सगळ्याचा माणसांच्या मानसिक आरोग्यावरही परिणाम होऊ लागला आहे. (विरोध करा.)

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ट. केवळ नोकरी मिळवण्यासाठी शिक्षण असे शिक्षणाचे स्वरूप झाले आहे. (सहमती दाखवा.)

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

## ४ निश्चय, संकल्प, योजना

**निश्चय - संकल्प - योजना - ठरवणे - मनावर घेणे**

**निश्चय** : निश्चय केला आहे...

**योजना** : योजना आखली आहे...

**संकल्प** : असा संकल्प सोडला / केला आहे...

**निर्धार** : निर्धार केला आहे...

**ठरवणे** : ठरवलं आहे...

**मनावर घेणे** : मनावर घेतलं आहे...

**१. वरीलपैकी योग्य तो पर्याय लिहून वाक्ये पूर्ण करा.**

क. मी नवीन वर्षात वजन कमी करेन असा ----------------------------------------.

ख. मी सकाळी लवकर उठेन आणि रात्री वेळेवर झोपेन असं ------------------------------.

ग. मी शिक्षणापासून वंचित असणाऱ्या मुलांसाठी निवासी शाळा बांधण्याची ---------------
----------------------.

घ. मी कमीत कमी एका निरक्षराला साक्षर करेन असं ----------------------------------.

च. मी रोजनिशी लिहिण्याचं ------------------------------------------.

छ. मी आईला घरकामात मदत करण्याचं ------------------------------------------.

ज. मी हस्ताक्षर सुधारण्याचं ------------------------------------------.

झ. मी असा ------------------------------------------, की मी कॉलेजचा एकही दिवस बुडवणार नाही.

ट. मी कॉलेजातील सर्व मुला-मुलींना सहज चढता येईल अशा डोंगरावर गिर्यारोहणासाठी जाण्याची ------------------------------------------.

ठ. ह्या वर्षी पहिल्या वर्गात पास होण्याचा मी ----------------------------------------- .

**२. निश्चय करणे, योजना आखणे आणि संकल्प करणे / सोडणे**
**ह्यातील नाम आणि क्रियापदाची कोणती जोडी कुठे योग्य होईल ते लिहा.**

क. शाळांना सुट्ट्या लागल्या, की मुलांना एकत्र जमवून खेळांमधून राहणीमान, जागतिकीकरण आणि अर्थव्यवस्था यांचा परस्परसंबंध कळण्यासाठी दोन तास त्यांच्याबरोबर घालवण्याचा माझा विचार आहे.

ख. वर्षातून एकदा तरी गावाला जाऊन शेतावर काम करण्याचे मी ठरवले आहे.

ग. माझ्या पोटाच्या तक्रारी लक्षात घेऊन मी नक्कीच मांसाहार सोडणार आहे.

घ. मुलींना सक्षम करण्याच्या कामामध्ये त्यांच्या शिक्षणात खंड पडू न देणे, त्यांना उच्च शिक्षणाची संधी देणे आणि आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होण्यासाठी त्यांना आवश्यक ती मदत करणे, ह्या गोष्टींचा समावेश होतो.

च. आम्ही सर्वांनी जाहिरातींकडे दुर्लक्ष करण्याचे ठरवले आहे.

छ. ह्या सुट्टीत पोहायला शिकायचेच असा मी निर्धार केला आहे.

ज. एक दिवस अपमान झाल्यानंतर पुन्हा कधीही भीक न मागण्याचे त्याने ठरवले.

झ. टप्प्याटप्प्याने शहराची स्वच्छता करण्याचे महानगरपालिकेने ठरवले आहे.

ट. आमच्या गावातील ज्येष्ठ नागरिकांनी रोज संध्याकाळी घरात न बसता गरीब मुलांना शिकवायचे ठरवले आहे.

## ५ बहुसांस्कृतिकता

जितके देश किंवा प्रांत तितक्या संस्कृती. प्रत्येक देशाची किंवा प्रांताची संस्कृती वेगळी असणारच, आणि आपापल्या संस्कृतीचे वेगळेपण, खासियत ह्यांचे अप्रूप त्या त्या देशवासीयाला वाटणारच. पण जेव्हा दोन किंवा अधिक वेगवेगळ्या संस्कृतींचे लोक एकत्र येतात आणि एकमेकांना सांभाळून घेत, दुसऱ्याच्या संस्कृतीचा आदर राखत एकत्र राहणे त्यांना क्रमप्राप्त होते, तेव्हा बहुसांस्कृतिकता जन्म घेते. त्यात अभिप्रेत असते एकमेकांना समजून घेणे, दोन्ही संस्कृतींचा सहनिवास परस्परपूरक आणि दोन्ही पक्षांना लाभदायक आणि सुखकारक ठरावा यासाठी सतत प्रयत्नशील राहणे.

बहुसांस्कृतिकता हा विषय भारतासारख्या देशाला काही नवीन नाही. गेली हजारो वर्षे परकीयांची आक्रमणे या देशाने पाहिली आहेत आणि विविध संस्कृतींमधील चांगल्या गोष्टी आपल्या संस्कृतीत समाविष्ट करून घेतल्या आहेत. बाहेरून आलेले काही अन्नपदार्थ, पेहराव, काही रीतिभाती ह्या आपल्या संस्कृतीत इतक्या एकरूप झाल्या आहेत, की त्यांचे उपरेपण कधीच विसरले गेले आहे. असे जर असेल, तर बहुसांस्कृतिकतेच्या मुद्द्यावर नव्याने वाद उफाळून येण्याचे कारण काय?

जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून जशा अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या देशात मूळ धरू लागल्या, तशाच प्रकारे इतरही 'बहु' आपल्या जाणिवेच्या क्षेत्रात शिरकाव करू लागले. जसे बहुभाषिकता, बहुसांस्कृतिकता आणि अगदी बहुराष्ट्रीय नागरिकत्वदेखील. जागतिकीकरणाच्या वेगवान प्रवाहात देशोदेशीच्या भाषा, संस्कृती, खाद्यविशेष इत्यादींचे वेगाने सपाटीकरण होऊ लागले. सर्व जगाचा चेहरा हळूहळू सारखाच दिसायला लागला. इंग्रजी भाषा जगातल्या बहुतेक सर्व भाषांवर प्रभुत्व गाजवू लागली. मोठमोठी शहरे, त्यातल्या उंचच उंच इमारती, झगमगणाऱ्या जाहिराती, सर्वत्र दिसणारे एकसारखे मॉल आणि त्यात भरून ओसंडणाऱ्या मालाची रेलचेल, हे पाहून बरेचदा खरेच आपण नक्की कोणत्या देशात आहोत हे आठवावेच लागते. बहुतेक देशांतील नागरी संस्कृती एकीकडे अशा तऱ्हेने प्रवाहपतित झालेली दिसत असली, तरी दुसरीकडे बऱ्याच जणांच्या मनात त्याचवेळी एक स्वत्वाची जाणीव मूळ धरू लागलेली दिसते. जे जे माझे आहे आणि म्हणूनच ज्याचा मला अभिमान आहे, त्या त्या सर्व गोष्टी ह्या जागतिकीकरणाच्या प्रचंड धारेत वाहून जात आहेत अशी भावना निर्माण होते आहे. ह्याच भावनेचा अतिरेक झाला, की मग माणूस आग्रही बनू लागतो. माझी भाषा, माझा देश, माझा वेष, माझा परिसर अशा सांस्कृतिक संदर्भांना अचानक आवश्यकतेपेक्षा जास्त महत्त्व यायला लागते. ह्यातूनच बरेचदा माणसे आक्रस्ताळेपणा करू लागतात. मग सुरू होतात दंगे, मोर्चे, बंदच्या घोषणा. 'वसुधैव कुटुंबकम्' किंवा 'हे विश्वचि माझे घर' ह्या संकल्पना विसरल्या जातात. 'जागतिकीकरणाचे सर्व फायदे तर मला हवेत, पण बदल्यात कोणत्याही तडजोडी मी करणार नाही' असे टोकाचे आडमुठे धोरण मग बहुसांस्कृतिकतेच्या व्यापक उद्देशाकडे साशंकतेने बघू लागते.

**१. वरील उताऱ्याच्या आधारे पुढील प्रश्न वाचून वर्गात त्यावर चर्चा करा.**

क. बहुसांस्कृतिकतेची व्याख्या तुम्ही काय कराल?

ख. जागतिकीकरणामुळे विविध संस्कृतींचे सहअस्तित्व धोक्यात येत आहे का?

ग. 'विविधतेमध्ये एकता' ह्या वाक्याचा अर्थ तुम्ही कसा लावाल?

घ. 'काळाच्या ओघात बरेच सांस्कृतिक संदर्भ बदलतात किंवा नष्ट होतात', ह्या वाक्याशी तुम्ही सहमत आहात का? तुमच्या स्वतःच्या अनुभवात अशी काही उदाहरणे आहेत का?

च. तुमच्या स्वतःच्या देशात किंवा प्रांतात असे कोणते मोठे बदल तुम्हाला दिसतात?

छ. गेले अनेक दिवस तुम्ही मराठी भाषा शिकत आहात. मराठी भाषा, संस्कृती आणि एकंदरच मराठी माणसावर बदलत्या जगाचा कोणता परिणाम तुम्हाला प्रकर्षाने दिसून येतो?

## ६ शब्दयोगी पदे आणि क्रियाविशेषणे

**१. पुढील शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(भोवती, पाशी, शेजारी, बाजूने, आसपास, पाठीमागे, बाजूला)

प्रेम हे एक अजब रसायन आहे असं म्हणतात. म्हणजे बघा ना, आपली प्रेयसी सतत (क) आपल्या ------------ असावी, (ख) आपल्या ---------- तिचा वावर असावा असं प्रत्येकाला वाटतं. पण बबनसारखा मुलगा केवळ बबलीसाठी, आपल्या प्रेयसीसाठी, आपलं चांगल्या वस्तीतलं मोठं घर सोडून ह्या साधारण वस्तीत, छोट्याशा घरात राहायला येईल, असं कोणाला वाटलं असतं? आणि हे घर तरी कसं, तर घराच्या (ग) ------------ एक मोठा नाला वाहतोय, (घ) नाल्याच्या ------------ कायम डुकरांचं वास्तव्य आहे, (च) घरा ------------ एक बार आहे आणि तिथं अतिशय कर्कश आवाजात गाणी लावलेली असतात. आपलं पहिलं छानसं घर सोडून बबन इथे आनंदात राहतोय, कारण ह्या (छ) घरा ------------ बबली राहते. तिच्या (ज) घराच्या ----------- एक छोटीशी बाग आहे, आणि तिथं ही दोघं रोज भेटू शकतात. मैत्रिणीकडे जाण्याचा बहाणा करून बबली तिच्या वडलांसमक्ष घराबाहेर पडते आणि बागेत जाते. त्यांना संशयही येत नाही, की ती बबनला भेटायला चालली आहे.

**२. 'आसपास, अवतीभोवती, शेजारी, भोवती, बाजूला, बाजूने, पाठीमागे' ही क्रियाविशेषणे वापरून खालील गोष्ट पूर्ण करा.**



(क) ------------ कोणी नाही असं बघून तो घराच्या (ख) ---------- गेला. मोठ्या वडाच्या झाडा (ग) ------------ लपून उभा राहिला. (घ) ------------ त्यानं नजर टाकली. ते झाड सोडल्यास त्याच्या (च) ------------ काटेरी झुडपांची गर्दी होती. थोड्या वेळाने त्याच्या (छ) ------------ हळूच ती येऊन उभी राहिली. पलीकडच्या (ज) ------------ वाहणाऱ्या पाण्याचा आवाज येत होता. काटेरी फांद्या (झ) ------------ करून ती दोघं आत घुसली. त्यांच्या प्रेमळ गुरगुरण्यानं आजोबांना जाग आली. ते गालातल्या गालात हसले. त्यांना कळलं, की त्यांच्या मनीला एकदाचा जोडीदार मिळाला होता आणि आता गोंडस पिल्लं घरात खेळणार होती.

## ७ घरोघरी, दारोदारी

**१. खाली दिलेल्या शब्दांपैकी योग्य तो शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा.**

(प्रांतोप्रांती, गावोगावी, पावलोपावली, देशोदेशी, गल्लोगल्ली, क्षणोक्षणी, घरोघरी)

क. मीराने खूप देश पाहिले आहेत आणि ------------च्या नाण्यांचा संग्रह केला आहे.

ख. 'गाव तेथे तळे' ह्या संकल्पनेचा प्रसार करण्यासाठी सुचित्रा ------------ हिंडली.

ग. मकरसंक्रांतीला ------------ तिळगुळाच्या वड्या केल्या जातात.

घ. माझी अगदी जवळची मैत्रीण जाऊन आता इतकी वर्षे झाली, पण अजूनही मला -------- तिची आठवण येते.

च. गोकुळाष्टमीला ------------ दहीहंड्या टांगल्या जातात.

छ. माझा चष्मा हरवलाय, मला नीट दिसत नाहीये, आणि मी ------------ ठेचकाळतेय.

ज. आपल्या पाककृतींच्या पुस्तकात रसिकाने ------------च्या पाककृती दिल्या आहेत.

**२. खालील शब्दांचा योग्य वापर करून खालील उतारा पूर्ण करा.**

(गावोगावी, घरोघरी, देशोदेशी, क्षणोक्षणी, दारोदारी, गल्लोगल्ली, मनोमनी)

पन्नास वर्षांपूर्वी वाटलं नव्हतं, की (क) -------------- संगणकाचे राज्य येईल आणि आपण आपल्या नातवंडांशी स्काईपवर बोलत राहू. वाटलं नव्हतं, की (ख) ------------ मोबाईल वाजत राहील आणि वाहतुकीची पर्वा न करता लोक त्याच्यावर बोलत राहतील. वाटलं नव्हतं, की (ग) ------------ दिसणाऱ्या रांगोळ्यांच्या जागी दुचाक्या, चारचाक्या उभ्या राहतील. (घ) ------------च्या विमानप्रवासाची घरबसल्या तिकिटं काढता येतील अशी कल्पनाही केली नव्हती. केवळ मोठ्या शहरांतच दिसणारी परदेशी खाद्यपदार्थांची उपाहारगृहे (च) ----------- ही दिसत राहतील असं स्वप्नातही वाटलं नव्हतं. आजूबाजूच्या चाळींमधील मुले (छ) ----------- उभ्या राहिलेल्या सायबर कॅफेमध्ये जाऊन केव्हाही जगाशी संपर्क साधू शकतात, ही तंत्रज्ञानाची क्रांतीच म्हणायची. (ज) ------------ वाटतं, की या तंत्रज्ञानाच्या लाटेमध्ये मनामनांचा संपर्क तुटू नये म्हणजे झालं!

## ८ जाहिरातींचे जग

### १. श्रुतलेखन

आपल्या खऱ्या गरजा कोणत्या? स्वत:लाच हा प्रश्न विचारा बरं! काय उत्तर मिळालं? आपण तर सारखी खरेदी करतच असतो. (क) --------------- घेतो, त्या सतत बदलत राहतो, ब्रँडेड कपडे घेतो, आणि कपाट भरलं तरी नवीन घ्यावेसे वाटतातच. प्रत्येकाकडे (ख) ------------------ अनेक जोड असतातच. हॉटेलमध्ये जातो तेव्हा आंतरराष्ट्रीय (ग) --------------------- खाणं आपल्याला प्रतिष्ठेचं वाटतं. घरातील प्रत्येक कामासाठी आपण नवनवीन (घ) ----------------- घेत राहतो. सतत येणाऱ्या नव्या (च) ----------------- नवे मोबाईल, (छ) -------------- अशा गोष्टी घेत असतो. त्यातील कित्येक आपण वापरतही नाही, पण तरीही त्या वस्तू आपल्याकडे असतात.

का असं होतं? ह्याचा विचार आपण करतो का? कशामुळे आपण आपलं (ज) -------------- एवढं बदललं आहे? हा तर (झ) ---------------- प्रभाव! जगभर होणाऱ्या वस्तूंच्या प्रचंड (ट) ------------ त्या वस्तूंच्या विक्रीचा रेटा इतका आहे, की जर विक्री झाली नाही तर अर्थकारण कोलमडेल. त्यामुळे अतिशय आकर्षक जाहिराती करणं हे या (ठ) ------------ वैशिष्ट्य झालं आहे. त्याशिवाय माणूस वस्तू घेण्यासाठी प्रवृत्त होणार नाही, गरज नसलेल्या वस्तू त्याला गरजेच्या वाटणार नाहीत.

### २. वरील उताऱ्याच्या मदतीने 'जाहिराती आणि आपण' ह्या विषयावर एक निबंध लिहा.

## ९ वेणू चितळे ह्यांच्याबद्दल माहिती देणारी चित्रफीत पाहा.

### १. चित्रफीत पुन्हा पाहा आणि खालील माहिती दुरुस्त करा.

क. त्या काळी मध्यमवर्गीय लोक आपल्या घरातल्या मुलींना इतक्या लांब पाठवत नव्हते.
ख. अगदी बालपणी वेणूनं आई-वडील गमावले. मोठ्या भावंडांनीच तिची काळजी घेतली.
ग. मॅट्रिक झाल्यानंतर त्या त्यांच्या मित्रांबरोबर कोल्हापूरला गेल्या.
घ. ज्योतिष्यांनी सांगितलं होतं, ह्यांचं लग्न झालं, तर ह्यांच्या बहिणीचं लग्न होणार नाही.
च. त्यामुळे वेणू चितळे ह्यांनी लग्न न करण्याचे ठरवले.

### २. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

क. वेणू चितळे ह्यांना ब्रिटिश नभोवाणीमध्ये म्हणजेच बी.बी.सी.मध्ये नोकरी कशी मिळाली?
ख. वेणू चितळे ह्या इंग्लंडमध्ये कायमस्वरूपी स्थायिक झाल्या का?

## १० की की का? की की का का?

**अनुज** : काय रे, सिनेमाला येतोस का?

**सलील** : कोणता सिनेमा?

**अनुज** : 'की ॲन्ड का'. कालच आईबाबांनी पहिला. बाबा सांगत होते, की प्रत्येक पुरुषाने हा सिनेमा नक्की पाहायला पाहिजे.

**सलील** : का?

**अनुज** : अरे, ते सांगत होते की ह्या सिनेमामध्ये एक खूप महत्त्वाचा विषय मांडला आहे. ह्या चित्रपटात एक जोडपं दाखवलं आहे. त्यातला नवरा घरकाम करतो आणि बायको नोकरी करते.

**सलील** : छान. बघू या. पण तुला काय वाटतं, पुरुषानं घरकाम करावं की नाही? स्त्रियांनी घरी बसावं की नोकरी करावी?

**अनुज** : माझ्या मते कोणी घरकाम करावं आणि कोणी नोकरी, हे ज्याच्या त्याच्या आवडीवर अवलंबून आहे. मला आवडेल घरी बसून स्वयंपाक करायला.

**१. वरील संवादातील 'की' आणि 'का' ह्या शब्दांचे निरनिराळे अर्थ अभ्यासा आणि खालील संवाद पूर्ण करा.**

**आई** : काय? बंड्याला तुम्ही खेळताना पाहिलं? अहो, पण मला तर तो म्हणाला (क) -------------------- मित्रांसोबत अभ्यास करतोय म्हणून.

**बाबा** : म्हणून मी तुला सांगितलं होतं, (ख) -------------------- बंड्याकडे लक्ष असू दे जरा.

**आई** : हो ना. हल्ली फार कमी अभ्यास होतोय त्याचा. काय करावं, त्याला रागवावं (ग) --------------------? (घ) -------------------- शिक्षा करावी?

**बाबा** : छे, छे! रागावलं (च) -------------------- तो अजूनच ऐकणार नाही. त्यापेक्षा आपण त्याला अभ्यासातली गंमत दाखवू या. तुला काही सुचतंय (छ) --------------------?

**२. आता तुम्ही 'की', किंवा 'का' ह्या शब्दांचा वापर करून हा संवाद पुढे लिहा.**



**डॉक्टर** : आपण कोणती पेस्ट वापरता?

**गण्या** : पांडुरंगाची आयुर्वेदिक पेस्ट.

**डॉक्टर** : शाम्पू?

**गण्या** : पांडुरंगाचा हर्बल शाम्पू.

**डॉक्टर** : हेयर ऑईल?

**गण्या** : पांडुरंगाचं आवळ्याचं तेल

**डॉक्टर** : हे पांडुरंग म्हणजे मल्टीनॅशनल कंपनी ब्रॅन्ड आहे?

**गण्या** : नाही.

**डॉक्टर** : मग? पॉप्युलर लोकल ब्रॅन्ड?

**गण्या** : नाही, पांडुरंग माझा रूम पार्टनर आहे.

## ११ भाववाचक नामे

**कधी कधी नामांची एकापेक्षा अधिक रूपे असतात. त्यांचा उपयोगही जरा वेगळ्या अर्थाने होऊ शकतो. पुढील वाक्यांमध्ये असे काही नमुने आहेत. त्यांचा अभ्यास करा आणि स्वतः ती वापरून वाक्ये लिहा.**

**१. तो कडूपणा – तो कडवटपणा**

- कारल्याच्या फोडींना मीठ लावून त्यांचे पाणी पिळून टाकल्यास कारल्याचा कडूपणा कमी होतो.
- त्या दोन कुटुंबांमध्ये भांडणामुळे निर्माण झालेला कडवटपणा इतक्या वर्षांनंतरही कमी झालेला नाही.

**२. ती ओढ – तो ओढा**

- आजी आणि आजोबांचे नातवंडांवर सारखेच प्रेम आहे, पण नातवंडांचा ओढा मात्र आजीकडेच जास्त आहे.
- गेल्या महिनाभरात पाऊस आलाच नाही. पावसाने अशी ओढ दिल्यामुळे निम्म्या पेरण्या वाया गेल्या आहेत.
- पुराच्या पाण्याला इतकी ओढ होती, की त्यात मोठा बैलही वाहून गेला असता.

**३. ती खळखळ – तो खळखळाट**

- पावसाळा सुरू झाल्यावर नाजूक खळखळ करत लहान लहान ओढे वाहू लागले आणि ते नदीला जाऊन मिळाल्यावर नदीचा खळखळाट वाढला.
- मोठ्या मॉलमधून काही कुरकुर न करता खरेदी करणारे लोक भाजीवाल्याला किंवा केळीवाल्याला पैसे देताना मात्र खळखळ करतात.

**४. ती कोरड – तो कोरडेपणा**

- उन्हातून तासभर चालून आल्यामुळे त्याच्या घशाला कोरड पडली होती.
- पावसात भिजून आल्यावर कपडे बदलले, की बदललेल्या कपड्यांचा कोरडेपणा छान वाटतो.
- पुतण्याच्या शिक्षणासाठी माझ्या आईने इतके कष्ट घेतले, पण निरोप घेताना त्याने दाखवलेला कोरडेपणा मला खटकला.

**५. ती खरखर – तो खरखरीतपणा**

- ध्वनिक्षेपकामधून सतत खरखर येत होती, त्यामुळे केळकरांचे व्याख्यान नीट ऐकू आले नाही.
- नवीन लाकडी टेबलाचा खरखरीतपणा सुताराने सँडपेपरने घासून काढला आणि टेबल गुळगुळीत केले.

**६. ती पोकळी – तो पोकळपणा**

- निर्वात पोकळीतून हायपरलूप वन धावेल.
- महात्मा गांधींच्या निधनाने राष्ट्रीय नेतृत्वामध्ये पोकळी निर्माण झाली. समाजाला अहिंसा आणि शांततेच्या मार्गाने नेणारा तसा दुसरा नेता नव्हता.
- पुढाऱ्यांनी मोठमोठी आश्वासने दिली, पण त्या आश्वासनांमधला पोकळपणा मागील पाच वर्षांच्या अनुभवाने लोकांना ओळखू आला.

## १२ विरुद्ध अर्थाच्या शब्दांची यादी तयार करा.

माणूस असतो बारीक किंवा लठ्ठ
त्याचा शर्ट ढिला किंवा घट्ट
काठी असते वाकडी किंवा सरळ
तुमचे गाव लांब किंवा जवळ
मुलगा असेल देखणा किंवा कुरूप
त्याला कामाचा आळस आहे की हुरूप?
दिव्याचा प्रकाश कधी प्रखर कधी मंद
दुकान कधी उघडे कधी बंद

कोणी मोठा तर कोणी लहान
कोणी सामान्य तर कोणी महान
कोणी भेकड तर कोणी साहसी
कोणी भित्रा तर कोणी धाडसी
कोणी गरीब तर कोणी श्रीमंत
कोणी दुर्भागी तर कोणी भाग्यवंत
॰ ॰ ॰

उदा॰ बारीक × लठ्ठ

## १३ नाम + क्रियापद

१. आखणे, सोडणे, देणे ही क्रियापदे नामांबरोबर आली आहेत. त्या जोड्या लिहा.

२. पाठ्यपुस्तकातील तत्त्वांचा अभ्यास करून 'करणे' या क्रियापदाबरोबर वापरलेली नामे लिहा.

३. जोड्या लावा.

| | |
|---|---|
| क. रेलचेल | १. घेणे |
| ख. दुजोरा | २. पावणे |
| ग. योजना | ३. पणाला लावणे |
| घ. लोप | ४. लागणे |
| च. लयाला | ५. असणे |
| छ. धाप | ६. देणे |
| ज. जुळवून | ७. जाणे |
| झ. शक्ती | ८. आखणे |

४. 'मार्ग' ह्या नामाबरोबर आलेली क्रियापदे कोणती? त्या जोड्यांचा स्वतंत्र वाक्यांत उपयोग करा.

# तोंडी परीक्षा

एकूण गुण १५

१ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ६)

**१. खालील उतारा वाचून दाखवा.** **(२)**



साल २०१० पासून २० मार्च हा दिवस जागतिक चिमणी दिन म्हणून पाळला जातो. जगभरातील लोककथा आणि बडबडगीतांमध्ये ज्या चिऊताईचे एक अढळ स्थान आहे, ज्या चिऊताईच्या गोष्टी ऐकत लहान मुले मोठी होतात, त्या सतत चिवचिवणाऱ्या चिऊताईचा चिवचिवाट अलीकडे ऐकू येईनासा झालाय. वाढत्या शहरीकरणामुळे पर्यावरणाच्या अन्नसाखळीतील महत्त्वाचा घटक असलेल्या चिमण्यांची संख्या कमी झाली आहे. भारतात पाच प्रकारच्या चिमण्यांच्या प्रजाती आढळतात. ह्यात पीतकंठी चिमणी, घरचिमणी, जावा चिमणी, पहाडी चिमणी आणि वृक्ष चिमणी अशा पाच प्रजाती येतात. त्यातील आपल्या भागातील लाडकी चिमणी म्हणजे घरचिमणी. ही भारतात सर्वत्र आढळते. कौलारू घरात वळचणीला, पन्हळीच्या आडोशाला, जुन्या काळच्या लाकडी घरातील अडगळीच्या जागी ह्या चिमण्या हटकून घरटे बांधत. हे घरटे बांधण्यासाठी त्यांना गवत आणि काड्या अशा गोष्टी लागतात. घरट्यात त्या एकावेळी ३-४ अंडी घालतात. खाण्यासाठी त्या गवताच्या बिया, कीटक, अळ्या ह्यांवर अवलंबून असतात. पण शहरीकरणाने त्यांची घरटे बांधण्याची हक्काची वळचणच हिरावून घेतलीय. ह्या कॉंक्रीटच्या जंगलात ना त्यांना घरट्यासाठी जागा सापडत, ना खाण्यासाठी अन्न. अमाप वृक्षतोड करून आपण त्यांचा निवारा आणि अन्न ह्या दोन्ही गोष्टी नाहीशा केल्या आहेत. चिमण्यांना त्यांचे नैसर्गिक घर आणि त्यांची नाहीशी होऊ लागलेली अन्नपाण्याची साखळी परत मिळवून देण्यासाठी प्रयत्न व्हायला हवेत. ज्या शहरात चिमण्यांची संख्या अधिक असते, तेथील पर्यावरणही उत्तम असते असं जाणकार सांगतात.

**२. पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या.** **(२)**

क. भारतात चिमण्यांच्या किती प्रजाती आढळतात? कोणत्या?

ख. चिमण्यांना घरटे करण्यासाठी कोणत्या जागा आवडतात?

ग. चिमण्यांची संख्या का कमी होऊ लागली आहे?

घ. चिमण्या काय खातात?

## २ संवाद साधा

(एकूण गुण ५)

**१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर तुमच्या जोडीदाराबरोबर संवाद साधा. जोडीदाराबरोबर खालीलपैकी एक विषय ठरवा आणि दिलेल्या मुद्यांचाही विचार करा. तयारीसाठी वेळ १० मिनिटे.**

**क. पर्यावरणासाठी मी काय करतो / करते?**

१. कचऱ्याचे वर्गीकरण

२. ऊर्जेचे नियोजन

३. पाण्याच्या वापराचे नियोजन

४. राहणीमानात केलेला बदल, इत्यादी

**ख. तुमचा मित्र नोकरीसाठी परदेशी किंवा दुसऱ्या गावी जात आहे. त्याला काय सल्ले द्याल?**

१. त्या देशातील भाषा / संस्कृती

२. वांशिक भेदभाव

३. तेथील खाद्यसंस्कृती

४. तेथील हवामान

## ३ चित्रवर्णन


(एकूण गुण ५)

**१. खाली दिलेल्या चित्रांपैकी एका चित्राचे वर्णन करा.**

ह्या चित्रांत कोणता विषय हाताळला आहे? ह्या विषयाबाबत तुमची स्वतःची मते काय आहेत? चित्रांत हाताळलेला विषय तुम्हाला गंभीर वाटतो का? ह्या विषयांबाबत तुम्हाला कोणती उपाययोजना सुचवावीशी वाटते?









# लेखी परीक्षा

एकूण गुण ३५

## १ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)

वस्तू खरेदी करण्यापूर्वी ती आत्ता विकत घेणं खरंच आवश्यक आहे का, ह्याचा विचार आपण करतो का? तो करायला हवा. मनात आलं म्हणून, सेल लागलाय म्हणून, शेजाऱ्याकडे आहे म्हणून किंवा फॅशन बदलली आहे म्हणून जर वस्तू खरेदी केली जात असेल, तर तो केवळ चंगळवाद ठरेल. चंगळवाद हा आर्थिक गुन्हा मानला गेला पाहिजे. एवढंच नाही, तर पर्यावरणीय गुन्हाही मानला जावा. कसं ते पाहू या.

अनावश्यक वस्तू किंवा खाद्यपदार्थ खरेदी करून ते वाया जाऊ देणे, ह्या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घ्यायला हवे. वस्तू किंवा पदार्थ खरेदी करताना आपण किंमत मोजतो, ती त्या वस्तूची बाजारातली त्या वेळची किंमत असते. पण ती वस्तू उत्पादित करताना किंवा पिकवताना जे मानवी कष्ट, ऊर्जा, यांत्रिक ऊर्जा खर्च होते, जी पर्यावरणीय किंमत मोजावी लागलेली असते, तिचा विचार बाजारातल्या किमतीमध्ये झालेला नसतो. केवळ बाजाराच्या उलाढालीतून ठरलेली किंमत आपण मोजतो. पण खर्च झालेली नैसर्गिक संसाधने, ऊर्जा, कष्ट हे खर्च होतातच. विचार करा, अनावश्यक आणि वाया जाणाऱ्या वस्तू आणि पदार्थांबरोबर किती प्रकारची ऊर्जा वाया जाते आणि पर्यावरणाचे किती नुकसान होते! म्हणून अशी खरेदी म्हणजे केवळ आर्थिक चंगळवाद नाही, तर संसाधनांची उधळपट्टी आहे.

जेवढी विचारपूर्वक खरेदी आपण करू, तेवढा प्रदूषणाला, पर्यावरणाच्या नाशाला, अनावश्यक तंत्रज्ञानाच्या वापराला आळा बसेल. म्हणून म्हणावेसे वाटते, की 'ग्राहका, जागा हो, सावध हो'.

**१. वरील उताऱ्याला योग्य शीर्षक द्या.**

**२. वस्तूच्या बाजारातील किमतीमागे कुठल्या गोष्टींचा विचार झालेला नसतो?**

**३. वस्तू खरेदी करण्याची इच्छा होण्यामागे कोणकोणती कारणे असू शकतात?**

**४. लेखकाच्या मते आर्थिक गुन्हा कोणता?**

**५. लेखक ग्राहकाला जागे राहायला का सांगत आहे?**

## २ व्याकरण (एकूण गुण २२)

**१. खालील उताऱ्यातील 'ऊन' प्रत्यय लागलेले शब्द शोधून शब्दाची फोड करून प्रत्यय लिहा.** **(४)**

उदा॰ जंगलातून – मूळ शब्द : जंगल - सा॰रू॰ : जंगला + त + ऊन

जंगलातून एक डरकाळी ऐकू आली. पाठोपाठ झाडीतून मोराच्या केका ऐकू आल्या. माकडे अस्वस्थ झाली आणि झाडावरून खाली, खालून वर चढू-उतरू लागली. त्या अस्वस्थ शांततेत एक फूत्कार उमटला आणि पाठोपाठ काहीतरी खसफस झाली. पाण्यातून कोणीतरी सुळकन बुडी मारली आणि तळ्यातलं पाणी डहुळलं. पुन्हा शांतता. त्या शांततेतून काहीतरी घडणार असल्याची चाहूल लागत होती. तेवढ्यात गवतातून एक हरीण वेगानं पळत सुटलं आणि मागोमाग दिसली एक वेगवान झेप. जंगलनाट्याचा शेवटचा अंक सुरू झाला होता.

**२. कंसात दिलेल्या सूचनांप्रमाणे योग्य रूपे लिहून पत्र पूर्ण करा.** **(५)**

प्रिय विशाखा,

(पूर्ण भविष्यकाळ)

स्वतःचं विश्व निर्माण करण्यासाठी हे घर तू सोडलंस त्याला आज एक वर्ष झालं. ह्या एका वर्षात तुझ्यात खूप बदल (होणे) ------------------. परदेशात राहून तू जास्तच स्वावलंबी (होणे) ---------------------. एक नवाच आत्मविश्वास तुझ्यात निर्माण (होणे) ---------------------- आणि त्यामुळे ठामपणे तू सर्व निर्णय (घेणे) --------------------. म्हणजेच, आता नव्या उमेदीने तू घरी परत येण्याचे (ठरवणे) ---------------------. माझे हे म्हणणे तुला (पटणे) -------------------- अशी आशा करते.

(रीती भविष्यकाळ)

तू रोजच नवनवीन गोष्टी (शिकणे) --------------------, नवनव्या माणसांना (भेटणे) --------------------------. हा प्रत्येक अनुभव तुला सतत काहीतरी नवीन (शिकवणे) --------------------, तुझं जीवन आणखी सुंदर, समृद्ध (करणे) ----------------- अशी मला खात्री वाटते. माझ्या पत्राचं उत्तर देशीलच!

तुझी, माई

**३. योग्य जागी योग्य तो शब्द लिहून उतारा पूर्ण करा.** **(३)**

(गावोगावी, घरोघरी, गल्लोगल्ली, देशोदेशी, वेळोवेळी, प्रांतोप्रांती)

------------- सांगूनही अभिजितने त्याच्या सवयी बदलल्या नाहीत. दरवेशासारखं ---------- हिंडणं हा त्याचा स्वभावच बनला होता. एकाच जागी जास्त दिवस तो राहूच शकत नसे. जर राहायची वेळ आलीच, तर दिवसभर तो ------------ हिंडत बसे. ------------ त्याचे मित्र होतेच. त्यामुळे जेवायच्या वेळी तो ज्या घरी असे तिथेच त्याचे जेवण होई. ह्या भ्रमंतीत तो ------------- च्या आणि ------------ च्या भाषा शिकला होता आणि वेळेनुसार त्यांचा योग्य तो उपयोगही करत असे. मीपण आता त्याची काळजी करणं सोडून दिलं होतं. माझ्या पोटी एक जिप्सी जन्माला आलाय हे मी मनोमन मान्य केलं होतं.

४. **खालील वाक्यांश 'ऐवजी' किंवा 'पैकी' वापरून जोडा. योग्य वाक्यरचना करण्यासाठी गरजेनुसार जास्तीचे शब्द घाला आणि लिंग, वचन, सामान्य रूप यांकडे लक्ष द्या.** (३)

| | | |
|---|---|---|
| लेखी परीक्षा | पैकी | तोंडी परीक्षा घेतली तर चालेल. |
| चार वाघ | ऐवजी | एक वाघ मेला. |
| चारचाकी गाडीने जाणे | | आम्ही बसने गेलो. |

५. **खालील रकान्यात दिलेले शब्द वाक्यांमध्ये योग्य जागी भरून वाक्ये पूर्ण करा.** (४)

| | |
|---|---|
| आसपास | १. ------------ जाणारा रस्ता फार रहदारीचा आहे म्हणून तू पलीकडच्या रस्त्याने जा. |
| भोवती | २. वळून ------------ पाहिले तर तो उभा होता; कधी आला ते कळलंही नाही. |
| पाशी | ३. इथे ------------ कुठे औषधाचं दुकान आहे का? |
| बाजूने | ४. खेळणारी, बागडणारी मुलं ------------ असली की वातावरण कसं जिवंत राहतं! |
| बाजूला | ५. त्या झाडा ------------ जाऊन उभा राहा; मी पाच मिनिटातच येतो. |
| पाठीमागे | ६. ------------ च्या दाट काळोखात गाव दिसेनासं झालं होतं. |
| अवतीभोवती | ७. ------------ जो वाडा आहे ना तो खूप सुंदर आहे. असे वाडे आता राहिले नाहीत. |
| शेजारी | ८. शिक्षक जरा ------------ गेल्यावर त्या मुलाने शेजारच्या मुलाच्या वहीत डोकावून पहिले. |

६. **योग्य जागी योग्य तो शब्द लिहून संवाद पूर्ण करा.** (३)

(सुंदरसा, छोट्याशा, इवलीशी, छानसा, लहानसा, छानसं)

सविता : मृदुला, तुला एका ------------ कामासाठी फोन केला होता. कथ्थक नृत्यशैलीविषयीच्या लेखासाठी मला एक ------------ फोटो हवाय. तुझ्या नृत्यशाळेतल्या मुलींचा एखादा ------------ फोटो असेल ना?

मृदुला : आहे ना एक. पण तो अगदीच ------------ फोटो आहे. मी पाठवते, बघ चालतोय का.

सविता : बघते. आणि तुला एक बातमीही द्यायची होती. अगं, आमच्या मांजरीला चार ------------ पिल्लं झालीयेत. तुला हवं होतं ना एक? त्यातलं एक ------------ पिल्लू ठेवते तुझ्यासाठी.

## ३ शब्दसंपदा (५)


१. पाण्याचा ग्लास लवंडणे
२. झुळुझुळु वाहणारे पाणी
३. खळाळत वाहणारे पाणी
४. धो धो कोसळणारे पाणी
५. रिमझिम पडणारा पाऊस
६. मुसळधार पाऊस
७. निथळणारे पाणी
८. थेंब थेंब टपकणारे पाणी
९. पाणी शिंपडणे
१०. पाणी फवारणे



























## ४ श्रुतलेखन (परीक्षकांसाठी उतारा शेवटी दिला आहे) (३)

# परीक्षकांसाठी

**श्रुतलेखनासाठीचा उतारा**

विविध प्रकारची झाडे एवढ्या प्रचंड प्रमाणात लावण्याचा उद्योग तात्यासाहेबांनी निव्वळ हौसेपोटी केलेला नाही. त्यातून येत्या दहा ते पंधरा वर्षात ह्या प्रदेशाचा कायापालट झालेला असेल. तो 'होईल' अशी त्यांना नुसती आशा वाटत नाही, तर 'झालेला असेल' अशी खात्री वाटते. तशी योजनाच त्यांनी तयार केली आहे आणि चार ते पाच वर्षांत ह्या योजनेचे फायदे मिळण्यास सुरुवात झालेली असेल. झाडे चांगली रुजलेली असतील, जमिनीतील पाण्याची पातळी वाढलेली असेल आणि पाण्याचा प्रश्न बऱ्याच प्रमाणात सुटलेला असेल. गावातील तरुणांसाठी जागेवरच रोजगार उपलब्ध झालेला असेल आणि शहराकडे धाव घेण्याचे प्रमाण कमी झालेले असेल.

# विज्ञान, तंत्र, मंत्र

७







## चला, शिकू या...

- विज्ञान आणि तंत्रज्ञान
- यंत्रे : उपयोग, समस्या,
- शक्य क्रियापदे : उचलवते - उचलवत नाही, करवते - करवत नाही इ.
- लेखनाचे आणि कथनाचे प्रकार
- संबोधन : श्रोतेहो, मित्रहो इ.
- वक्तृत्व
- असो, असू दे
- मंत्र, विज्ञान आणि अंधश्रद्धा ह्यांविषयी बोलणे
- नुकतेच, मघाशी, काल संध्याकाळी, आदल्या दिवशी, पूर्वी, अलीकडेच, यंदा इ.
- शब्दयोगी पदे : साठी / करिता

## १ विज्ञान

**१. पुढील शब्दांच्या आधी 'अ' हा उपसर्ग लावून विरुद्ध अर्थाचे शब्द लिहा आणि नंतर उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्यात उपयोग करा.**

उदा. ज्ञान : अज्ञान - शरीरस्वच्छतेबाबतचे अज्ञान अनेक रोगांना कारणीभूत ठरते.

क. शास्त्रीय : ------------------------------------------------------------

ख. विश्वास : ------------------------------------------------------------

ग. वैज्ञानिक : ------------------------------------------------------------

घ. वैध : ------------------------------------------------------------

च. स्वस्थ : ------------------------------------------------------------

छ. व्यावहारिक : ------------------------------------------------------------

ज. नियंत्रित : ------------------------------------------------------------

झ. प्रगत : ------------------------------------------------------------

**२. क. योग्य अक्षरांवर अनुस्वार द्या.**

उदा. रगीत – रंगीत

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. सगीत | ४. रागोळी | ७. मत्र | १०. फुकर | १३. नियत्रण | १६. स्वयपाक |
| २. चागला | ५. यत्र | ८. अधश्रद्धा | ११. सिद्धात | १४. केद्रबिदू | |
| ३. जगल | ६. तत्र | ९. सशोधन | १२. सबध | १५. उत्क्राती | |

**ख. शब्द ऐका व आपली उत्तरे तपासा. शब्द मोठ्याने उच्चारा.**

**३. क. कंसातील जोडाक्षरे योग्य जागी भरा.**

(व्या, त्सा, स्या, ष्टि, द्दा, त्त्व, ज्ञ, श्वा, ल्प, च्छा, त्क्रां, क्री, ह्लू, र्थी)

उदा. दृ ---- कोन - दृष्टिकोन

| | | | |
|---|---|---|---|
| १. तंत्र---- | ४. उ----ती | ७. पि---- | १०. मह---- |
| २. क----ना | ५. सम---- | ८. आदरा---- | ११. इ---- |
| ३. किरणो----र | ६. वि----प----त | ९. ----सपीठ | १२. मु---- |

**ख. शब्द ऐका व आपली उत्तरे तपासा. शब्द मोठ्याने उच्चारा.**

४. शब्दकोडे




**कळीचे शब्द**

आडवे शब्द :

१. वैज्ञानिक शोधाचा व्यावहारिक उपयोग ४. सातत्याने केलेले ठरावीक शब्दोच्चार ५. अवकाशातील पोकळी ८. आजच्या नंतरचा दिवस ९. पूर्ण विश्वास १०. आश्चर्यकारक गोष्ट, हातचलाखी १२. ह्या वर्षी १४. एखादी गोष्ट माहीत नसणे १५. दुसरा ग्रह १८. वैज्ञानिक १९. ह्याआधी

उभे शब्द :


१. विशिष्ट पद्धत २. एखाद्या गोष्टीचे आकलन असणे ३. काळ ५. कोणतीही शंका न घेता अंधपणे ठेवलेला विश्वास ६. 'दिवस'च्या विरुद्धार्थी शब्द ७. ढोंगी माणूस ११. शास्त्र १२. तंत्रज्ञानाचा उपयोग करून बनवलेले १३. आजच्या आधीचा दिवस १४. अवैज्ञानिक १५. उद्याच्या नंतरचा दिवस १६. अंतराळातील गोल १७. थोड्या वेळापूर्वी

## २ यंत्रे

**१. वाचा : शोध छोटा, उपयोग मोठा**

उदा॰ 

थोडा विचार करा. ह्या किंवा अशाच दोऱ्याचा किंवा सुताचा शोध लागला नसता, तर तुम्हाला आजही कपड्यांशिवायच राहावे लागले असते का?

क. 

झिप : हिचा शोध लागला आणि कपडे, पिशव्या, पर्स अशा अनेक गोष्टी नीट बंद करता येऊ लागल्या.

ख. 

ह्या काडेपेट्या मेणबत्त्या, कंदील, दिवे, स्टोव्ह इ॰ पेटवतात. जगभरात वर्षाकाठी ५० हजार कोटी काडेपेट्या विकल्या जातात.

ग. 

एखादी बारीक जखम झाली, की आपण बँड-एड शोधू लागतो. आजपर्यंत १ हजार कोटी बँड-एड विकली गेली आहेत.

घ. 

'व्हलूर' आणि 'क्रोशे' ह्या फ्रेंच शब्दांपासून ह्याचे नाव वेलक्रो पडले. कोट्यवधीची विक्री तर झालीच, आणि जमिनीवरच नाही, तर अंतराळातपण हे खूपच उपयोगी ठरले.

च. 

विचारांत गढलेल्या वॉल्टर हंटने बसल्या बसल्या हातातील तांब्याच्या तारेला पीळ दिला. तिचा हा आकार तयार झाला. त्याने त्याचे पेटंट घेतले आणि हा अत्यंत उपयुक्त आविष्कार जगापुढे आला.

छ. 

घड्याळाला तासाचा आणि मिनिटाचा काटाच नसता तर?

**२. वरील शोधांचे महत्त्व लक्षात घ्या आणि 'जर-तर' वापरून वाक्ये तयार करा.**

उदा. जर सुताचा शोध लागला नसता, तर माणसाला आजही कपड्यांशिवाय राहावे लागले असते.

क. -------------------------------------------------------------------------------

ख. -------------------------------------------------------------------------------

ग. -------------------------------------------------------------------------------

घ. -------------------------------------------------------------------------------

च. -------------------------------------------------------------------------------

छ. -------------------------------------------------------------------------------

## ३ शक्य क्रियापदे

**१. खालील उताऱ्यामध्ये कंसातील योग्य क्रियापद निवडून त्याचे 'शक्य रूप' लिहा. एक क्रियापद अधिक वेळा येऊ शकते.**

(करणे, पसरणे, जाणे, पाहणे, बोलणे, उठणे, पिणे, सांगणे)

अचानकच तो आला. इतका दमलेला, मळलेला आणि भुकेलेला होता, की त्याच्याकडे पाहवत नव्हते. एक शब्दही न बोलता तो घरात आला आणि खुणेनेच त्याने पाणी मागितले. त्याला (क) ---------------------- ही नव्हते. सरबत प्यायला दिले, तेही त्याला (ख) ---------------------- नव्हते. थोड्या वेळाने तो जाण्यासाठी उठू लागला, पण त्याला (ग) -------------- ही नव्हते. मी त्याला म्हटले, "तुला (घ) ------------------ नसेल तर असू दे. बस तिथेच. थोड्या वेळानं तुला (च) ---------------- असेल तर अंघोळ कर आणि स्वच्छ हो. आणि नंतर तुला (छ) -------------- असेल, तर तुझी कहाणी मला ऐकायची आहे. घरदार सोडून कसं (ज) ------------------ तुला इतक्या लांब? आणि इतके कष्ट (झ) ------------------------ तरी कसे?" त्याच्या पायाला लागले असल्यामुळे त्याला पाय (ट) --------------------- नव्हते. बसल्या जागीच त्याला झोप लागली.

**२. खालील चारोळी वाचा आणि पुढील चारोळ्या पूर्ण करा.**

मंत्र पाठ होत नाही
तंत्र जमत नाही
यंत्र चालत नाही
मी आनंदात आहे.

| रस्त्यातील गर्दी पाहवत नाही | उन्हाळा असो वा हिवाळा |
|---|---|
| ------------------------------------ | ------------------------------------ |
| ------------------------------------ | ------------------------------------ |
| ------------------------------------ | ------------------------------------ |

## ४ कथनाचे प्रकार

**चातुर्यकथा**



एका रात्री अकबर बादशहाने एक विचित्र स्वप्न बघितले. त्याला दिसले, की आपला एक दात सोडून बाकी सगळे दात पडले आहेत. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याने राज्यातील सर्व विख्यात ज्योतिष्यांना बोलावले आणि त्यांना आपल्याला पडलेल्या विचित्र स्वप्नाबद्दल सांगून त्याचा अर्थ सर्व ज्योतिष्यांनी आपापसात विचारविनिमय करून एकमताने उत्तर दिले, "महाराज, ह्याचा अर्थ असा आहे, की तुमचे सर्व नातेवाईक तुमच्याआधी मरून जातील." विचारला. हे ऐकून बादशहा खूप रागावला आणि त्याने सर्व ज्योतिष्यांना दरबारातून निघून जाण्यास सांगितले. त्यानंतर बादशहाने बिरबलाला बोलावले आणि त्याला तोच प्रश्न विचारला.

बिरबलाचे उत्तर – ...

बादशहा बिरबलाच्या उत्तरावर खूपच खूश झाला आणि त्याने बिरबलाला मोठे बक्षीस दिले.

**१. बादशहा इतका खूश व्हावा असा स्वप्नाचा कोणता अर्थ बिरबलाने सांगितला?**

बिरबलाने दिलेले उत्तर :

बिरबल म्हणाला : “महाराज, आपल्याला पडलेले स्वप्न अत्यंत शुभदायक आहे. ह्याचा अर्थ असा, की तुम्ही तुमच्या सर्व नातेवाइकांमध्ये सर्वात अधिक काळ जगणार आहात.


**२. बिरबलाने चातुर्याने सांगितलेला स्वप्नाचा अर्थ २ ते ४ ओळीत लिहा.**

## ५ संबोधन

**खालील प्रसंगांमध्ये कोणकोणती संबोधने वापराल?**

| प्रसंग | संबोधने |
|---|---|
| एका महिला मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन आहे आणि तुम्ही मुख्य वक्ता आहात. | उदा. प्रिय मैत्रिणींनो / भगिनींनो... |
| १. शाळेतील विद्यार्थ्यांना शांत बसवायचे आहे. | |
| २. सैनिकांशी संवाद साधायचा आहे. | |
| ३. निवडणुकीच्या प्रचारसभेत भाषण करायचे आहे. | |
| ४. खोट्या कंपन्यांनी चालवलेल्या फसवणुकीबाबत ग्राहकांना सावध करायचे आहे. | |
| ५. मुलांना गोष्ट सांगायची आहे. | |
| ६. लहान बाळ रडत आहे, त्याला शांत करायचे आहे. | |
| ७. आईला हाक मारायची आहे. | |
| ८. मैत्रिणीला बोलवायचे आहे. | |

## ६ पिशी मावशी




कमीत कमी शब्दांत मोठा आशय सांगण्याची किमया फक्त कवितेत असते. मराठी भाषेला ही मोठी काव्यपरंपरा आहे. तुकाराम महाराजांसारख्या प्रतिभावान कवीपासून आज लोकप्रिय असलेल्या संदीप खऱ्यांपर्यंत विविध शैलीचे आणि प्रकारचे कवी मराठी भाषेला लाभले आहेत. त्यांपैकीच एक म्हणजे **विंदा करंदीकर.** भारतातील 'ज्ञानपीठ' ह्या सर्वोच्च साहित्य पुरस्काराने गौरवल्या गेलेल्या विंदा करंदीकरांच्या 'पिशी मावशी आणि तिची भुतावळ' ह्या अतिशय गाजलेल्या बालकवितासंग्रहातील एक कविता.

**१. पिशी मावशी म्हणे एक चेटकीण होती. तुम्हाला काय वाटते, चेटकीण असते का? पिशी मावशी नक्की कोण असेल?**

## पिशी मावशी

मसणवटीच्या वाटेवरती
वाट थबकते एक ठिकाणी!
आणि पाहता भवती दिसती
... फक्त चौथरे... नष्ट घराणी.

उमगतील मग पडक्या भिंती
जिवंत पारंबीचा धारण;
फक्त सात बेलाचे वासे;
मला न ठाऊक त्याचे कारण.

पिशी मावशी तेथे वसते;
गाव राहतो धरून डोंगर!
... एकलकोंडी... कुशीत घेते
लुकलुकणारे काळे मांजर.

सात दिसांनी फक्त एकदा
सर्वांगाला लावुन रक्षा,
पिशी मावशी कोरण मागे;
चवताळेल जर म्हणाल, 'भिक्षा'

"पिशी मावशी... पिशी मावशी"
म्हणती पोरे; म्हणतो मीही;
ती दिसता पण खचते हिंमत
... अन आठवते दुसरे काही!

**कवितेतील काही शब्दांचे अर्थ :**

| | | |
|---|---|---|
| मसणवट | : | स्मशान, दहनभूमी |
| थबकणे | : | चालता चालता मध्येच थांबणे |
| चौथरा | : | (स्मशानभूमीतील) चौकोनी ओटा |
| उमगणे | : | समजणे, कळणे |
| पारंबी | : | वड, पिंपळ इत्यादी झाडांची फांदीपासून निघणारी मुळे |
| धारण | : | परिधान, पोशाख |
| रक्षा | : | राख |
| कोरण | : | कोरडी भिक्षा |
| चवताळणे | : | पिसाळणे, संतापाने बेताल वागणे |
| खचणे | : | अवसान गळणे, भीती वाटणे |

**२. योग्य पर्याय निवडा.**

क. पिशी मावशी कुठे राहते?

१. स्मशानभूमीत / २. स्मशानाच्या वाटेवर / ३. स्मशानाजवळ

ख. गावातले लोक कुठे राहतात?

१. डोंगरावर / २. स्मशानभूमीच्या मागे / ३. डोंगराखाली

ग. पिशी मावशीच्या घरात कोण राहते?

१. काळी मनीमाऊ / २. काळे कुत्रे / ३. पांढरी मांजर

घ. पिशी मावशी ---------------- भिक्षा मागते?

१. रोज / २. आठवड्यातून एकदा / ३. एकदा

**३. कविता वाचल्यावर तुम्हाला 'पिशी मावशी' कोण आहे असे वाटते? स्पष्टीकरण द्या.**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**४. "ती दिसता पण खचते हिंमत /... अन आठवते दुसरे काही!" ह्या ओळींचा अर्थ लिहा.**

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**५. पिशी मावशी अमेरिकेला गेली तर काय होईल ह्याची कल्पना करा आणि विंदा करंदीकर ह्यांची दुसरी कविता पूर्ण करा.**

पिशी मावशी अमेरिकेला
------------ जाऊन आली;
अटलांटिकच्या मध्यावरती
------------ बोट बुडाली.

बोट बुडाली तरी राहिली
एक बायकी हॅट तरंगत
पिशी मावशी ------------
आणि म्हणाली, "आली गंमत"

पिशी मावशी हसली ख्यॅ ख्यॅ
तिने अंगठा उलटा केला;
तोच देवमासा आला वर
तिने ----------------

हॅट पोचली बोटीआधी
अमेरिकेच्या धक्क्यावरती;
तीच हॅट डोक्यावर घालून
--------------------------

पिशी मावशी ------------
परंतु भ्याली पाहून ----------
अमेरिकेचे ------------ ते!
--------------------------

"मंत्राहूनही यंत्र भयंकर"
पिशी म्हणाली सरला ताठा,
"चल गं बाई, चल रे बाबा,
पुन्हा आपला भारत गाठा!"

**क. अमेरिका पाहून पिशी मावशी म्हणाली, "मंत्राहूनही यंत्र भयंकर". ह्या ओळीचा तुम्ही कसा अर्थ लावाल ते लिहा.**

पिशी मावशी अमेरिकेला
नुकती नुकती जाऊन आली;
अटलांटिकच्या मध्यावरती
वादळ झाले बोट बुडाली.

बोट बुडाली तरी राहिली
एक बायकी हॅट तरंगत
पिशी मावशी तिच्यात बसली
आणि म्हणाली,"आली गंमत"

पिशी मावशी हसली ख्यॅ ख्यॅ
तिने अंगठा उलटा केला;
तोच देवमासा आला वर
तिने जुंपला तो हॅटेला.

हॅट पोचली बोटीआधी
अमेरिकेच्या धक्क्यावरती;
तीच हॅट डोक्यावर घालुन
पिशी मावशी झाली पुढती.

पिशी मावशी झाली पुढती.
परंतु भ्याली पाहून गर्दी:
अमेरिकेचे गुप्तहेर ते!
त्यांना यंत्रावरून वर्दी!

"मंत्राहूनही यंत्र भयंकर"
पिशी म्हणाली, सरला ताठा,
"चल गं बाई, चल रे बाबा,
पुन्हा आपला भारत गाठा!"

**ख. दोन्ही कवितांपैकी एक कविता निवडा. ती कशी वाचावी हे ठरवा, त्याचा सराव करा आणि वर्गातील इतर विद्यार्थ्यांकडून वाचन करून घ्या.**

**ग. काही विद्यार्थ्यांचे गट करा आणि दुसऱ्या कवितेचे नाट्यरूपांतर करा.**

## ७ असो, असू दे ...

**१. मला वाटते**

माणसाला कर्तव्याची जाण असू दे, आयुष्यात आळसाला जागा नसू दे.

पोटापुरता पैसा असू दे, उधळण्यासाठी छदाम नसू दे.

प्रत्येकाच्या डोक्यावर छप्पर असू दे, बेघर जगण्याचं संकट नसू दे.

जगण्यावरती प्रेम असू दे, कोणाविषयी द्वेष नसू दे.

**क. तुम्हाला काय वाटते? काय असू दे? आणि काय नसू दे? कोणत्याही विषयावर काही ओळी लिहा. (पर्यावरण, शहरातील जीवन, निसर्ग आणि वन्यजीवन, श्रद्धा आणि अंधश्रद्धा इ॰)**

उदा॰ शहरात खूप झाडे असू देत, प्रदूषण नसू दे.

**२. असो**

**पुढीलपैकी योग्य तो पर्याय त्या त्या वाक्यापुढे लिहा.**

(जे झाले ते झाले / ठीक आहे / हो / असेल, तरी)

मुलगा असो किंवा मुलगी, ह्या घरात सर्वांसाठी सारखेच नियम आहेत. (उदा॰ असेल, तरी)

क. असं घडायला नको होतं. असो, हा झाला भूतकाळ! आता आपण भविष्याबद्दल बोलू या.

ख. खरं नाव वापरायचं नाही का? असो, नाव बदलून लिहिण्याचा एक फायदा तर आहेच. इथे आपण बिनधास्त आपली मते मांडू शकतो.

ग. खाजगी असो वा सरकारी, तुम्ही मॅनेजमेंटसमोर आवाज उठवू शकत नाही.

घ. शेवटी मी तुमच्यावर केलेले सर्व आरोप तुम्ही अमान्य केलेतच! असो! हा विषय वाढवण्यात अर्थ नाही.

## ८ वाचन आणि आकलन

### श्रद्धा आणि अंधश्रद्धा



आकाशात कडाडणाऱ्या विजा आणि जंगलामध्ये अचानक पेटणाऱ्या वणव्यांच्या स्वरूपात दिसणाऱ्या अग्नीची हजारो वर्षांपूर्वी माणसाला भीती वाटायची. त्या भीतीमुळे तो अग्नीची पूजा करू लागला. परंतु कालांतराने अग्नी निर्माण करण्याचे, वापरण्याचे आणि त्याच्यावर नियंत्रण मिळवण्याचे कौशल्य आणि ज्ञान त्याने मिळवले. त्याची भीती गेली, पण तरीही तो अग्नीची एक देव म्हणून पूजा करतच राहिला. सर्व मार्गांनी विविध रूपांतील अग्नी माणसाने मिळवला.

कोळशाच्या प्रचंड खाणींमधून कोळसा, जंगले तोडून जळणासाठी लाकूड, ते संपत आल्यावर पृथ्वीच्या पोटातून खनिजतेल उपसून तेही वापरले. मग तो अणुऊर्जेच्या मागे लागला. अशा सर्व मार्गांनी अग्नीला, म्हणजेच ऊर्जेला, त्याने आपल्या हातचे बाहुले बनवले. त्यामुळे संपूर्ण सजीव सृष्टीला तापमानवाढ, प्रदूषण, ओझोनला पडलेली खिंडारे ह्या संकटांना तोंड द्यावे लागत आहे. आणि तरीही तंत्रज्ञानाच्या जोरावर आपण निसर्गावर विजय मिळवू शकतो, हा माणसाचा समज तसाच आहे. हीच वैज्ञानिक अंधश्रद्धा!

दुसरीकडे मात्र काही माणसे अजूनही त्याच प्राथमिक स्वरूपाच्या भावनेने पूजा, होमहवन ह्या कर्मकांडात गुंतलेली दिसतात. एकीकडे अग्नीचा अतिवापर, गैरवापर करायचा, हिंसक आणि विध्वंसक वापरही करायचा आणि दुसरीकडे अग्नीला देव मानून त्याची पूजाही करायची. ही धार्मिक अंधश्रद्धा! अग्नीचा ऊर्जा म्हणून आदर राखायचा असेल आणि त्याविषयी डोळस श्रद्धा बाळगायची असेल, तर अग्नीचा योग्य, आवश्यक तेवढाच वापर करून नैसर्गिक संसाधनांचे अतिशोषण थांबवले पाहिजे. तरच दोन्ही प्रकारच्या अंधश्रद्धांमुळे होणारे पृथ्वीचे नुकसान थांबेल.

**१. वरील उतारा वाचून खालील वाक्ये चूक की बरोबर ते लिहा.**

क. तंत्रज्ञानाच्या मर्यादा ओळखल्या नाहीत, तर त्याला वैज्ञानिक अंधश्रद्धा म्हणावे लागेल.

ख. धार्मिक अंधश्रद्धेमुळे समाज अज्ञानी राहतो.

ग. धार्मिक अंधश्रद्धेमुळे अग्नीविषयी आदर दाखवला जातो.

घ. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यात काही फरक नाही.

च. अज्ञानामुळे भीती आणि भीतीमुळे अंधश्रद्धा निर्माण होते.

छ. डोळस श्रद्धा जोपासणे शक्य नाही.

**२. कोणत्या गोष्टीविषयी तुमच्या मनात श्रद्धा आहे? ती श्रद्धा डोळस आहे असे तुम्हाला वाटते का? स्पष्टीकरण द्या.**

**३. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्य तयार करा.**

| | |
|---|---|
| उदा. तू डॉक्टरकडे जातोस का? | (ताप येणे) हो. जर मला ताप आला, तर मी डॉक्टरकडे जातो. |
| क. तू अभ्यास करतोस का? | (परीक्षा जवळ येणे) |
| ख. तू चहा पितोस का? | (झोप येणे) |
| ग. तू कॉलेजला दांडी मारतोस का? | (कंटाळा येणे) |
| घ. तू खोटं बोलतोस का? | (दुसरा उपाय नसणे) |
| उदा. तू शाळेत असताना खेळांमध्ये भाग घ्यायचास का? | (आवडीचा खेळ असणे) हो. माझ्या आवडीचा खेळ असला, तर मी भाग घ्यायचो. |
| च. तू शाळेत असताना नाटकात काम करायचास का? | (भूमिका आवडणे) |
| छ. तू शाळेत असताना खूप खोड्या करायचास का? | (अभ्यासाचा कंटाळा येणे) |
| ज. तू लहानपणी हट्ट करायचास का? | (माझे म्हणणे कोणी न ऐकणे) |
| झ. तू पूर्वी नेहमी योगासनं करायचास का? | (सकाळी लवकर जाग येणे) |
| उदा. तू मोठेपणी सैन्यात भरती होणार आहेस का? | (निवड होणे) हो. माझी निवड झाल्यास मी सैन्यात भरती होईन. |
| ट. तू मोठेपणी जगप्रवास करणार आहेस का? | (पुरेसे पैसे जमणे) |
| ठ. तू पुढच्या वर्षी मॅरेथॉनमध्ये भाग घेणार आहेस का? | (पुरेशी तयारी होणे) |
| ड. तू कायम अविवाहित राहणार आहेस का? | (मनासारखी मुलगी / मुलगा न मिळणे) |
| ढ. तू पुढे कधी आत्मचरित्र लिहिणार आहेस का? | (मोठे कर्तृत्व गाजवणे) |

## ९ काळ

**१. खालील गोष्टीमध्ये कंसातील योग्य शब्द निवडून रिकाम्या जागा भरा.**

(नुकताच, आजही, संध्याकाळी, वेळीअवेळी, पूर्वी, आदल्या दिवशीच, अलीकडे, दुसऱ्या दिवशी, आता)



सहा महिन्यांपूर्वी मोहितने अगदी अत्याधुनिक, अद्ययावत टॅब घेतला. अगदी सुटसुटीत, एका सुंदर छोट्याशा पाऊचमध्ये मावणारा. आता लॅपटॉपलाही सुट्टी आणि मोबाईलही खिशात ठेवायला नको. दोन्हींची सगळी कामं हा एकटाच करणार. आणि अजून एक खासियत होती त्याची. तो तोंडी दिलेल्या सूचना समजू शकत होता आणि त्याप्रमाणे झपाट्याने मोहितची कामे करत होता. कुठलीही कळ दाबायला नको की माऊस फिरवायला नको. मोहित तर काय, एकदम खूश! आदल्या दिवशीच तो आपल्या खास मैत्रिणीशी त्या टॅबवरूनच बोलला. तिनं घातलेला नवा टॉपही त्याने पाहिला आणि (क) ----------- भेटायचं ठरवून दोघांनीही एकमेकांना खास निरोप दिला. मग मोहितनं टॅबवर (ख) ---------- एक फिल्म पाहिली आणि तो उशिरा झोपायला गेला. नाही तरी तो हल्ली (ग) ----------- झोपायचा. (घ) ----------- हा नवीन टॅब घेतल्यापासून त्याला त्याच्याशी खेळायचा जणू छंदच लागला होता.

(च) ----------- मोहित अर्थातच उशिरा उठला. आज त्याला तिला भेटायला जायचं होतं, त्यामुळे तो खुशीत होता. (छ) ----------- अंघोळ करून आरशासमोर उभा राहून तो तयार होतच होता, तर त्याच्या कानावर शब्द आले, "अरे, तिला यायला वेळ आहे अजून. तू खूपच लवकर आवरून तयार झालायस."

मोहित दचकला. "कोण बोललं हे?"

टॅबमधून आवाज आला, "अरे मीच".

"तू बोलतोयस? कसं काय?"

मोहित अवाक होऊन पाहत असतानाच टॅब म्हणाला, "कसं म्हणजे? ऐकू लागलो, मग बोलूही लागलो. (ज) ----------- तुम्ही मला कान दिला त्यामुळे ऐकू येऊ लागलं आणि म्हणूनच (झ) ----------- बोलायला शिकलो."

"अरे, पण मराठी? कसं काय?" मोहितनं विचारलं.

"तुझ्याकडूनच. संवादात्मक पद्धतीनं. रोज तर तू सायलीशी तासन्-तास गप्पा मारत असतोस. मग काय अवघड आहे?"

"पण सायलीबद्दल तू कसं सांगतोयस?"

"अरे, (ट) ---------- म्हणालो ना, मला कान आहे म्हणून! तिच्याही टॅबला कान आहेच

ना! ती आत्ता गाडी चालवतेय. गेली होती खरेदीला आणि गर्दीत अडकलीय.”

मोहित सुन्न झाला. म्हणजे ह्या टॅबपासून काहीच लपून राहणार नाही आपल्याबद्दल? बाप रे! तंत्रज्ञानाचं भूत पाहिल्यासारखा त्याचा चेहरा दिसत होता.

**२. कंसातील शब्दांच्या ऐवजी चौकटीतील योग्य शब्द वापरून खालील उतारा पूर्ण करा.**

| |
|---|
| यंदा, पूर्वी, नुकताच (२), आदल्या दिवशी, दुसऱ्या दिवशी, अलीकडे, वेळीअवेळी |

आज ७ फेब्रुवारी. सहा वाजता तो उठला. ७ वाजता त्यानं व्यायाम केला. त्याआधी (साडेसहाला) नुकताच तो चहा प्यायला होता. ९ वाजता त्याला ऑफिसला जायचं होतं. पण (क) (७ ते ८) ---------- व्यायाम केल्यामुळे तो जरा दमला होता. शिवाय (ख) (६ तारखेला) ---------- जागरणही झालं होतं. (ग) (डिसेंबर महिन्यात) --------- त्यानं जे काम करून त्याच्या लॅपटॉपमध्ये ठेवलं होतं, ते तो शोधत होता. (घ) (आजकाल) ---------- तो अनेक गोष्टी विसरायचा. ते आठवताना (च) (मध्येच) --------- त्याला जाग यायची. मग तो (छ) (उद्या) --------- आपलं कसं होणार, वरिष्ठांना कसं तोंड दाखवायचं ह्याची काळजी करत बसायचा. शिवाय (ज) (त्या वर्षी) ---------- त्याला बढती मिळणार होती.

## १० शब्दयोगी पदे (साठी / करता)

**१. ‘साठी’ किंवा ‘करता’ ही शब्दयोगी पदे वापरून रिकाम्या जागा भरा.**

पिशी मावशी आणि तिची भुतावळ

प्रत्येक सणाला आपण जसं (घरातले) घरातल्यांसाठी काही ना काही आणतो, तसं आम्ही (क) (घर) ------------- सुद्धा काहीतरी खरेदी करतो. (ख) (आम्ही) ------------- कपडे खरेदी झाली की (ग) (घर) ------------- पडद्यांची खरेदी होतेच. (घ) (मुले) --------------------- खेळणी आणली की आम्ही (च) (सजावट) --------------- एखादी वस्तू आणतो. दिवाळीच्या आधी घराच्या (छ) (स्वच्छता) --------------- आम्ही सगळे वेळ काढतो. घराच्या (ज) (वाढदिवस) ------------- आम्ही सगळे काही ना काही करतो. (झ) (तोरण) --------------- झेंडूची फुलं आणि आंब्याची पानं आणून शमिका तोरण तयार करते. तिच्या (ट) (मदत) --------------- छोटी देविका धावतपळत येते. (ठ) (अमोल) -------------- आणलेला नवा शर्ट तो ह्या दिवशी घालतो. पण (ड) (घर) -------------- काही गोडधोड केलं तरी ते मात्र घर काही खाऊ शकत नाही. पण त्या निमित्तानं आम्ही सगळे एकत्र येतो, मस्त खातो, पितो, गप्पा मारतो आणि दिवस आनंदात घालवतो.

(ढ) (आपण) ---------------- घर असतं आणि (ण) (घर) ---------------- आपण. सगळ्यांच्या (त) (आनंद) ---------------------- घरालाही कुटुंबाचा एक सदस्य समजून सगळ्यांनी (थ) (घर) ---------------- वेळ देणं, ही कल्पनाच फार सुंदर आहे.

**२. क. श्रुतलेखन : कशासाठी?**

मला ना, कधी कधी (क) ---------- खूप राग येतो. ज्या गोष्टी करू नकोस असं स्वतःला सांगितलेलं असतं, नेमक्या (ख) ---------- गोष्टी मी करत राहते. आता बघा ना, लोकांना (ग) ---------- सल्ले देण्याची माझी सवय (घ) ---------- मोडली पाहिजे असं मी ठरवलं होतं. तरी मी मित्रांना सल्ले (च) ---------- असते. का देते मी सल्ले? बरं, मित्रसुद्धा शेवटी त्यांना जे करायचंय, (छ) ---------- करतात. ज्या केल्यानं माझा (ज) ---------- त्रास होत राहतो, अशा (झ) ---------- गोष्टी मी करते. मग कशासाठी करते मी हे सगळं?

**ख. खालीलप्रमाणे संवाद लिहा.**

उदा. (मित्रांना सल्ला देणे / त्यांना मदत करणे)

विजय : कशासाठी / कशाकरता देतेस मित्रांना सल्ले?

विद्या : त्यांना मदत करण्यासाठी / करण्याकरता.

१. (रात्री जागणे / परीक्षेत चांगले गुण मिळणे)
२. (मुलांना नियम पाळायला लावणे / त्यांना चांगले वळण लावणे)
३. (कामावर पाट्या टाकणे / लवकर घरी जाणे)
४. (स्वयंपाक शिकणे / नवऱ्याला मदत करणे)
५. (खूप खरेदी करणे / एकटेपणा घालवणे)
६. (सुसाट वेगाने गाडी चालवणे / थरार अनुभवणे)
७. (खूप चॉकलेटस् खाणे/ नैराश्य दूर करणे)
८. (सारखा चहा पिणे / झोप न येणे)

## ११ नाम + क्रियापद

**खालील वाक्यांमध्ये नाम + क्रियापदाच्या योग्य जोडीचा पर्याय निवडा. वाक्याच्या काळानुसार, लिंग-वचनानुसार क्रियापदाचे योग्य रूप वापरा.**

**१. घरात खूप कामे होती, पण दोन तासांतच मी कामांचा --------------------.**

क. मागोवा घेणे

ख. पाया रचणे

ग. फडशा पाडणे

**२. आल्या आल्या दिवसभरात काय घडले आहे त्याचा मी -------------------- आणि पुढच्या कामाला लागले.**

क. संबंध जोडणे

ख. आढावा घेणे

ग. खपवून घेणे

**३. पाहुण्यांनी सभागृहात एकच -------------------- आणि सगळीकडे शांतता पसरली.**

क. नियंत्रण मिळवणे

ख. दृष्टिक्षेप टाकणे

ग. लक्ष वेधणे

**४. सीमेजवळ राहणाऱ्या लोकांना अनेकवेळा संकटांशी -------------------- लागतो.**

क. सामना करणे

ख. संबंध जोडणे

ग. विश्वास ठेवणे

**५. नवे शिक्षक सगळ्या मुलांना आवडले कारण ते मुलांच्या सर्व शंकांचे ----------------.**

क. नियंत्रण मिळवणे

ख. निरसन करणे

ग. खपवून घेणे

**६. "हे वाईट, तेच चांगलं अशा समजुतींना -------------------- तर तुझी प्रगती कशी होईल?".**

क. कवटाळून बसणे

ख. लक्ष वेधणे

ग. सिद्धांत मांडणे

८

# सणवार








## चला, शिकू या...

- विविध सण : नववर्ष, सणांची पक्वान्ने
- स्वयंपाकाशी संबंधित क्रियापदे, प्रश्नशब्द : कशाशी?
- रीती काळ (उजळणी)
- धातुसाधित भाववाचक नामे
- जोडीने येणारी नामे : चिडचिड, बडबड, हुरहुर इ.
- शब्दयोगी पदे : समक्ष, विरुद्ध, उलट, सह
- स्थलवाचक क्रियाविशेषणे : आतून, बाहेरून, वरून, खालून इ.
- आज्ञार्थी रूपे : मनावर घे, लाजू नकोस इ.
- समूहवाचक नामे
- चित्रकथा

## १ सण

१. **खाली एक शब्दखेळ आहे. तो एका वेळी चार किंवा पाच जणांनी खेळायचा आहे. एक फासा आणि चार किंवा पाच सोंगट्या घ्यावेत. ज्याचे प्रथम १ हे दान पडेल, त्याने सुरुवात करावी. जितके दान पडेल तितकी घरे पुढे जावे. ज्या घरात तुम्ही पोहचाल तिथे जर -**

- सणाचे नाव असेल, तर तो सण कशा रीतीने साजरा करतात, त्यातील एक रीत सांगावी. उदा० दिवाळी – आकाशकंदील, पणत्या लावून घर सजवणे



- क्रियापद आले, तर ते कोणत्या पदार्थाशी संबंधित आहे, तो पदार्थ सांगावा. त्या नामाचे लिंग व अनेकवचनी रूपही सांगावे. उदा० थापणे – भाकरी. ती भाकरी – त्या भाकऱ्या - थापणे.



- पदार्थाचे नाव आले, तर त्या पदार्थाशी संबंधित स्वयंपाकातील एक क्रिया सांगावी. उदा० पोळी – लाटणे.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ → कापणे | २ → करंजी | ३ → गुढीपाडवा | ४ → | ५ → ईद | ६ → भाजी |
| १२ ← | ११ ← | १० ← दिवाळी | ९ ← | ८ ← कुटणे | ७ ← |
| १३ → ख्रिसमस | १४ → | १५ → चिरणे | १६ → | १७ → | १८ → पुरणपोळी |
| २४ ← कालवणे | २३ ← | २२ ← चकली | २१ ← | २० ← भाजणे | १९ ← |
| २५ → होळी | २६ → श्रीखंड | २७ → | २८ → संक्रांत | २९ → | ३० → मोदक |
| ३६ ← वडा | ३५ ← | ३४ ← परतणे | ३३ ← | ३२ ← गणेशोत्सव | ३१ ← |

**२. खाली खाद्यपदार्थांची एक यादी दिली आहे. ते पदार्थ कोणत्या सणांना करतात ते शोधा आणि तक्ता पूर्ण करा. एकापेक्षा जास्त नावेही असू शकतील.**

(पोर्क विंदालू, श्रीखंड, बासुंदी, नारळीभात, करंज्या, मटण दालचा, पाकातल्या पुऱ्या, गुळाच्या पोळ्या, बिर्याणी, खोबऱ्याच्या वड्या, मांगशो, खीर, शिरखुर्मा, माशांचे पदार्थ, पुरणाच्या पोळ्या, आम्रखंड, मोदक, केक, लाडू, तिळाच्या वड्या, हलवा, शेव, चकली, माछेर झोल)

| सणाचे नाव | त्या सणाला केले जाणारे खास पदार्थ |
|---|---|
| उदा. मकरसंक्रांत | तिळाच्या वड्या, हलवा |
| क. ईद | |
| ख. दिवाळी | |
| ग. ख्रिसमस | |
| घ. नवरोज | |
| च. दसरा | |
| छ. होळी | |
| ज. नारळी पौर्णिमा | |
| झ. रंगपंचमी | |
| ट. गणेशचतुर्थी | |
| ठ. दुर्गा पूजा | |
| ड. रोंगाली बिहू | |

## २ स्वयंपाक



**१. खालील पदार्थांपुढे योग्य क्रियापद लिहा.**

| उदा. थालीपीठ | थापणे |
|---|---|
| क. पोळी | |
| ख. नारळ | |
| ग. कोथिंबीर | |
| घ. कांदा आणि कोथिंबीर | |
| च. शेंगदाणे | |
| छ. मिरची | |
| ज. लिंबू | |
| झ. पोहे | |
| ट. पापड | |
| ठ. मटण | |
| ड. मासे | |

**२. खाद्यपदार्थांची चव व्यक्त करणारे शब्द ओळखा.**

उदा. टकचदार – चटकदार

| | | | |
|---|---|---|---|
| क. ष्टचवि | ख. कररुच | ग. टखार | घ. मंगख |
| च. तजळजळी | छ. झणणीतझ | ज. अणीळ | झ. सालेमदार |
| ट. मिळीतमिळ | ठ. खुतखुशीस | ड. डगो | ढ. खतिट |

**३. खालील पदार्थ कसे असतात ते लिहा.**

उदा. मिसळ : तिखट

क. श्रीखंड : ______________ ख. थालीपीठ : ______________

ग. चकली : ______________ घ. कोल्हापुरी तांबडा रस्सा : ______________

च. आमरस : ______________ छ. भेळ : ______________

ज. लसूण चटणी : ______________

## ३ अक्षरांची गंमत

**१. एक गमतीशीर उतारा ऐका. काही कळतंय का?**

**क. कोणते शब्द कळले? ओळखीचे वाटलेले शब्द लिहून काढा.**

______________________________________________

______________________________________________

**ख. तुम्ही ऐकलेला उतारा 'च' च्या भाषेमध्ये लिहिला आहे. आता तो मोठ्याने वाचा.**

चलाम चकए चप्नस्व चलंडप. चमी चटीकए चलेलचा चतेहो. चणिआ चकए चतमगं चलीझा. चनडूकति चलाआ चलईबामो, चनडूकति चलाआ चपटॉपलॅ. चनरूमोस चलाआ चटबोरो. चटमोरि चताहो चडेकझ्यामा.

**ग. शब्दाचे पहिले अक्षर 'च' च्या बाराखडीतले आहे, ते काढल्यावर मूळ शब्द काय आहे ह्याची कल्पना येईल. हा उतारा योग्य प्रकारे पुन्हा लिहा.**

उदा. मला एक स्वप्न पडलं. ______________________________

______________________________________________

______________________________________________

______________________________________________

**२. श की ष?**

**खालील वाक्यांतील चुकीच्या शब्दांवर काट मारा.**

उदा. चला! वर्षाची / ~~वर्शाची~~ सुरुवात तर छान झाली. नव्या चित्रपटाचा विषय / ~~विशय~~ पक्का झाला. आता ~~पैषाची~~ / पैशाची सोय झाली की कामाला सुरुवात करता येईल.

क. सुशमा / सुषमा शाल / षाल घरीच विसरून आली होती. थंडीमुळे तिचे दात अक्षरशः / अक्षरष: वाजत होते. "ओ ताई! पुणे-नाशिक / नाषिक गाडी लागायला अजून अवकाश / अवकाष आहे. तोवर तिकडं उन्हात उभ्या ऱ्हावा जराषा / जराशा," तो कर्मचारी म्हणाला.

ख. रात्रीची वेळ. रस्त्यात अगदी षुकषुकाट / शुकशुकाट होता. जानकीला वाटले, सोबतीला कुणी तरी पुरुशमाणूस / पुरुषमाणूस हवा होता. इतक्यात दुरून बसचा आवाज आला. जानकीने पिशवी / पिषवी खांद्यावर घेतली आणि दुसऱ्या हाताने पोरीला उचलले. बस समोर येऊन थांबली. जानकीने पायरीवर पाय ठेवला, तोच रडक्या आवाजात पोरगी किरकिरली, "आई गं, षूऽऽ / शूऽऽ!"

ग. "बातमीच्या डोक्यावर जाड अक्षरात छापतात त्याला काय म्हणतात?"
"शीर्षक / शीर्शक किंवा मथळा", सागर उत्साहाने म्हणाला.
"षाबास / शाबास!" बाई कौतुकाने म्हणाल्या.

घ. आदित्यला एखादी परकी भाशा / भाषा शिकायची / षिकायची आहे. पुढे दुभाषा / दुभाशा म्हणून काम करण्याची संधी त्याला मिळू शकेल / षकेल.

च. षिल्प / शिल्प घडवण्यासाठी जो पाशाण / पाषाण लागतो, तो ह्या प्रदेशात / प्रदेषात विपुल आहे. अजून तरी हवेच्या प्रदूषणाने / प्रदूशणाने इकडे प्रवेश / प्रवेष केलेला नाही आहे.

छ. अमेयने एकाच षटकात / शटकात दोन गडी बाद केले आणि नंतरच्या डावात अर्धशतक / अर्धषतक ठोकले.

## ४ क्रियापद नामे

**१. खालील क्रियापदांपासून कोणती नामे होतील ती लिहा.**

| उदा. दमणे | ते दमणे / दमणं | ती दमणूक |
|---|---|---|
| क. चिडणे | | |
| ख. रुसणे | | |
| ग. धावणे | | |
| घ. शिवणे | | |
| च. पकडणे | | |
| छ. झोपणे | | |
| ज. हसणे | | |
| झ. चढणे | | |

| | | |
|---|---|---|
| ट. उतरणे | | |
| ठ. मारणे | | |

**२. खालील वाक्यांतील क्रियापदांची नामे वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

उदा० एव्हरेस्ट एकदा तरी **चढायचं,** असं पहायची ती स्वप्न.
एव्हरेस्टवर एकदा तरी चढाई करण्याचं तिचं स्वप्न होतं.

क. व्याख्यान चालू असताना अचानक पाऊस आल्यामुळे सगळे **पळाले.** = व्याख्यान चालू असताना अचानक पाऊस आल्यामुळे सगळ्यांची ------------ झाली.

ख. आई दिसताच ती आईकडे **धावली.** = आई दिसताच तिने आईकडे ------------ घेतली.

ग. पाच मजले चढून जाईपर्यंत आजी **दमली.** = पाच मजले चढून जाईपर्यंत आजीला ------------ लागला.

घ. अंधार पडला तरी मुले **खेळतच** होती. = अंधार पडला तरी मुलांचा ------------ चालूच होता.

च. अरे मुलांनो, **भांडू** नका. = अरे मुलांनो, ------------ करू नका.

छ. तू **जेवलास** का? = तुझं ------------ झालं का?

ज. ऑफिसमध्ये आल्यावर तो मला भेटला. = ऑफिसमध्ये आल्यावर त्याने माझी ------------ घेतली.

झ. ती सकाळी फिरायला जाते. = सकाळचं ------------ ती कधी चुकवत नाही.

ट. तो गोड बोलला तरी मी फसणार नाही. = तो गोड बोलला तरी माझी ———— होणार नाही.

ठ. माझ्यासमोरच तो घसरून पडल्यामुळे मी हसले. = माझ्यासमोरच तो घसरून पडल्यामुळे मला ------------ आले.

## ५ शब्दयोगी पदे आणि क्रियाविशेषणे

**१. 'विरुद्ध, उलट, समक्ष' ह्यांपैकी योग्य शब्द वापरून वाक्ये पूर्ण करा.**

क. ------------- दिशेला गेल्यामुळे तो रस्ता चुकला.

ख. मला काय विचारतोस? ------------- तूच मला ह्यावर उपाय सांग.

ग. मला राग नाही आला, ------------- त्याचं स्पष्ट बोलणं मला आवडलं.

घ. ------------- भेटून बोलल्यामुळे गैरसमज टाळता येतात.

च. त्यांना ------------- उत्तर देण्याचे धाडसच कसे करतेस तू?

छ. भूक कुठली, ------------- मला तर तहान लागलीये.

ज. त्याच्या ------------- बोलण्याने त्याच्यावर सगळेच नाराज झाले.

**२. 'विरुद्ध, समक्ष, सह' ह्यांपैकी योग्य ते शब्दयोगी पद वापरून वाक्ये पूर्ण करा.**

क. हजारो लोकां------------ त्यांनी पुन्हा तारेवर चालण्याचा तो प्रयोग करून दाखवला.

ख. याल तर तुमच्या------------, नाहीतर तुमच्याशिवाय!

ग. देशा------------ कारस्थान करणारे लवकरच तुरुंगात जातील.

घ. मित्रमंडळीं------------ सण साजरा करायला मजा येते.

च. भारताने इंग्लंड------------ सामना जिंकल्यामुळे आमच्या पैजेचा निकाल आमच्या बाजूने लागला.

छ. सर्व कुटुंबीयां------------ लग्नाला या.

## ६ खालून, वरून, मागून, पुढून...

**१. खालील चित्र पाहा आणि 'खालून, वरून, पुढे, मागे,' इत्यादी शब्द वापरून चित्राचे वर्णन लिहा.**



**२. उदाहरणात दिल्याप्रमाणे कंसातील शब्द योग्य त्या जागी घालून उतारा पूर्ण करा.**

(खालची, शेजारून, खालून, वर, वरच्या, शेजारी, वरून, खाली, मधल्या, समोर, मध्ये, मागच्या, मागे, वरच्या, आत, खाली, समोर, मागे, खालच्या, समोरून)





गावकडचा आमचा वाडा आम्हा सर्वांचाच आवडता आहे. आधीच आमचं गाव इतकं सुंदर, त्यात हा मोठा चौसोपी वाडा. गावात शिरताच आधी लागते खालची आळी. आमचं घर आहे (क) ---------------- आळीत. गाव डोंगरात वसलंय, त्यामुळे तुम्हाला गावात सगळीकडे (ख) ---------------- (ग) ---------------- आणि (घ) ----------------

(च) -------------- असं चढावं-उतरावं लागतंच. आमच्या आळीत शिरलात, की आधी (छ) ----------- दिसतं महादेवाचं मंदिर. त्याच्या (ज) --------------- उजवीकडे गेलात, की लगेच आहे आमचा वाडा. वाड्याच्या (झ) --------------- एक मोठं वडाचं झाड आहे. आता वाड्याच्या दिंडीदरवाजातून (ट) --------------- डोकावून बघा. (ठ) --------------- आहे मोठा चौक. त्याच्या चारही बाजूंनी दोन मजली वाडा. (ड) --------------- मजल्यावर सर्वांच्या झोपायच्या खोल्या. (ढ) --------------- दिसतेय ती ओसरी. त्याच्या (त) --------------- माजघर आणि अगदी (थ) --------------- स्वयंपाकघर. (द) --------------- मजल्यावरच्या इतर सर्व खोल्या वेगवेगळ्या कारणांसाठी वापरतात. (ध) घरा--------------- जाणाऱ्या ह्या रस्त्यावर अगदी कमी वर्दळ असते. आमच्या काकांचं घर (न) -------------- आळीत आहे. आमच्या (प) घरा--------------- बागेतून तिथे जाता येतं.

## ७ आज्ञार्थी रूपे

**१. रोजच्या जीवनात कसे वागावे ह्याबद्दल दिलेले काही सल्ले वाचा.**

बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको
संसारामधि ऐस आपला उगाच भटकत फिरू नको
चल सालसपण धरुनि निखालस खोट्या बोला बोलू नको
अंगि नम्रता सदा असावी राग कुणावर धरू नको (...)
मायबापांवर रुसू नको, दूर एकला बसू नको,
व्यवहारामधी फसू नको, कधी रिकामा असू नको.

**शब्दार्थ :**

बिकट = अवघड
वहिवाट = रूढ, नेहमी वापरात असलेली वाट
धोपट मार्ग = सरळ सोपी वाट, रूढ मार्ग
सालसपण = सज्जनपणा
निखालस = धडधडीत, उघडउघड, स्पष्टपणे

**२. आता हे सल्ले गद्य रूपात लिहा.**

उदा॰ बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको

अवघड, न रुळलेल्या वाटेवरून जाऊ नकोस; सरळ, सोपी वाट सोडू नकोस!

क. ---------------------------------------------------------------

ख. ---------------------------------------------------------------

ग. ---------------------------------------------------------------

घ. ---------------------------------------------------------------

च. ---------------------------------------------------------------

**३. काय कर आणि काय करू नकोस असे काही सल्ले तुम्ही लिहा.**

## ८ समूहवाचक नामे

**१. योग्य ती समूहवाचक नामे घालून खालील ओळी पूर्ण करा.**

वरती ठेवली (क) लाकडाची ------------, शेजारून चालली चोरांची टोळी

मागे आहे (ख) गायींचा ------------, कपाटात ठेवली (ग) पुस्तकांची ------------

इकडून आली (घ) वारकऱ्यांची ------------, त्यांच्यामागे (च) गव्यांच्या ------------

खाली ठेवले (छ) फुलांचे ------------, त्यामधली फुले फारच स्वच्छ

वरती टांगला (ज) केळ्यांचा ------------, तो आहे वजनाला फारच जड

**२. आता पुढे दिलेल्या समूहवाचक नामांचा वापर करून तुम्ही एखादी छोटी कविता करा.**

किल्ल्यांचा जुडगा, केळ्यांचे घड, पुस्तकांची थप्पी, धान्याची रास, पक्ष्यांचे थवे

## ९ कथा

**१. खाली एका गोष्टीची रूपरेषा दिली आहे. त्यावरून गोष्ट लिहा. गोष्टीचा शेवट काय करायचा ते एका कोड्यात सांगितले आहे. त्याप्रमाणे शेवट लिहा.**

कोल्हापूर – रितेश आणि रेवती – नवरा बायको – दोघेही पक्के खादाड आणि आळशी – लट्ठमुट्ठ – फक्त खाणे हाच एक छंद – लोकांनी चेष्टा, टिंगल करणे – वजन कमी करायचं ठरवणे – व्यायाम – चालणे – कंटाळा – चमचमीत खायची इच्छा होणे – काय करायचं ह्यावरून भांडण – कांद्याची भजी – ५१ भजी होणे – मोजून २५-२५ खाणे – उरलेलं एक भजं कुणी खायचं? – पैज – जो जिंकेल त्याला ते भजं मिळणार – कोणीही न हरणे – घरी येतात तर भजं नाहीसं होणे – दोघांची चिडचिड – शोधणे – आणि चोर सापडणे.

- **चोर कोण?**

**२. खाली दिलेले एका बोधकथेचे रूपांतर वाचा.**

**कोल्हा आणि द्राक्षे**

एक होता कोल्हा. रोज सकाळी उठून सिंहमहाराजांकडे चाकरीला जात असे. एकदा त्याला एका वेलाला लागलेले टपोरे मणी दिसले. त्याला ते एकदम खावेसे वाटले. पण तो होता आज्ञाधारक. आईला विचारल्याशिवाय काहीही करीत नसे. घरी आल्यावर तो आईला म्हणाला, “आई, आई, मी आज एका वेलाला टपोरे मणी लागलेले पाहिले. मी खाऊ का ते?”

आई म्हणाली, “नको रे! त्याला द्राक्षे म्हणतात आणि ती आंबट असतात. नकोच खाऊस!”

कोल्हा निराश झाला. पण जाता-येता त्याला ते द्राक्षाचे घोस दिसत आणि रोज ते वाढलेले दिसत. एके दिवशी ते घोस फारच छान असे तांबूस दिसू लागले. कोल्ह्याने मनाचा हिय्या केला आणि जोरात एक उडी मारली. घोसांना जीभ लागली आणि आणखीनच चाळवली गेली. पण घोस काही तोंडात येईना.

मग त्याने आपला मित्र गाढव ह्याला बोलावले. त्याच्या पाठीवर उभे राहून उडी मारली आणि द्राक्षाचा घोस खाऊन टाकला. तो अत्यंत गोड होता. कोल्ह्याच्या लक्षात आले, की आपले आई-वडील आपल्याशी खोटे बोलले. आनंद आणि संताप अशा एकत्र भरात तो कुई कुई असे ओरडू लागला. ते ऐकून बागेचा मालक आला. त्याने पळून जाणाऱ्या कोल्ह्याला पाहिलेच नाही, पण उभे असणाऱ्या गाढवाला बेदम चोप दिला. (...)

**क. वरील बोधकथेची तात्पर्ये लिहा.**

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

**ख. आता वरील कथेची लेखकाने दिलेली तात्पर्ये वाचा. तुम्हाला ही तात्पर्ये बरोबर वाटतात का? त्यावर चर्चा करा.**

(...)

**तात्पर्य क्र. १ :** आपल्याला आंबट वाटलेली द्राक्षे आपल्या मुलांना गोड लागू शकतात. (कारण मध्यंतरी बराच वेळ गेलेला असतो.)

**तात्पर्य क्र. २ :** मित्राला मदत करताना आपल्याला चोप बसू शकतो.

**तात्पर्य क्र. ३ :** आपली मुले आपल्यापेक्षा येनकेन प्रकारेण उंच उडी मारू शकतात.

**ग. आता ह्याच गोष्टीचे लेखकाने केलेले अजून एक रूपांतर वाचा आणि तात्पर्ये लिहा.**

**कोल्हा आणि द्राक्षे**

एक होता कोल्हा. त्याला दिसली द्राक्षे. त्याला ऐतिहासिक जाणीव असल्याने त्याच्या खापरपणजोबांपासून चालत आलेली 'कोल्ह्याला द्राक्षे आंबट' ही गोष्ट त्याला माहीत होती. त्याने त्या द्राक्षांना उद्देशून स्वगत चालू केले, "धिक्कार असो तुमचा! आमच्या सात पिढ्यांतील एकालाही एक साधे द्राक्षदेखील चाखायला मिळू नये ना! अशाने तुमचे गुणवर्णन कोण करील?" इ.

मळ्याच्या मालकाला फक्त कुईकुई आवाज आला. त्याने लपतछपत येऊन त्याला बेदम चोप दिला.

(...)

- डॉ. राजीव शारंगपाणी

तात्पर्ये : ------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

घ. आता लेखकाने सांगितलेली तात्पर्ये वाचा. वरील रूपांतरासाठी तुम्हाला ती बरोबर वाटतात का?

(...)

**तात्पर्य क्र. १ :** इतिहासामुळे वर्तमानाला मार बसू शकतो.

**तात्पर्य क्र. २ :** भलत्या वेळी इतिहास आठवल्याने वर्तमानाचे भान सुटते आणि बेदम मार बसतो.

**तात्पर्य क्र. ३ :** कोणी नाही असे समजून मोठ्याने बोलू नये. घात होतो.

च. आता काही नवीन तात्पर्ये वाचा आणि त्यांनुसार वरील गोष्ट बदलून पुन्हा लिहा.

(...)

**तात्पर्य क्र. १ :** द्राक्षे दिसली म्हणजे उड्या मारल्याच पाहिजेत असे नाही.

**तात्पर्य क्र. २ :** काही कोल्हे द्राक्षे खात नाहीत.

**तात्पर्य क्र. ३ :** आपली मुले आपल्यापेक्षा येनकेन प्रकारेण उंच उडी मारू शकतात.

**कोल्हा आणि द्राक्षे**

एक होता कोल्हा. एकदा त्याला द्राक्षे दिसली. पण...

**कोल्हा आणि द्राक्षे**

एक होता कोल्हा. एकदा त्याला द्राक्षे दिसली. पण तो त्यांच्याकडे न पाहता निघून गेला.

- डॉ. राजीव शारंगपाणी

## १० नाम + क्रियापद

**१. पाठ्यपुस्तकातील नाम + क्रियापदाच्या तक्त्यातील कोणत्याही पाच जोड्या निवडा आणि त्यांचा वाक्यात उपयोग करा.**

**२. चुकीच्या शब्दावर काट मारा.**

क. घेणे : मनावर, ताबा, हृदय, सामील करून, विराम

ख. उडवणे : पंख, पैसे, विमान, फटाके

ग. करणे : मिठी, जाहीर, सांत्वन, राग, गवगवा, शहानिशा, परीक्षा

**३. भासणे, मारणे, ओढणे, टाकणे ह्या क्रियापदांबरोबर कोणती नामे आली आहेत त्या जोड्या लिहा.**

## ११ रीती काळ (उजळणी)

**१. गाळलेल्या जागी क्रियापदांची रीती भविष्यकाळाची रूपे भरून वाक्ये पूर्ण करा.**

उदा. लता मंगेशकरांचे गाणे असेच आनंद (देणे) देत राहील.

क. माळढोक पक्ष्याला संरक्षण मिळाल्याने त्यांची संख्या (वाढणे) वाढत जाईल.

ख. आत्ता झाड लावलंस तर भविष्यात नियमित फळं (मिळणे) ----------- -------------.

ग. ह्या सोशल मीडियाच्या आहारी जाऊन बरीच माणसं भविष्यात हळूहळू एकटी (पडणे) ---------- -------------.

घ. आता लवकरच मला नोकरी लागेल. मग नियमित पैसे (मिळणे) ----------- -----------.

च. मला शिकव स्वयंपाक करायला. मी तिकडे गेल्यावर नेहमी स्वयंपाक (करणे) ----------- ----------- .

छ. पृथ्वीवर कितीही संकटे आली तरी ती नेमाने सूर्याभोवती (फिरणे) ---------- ----------.

ज. चिनूच्या शाळेला सुट्टी लागणार. सुट्टीत तो सारखा दंगा (करणे) ---------- ----------.

झ. बाबा रिटायर झालेत. आता ते दिवसभर टीव्ही (बघणे) ----------- -----------.

ट. गोविंदकाका परवा देवाघरी गेले. आपल्याला त्यांची नेहमीच आठवण (येणे) ----------- -----------.

ठ. तू मला साड्या आण, मी ह्यापुढे कधीकधी साड्या (नेसणे) ----------- -----------.

ड. त्यांनी दिलेली पुस्तके मी रोज (वाचणे) ----------- -----------.

**२. पुढील वाक्ये रीती भूतकाळात लिहा.**

उदा॰ वाहत्या नदीमध्ये पोहायला खूप मजा येते.

वाहत्या नदीमध्ये पोहायला खूप मजा येत असे / यायची.

क. राहणीमान जितके साधे तितके जीवन सोपे असते.

---

ख. शिक्षक वर्गात आले, की आम्ही उभे राहून त्यांना नमस्ते म्हणतो.

---

ग. तो रोज ठरावीक वेळी सूर्यनमस्कार घालत असतो.

---

घ. आजीच्या बटव्यात नेहमी काहीतरी खाऊ असतोच.

---

च. तू चपला इथे काढून ठेवतोस का?

---

छ. हो, तुम्हाला ओळखतो आम्ही. तुम्ही नेहमी इथे कामासाठी येता.

---

ज. आम्ही मकरसंक्रांतीला पतंग उडवतो आणि रंगपंचमीला रंग खेळतो.

---

झ. आपण लहानपणी मोठं होण्याचं स्वप्न बघतो.

---

ट. मला खूप चालायला आवडतं.

---

ठ. ती सतत गाण्याचा सराव करते.

---

ड. वारा वाहतो तेव्हा झाडाची पाने सळसळतात.

---

# तोंडी परीक्षा

एकूण गुण १५

## १ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)

**१. खालील उतारा मोठ्याने वाचून दाखवा.** **(३)**

हजारो वर्षांपूर्वीची गोष्ट. त्या वेळी पृथ्वीवर आदिमानव राहत होते. ते कळपाने राहत असत. दगडांच्या हत्यारांनी प्राण्यांची, पक्ष्यांची शिकार करून कच्चेच मांस खात. खूप थंडी पडली तर गारठून जात. अंधार पडल्यानंतर त्यांना कुठेही जाता येत नसे. ह्या सगळ्याचे कारण एकच, ते म्हणजे त्यांच्याकडे अग्नी नव्हता. आकाशात विजा चमकत. एखादी वीज झाडांवर पडून झाड पेट घेई. तोच काय तो अग्नी आदिमानवाला त्या काळी माहीत होता. पण तो पेटवायचा कसा, हे मात्र त्याला माहीत नव्हते. कालांतराने कधी तरी दगडांची हत्यारे बनवताना त्याने एकावर एक घासलेल्या दगडांमुळे ठिणग्या उडाल्या आणि अग्नीचा शोध लागला. इतक्या कष्टाने शोधलेल्या अग्नीचे महत्त्व आजही तितकेच आहे, पण ते आपल्या लक्षात येत नाही. कारण आपल्याला अग्नी निर्माण करण्यासाठी कष्ट करावे लागत नाहीत. अन्न शिजवण्यासाठी, थंडीपासून बचाव करण्यासाठी आणि अंधारात प्रकाश मिळवण्यासाठी अग्नीचा उपयोग आदिमानवाने केला तसा आपणही करतो. शिवाय अग्नीचे इतरही अनेक उपयोग आहेत. ह्या नैसर्गिक घटकाचा विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे.

**२. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.** **(२)**

क. आदिमानवाला अग्नीचा शोध कसा लागला?

ख. उताऱ्यात दिलेल्या उपयोगांव्यतिरिक्त अग्नीचे कोणतेही इतर दोन उपयोग सांगा.

## २ चित्रवर्णन (एकूण ५ गुण)

**खालीलपैकी कोणत्याही एका चित्राचे वर्णन करा. आवश्यक वाटल्यास आपल्या कल्पना वापरा.**







३ संवाद साधा. (एकूण ५ गुण)

**१. पुढे दोन विषय दिले आहेत. त्यांपैकी कोणत्याही एका विषयावर दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे भाषण तयार करा.**

क. तुम्हाला एका शाळेत विद्यार्थ्यांना 'रोजच्या जीवनात विज्ञानाचा उपयोग' ह्या विषयावर व्याख्यान द्यायचे आहे.

ख. तुम्हाला रेडिओवर एका प्रसिद्ध व्यक्तीची माहिती द्यायची आहे.

**भाषणासाठी मुद्दे :**

अभिवादन व संबोधन – विषयाची ओळख – विषयाची मांडणी – श्रोत्यांना प्रश्न – शेवट व अभिवादन

## लेखी परीक्षा

एकूण गुण ३५

१ वाचन आणि आकलन. (एकूण गुण १०)

अंजना आणि जस्मिन काल एका वृद्धाश्रमात जाऊन आल्या. यंदा दिवाळीचा पहिला दिवस स्वत:पुरता साजरा करण्यापेक्षा दुसऱ्यांना आनंद वाटण्यात घालवावा, असं त्यांनी ठरवलं होतं. गेली तीन वर्षं त्या कॉलेजमधून येता-जाता हा वृद्धाश्रम पाहत होत्या. ह्या वेळी आत जाऊन तिथे राहणाऱ्या आजीआजोबांची प्रत्यक्ष भेट घ्यावी असं त्यांनी पक्कं केलं. त्यासाठी त्यांनी एकूण कार्यक्रमाची नीट आखणी केली. आदल्या दिवशी 'उत्तरायण' संस्थेत जाऊन अधिकाऱ्यांची रीतसर परवानगी घेतली. वयस्कर लोकांना भेटायचं असल्यानं मुद्दाम कमी तेलकट, कमी गोड असे पदार्थ, म्हणजे बेक्ड करंज्या, बिनतेलाचा कोरडा चिवडा, खास मधुमेहींसाठी केलेल्या मिठाया असा फराळ, शिवाय कंदील, रांगोळीचे रंग अशी खरेदी केली.

दिवाळीच्या पहिल्याच दिवशी सकाळी लवकर उठून त्या संस्थेत गेल्या. गेल्या गेल्या अंजना आणि जस्मिननं सगळ्यांना वाकून नमस्कार करत दिवाळीच्या शुभेच्छा दिल्या. दोघींनी मिळून संस्थेच्या ऑफिसमध्ये छान रांगोळी काढली. आणलेला कंदील लावला. जस्मिनने सगळ्यांसाठी एक छान गाणं म्हटलं. सगळ्या आजीआजोबांनी टाळ्या वाजवून दोघींचं कौतुक केलं. अंजनानं सगळ्यांना खेळता येतील असे खेळ तयार करून आणले होते. गाणी, गप्पा, खेळ, खाऊ, हास्यविनोद या सगळ्यात वेळ अगदी मजेत गेला. त्या दोघी जेव्हा परत निघाल्या, तेव्हा बक्षीआजोबा उठून पुढे आले आणि भरल्या गळ्याने म्हणाले, "मुलींनो, तुम्हाला खूप खूप आशीर्वाद आमच्याकडून. ह्या म्हाताऱ्यांना खूप मोठा आनंद दिलाय तुम्ही. रोजच आम्ही कंटाळलेलो असतो. आपापले मग जुने दिवस आठवत बसतो. रोजच्या कंटाळवाण्या दिवसांसारखीच जायची दिवाळीही. ह्या संस्थेत आल्यापासून आज प्रथमच आमची दिवाळी इतकी छान साजरी झाली. नेहमी अशाच येत राहा. आम्हाला बरं वाटेल." समाधानाने भरलेल्या मनाने बाहेर पडताना दोघींचंही इथे नेहमी यायचं ठरलंच होतं.

**१. वरील उताऱ्यात आलेले रीती काळातील कोणतेही एक क्रियापद लिहा. (१)**

**२. अंजना आणि जस्मिन ह्यांनी वृद्धाश्रमात दिवाळी साजरी करण्यासाठी काय काय तयारी केली? (३)**

३. अंजना आणि जस्मिन वृद्धाश्रमात कोणता खाऊ घेऊन गेल्या होत्या? (१)

४. पुढील क्रियापदांची उताऱ्यात आलेली धातुसाधिते लिहा. (५)

क. करणे ख. आणणे ग. आखणे घ. कंटाळणे च. भरणे

## २ व्याकरण (एकूण गुण १२)

१. पुढील वाक्यांतील 'असो' ह्या शब्दाच्या जागी कंसातील योग्य शब्दसमूह वापरा. (३)

(असू द्या, असलं तरी, जे झालं ते झालं)

क. तुमचं स्वत:चं मत काहीही असो, तुम्ही इतर सगळ्यांची मतं विचारात घेतलीच पाहिजेत.

ख. नवीन आयुष्याला सुरुवात करताना तुमचा आशीर्वाद आमच्या पाठीशी असो हीच विनंती.

ग. परागनं आईला उलट उत्तर द्यायला नको होतं. असो. तो पुन्हा असं वागणार नाही.

२. पुढील वाक्यांतील क्रियापदांच्या जागी त्या क्रियापदाचे शक्य रूप वापरा. त्यानुसार वाक्यात इतरही आवश्यक बदल करा. (२)

क. दादा आता वयामुळे पूर्वीप्रमाणे भरभर चालू शकत नाहीत.

ख. इतके मारामारीचे चित्रपट कसे काय बघू शकता तुम्ही?

३. पुढील तक्ता पूर्ण करा. (७)

| क्रियापद | धातुसाधित नाम |
|---|---|
| हसणे | |
| शिवणे | |
| वागणे | |
| चालणे | |
| लिहिणे | |
| खाणे | |
| शिकवणे | |

## ३ शब्दसंपदा (एकूण गुण १०)

**वाक्यांतील रिकाम्या जागी कंसातील योग्य शब्दसमूह निवडून लिहा.**

(दुरून, नुकतेच, बाहेरून, आदल्या दिवशी, समोरचा, आतून, पूर्वी, अलीकडेच, यंदा, शेजारून)

१. तुम्हाला यायला थोडा उशीर झाला. काका ------------ बाहेर पडले.

२. ------------ चांगला पाऊस पडेल असा हवामानखात्याचा अंदाज आहे.

३. अगं, शिरीष किती बारीक झालीये! अगदी ------------ चालत गेली तरी मी ओळखलं नाही तिला.

४. ------------ आम्ही गिरगावात राहत होतो.

५. उत्तम संवादासाठी फक्त आपण बोलून चालत नाही, ------------ काय बोलतोय ह्याकडेही लक्ष द्यावं लागतं.

६. परीक्षेच्या ------------------------ अभ्यासाची उजळणी केली, की ती चांगली लक्षात राहते.

७. ------------ खूप चांगली मराठी नाटकं आली आहेत.

८. नानामामा अगदी फणसासारखा, ------------ काटेरी, पण ------------ मऊ आणि गोड!

९. वेगवेगळ्या फुलांनी फुललेलं कासचं पठार ------------ अगदी गालिच्यासारखं दिसत होतं.

## ४ श्रुतलेखन (परीक्षकांसाठी उतारा शेवटी दिला आहे) (एकूण गुण ३)

# परीक्षकांसाठी

**श्रुतलेखनासाठीचा उतारा**

आदिम काळापासून माणसाला अंतराळातले ग्रह-तारे, पृथ्वी इत्यादी गोष्टींनी आकर्षित केलं आहे. माणूस गुहेत राहत असतानाही तो आकाशाकडे पाहून दिवस-रात्र त्यांचा अर्थ शोधू पाहायचा. ढग कुठून येतात आणि आकाशात दिसणारे तारे किती लांब आहेत, असे प्रश्न त्याला पडायचे. ह्या प्राथमिक अवस्थेतील माणसाला नेहमी प्रश्न पडायचा, की रोज सकाळी सूर्य का उगवतो आणि त्यानंतर हे तारे दिसेनासे का होतात? मग तो निसर्गात घडणाऱ्या घटनांचा जन्म-मृत्यू, दुष्काळ आणि सुकाळ ह्यांच्याशी संबंध लावू लागला. त्याला ते ‘स्वर्गीय’ वाटू लागले आणि त्याने त्यांना ‘देव’ असं नाव दिलं.

- ए॰पी॰जे॰ अब्दुल कलाम आणि सृजन पाल सिंग

९

# महाराष्ट्र आणि त्यातील प्रमुख शहरे












## चला, शिकू या...

- महाराष्ट्र राज्य व त्यातील प्रमुख शहरांचा अभ्यास करणे : मुंबई आणि पुणे
- क्रियापद-नामाची षष्ठी
- बोलीभाषा
- च, ही, सुद्धा, पण, नं, मात्र, फक्त, केवळ
- अलीकडे, पलीकडे
- जेवढे-तेवढे, जितके-तितके, एवढे / इतके

## १ महाराष्ट्र राज्य व त्यातील शहरे

१. महाराष्ट्रातील प्रमुख शहरांबद्दल तुम्हाला काय माहीत आहे? उदाहरणात दाखवल्याप्रमाणे खालीलपैकी कोणत्याही एका शहराबद्दल माहिती लिहा.







पुणे

सोलापूर

नाशिक

नागपूर

औरंगाबाद



**२. आता तुमच्या शहराबद्दल माहिती लिहा.**

माझे शहर

**३. प्रत्येक शहराच्या काही चांगल्या व काही वाईट गोष्टी असतात. काही गोष्टी आपल्याला आवडतात, काही आवडत नाहीत. तुमच्या शहराबद्दल ज्या गोष्टी तुम्हाला आवडतात त्या निळ्या रंगाने व ज्या गोष्टी आवडत नाहीत त्या लाल रंगाने अधोरेखित करा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| गर्दी | वर्दळ | खाणेपिणे | आधुनिक जीवन | माणसांचे स्वभाव |
| पाणी | स्वस्ताई | हिरवाई | कामाच्या संधी | फिरायला जाण्याची ठिकाणे |
| हवा | निसर्ग | संस्कृती | प्रवासाच्या सोयी | जीवनावश्यक गोष्टी |
| शिस्त | स्वच्छता | महागाई | शिक्षणाच्या सोयी | प्रशासकीय व्यवस्थापन |

**४. महाराष्ट्रातल्या एखाद्या शहराबद्दल तुम्हाला आवडणाऱ्या आणि न आवडणाऱ्या गोष्टींबद्दल लिहा.**

**शहराचे नाव** : ------------------------

**आवडत्या गोष्टी** : ------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

**नावडत्या गोष्टी** : ------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------

**५. मुंबई**

**क. ध्वनिफितीत खालील वाक्ये कोणत्या क्रमाने आली आहेत?**

- ☐ धनिकांच्या ब्रिटिश मुंबईत काळ थांबून राहिल्यासारखा वाटतो.
- ☐ मुंबईत नसत्या चौकश्या केल्या जात नाहीत.
- ☐ मुंबई हे भूतकाळात रमणारे शहर नाही.
- ☐ आपल्यातील 'मी'ला जपणाऱ्या शहरात जाण्याची लेखकाची इच्छा होती.
- ☐ १९९३ च्या बॉम्बस्फोटांनी मुंबईच्या वर्मी घाव बसला.
- ☐ मुंबई हे उद्योगी माणसांचे शहर आहे.

**ख. वरील उताऱ्यात मुंबई शहराची काही वैशिष्ट्ये आलेली आहेत, ती वैशिष्ट्ये सांगणारे खालील वाक्यांश पूर्ण करा.**

उदा。 वर्तमानकाळात जगण्याचे धैर्य असलेले शहर

१. तुम्ही काम करणारे असाल तर ----------------------------------------

२. तुम्ही काळाच्या मागे पडू लागलात तर ----------------------------------------

३. मुंबई सतत ----------------------------------------

४. मुंबईचा उपनगरी भाग ----------------------------------------

५. मुंबईच्या वातावरणात ----------------------------------------

६. पुन्हा पुन्हा कोसळल्यानंतरही ----------------------------------------

**६. पाठ्यपुस्तकातील क्रमांक २ (महाराष्ट्रामधील) उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

क. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या साधारण किती आहे?

----------------------------------------

----------------------------------------

ख. महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा कोणती आहे? तसेच, इथे इतर कोणत्या बोलीभाषा अस्तित्वात आहेत?

----------------------------------------

ग. महाराष्ट्र राज्याची राजधानी कोणती आहे?

----------------------------------------

घ. सांस्कृतिक राजधानी कोणत्या शहरास म्हटले जाते व का?

----------------------------------------

च. महाराष्ट्रात कोणते सण साजरे केले जातात?

----------------------------------------

## २ क्रियापद-नामाचे षष्ठीचे रूप

**१. कंसात दिलेल्या क्रियापद-नामांचे उदाहरणात दाखवल्याप्रमाणे षष्ठीचे रूप करून वाक्ये पूर्ण करा.**

**मधुरा** : निहिरा, का गं इतका गंभीर चेहरा करून बसलीयेस?

**निहिरा** : अगं, दादाचा मोबाईल सापडत नाहीये. आणि तो मीच हरवलाय असा त्याचा आरोप आहे. मी तो काल जरा वेळ घेतला होता आणि त्याच्यावर नवीन खेळ (खेळणे)

खेळण्याचा प्रयत्न करत होते ना!

**मधुरा** : अरे बापरे! फारच मोठा शब्द वापरतेयस तू. गोष्ट फुगवून (क) (सांगणे) -------- सवयच आहे तुला. आरोप काय गं! तू तो कुठेतरी ठेवलायस आणि आता तुला आठवत नाहीये, इतकंच म्हणायचं असेल त्याला.

**मधुरा** : हा झाला (ख) (विसरणे) ---------- आरोप. मी इतकं विसरते का?

**निहिरा** : हे बघ, आता ह्या विषयावर वाद (ग) (घालणे) ----------- गरज नाहीये. आईनं कोणती कामं करायला सांगितली होती ते आठवतंय का?



**मधुरा** : हो, खोली (घ) (आवरणे) -----------, कपड्यांच्या घड्या (च) (घालणे) -----------, मोत्याला जेवायला (छ) (देणे) ----------- आठवण आहे मला. करतेय मी ते सगळं.

**२. क्रियापद-नामांचे षष्ठीचे रूप वापरून वाक्ये लिहा.**

उदा० (करणे) – कला : माझ्याकडे स्वयंपाक करण्याची कला अजिबात नाही.

क. (फिरणे) – फायदा : ----------------------------------------

ख. (चालणे) – हौस : ----------------------------------------

ग. (बनवणे) – तंत्र : ----------------------------------------

घ. (झोपणे) – वेळ : ----------------------------------------

च. (शिकवणे) – आवड : ----------------------------------------

छ. (जिंकणे) – इच्छा : ----------------------------------------

ज. (गाणे) – आवड : ----------------------------------------

**३. खाली दिलेल्या उदाहरणाप्रमाणे संवाद लिहा.**

उदा० अनिता, तुला खाण्याची आवड आहे की गाण्याची?

- फिरण्याची!

उदा० केशव, तुला आत्ता चालण्याची इच्छा आहे की फिरण्याची?

- झोपण्याची!

(पोहणे, जेवणे, लिहिणे, वाचणे, झोपणे, फिरणे, बोलणे, नाचणे, ऐकणे)

## ३ शहर पुणे



पावसाळा हा अगदी लहानपणापासून माझा सर्वात आवडता ऋतू. पावसाळ्यातल्या पुण्याची माझ्या मनातली रूपे माझ्या वाढत्या वयाबरोबर आणि कालमानानुसारही सतत बदलत गेलेली मला जाणवतात. शाळकरी वयात मी अनुभवलेला पुण्यातला पाऊस आजही लख्ख आठवतो. मे महिना संपत आलेला असे. माझे काका आम्हा मुलांसाठी नवी पुस्तके, नव्या वह्या, नव्या छत्र्या असा सरंजाम खरेदी करत. रेनकोटाची फॅशन अद्याप आलेली नव्हती.

मग ते रोजचे शाळेला जाणे. पत्र्याच्या बॅगेत भरलेली वह्या-पुस्तके, एका छोट्याशा कापडाच्या पिशवीत दुपारच्या सुटीत खाण्याचा डबा, दुसऱ्या हातात छत्री अशा थाटात मी शाळेला जायची. नव्यानेच नेसू लागलेल्या नऊवारी साडीचे ओचे कसेतरी सावरायचे, पायातल्या चपलांनी पावलांवर उडणाऱ्या चिखलाच्या थेंबांकडे दुर्लक्ष करायचे, मधूनच पावसाची सर आली तर त्या साऱ्या गडबड गोंधळात छत्रीही कशीबशी उघडून डोक्यावर धरायची, ह्यात माझी खूपच त्रेधा उडे. तरीही, शाळेला जाणे हा मोठा आनंददायक अनुभव होता. वारा, पाऊस, ओल्या जमिनीचा वास, अंगावर टपटपणारे थेंब, वाजणारी थंडी ह्या साऱ्यांचे मिळून एक अद्भुत रसायन तयार होई.

कवींच्या वेगवेगळ्या कवितांतूनही जिथे जिथे म्हणून पावसाळ्याची वर्णने येत ती सारी मला अतिशय आवडत. 'आनंद' ह्या कवींची 'शिवामूठ' नावाची सुंदर कविता आहे. तिच्या प्रारंभी या ओळी होत्या–

सळ सळ सळ पाऊस कोसळे
हिरवाळुन हे मळे
उमलले सोनटक्क्याचे कळे
अंगणात साचल्या जळावर
पागोळी सळसळे
बुडबुडा इकडुन तिकडे पळे

श्रावणात पुणे विलक्षण सुंदर दिसे. पावसाळ्याच्या अनेक भाववृत्ती पुण्यातच माझ्या ओळखीच्या झाल्या. सबंध आभाळाला बसलेले ढगांचे गच्च झाकण आणि गावावर पसरलेली अंधारी, मुसळधार पावसात भिजत जातायेताना मैत्रिणींशी मारलेल्या गप्पा, पावसाळ्यात धुऊन लख्ख निघणारे ताज्या हिरव्यागार रंगाने सजलेले गावातले जुनाट वृक्ष...

माझे ते तेव्हाचे पुणे आज राहिलेले नाही. ते पुणे प्रथम बेचाळीसच्या चळवळीत हादरले. दुसऱ्या महायुद्धाने त्याला घराबाहेर काढले आणि रेशनिंगच्या ऑफिसात गुंतवून टाकले. पुण्याची जुनी सांस्कृतिक परंपरा ढासळली. एकत्र कुटुंब व्यवस्था विस्कळीत झाली. मग उरलेसुरले पानशेतच्या जलप्रलयात वाहून गेले. ऋतू आपली वैशिष्ट्ये हरवून बसले. पावसाचे पाऊसपण आज कुठेच जाणवत नाही. पाऊस बदलला आहे, आणि आपण तरी पूर्वीचे कुठे राहिलो आहोत? मोठ्या माणसांची गोष्ट सोडा, पण बालकांच्या

सृष्टीतदेखील पावसाचे जे अनन्यसाधारण महत्त्व असे ते तसे आज राहिलेले दिसत नाही. आजचा चंद्र लिंबोणीच्या झाडामागे लपत नाही. मामाच्या चिरेबंदी वाड्याआडून डोकावत नाही. आज ढगातून म्हातारी हरभरा भरडत नाही आणि रस्त्यावरून वाहणाऱ्या तांबूस गढूळ प्रवाहात मुले कागदी नावा सोडण्याचा खेळ खेळत नाहीत. पावसाची विशिष्ट परिभाषाही आज राहिलेली नाही. 'ढगांची फळी उठणे, आभाळ येणे, ढग फुटून कोसळणे, उन्हात पडणाऱ्या पावसामध्ये कोल्हाकोल्हीचे लग्न लागणे', हे वाक्प्रचार मुलांनाच काय मोठ्यांनाही ठाऊक नाहीत. मुसळधार, शिरवा, सर, झिरमिर, टिपटिप ह्या शब्दांनादेखील तसा अर्थ राहिलेला नाही.

आजचा पाऊस फक्त असतो. नुसताच असतो!

– शान्ता शेळके

**१. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

क. शान्ताबाईंच्या आठवणीतल्या त्यांच्या लहानपणीच्या पुण्यातल्या पावसाची कोणती वैशिष्टये तुम्हालाही आवडली?

ख. ह्यांपैकी कोणत्या गोष्टी तुम्हीही तुमच्या लहानपणी अनुभवल्या आहेत?

ग. पूर्वीची लहान मुले पावसाची मजा एका वेगळ्याच तऱ्हेने घेत असत. आजच्या मुलांना ह्यापैकी कोणत्या गोष्टी माहीत नाहीत?

घ. आजची लहान मुले पावसाची मजा कोणत्या वेगळ्या तऱ्हेने घेतात?

च. तुम्हाला कोणता ऋतू विशेष आवडतो? तुमच्या गावात / प्रांतात ह्या ऋतूचे काही खास वेगळे रूप आहे असे तुम्हाला वाटते का? कसे?

**२. वरील उताऱ्यात दिलेल्या आनंद ह्यांच्या 'शिवामूठ' ह्या कवितेतील ओळी पाठ करा आणि वर्गात सादर करा.**

३. शान्ता शेळके यांच्या उताऱ्यात आता फारशी वापरात नसलेली रीती भूतकाळाची रूपे आली आहेत. ती रूपे ओळखा आणि खालील तक्ता पूर्ण करा.

| | |
|---|---|
| करत | |
| जायची | जात असे / जायचे |
| उडे | उडत असे |
| होई | |
| | येत असे |
| | आवडत असे |
| दिसे | दिसत असे |

४. पाठ्यपुस्तकात प्रसाद शिरगावकरांच्या ज्या कवितेच्या ओळी तुम्ही लिहिल्या, ती मूळ कविता वाचा.

आमच्या काँक्रीटच्या जंगलातही
सूर्योदय होतो, सूर्यास्त होतो
ढग दाटतात, पाऊसही कोसळतो

आमच्या काँक्रीटच्या जंगलातही
पक्षी किलबिलतात, फुलपाखरं भिरभिरतात
फुलं घमघमतात, पानं सळसळतात

आमच्या काँक्रीटच्या जंगलालाही
एक जमीन, एक आकाश, एक क्षितिज असतं
आमच्या खुराड्याच्या खिडकीतूनही
क्षितिज गोलाकार, आकाश अनंतच दिसतं...

आमच्या काँक्रीटच्या जंगलात
झाडं, पानं, फुलं, पक्षी असतातच
इमारती, रस्ते, वाहनं, दगडही असतात

आमच्या काँक्रीटच्या जंगलात
सजीव सजीव असतातच
निर्जीवही सजीव असतात
कधी सगळेच सजीव असतात
कधी सगळेच निर्जीव असतात...

अन् तरीही
आमच्या काँक्रीटच्या जंगलात
सूर्योदयही होतो, सूर्यास्तही होतो
अन् तो सुंदरही दिसू शकतो,
पाहायचं ठरवलं तर...

- प्रसाद शिरगांवकर

## ४ केवळ, फक्त...

**खालील गाळलेल्या जागांमध्ये योग्य शब्द भरा.**

(फक्त, केवळ, च, ही, च, पण)

१. "तू ते खादीचं प्रदर्शन बघितलंस का? आम्ही जाणार आहोत. तू ------------ येणार का?"

२. "अगं, मी परवा ----------- 'आम्ही दोघी' हा सिनेमा पहिला. मस्त आहे."

३. परीक्षेला ----------- दोन ----------- दिवस उरले आहेत, आणि मला तर आता अभ्यासाचा कंटाळा आलाय.

४. महाबळेश्वरला पाहिलेला अवर्णनीय सूर्यास्त मला आज ----------- आठवतो.

५. "मला तू आजच्या आज आमच्या मासिकासाठी एक गोष्ट लिहून दे."
"-------------- अशक्य आहे."

## ५ अलीकडे... पलीकडे...

**१. योग्य पर्याय निवडून वाक्य तयार करा.**

| | | |
|---|---|---|
| बसने प्रवास करतो. | गाव सुरू होते. | कमी ऐकू येते. |
| एक एटीएम आहे. | एक मोठे मैदान आहे. | |

उदा॰ कुंपणाच्या पलीकडे... कुंपणाच्या पलीकडे एक मोठे मैदान आहे.

क. अलीकडे आजोबांना... ---------------------

ख. ह्या वेशीच्या पलीकडे... ---------------------

ग. शाळेच्या पलीकडे... ---------------------

घ. अलीकडे आम्ही सर्वजण... ---------------------

**२. खालील प्रश्नांची 'अलीकडे' आणि 'पलीकडे' हे शब्द वापरून उत्तरे लिहा.**

उदा॰ तुमच्या घराच्या अलीकडे काय आहे? माझ्या घराच्या अलीकडे शाळा आहे.

क. नदीच्या पलीकडे काय आहे?

---------------------------------------------

ख. अलीकडे तुम्ही डॉक्टरकडे गेला होतात काय?

---------------------------------------------

ग. रस्त्याच्या पलीकडे काय आहे?

______________________________________

घ. दैनंदिन गोष्टींपलीकडे जाऊन कोणत्या विषयांची चर्चा तुम्ही करता?

______________________________________

**३. खालील उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे द्या.**

अलीकडे मला काय झाले आहे तेच कळत नाही. आता कालचेच पहा. मला जायचे होते कॉलेजमध्ये, पण गेलो भलतीकडेच! खरेतर माझे कॉलेज आहे नानावटी हॉस्पिटलच्या अलीकडे. नेहमीप्रमाणे मी बसने निघालो, पण उतरलो पुढच्या स्टॉपला, म्हणजे हॉस्पिटलच्या पलीकडे. कुठल्या तंद्रीत होतो कोण जाणे! मग तंगडतोड करून परत कॉलेजला यावे लागले. हे असे होते आहे सध्या. आणि हे सगळे काही त्या मुलीला पाहिल्यापासून होते आहे. अहाहा, काय सुंदर होती ती! कोण असेल? कुठे राहत असेल? काय शिकत असेल? ह्यापलीकडे सध्या दुसरे कुठले विचारच मनात येत नाहीत. अरेच्या! प्रेमात वगैरे पडलो आहे की काय मी?

क. लेखकाला कुठे उतरायचे होते? पण तो कुठे उतरला?

______________________________________________________________________

______________________________________________________________________

ख. लेखकाच्या मनात सध्या कोणते विचार येत आहेत?

______________________________________________________________________

______________________________________________________________________

ग. लेखक प्रेमात पडला आहे का? तुमचे मत काय आहे?

______________________________________________________________________

______________________________________________________________________

## ६ जेवढे - तेवढे, जितके - तितके, एवढेच नव्हे ...

**१. कंसातील शब्दांचा आणि शब्दप्रयोगांचा त्यांचे लिंग, वचन, सामान्यरूप इ॰ लक्षात घेऊन योग्य जागी उपयोग करा आणि वाक्ये पूर्ण करा.**

(जेवढा / जितका, तेवढा / तितका, एवढा / इतका, एवढेच नव्हे / इतकेच नव्हे, एवढीच की / इतकीच की, तेवढे नसले / तितके नसले तरी, एवढे नाही / इतके नाही)

क. हे दुर्मीळ पुस्तक मिळवण्यासाठी धनंजयने ------------ धडपड आणि खर्च केला, ------------ ते पुस्तक महत्त्वाचे नव्हतेच, असे नंतर लक्षात आले.

ख. काही वर्षांपूर्वी गावकऱ्यांनी बांधलेल्या दोन शेततळ्यांचा खूप फायदा झाला. ------------ ------------ तर गेल्या वर्षीच्या दुष्काळातही गावाला पाणी कमी पडले नाही.

ग. “इथं शिक्षणाची परिस्थिती तुम्ही समजता ------------ वाईट नाहीय. नव्या मुख्याध्यापकांनी केलेल्या वेगवेगळ्या प्रयोगांमुळे शाळेचा कायापालटच झालाय. ------------ की ------------ मुलं दुसऱ्या शाळांमध्ये गेली होती ------------ सगळी परत आली आहेत.

घ. “सोहेलनं वजन किती कमी केलंय, पाहिलंस? ------------ तरी माझंही थोडं कमी झालंय. व्हावा ------------ व्यायाम होत नाही रे माझा! तो रोज दोन तास जिममध्ये जातो. ------------, तर ऑफिसलाही सायकलनं जातो. ------------ नाही बुवा जमत मला.”

च. पहिल्या दिवशी प्राध्यापक धारवाडकर विद्यार्थ्यांना म्हणाले, “प्रश्न पडणे हा माणूस म्हणून आपण जिवंत असल्याचा पुरावा असतो. तुम्हाला ------------ प्रश्न पडतील ------------ तुमचा मेंदू तरतरीत राहील. त्यातल्या जास्तीतजास्त प्रश्नांची उत्तरं स्वतःच शोधण्याची ------------ धडपड तुम्ही कराल, ------------ तुमची बुद्धी धारदार होईल. मनात उरलेले प्रश्न आपल्या गुरूला विचारण्याचं धाडस, ------------ तर थोडासा उद्धटपणा तुमच्यात नसेल, तर तुम्ही फार पुढे जाऊ शकणार नाही, ------------ तुमच्या बुद्धीची धार काहीतरी चांगलं घडवण्यासाठी उपयोगी पडली पाहिजे.”

## ७ शब्दखेळ

**१. न की ण? योग्य उत्तर अधोरेखित करा.**

उदा॰ बुवा आपल्या शिष्यांना सांगत, “तान / ताण गळ्यातून सहज निघाली पाहिजे.”

क. मुलाखतीला जाताना चेहरा प्रसन्न ठेवा. मनातला तान / ताण चेहऱ्यावर दिसणार नाही ह्याची काळजी घ्या.

ख. मला दुसऱ्या माणसाचे मन / मण कळत नाही हे मला पक्के कळले आहे. म्हणूनच मी लग्न केले नाही.

ग. देसायांकडे फक्त दोन राष्ट्रीय सन / सण दिवाळीसारखे साजरे होतात.

घ. एका ठेंगण्या टेकडीवर बाभळीचे दाट वण / वन होते.

च. माझा एक भाचा आहे. त्याच्या डाव्या गालावर मोठा जांभळा वण / वन आहे.

छ. “एवढ्या रात्री कोन / कोण आलंय?”

ज. काही वस्तू फक्त हरवण्यासाठीच असतात. उदाहरणार्थ पेण / पेन.

झ. काका दुसऱ्याला मदत करण्यासाठी मन / मण आणि कितीही धन / धण खर्च करायला नेहमीच तयार असतो. तन / तण खर्च करायला मात्र साफ नकार देतो.

ट. सावित्रीने आयुष्यभर मान / माण खाली घालून केवळ कामच केले.

ठ. इतिहासातले सन / सण पाठ करणे हा अत्यंत कंटाळवाणा व्यायाम असतो.

**२. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे रिकाम्या चौकटींत योग्य नामे लिहा.**




**३. पाठ्यपुस्तकातील नाम + क्रियापद तत्त्वांचा अभ्यास करा आणि खालील उताऱ्यात रिकाम्या जागांमध्ये कंसातील योग्य त्या 'नाम + क्रियापद' किंवा 'इतर शब्द + क्रियापदाच्या' जोड्या वापरून उतारा पूर्ण करा. काळ विचारात घेऊन क्रियापदाचे रूप वापरा.**

(प्रयोग करणे, नशीब फळफळणे, वाळवी लागणे, आपलंसं करणे, आकाराला आणणे, लौकिक मिळवणे, उत्साहाने सळसळणे, समन्वय साधणे, खुंटाला बांधणे)

मंदारने एक चांगला नट म्हणून (क) ------------ ------------ आहे, पण तरीही त्याला व्यावसायिक नाटकाच्या (ख) ------------ ------------ राहायचे नाही. त्याला काहीतरी वेगळा (ग) ------------ ------------ आहे. "मी इथेच राहिलो तर माझ्या क्षमतेला (घ) ------------ ------------ हे नक्की," असे तो नेहमी म्हणत असे. खरोखरच एक दिवस त्याचे (च) ------------ ------------. त्याला आदिवासींच्या जीवनशैलीवर, त्यांच्या कलाप्रकारांवर संशोधन करण्यासाठी शिष्यवृत्ती मिळाली. हे सांगायला तो जेव्हा आला तेव्हा तो अक्षरश: (छ) ------------ ------------ होता. मला खात्री आहे, की तो त्या जंगलवासीयांना (ज) ------------ ------------ आणि नाटक आणि त्यांच्यातले कलागुण यांचा (झ) ------------ ------------, आणि हा प्रकल्प (ट) ------------ ------------.

# १०

# सामाजिक समस्या आणि सामाजिक मूल्ये












## चला, शिकू या...

- सामाजिक समस्या समजणे, वंचितांचे प्रश्न समजणे
- शासकीय व स्वयंसेवी संस्थांबद्दल माहिती घेणे
- सामाजिक मूल्ये : हे केले पाहिजे किंवा ते करता कामा नये
- बहुधा, बहुतेक, कदाचित, खात्रीने इ.
- शब्दयोगी पदे : विषयी, संबंधी, बद्दल
- संख्याविशेषणे : फार, पुष्कळ, थोडा,
- एकामागोमाग एक, एकाआड एक, एकापाठोपाठ एक इ.
- प्रयोजक क्रियापदे : सोडणे - सोडवणे, वाढणे - वाढवणे इ.
- एकाच क्रियापदाचे अनेक अर्थ : उदा. वाटणे, लागणे

## १ सामाजिक समस्या

**१. खालील चित्रे पाहून त्यावर चर्चा करा व तुम्ही ह्यावर काय उपाय कराल ते सांगा.**



क.



ख.

## २ स्वयंसेवी संस्था



‘व्हॅलेंटाईन डे’ म्हणजे तरुणतरुणींमधील प्रेमाच्या आविष्काराचा दिवस. बदामाच्या आकाराचे केक, लाल गुलाबाची फुलं आणि वेगवेगळ्या भेटवस्तू एकमेकांना देऊन एकमेकांपाशी आपलं प्रेम व्यक्त केलं जातं. हा केवळ तरुणतरुणींमधील प्रेमाचा दिवस न राहता ‘व्हॅलेंटाईन डे’ची संकल्पना आणि तिची व्याप्ती आता मोठी झाली आहे. ह्या दिवसाच्या निमित्ताने इतर नात्यांनाही उजाळा देणे, समाजातील वंचित, दुर्लक्षित घटकांशी संपर्क साधणे, त्यांच्याशी जवळीक साधणे, त्यांना मुख्य प्रवाहाशी जोडून घेणे हे उद्देश साधले गेले, तर हा दिवस जास्त अर्थपूर्ण होईल.

गेल्या काही वर्षांपासून मुंबईतील महालक्ष्मी येथील वात्सल्य फाउंडेशनतर्फे हा दिवस अतिशय वेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. ही संस्था वंचित, दुर्लक्षित मुलांसाठी काम करते. त्यांना निवारा पुरवणे, त्यांना आरोग्याच्या सुविधा पुरवणे ह्या कामांबरोबरच त्यांचे शिक्षण, त्यांचे भावी आयुष्य ह्यांचा विचारही ही संस्था करते. ‘व्हॅलेंटाईन डे’च्या निमित्ताने दरवर्षी संस्थेतील सर्व मुलांचा वाढदिवस एकत्रित साजरा केला जातो. त्यांच्याबद्दल प्रेम व्यक्त करण्याची ही संधी या संस्थेमार्फत सगळ्यांनाच मिळू शकते. ह्या वेळी धमाल-मस्ती ह्याबरोबरच खूप खेळ व गाणी होतात. हा उपक्रम केवळ मुंबईपुरता मर्यादित न राहता मुरबाड, आसनगाव, शहापूर परिसरात असणाऱ्या संस्थेच्या इतर शैक्षणिक केंद्रांमध्येही राबवला जातो. प्रेमाचे प्रतीक असलेला हा दिवस साजरा करून ही मुलेही आपल्यातीलच एक घटक आहेत हे सांगण्याचा हा छोटासा प्रयत्न असल्याचे वात्सल्य फाउंडेशनतर्फे सांगण्यात आले.

**१. चूक की बरोबर ते लिहा.**

उदा. ‘व्हॅलेंटाईन डे’ तरुणांमध्ये अधिकाधिक लोकप्रिय होत चालला आहे. बरोबर

क. वात्सल्य फाउंडेशन ही एक समाजातील वंचित घटकांसाठी काम करणारी संस्था आहे.

_______________________.

ख. वात्सल्य फाउंडेशन ही एक सरकारी संस्था आहे. -------------------------.

ग. 'व्हॅलेंटाईन डे' हा वात्सल्य फाउंडेशनतर्फे नेहमीप्रमाणे फुले वाटून व केक कापून साजरा केला जातो. -------------------------.

घ. वात्सल्य फाउंडेशन फक्त मुंबई शहरात काम करते. -------------------------.

**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

क. वात्सल्य फाउंडेशन 'व्हॅलेंटाईन डे' कशा प्रकारे साजरा करते?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ख. वात्सल्य फाउंडेशन समाजातील कोणत्या लोकांसाठी काम करते?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

ग. वात्सल्य फाउंडेशन वंचितांसाठी काय काय करते?

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

घ. वात्सल्य फाउंडेशनसारखी अजून एखादी स्वयंसेवी संस्था तुम्हाला माहीत आहे का? असल्यास तिच्याबद्दल थोडे सांगा.

--------------------------------------------------------------------------------

--------------------------------------------------------------------------------

**३. तुमच्या शहरातील एखाद्या स्वयंसेवी संस्थेबद्दल माहिती काढा व वर्गात सादर करा.**

**४. खालीलपैकी कोणतेही एक चित्र निवडा आणि त्यावर पुढील प्रश्नांच्या मदतीने तुमचे विचार लिहा.**

क. सामाजिक मूल्ये म्हणजे काय?

ख. चित्रामधील प्रसंगांमध्ये तुमच्या मते माणसांनी कसे वागले पाहिजे?












**५. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये लिहा.**

(आपला परिसर स्वच्छ ठेवणे / वाहतूक नियमांचे पालन करणे / कायद्यांचे पालन करणे / पर्यावरणाचे रक्षण करणे / स्त्रियांचा आदर करणे / गरिबांना मदत करणे)

उदा. आपला परिसर स्वच्छ ठेवला पाहिजे. तो घाण करता कामा नये.

क. ------------------------------------------------------------------------

ख. ------------------------------------------------------------------------

ग. ------------------------------------------------------------------------

घ. ------------------------------------------------------------------------

च. ------------------------------------------------------------------------

**६. आनंदवन**

**क. खालील उतारे वाचून ते कोणत्या चित्रासाठी योग्य आहेत ते लिहा.**









१. अनेक लोक स्वतःहून समाजकार्याला वाहून घेतात, त्यांपैकीच एक बाबा आमटे. बाबा आमटे ह्यांनी एक भव्य स्वप्न पाहिलं आणि त्याचंच मूर्त रूप म्हणजे आनंदवन. त्यांचे सुपुत्र डॉ. प्रकाश आमटे ह्यांनी वडिलांपासून प्रेरणा घेऊन हेमलकसा येथे लोकबिरादरी प्रकल्प सुरू केला आणि बाबांच्या कार्याचा विस्तार केला...

२. शेती, पाणी, पर्यावरण, उद्योग, शिक्षण, आरोग्य, रोजगार, घरबांधणी अशा अनेक क्षेत्रांत नानाविध प्रयोग करून अफाट आणि पायाभूत काम आनंदवनात उभे राहिलेले आहे. विशेष म्हणजे, समाजाने नाकारलेल्या साध्यासुध्या माणसांच्या कष्टांतून हा चमत्कार घडला आहे. आनंदवन व हेमलकसा प्रकल्प पाहायला अनेक लोक दूरवरून येतात.

३. गडचिरोली जिल्ह्यातील अतिदुर्गम भागातील हेमलकशाची जबाबदारी सांभाळली ती प्रकाश व त्यांची सहचारिणी मंदा आमटे ह्यांनी. प्रकाश ह्यांनी वैद्यकशास्त्रात उच्चशिक्षण घेतल्यानंतर लठ्ठ पगाराच्या नोकरीचा मोह टाळला आणि आपल्या ज्ञानाचा उपयोग तळागाळातील लोकांसाठी करत हेमलकशात नंदनवन फुलवले. इतकेच नव्हे, तर तेथील अनेक प्राण्यांना त्यांनी जीवनदान दिले आहे, आपलेसे केले आहे.

४. बाबांनी दुबळ्या, अशिक्षित, मागास आदिवासींमध्ये आरोग्य व शिक्षणाबाबत जागृती निर्माण करून त्यांना सन्मानाने जगणे शिकवण्यासाठी हेमलकसा प्रकल्पाची मुहूर्तमेढ रोवली. त्यावेळी जेमतेम आठ विद्यार्थी असणाऱ्या हेमलकशाच्या आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांनी डॉक्टर, इंजिनियर, वकील बनून नवा आदर्श प्रस्थापित केला आहे.

**ख. बाबा आमटे ह्यांच्यावरील एक लघुपट पाहा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**१. योग्य पर्याय निवडा.**

क. हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्प कधी सुरू झाला?

१) १९७३ साली    २) १९७६ साली

ख. डॉ. प्रकाश आमटे ह्यांच्या मते आदिवासींची मुख्य समस्या कोणती होती?

१) मलेरिया    २) कुपोषण

ग. लोकबिरादरी प्रकल्पाची शाळा सुरू झाली ते साल कोणते होते?

१) १९७६    २) १९७३

**२. पुढील प्रश्नांची एक ते दोन वाक्यांत उत्तरे लिहा.**

क. हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्प कोणत्या जिल्ह्यात आहे?

___________________________________________

___________________________________________

ख. मोनॅको देशाने आमटे दाम्पत्याचा कसा सन्मान केला?

___________________________________________

___________________________________________

ग. भगवान अरविंद घोष ह्यांनी बाबांना दिलेल्या पुरस्कारावर काय लिहिले होते?

-------------------------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------------------

## ३ कदाचित, बहुधा, एकंदरीत ...

**१. उदाहरणात दाखवल्याप्रमाणे संवाद लिहा.**

| | |
|---|---|
| तुला उद्या सिनेमाला यायला जमेल का? | कदाचित जमेल / कदाचित नाही.<br>बहुधा नाही.<br>उद्या? छे! अशक्य.<br>बहुतेक येईन.<br>एकंदरीत असं दिसतंय, की जमेल. |

(जिममध्ये जाणे    पोहायला जाणे    नाटकाला जाणे    जेवायला जाणे)

## ४ विषयी, संबंधी, बद्दल

**उदाहरणात दाखवल्याप्रमाणे वाक्ये लिहा.**

उदा. राजकारणाविषयी तुला आस्था वाटते का? — छे! राजकारणाविषयी मला मुळीच आस्था वाटत नाही. कधी कधी तर राजकारण्यांबद्दल घृणा वाटते.

१. नवीन आलेल्या त्या चित्रपटाबद्दल तुझे काय मत आहे?
२. पर्यावरणासंबंधी पुस्तके तुझ्याकडे आहेत. का?
३. माझ्या नवीन केशरचनेबद्दल तुला काय वाटते?
४. प्रेमाविषयी तुला काय वाटते?
५. गरीब लोकांचे आयुष्य शिक्षणाने बदलेल का?



## ५ संख्यावाचक विशेषणे

**१. योग्य विशेषणे लिहा.**

(कोट्यवधी, दुप्पट, थोडासा, चौपदरी, किंचित)

मागच्या महिन्यात आम्ही बंगळुरूहून आलो. परत येताना वाटेत (क) ----------- पाऊस लागला. तापमानातसुद्धा (ख) ----------- बदल जाणवला. सुट्ट्यांचे दिवस असल्यामुळे परत येणाऱ्या प्रवाशांची संख्या जवळजवळ (ग) ------------- होती. मुंबई-बंगळुरू महामार्ग नुकताच (घ) ------------- केल्यामुळे प्रवास सुकर होतो. पण अजून सुधारणा व्हायला हव्यात. टोलनाक्यांवर बरीच कोंडी होते. (च) ------------- रुपये खर्च करूनही सरकार नागरिकांच्या सोयींकडे कसे काय दुर्लक्ष करते कोण जाणे!

**२. गाळलेल्या जागांमध्ये योग्य संख्याविशेषण भरू या.**

(दुहेरी, चौपट, चौपदरी, एकेरी, दुप्पट)

क. ह्या रस्त्यावर फक्त ------------- वाहतूक मान्य आहे.

ख. हे काय? तुझ्याकडे फक्त शंभर नाणी आहेत? माझ्याकडे तुझ्यापेक्षा ------------- नाणी आहेत.

ग. जरा ह्या कापडाची ------------- घडी करून ठेव बघू!

घ. घर आणि नोकरी सांभाळताना स्त्रियांना कायम ------------- भूमिका बजावायला लागते.

च. मोघलांचे सैन्य शिवाजी महाराजांच्या सैन्याच्या ------------- होते.

## ६ प्रयोजक क्रियापदे

**खालील वाक्यांत काळ, लिंग व वचनानुसार कंसात दिलेल्या क्रियापदाचे योग्य रूप लिहा आणि योग्य त्या जागी त्याचे प्रयोजक क्रियापद लिहा.**

उदा॰ रानातली झाडे आपापली (वाढणे) वाढली, पण बागेत लावलेली झाडे मात्र निगुतीने वाढवावी लागतात.

१. शर्यत बघण्यासाठी जमलेल्या गर्दीमध्ये अचानक एक बैल (घुसणे) ------------- आणि त्याला पकडण्यासाठी पाठोपाठ पोलिसांनी आपली जीप गर्दीत -------------.

२. आई मुलीला घेऊन बाकावर (बसणे) ------------- होती. डॉक्टरांनी आत बोलावल्यावर मुलीला तिथेच ------------- आई आत गेली.

३. सगळी मुले (झोपणे) ------------ आहेत ह्याची खात्री करून घेऊन ती आपल्या खोलीत गेली आणि आपल्या मुलाला ------------- तिने अभ्यासाला सुरुवात केली.

४. गीझरमध्ये पाणी (तापणे) ------------ आहे, त्यात एकाची अंघोळ होईल; पण वीज गेल्यामुळे आता गॅसवर पाणी ------------ लागेल.

५. "उद्या ह्या ताई तुम्हाला कविता (म्हणणे) ------------ दाखवतील, मग त्यानंतर त्या तुमच्याकडून ------------ घेतील."

६. भारतीय संघाने त्या परदेशी संघाला सहज (हरणे) ------------. ते खेळाडू अगदी नवखे असल्यामुळे------------.

७. मला वाटते, की ते लोक जमीरला (फसणे) ----------- आणि ह्या विषयातले त्याला काही माहीत नसल्यामुळे तोही ------------ बिचारा!

८. स्टेशनच्या फलाटावर फार गर्दी झाली होती म्हणून तो भिकारी (उठणे) ------------ आणि दुसरीकडे जाऊन बसला; पण पोलिसांनी त्याला ----------- आणि तिथून जायला सांगितले.

९. भीमसेन जोशींच्या गाण्याची ध्वनिफीत मला माझ्या मित्राने प्रथम (ऐकणे) ------------ आणि मी भारावून गेलो. त्यानंतर गाणे ------------ गोडी मला लागली.

## ७ लागणे

**मराठीत 'लागण्याची' गंमत बघा.**

**१. खाली दिलेल्या वाक्यांमध्ये 'लागणे' ह्या क्रियापदाचा वापर वेगवेगळ्या नामांबरोबर झाल्यामुळे त्याचे कोणकोणते अर्थ होतात ते लिहा.**

| | |
|---|---|
| उदा. शेजारच्या गावात एक चित्रपट लागला होता. | दाखवायला सुरवात होणे / प्रदर्शित होणे |
| क. तिकिटाच्या रांगेत उभा राहिलो, तर अर्ध्या तासाने नंबर लागला. | १. दिसणे |
| ख. मला इतका आनंद झाला की जणू लॉटरीच लागली. | २. करपणे |
| ग. चित्रपट बघून परत येताना वाटेत ऊन लागलं. | ३. जिंकणे |
| घ. वाटेत मित्राचा बंगला लागला म्हणून पाणी प्यायला आत गेलो. | ४. आवश्यक असणे |
| च. जेवणानंतर सुपारी दिली, ती नेमकी मला लागली. | ५. आग्रह करणे |
| छ. बंगल्यात शिरताना वाकलो नाही, त्यामुळे दरवाजा डोक्याला लागला. | ६. मार बसणे / दुखापत होणे |
| ज. मी जेवून जावं म्हणून घरचे माझ्या मागे लागले. | ७. त्रास होणे / बाधणे |
| झ. भात थोडा लागला होता, पण बाकीचं जेवण छान होतं. | ८. नंबर येणे |
| ट. मला जेवणात गोड लागतं हे माहीत असल्याने शिकरण केलं होतं. | ९. घशात अडकणे |
| ठ. खूप चालून आल्यामुळे मला तहान लागली. | १०. पाणी प्यावेसे वाटणे |

**२. खाली दिलेल्या वाक्यांमध्ये 'लागणे' ह्या क्रियापदाचा वापर वेगवेगळ्या नामांबरोबर झाल्यामुळे त्याचे कोणकोणते अर्थ होतात ते लिहा.**

(सूर सापडणे, वाईट वाटणे, आग्रह करणे, असणे, सुरू होणे / सुरुवात करणे, मळमळणे, वाटणे, शी येणे, रुजू होणे, बिनसणे / फजिती होणे )

क. जेवणानंतर 'एक तरी गाणं गा की रे!' म्हणून मित्र मागे लागला, पण माझा आवाज काही लागला नाही. -------------------- --------------------

ख. मला उचकी लागली होती; ती काही केल्या थांबेना. -------------------- --------------------

ग. त्याचा मुलगा माझ्या ऑफिसमध्ये नुकताच लागला होता. -------------------- --------------------

घ. पाहुण्यांना आपल्यामुळे त्रास झाला ही गोष्ट घरच्यांना फार लागली. -------------------- --------------------


च. पण भरल्या पोटी वळणावळणाच्या रस्त्यामुळे मला बस लागली. -------------------- -------------------- मग काय... उलट्या, जुलाब...!

छ. घरी पोहोचेपर्यंत माझ्या पोटाची मला भलतीच काळजी लागली, कारण आल्या आल्या घाईची 'लागली'. -------------------- --------------------

ज. थोडक्यात काय, माझी अगदी वाट लागली!!! -------------------- --------------------

## ८ उजळणी

१.



क. खेळणे ह्या क्रियापदाची साध्या काळातील सर्वपुरुषी व सर्ववचनी रूपे पूर्ण करा.

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ | | साधा भूतकाळ | | साधा भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळतो / खेळते | खेळत नाही | खेळलो / खेळले | खेळलो / खेळले नाही | खेळेन | खेळणार नाही |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | | | खेळलास / खेळलीस | | | |
| तुम्ही / आपण | खेळता | | | | खेळाल | |
| तो | | | | | | |
| ती | | | खेळली | | | |
| ते | | | | | खेळेल | |
| ते | | | | | | |
| त्या | खेळतात | खेळत नाहीत | | | | |
| ती | | | | | | |


**ख. आता ‘लिहिणे’ हे सकर्मक क्रियापद वापरून खालील तक्ता पूर्ण करा.**

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ | | साधा भूतकाळ | | साधा भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहितो / लिहिते | कविता लिहीत नाही | कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहीन | कविता लिहिणार नाही |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | लिहितोस / लिहितेस | | | | | |
| तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | | | त्याने | | | |
| ती | | | तिने | | | |
| ते | | | त्याने | | | |
| ते | | | त्यांनी | | | |
| त्या | | | त्यांनी | | | |
| ती | | | त्यांनी | | | |

**ग. ह्याचप्रमाणे आता वरील तक्त्यात ‘कविता’ (अ॰व॰), ‘संवाद’ (ए॰व॰ / अ॰व॰), आणि ‘पत्र’ (ए॰व॰ / अ॰व॰) ही नामे वापरून तक्ता पूर्ण करा.**

**घ. खालील गोष्टीमध्ये क्रियापदाचे योग्य रूपे वापरून रिकाम्या जागा भरा.**

एकदा रेडिओ जॉकी अभिराजने 'आनंद ऊर्जा' हॉस्पिटलचे व्यवस्थापक श्री॰ प्रफुल्ल कुमार ह्यांची मुलाखत (घेणे) घेतली. आधी अभिराजने त्यांना त्यांच्या 'आनंद ऊर्जा' ह्या उपचारपद्धतीविषयी (१) (विचारणे) ----------------------. त्यावर प्रफुल्ल कुमार (२) (म्हणणे) --------------------, "आम्ही काही वर्षांपूर्वी 'आनंद ऊर्जा' ह्या उपचारपद्धतीचा शोध (३) (लावणे) -------------------. आजकाल माणूस आपल्या दैनंदिन आयुष्यातील ताणतणावामुळे खूप निराश (४) (होणे) -------- ------------- आणि त्याला एका चांगल्या थेरपीची गरज (५) (भासणे) -------------------. पूर्वी आपला असा समज (६) (असणे) -------------------- की आनंद शिकावा (७) (न लागणे) --------------------, तो आपल्या आतच असतो किंवा (८) (नसणे) -------------------. परंतु आम्ही काही वेगळे प्रयोग करून (९) (पाहणे) ----------------------- तेव्हा आमच्या लक्षात (१०) (येणे) ------------------, की निराश माणसांवर आनंदोपचार करता (११) (येणे) --------------------. आमच्या तज्ज्ञांनी खूप काळ सखोल अभ्यास (१२) (करणे) --------- ------------ आणि निरनिराळ्या उपचारपद्धती विकसित (१३) (करणे) -------------------. आमच्याकडे आजवर कित्येक निराश रुग्ण (१४) (येणे) ----------------- आणि प्रफुल्लित होऊन घरी (१५) (जाणे) ----------------. आमच्याकडून उपचार घेतलेले रुग्ण पुढे भविष्यात पुन्हा कधीच निराश (१६) (न होणे) -------------------------, हे मी खात्रीने सांगू (१७) (शकणे) --------------------. आम्ही शिकवलेला व्यायाम त्यांनी रोज केला, तर ते सदैव खूश (१८) (राहणे) ---------------. पुरुष आनंदाने काम (१९) (करणे) --------------------, पैसे (२०) (कमवणे) ---------------- आणि स्त्रियासुद्धा प्रेमाने घर (२१) (सांभाळणे) ------------- ---------." हे ऐकून अभिराजसुद्धा प्रफुल्लित (२२) (होणे) -------------------. तो (२३) (म्हणणे) --------------------, "मीसुद्धा एकदा तुमच्या हॉस्पिटलला नक्की भेट (२४) (देणे) ------------- -------- आणि तुमच्या उपचारपद्धतींचा अनुभव (२५) (घेणे) --------------------."



च. 'खेळणे' ह्या क्रियापदाची वर्तमानकाळातील तीन रूपे पूर्ण करा.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू वर्तमानकाळ | | पूर्ण वर्तमानकाळ | | रीती वर्तमानकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळत आहे | खेळत नाही आहे | खेळलो / खेळले आहे | खेळलो / खेळले नाही आहे | खेळत असतो / असते | खेळत नसतो / नसते |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | | | | | | |
| तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | | | | | | |
| ती | | | | | | |
| ते | | | | | | |
| ते | | | | | | |
| त्या | | खेळत नाही आहेत | | | | |
| ती | | | | | | |

छ. आता 'लिहिणे' हे सकर्मक क्रियापद वापरून खालील तक्ता पूर्ण करा.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहीत आहे | कविता लिहीत नाही आहे | कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असतो / असते | कविता लिहीत नसतो / नसते |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | | | कविता लिहिली आहेस | | | |
| तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | | | त्याने<br>त्याने कविता लिहिली आहे | | | |
| ती | | | तिने | | | |
| ते | | | त्याने | | | |
| ते | | | त्यांनी | | | |
| त्या | | | त्यांनी | | | |
| ती | | | त्यांनी | | | |

ज. ह्याचप्रमाणे आता वरील तक्त्यात 'कविता' (अ॰व॰), 'संवाद' (ए॰व॰ / अ॰व॰), आणि 'पत्र' (ए॰व॰ / अ॰व॰) ही नामे वापरून तक्ता पूर्ण करा.

**झ. खालील उताऱ्यात कंसातील क्रियापदाचे वर्तमानकाळातील योग्य रूप (सामान्य, अपूर्ण, पूर्ण किंवा रीती) वापरा आणि रिकाम्या जागा भरा.**

**ब्रम्हानंद सोसायटी**

श्री॰ असंतोष निराशे ह्यांना मिस्टर नारद आपल्या ब्रम्हानंद सोसायटीची माहिती (देणे) देत आहेत.

"आमच्या आगळ्यावेगळ्या आनंदी सिटी प्रकल्पात आपले सहर्ष स्वागत आहे. आमच्या ह्या सोसायटीमध्ये तुम्ही घर घ्यायचे (ठरवणे) ठरवले आहे ही आमच्यासाठी फार आनंदाची बाब आहे. आमच्या सोसायटीतील घरे तुम्हाला महाग वाटतील; पण मी तुम्हाला खात्रीने सांगतो, इतर सोसायट्यांपेक्षा आमचा प्रकल्प निराळा आहे. इथे राहताना तुम्हाला फक्त आणि फक्त आनंदाचाच अनुभव मिळेल ह्याची सर्व काळजी आम्ही (घेणे) (१) ----------------. ब्रम्हानंद सोसायटीचे काम आता शेवटच्या टप्प्यावर येऊन (पोहोचणे) (२) -------------- जवळजवळ सगळ्या इमारती बांधून (होणे) (३) -------------------.



हे पाहा आमचे क्लब हाउस 'स्वर्ग'. बघा ना, जिममध्ये काही लोक कसे आनंदाने व्यायाम (करणे) करत आहेत, त्या तिथे तलावात काही जण मस्त (पोहणे) (४) ------------------- आणि तिथे मागेच एक लाउंज आहे, तिथे काही जण निवांत बसून गप्पा (मारणे) (५) ------------------- मोठ्या स्क्रीनवर मॅच (पाहणे) (६) -------------------. तिथेच खाली लहान मुलांना खेळण्यासाठी जागा आहे. तुम्ही पाहू शकता, तिथे लहान मुले कशी छान (खेळणे) (७) -----------------.


तुम्ही जेव्हा इथे राहायला याल तेव्हा तुम्हाला दिसेल, की इथले लोक नेहमी आनंदी असतात. त्यासाठी आम्ही नेहमी नवनवीन उपक्रम राबवत असतो. सोसायटीचे रहिवासीसुद्धा आनंदाने त्यांत सहभागी (होणे) (८) -------------------. संपूर्ण आठवडाभर आमच्याकडे वेगवेगळे उपक्रम चालू असतात. हे उपक्रम चालवण्यासाठी आम्ही बरेच तज्ज्ञ व कर्मचारी नेमले आहेत. सोसायटीतील लोकांच्या आनंदासाठी ते दिवसरात्र (झटणे) (९) ---------------. उदाहरणार्थ, काही कर्मचारी दर सोमवारी प्रत्येक नोकरदाराला कामावर जाण्यासाठी प्रेमाने (उठवणे) (१०) ------------- आणि त्याला त्याच्या कामाच्या फायद्यांची आठवण करून (देणे) (११) ----------. काही कर्मचारी लहान मुलांनाही शाळा कशी छान असते ते अधूनमधून समजावून (सांगणे) (१२) -------------. आणि आम्ही सोसायटीतील स्त्रियांनाही आठवड्यातून

तीन वेळा खास व्यायामाचे प्रकार (शिकवणे) (१३) ---------------. त्यामुळे त्यांना घरातील दिवसभराचे काम पार पडण्यासाठी भरपूर ऊर्जा मिळते. बोला, आकर्षक आहे की नाही सगळं?"

हे सर्व पाहून श्रीमती निराशे खूपच खूश (होणे) झाल्या. त्यांच्या पतींना मात्र ब्रह्मानंद सोसायटी इतकी (न आवडणे) (१४) -------------. शेवटी श्रीमती निराशे त्यांना म्हणाल्या, "काय हो, मला सांगा, तुम्ही तुमच्या उभ्या आयुष्यात कधी असे क्लब हाउस (पाहणे) पाहिले आहे का? तुम्ही कधी अशा अद्ययावत जिममध्ये व्यायाम (करणे) (१५) -------------- का? तुम्ही असे कधी तलावात मस्त (पोहणे) (१६) ---------------- का? असे निवांत बसून कधी गप्पा (मारणे) (१७) ------------------ का?"

त्यावर निराशेंनी त्यांच्या बायकोला त्यांच्या लहानपणीच्या गावातल्या आठवणी सांगितल्या. "अगं, हे तर काहीच नाही. आमच्या गावात मी लहानपणी ह्याहीपेक्षा सुंदर आणि आनंदी आयुष्य जगलो आहे. आमच्या गावात आजही लोक आनंदीच असतात. तू कधीही येऊन पाहा, मी जेव्हा जेव्हा गावी जातो तेव्हा तेव्हा आताही मी हे सगळं करतच असतो. मित्रांबरोबर शेतात (राबणे) (१८) -------------, आमच्या गावातील विहिरीत (पोहणे) (१९) ---------------. लहान मुलेही मस्त (खेळणे) (२०) ---------------, झाडांच्या पारंब्यांना (लोंबकळणे) (२१) --------------, झोके (घेणे) (२२) --------------. म्हणून मला काही हे नवीन नाही."





ट. 'खेळणे' ह्या क्रियापदाची भूतकाळातील तीन रूपे पूर्ण करा.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळत होतो / होते | खेळत नव्हतो / नव्हते | खेळलो होतो खेळले होते | खेळलो नव्हतो / खेळले नव्हते | खेळत असे / खेळायचो / खेळायचे | खेळत नसे / खेळायचो / खेळायचे नाही |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | | | | | | |
| तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | | | | | | |
| ती | | | | | | |
| ते | | | | | | |
| ते | | | | | | |
| त्या | | | | | | |
| ती | | | | | | |

**ठ. आता 'लिहिणे' हे सकर्मक क्रियापद वापरून खालील तक्ता पूर्ण करा.**

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहीत होतो / होते | कविता लिहीत नव्हतो / नव्हते | कविता लिहिली होती | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असे / लिहायचो / लिहायचे | कविता लिहीत नसे / लिहायचो / लिहायचे नाही |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | | | | | | |
| तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | | | त्याने | | | |
| ती | | | तिने | | | |
| ते | | | त्याने | | | |
| ते | | | त्यांनी | | | |
| त्या | | | त्यांनी | | | |
| ती | | | त्यांनी | | | |


**ड. ह्याचप्रमाणे आता वरील तक्त्यात 'कविता' (अ॰व॰), 'संवाद' (ए॰व॰ / अ॰व॰), आणि 'पत्र' (ए॰व॰ / अ॰व॰) ही नामे वापरून तक्ता पूर्ण करा.**

**ढ. खाली दिलेल्या गोष्टीमध्ये भूतकाळाची योग्य रूपे (सामान्य, अपूर्ण, पूर्ण किंवा रीती) वापरा आणि रिकाम्या जागा भरा.**

एकांत शिकावा लागतो. तो इतका सहज समजत नाही. कोणत्याही व्यक्तीला जर एकांतामध्ये ठेवले तर ती व्यक्ती सहा महिन्यांहून अधिक काळ स्वस्थचित्त राहू शकणार नाही, उलट ती वेडीच होईल. इजिप्त देशाच्या एका सम्राटाने असाच एक प्रयोग केला होता. कुणा एका फकिराने त्याला

इजिप्त देशाच्या एका सम्राटाने असाच एक प्रयोग केला होता. कुणा एका फकिराने त्याला (सांगणे) (१) --------------, "तुमच्या नगरीमध्ये जो सगळ्यात स्वस्थचित्त माणूस असेल, त्याला सहा महिन्यांपर्यंत एकांतात कोंडून ठेवा." सम्राटाला खरे तर सर्वदृष्ट्या प्रसन्न असा एक स्वस्थचित्त युवक (सापडणे) (२) --------------, परंतु तो युवक सम्राटाच्या ह्या प्रयोगासाठी तयार (न होणे) (३) --------------. कारण नुकतेच त्याचे लग्न (होणे) (४) --------------, तो चांगले पैसेही (कमवणे) कमवत होता आणि मोठ्या मजेत (राहणे) (५) --------------. "तुला आम्ही कोणताही त्रास देणार नाही", अशी खात्री खुद्द सम्राटाने त्याला (देणे) (६) ------------, परंतु तरीही तो हो (न म्हणणे) (७) --------------. सम्राटाने खूप विनवण्या केल्यावर शेवटी तो तयार झाला. सम्राटाने एका मोठ्या घरात त्याला कोंडले. त्याला सगळ्या सुखसोयी दिल्या. मात्र त्याला तिथे खूप एकटेपण (जाणवणे) (८) ------------, पहाऱ्यावरील माणसालाही त्याची भाषा (न समजणे) (९) --------------. दोन-चार दिवसांतच त्याला भीती वाटू लागली. खरे तर त्याला सगळ्या सोयी (मिळणे) (१०) --------------. अडचण कसलीही नव्हती. वेळच्यावेळी त्याला जेवायला मिळत असे, तो भरपूर (झोपणे) (११) --------------, राजेशाही महालात निवांत (फिरणे) (१२) --------------. तिथे बसून तो जे पाहिजे ते करू (शकणे) (१३) --------------, फक्त तो कोणाशी बोलू (न शकणे) (१४) --------------, किंवा कोणाला भेटूही (न शकणे) (१५) --------------, एवढेच!

दोन-चार दिवसांतच तो बेचैन झाला, आठ दिवसांच्या आत तो ओरडू लागला, "मला बाहेर काढा. मला इथे नाही राहायचे!" अशी कोणती अडचण (येणे) (१६) ------------? आयुष्यातील अडचणी केवळ बाहेरच्या जगातूनच येतात, असे त्याला आजवर (वाटणे) (१७) --------------, परंतु खरे तर माणसाच्या सगळ्या अडचणी ह्या आपल्या आतूनच निर्माण होतात, हा शोध त्याला एकांतात लागला. सहा महिने संपता संपता तो माणूस वेडा (होणे) (१८) --------------. बाहेर काढल्यावर त्याला बरे करायला जवळजवळ सहा वर्षे लागली.



ण. 'खेळणे' ह्या क्रियापदाची भविष्यकाळातील तीन रूपे पूर्ण करा.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भविष्यकाळ | | पूर्ण भविष्यकाळ | | रीती भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळत असेन | खेळत नसेन | खेळलो / खेळले असेन | खेळलो / खेळले नसेन | खेळत जाईन / राहीन | खेळत जाणार / राहणार नाही |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | | | | | | |
| तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | | | | | | |
| ती | | | | | | |
| ते | | | | | | |
| ते | | | | | | |
| त्या | | | | | | |
| ती | | | | | | |

**त. आता ‘लिहिणे’ हे सकर्मक क्रियापद वापरून खालील तक्ता पूर्ण करा.**

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भविष्यकाळ | | पूर्ण भविष्यकाळ | | रीती भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहीत असेन | कविता लिहीत नसेन | कविता लिहिली असेल | कविता लिहिली नसेल | कविता लिहीत जाईन / राहीन | कविता लिहीत जाणार / राहणार नाही |
| आम्ही / आपण | | | | | | |
| तू | | | | | | |
| तुम्ही / आपण | | | | | | |
| तो | | | त्याने | | | |
| ती | | | तिने | | | |
| ते | | | त्याने | | | |
| ते | | | त्यांनी | | | |
| त्या | | | त्यांनी | | | |
| ती | | | त्यांनी | | | |

**थ. ह्याचप्रमाणे ‘कविता’ ह्या नामाऐवजी ‘कविता’ (अ॰व॰), ‘संवाद’ (ए॰व॰ / अ॰व॰), आणि ‘पत्र’ (ए॰व॰ / अ॰व॰) ही नामे वापरून तक्ता पूर्ण करा.**

**द. खाली दिलेल्या गोष्टीमध्ये भविष्यकाळाची योग्य रूपे (सामान्य, अपूर्ण, पूर्ण किंवा रीती) वापरा आणि रिकाम्या जागा भरा.**

एकदा प्रतीकची आजी झाडांना पाणी घालत असताना म्हणाली, "हे बघ प्रतीक, ऊर्जा आपण निसर्गाकडून उसनी घेतलेली असते, म्हणून ती कधी तरी परत करावी लागते."

आजीच्या बोलण्यावर प्रतीक दिवसभर विचार करत राहिला, परंतु त्याला काही तिचे म्हणणे समजले नव्हते. त्या रात्री मात्र त्याने स्वप्नात २०८० साली जग कसे असेल ते पाहिले. दुसऱ्या दिवशी त्याने आजीचे म्हणणे शाळेतील मित्रांना सांगितले. तो आपल्या स्वप्नाबद्दलही बोलू लागला. "आजपासून जवळजवळ चाळीस वर्षांनंतर झाडं माणसांसारखी वागायला लागतील. तुम्ही पाहालच, झाडं आपल्यावर (रागावणे) रागावलेली असतील. त्यांनी आपल्याला सावली देणे बंद (करणे) (१) ----------, पक्षीसुद्धा झाडं सोडून (जाणे) (२) ----------. नद्यांमधील पाणीसुद्धा (संपणे) (३) ----------, पावसाने पृथ्वीला भेट द्यायचं (सोडणे) (४) ----------. देशातील शास्त्रज्ञ मात्र ह्या समस्येच्या निवारणासाठी नवीन उपाय (शोधणे) (५) ----------. आणि अथक प्रयत्नांनी त्यांना काही काळाने यश (येणे) (६) ----------, परंतु तो उपाय सगळ्यांना परवडणारा नसेल. बहुतेक लोक असेच पावसाची वाट (पाहणे) (७) ----------, अनेक लोक सावलीच्या आठवणीत (जगणे) (८) ---------- आणि त्यांच्या लहान मुलांना ही एक परीकथा (सांगणे) (९) ----------, 'बरं का मुलांनो, एक आटपाट नगर होते, तिथे खूप हिरवीगार झाडे होती...'

**२. कंसातील नामाचे सामान्यरूप करा आणि दिलेला प्रत्यय / शब्दयोगी पदे जोडून रिकाम्या जागा भरा. एकवचन-अनेकवचनाकडेही लक्ष द्या.**

क. चित्रवाणीच्या अभिनेत्यांची लोकप्रियता एका (मालिका + पुरती) ---------- असते.

ख. सार्वजनिक (अस्वच्छता + वर ) ---------- सततचे आणि प्रभावी लोकशिक्षण हाच उपाय आहे.

ग. इंग्रजी (भाषा + च्या) ---------- सर्वच (शिक्षिका + ना) ---------- नियमित प्रशिक्षण मिळाल्यास प्रत्येक (शिक्षिका + ला) ---------- शिकवताना आत्मविश्वास वाटेल.

घ. कोणीतरी खोडसाळपणे पसरवलेल्या एका (अफवा + मुळे) ---------- शहरात तणाव निर्माण झालेला आहे.

च. नाव मिळवण्याच्या आपल्या (महत्त्वाकांक्षा + पुढे ) ---------- अप्पांना कशाचीच पर्वा वाटत नव्हती. मुलांचे कसे होणार, ह्या (चिंता + मुळे) ---------- उमावहिनी तर अर्ध्या झाल्या होत्या. त्यांनी नाना ( तऱ्हा + नी ) ---------- अप्पांना समजावण्याचा प्रयत्न केला, पण व्यर्थ.

**३. वाक्य नीट वाचा आणि दिलेल्या नामाचे एकवचनी किंवा अनेकवचनी सामान्यरूप योग्य जागी लिहून वाक्य पूर्ण करा.**

क. कुंडी :
एका -----------मधली माती बदलली आहे. बाकीच्या -----------चे उद्या बघू.

ख. पिढी :
आधीच्या दोन ---------ना मिळून जेवढी माहिती नव्हती, तेवढी आत्ताच्या एका --------ला आहे.

ग. गल्ली :
आमच्या -------ची वीज पाच मिनिटांत आली, पण आजूबाजूच्या -----------चा वीजपुरवठा अजून सुरू झालेला नाही.

घ. उशी :
"मी माझ्या -------ला अभ्रा घातला आहे. इतरांच्या डझनभर -----------ना मी काय म्हणून घालू?"

च. मिशी :
मांजराच्या -------ना राजगिऱ्याच्या लाह्या चिकटल्या होत्या. नंतर तासभर आपल्या ------ची सफाई करण्यात त्याचा वेळ बरा गेला.

**४. नाम + क्रियापद जोड्यांचे अर्थ खाली दिले आहेत, ते कोणत्या 'नाम + क्रियापद' किंवा 'इतर शब्द + क्रियापद' यांच्याशी जुळतात ते लिहा.**

| **नाम + क्रियापद जोडी** | **अर्थ** |
|---|---|
| क. दखल घेणे | १. त्रस्त होणे |
| ख. गंमत वाटणे | २. स्वाभिमानाने जगणे |
| ग. बेजार होणे | ३. मजा वाटणे |
| घ. भेदभाव करणे | ४. एखाद्या गोष्टीचे संकट किंवा त्रास दूर करणे |
| च. कार्यरत राहणे | ५. चांगला – वाईट, उच्च – नीच, काळा – गोरा, शहरी – ग्रामीण असा फरक करणे |
| छ. निवारण करणे | ६. बंधन घालणे |
| ज. ताठ मानेने जगणे | ७. एखाद्या गोष्टीकडे, माणसाकडे लक्ष देणे |
| झ. आळा घालणे | ८. काम करत राहणे |
| ट. वागणूक देणे | ९. एखाद्याला विशिष्ट प्रकारे वागवणे |

# तोंडी परीक्षा

एकूण गुण १५

१ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)

**१. खालील पत्र सर्व शब्दांच्या योग्य उच्चारांसहित मोठ्याने वाचून दाखवा. (३)**

प्रिय ज्योती,

तुझं पत्र मिळून चार दिवस झाले, पण उत्तर लिहायला वेळच मिळाला नाही. नाही म्हटलं तरी घरात लक्ष घालावंच लागतं ना! परवा एक गंमतच झाली. त्या चांदणीनं पैसे चोरले असं जान्हवीचं म्हणणं होतं. मी म्हटलं, चार पैसे चोरले असतीलही, पण ती चांगलं काम करते गं! झाडते, स्वच्छता करते. जाऊ दे ना! त्या गोंधळात सगळ्यालाच उशीर झाला. चित्रानं भाजी चिरून ठेवलीच होती. मग जान्हवीला म्हटलं, चटकन चार पोळ्या करू आणि जेवून घेऊ. मग जहाजांच्या प्रतिकृतींचं प्रदर्शन पाहायला आम्हाला झेलमला घेऊन जायचं होतं. जान्हवीला म्हटलं, "क्षणभर विचार कर, क्षुल्लक कारणावरून किती चिडतेस तू!" झेलम झोपाळ्यावर खेळत होती; नंतर ती झोपली. आम्हीही थोडी झोप घेतली आणि मग निघालो. तिथे खूप गर्दी होती, त्यामुळे झेलम जाम दमली.

काल तो ज्ञानेश आला होता नळाचं काम करायला. नळातून पाणी झिरपत होतं. चटकन काम केलं त्यानं. खरंच, तो ह्या कामातला तज्ज्ञ आहे हं! थोडा झंगड आहे, पण हुशार आहे.

तुझी

आई.

**२. पुढीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या. (२)**

क. पत्रलेखिकेचं ज्योती आणि झेलम ह्यांच्याशी काय नातं असावं?

ख. उताऱ्यात उल्लेख केलेल्या दोन स्त्रिया – चांदणी आणि चित्रा ह्या कोण आहेत?

ग. ज्ञानेश कशासाठी घरी आला होता? त्याचे वर्णन करण्यासाठी कोणते शब्द वापरले आहेत?

घ. खालील शब्दांचे योग्य उच्चार करा.

१. झेलणे, झोडपणे, झिडकारणे

२. जोरात, जागरण, जीवन

३. चुचकारणे, चार, चमचा

## २ संवाद साधा.

(एकूण गुण ५)

**खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर तुमच्या जोडीदाराबरोबर संवाद साधा. जोडीदाराबरोबर खालीलपैकी एक विषय ठरवा आणि दिलेल्या मुद्द्यांचाही विचार करा. तयारीसाठी वेळ १० मिनिटे.**

क. मोठ्या शहरात राहण्याचे फायदे आणि तोटे. (मोठ्या शहरात येणारे अनुभव, शहराची चांगली आणि वाईट बाजू इ॰)

ख. शहरात राहताना कोणती सामाजिक मूल्ये पाळावी लागतात? (इतर संस्कृतींबद्दल आदर, स्वच्छतेचे आणि वाहतुकीचे नियम इ॰)

## ३ चित्रवर्णन

(एकूण गुण ५)

**१. खाली दिलेल्या चित्रांपैकी एका चित्राचे वर्णन करा.**

क. तुम्ही हे चित्र का निवडलंत?

ख. ह्या चित्रात कोणता विषय हाताळला आहे?

ग. चित्रात हाताळलेला विषय तुम्हाला गंभीर वाटतो का?

घ. ह्या विषयांवर तुम्हाला कोणती उपाययोजना सुचवावीशी वाटते?









# लेखी परीक्षा

एकूण गुण ३५

१ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)

हे शहर वेगळंय. ह्या शहरातल्या गोष्टी वेगळ्या आहेत. हे शहर शिकवतं, घडवतं. फक्त ते बघायला जमलं पाहिजे. मी रोज शिकत होते, घडत होते. कामाच्या शोधात कित्येक वर्षांपूर्वी ह्या शहरात आलेल्या आणि इथे टॅक्सी चालवणाऱ्या भैयांशी बोलून मला हे शहर कळत गेलं. हॉस्टेलमध्ये उरलेलं अन्न रोज रात्री स्टेशनवर बसणाऱ्या भिकाऱ्यांना द्यायला गेल्यावर मला ह्या शहराची एक वेगळी बाजू दिसली. दिवसभराची धावपळ संपल्यावर रात्री त्याच फूटपाथवर रांगा लावून झोपणारे, थंडीत कुडकुडणारे लोक पाहिल्यावर मला हे शहर कळत गेलं. [...] ह्या शहरानं मला स्वातंत्र्य दिलं आणि त्या स्वातंत्र्याबरोबर येणाऱ्या जबाबदारीची जाणीवही. घरापासून लांब राहताना पदोपदी येणाऱ्या अडचणींशी लढण्याची ताकद दिली. आजारी पडल्यावर बेडजवळ बसून राहणाऱ्या आणि काळजी घेणाऱ्या मैत्रिणी दिल्या. पैसे संपत आले की घरून मागायचे नाहीत, असं ठरवल्यावर करायची काटकसर शिकवली. [...] हे शहर जितकं मुक्त आहे तितकंच ते सक्तपण आहे. ते तुम्हाला जितकं देतं, त्याहून कितीतरी अधिक ते तुमच्याकडून घेतं. [...] ह्या शहरानं मला बरंच काही दिलं. इथे मला चांगली-वाईट माणसं भेटली. इतक्या मोठ्या शहरात एकटी राहताना येणाऱ्या अनुभवातून मला हे शहर शिकवत गेलं. घडवत गेलं. [...] त्यानं मला जे काही दिलंय, मला जे बनवलंय, ते माझ्याजवळ आयुष्यभर राहील. ह्या शहराबरोबर माझं एक रोमँटिक नातं आहे आणि हे अफेअर कधीच संपणार नाही. मी अजूनही ह्या शहरात येते, इथल्या माझ्या आवडत्या भागात मस्त एकटी फिरते, जहांगीर आर्ट गॅलरीत चक्कर टाकते आणि मरीन ड्राइव्हला बसून सूर्यास्त पाहते. मी जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही गेले, तरी हे सगळं नित्यनियमानं होत राहील.

- अमृता शेडगे

क. ह्या शहराने लेखिकेला काय काय दिले?

ख. ह्या शहराने लेखिकेला काय शिकवले?

ग. लेखिकेच्या ह्या शहराशी असलेल्या नात्याचे वर्णन तुम्ही कसे कराल?

घ. शहराच्या कोणत्या भागात फिरायला लेखिकेला अजूनही आवडते?

च. ह्या शहराची ओळख तुम्हाला पटली का? शहराचे नाव सांगा आणि ओळख कशावरून पटली तेही सांगा.

## २ व्याकरण (एकूण गुण २२)

**१. खाली दिलेल्या शब्दांपैकी योग्य ते शब्द भरून संवाद पूर्ण करा. (३)**

(थोडं, फार, दुप्पट, किंचित, तिप्पट, जराशी)

**आई** : संध्या, अगं स्वयंपाक करताना बहुतेक गोष्टी अंदाजाने घ्यायच्या असतात. मी म्हटलं ना ------------ आलं घे म्हणून? ही फूटपट्टी कशाला आणलीस मोजायला? हो, आणि आल्याच्या ------------ मिरची घे. ती जास्त लागते.

**संध्या** : आई, एक वाटी रवा घेतलाय. मग मीठ किती लागेल?

**आई** : तेपण अंदाजाने घालायचं. बघू किती घेतलंयस! हं, घाल अजून ------------.

**संध्या** : नको गं, ------------ खारट होईल मग.

**आई** : काही नाही होत खारट. त्यात अजून ------------ साखर पडायचीय चवीला.

**संध्या** : आई, पण सांजा किती कमी दिसतोय.

**आई** : अग, त्यात पाणी घालून वाफ आणली, की फुगून आहे त्याच्या ———— सांजा तयार होईल बघ.

**२. योग्य जागी 'अलीकडे' आणि 'पलीकडे' हे शब्द वापरून उतारा पूर्ण करा. (२)**



हे चित्र पाहिलंस ना? आम्हाला जायचंय नदीच्या ------------. ती मोठी घरं दिसतायत ना, तिथे. अंजुमनचं घर तिथेच आहे. तिथे ------------ लोकवस्ती आहे. इथे नदीच्या ------------ मात्र फक्त हे बंदर आहे. आणि हो, काही कार्यालयंही नदीच्या ------------ इथे जवळच आहेत.

**३. ह्यांपैकी कोणत्या गोष्टी केल्या पाहिजेत किंवा करता कामा नयेत ते पूर्ण वाक्ये लिहून सांगा. (२)**

क.  ------------------------------------------------------------

ख.  ------------------------------------------------------------

ग.  ----------------------------------------------------

घ.  ----------------------------------------------------

**४. योग्य शब्द लिहून वाक्ये पूर्ण करा.** **(३)**

(बहुधा, बहुतेक, खात्रीने, नक्की, मुळीच, कदाचित)

**अभिजित** : आभाळ अगदी भरून आलंय, पाऊस पडेल ------------.

**सुजित** : मला नाही वाटत असं. वारा किती सुटलाय! ढग वाहूनही जातील ----------.

**अभिजित** : आज नाही पडला तर उद्या ------------ पडेल पाऊस. मी हवामानवृत्त वाचलंय.

**सुजित** : असं म्हणतोस? नाही, मग तर ------------ नाही पडणार पाऊस.

**अभिजित** : मला वाटतंय, ह्यावेळी हवामानवृत्त ------------ बरोबर ठरेल. त्यांनी ओळीनं तीन वेळा चुकीचा अंदाज केलाय.

**सुजित** : मी तुला सांगतो, त्यांचा अंदाज ----------- बरोबर येणार नाही. ते ----------- कधीच काही सांगत नाहीत. त्यांचा नेहमी अंदाजच असतो.


**५. खालील वाक्यांमध्ये शुद्ध शब्दयोगी अव्ययांचा वापर केलेला आहे. वाक्यांमधील शुद्ध शब्दयोगी अव्यये काढून वाक्ये परत लिहा.** **(२)**

क. तोच म्हणाला होता की आपण सहलीला जाऊ या.

ख. तीपण आली असती सहलीला, पण वेळेचा प्रश्न आहे.

ग. वेळ असता तर आईदेखील आली असती.

घ. त्यांनाही विचार सहलीचं.



६. **खालील वाक्यांमध्ये योग्य जागी 'विषयी, संबंधी, बद्दल' ही शब्दयोगी अव्यये वापरून गाळलेल्या जागा भरा. अव्यय जोडताना नामाच्या वचनाकडे आणि सामान्यरूपाकडे लक्ष द्या.** **(३)**

क. (तो) ------------------ बोलताना जरा जपूनच बोल; तो सहकारी आहे ना तुझा!

ख. आपल्या व्याख्यानात (पक्षी) ------------------- माहिती सांगताना तो अगदी भरभरून बोलत होता.

ग. प्रत्येकाने (विषय) ------------------- च प्रश्न विचारावेत; विषय सोडून बोलू नये.

७. **खालील वाक्यांमध्ये क्रियापद आणि प्रयोजक क्रियापदांच्या जोड्या वापरून वाक्ये पूर्ण करा.** **(४)**

(फिरणे-फिरवणे, हसणे-हसवणे, मिळणे-मिळवणे, सोडणे-सोडवणे)

क. पोलीस चोराला ------------------- तयार नव्हते, पण वकिलांनी त्याला जामिनावर -------------------.

ख. गर्दीत घुसून तिने अमिताभ बच्चनची सही ------------------------. त्याबद्दल आईकडून तिला शाबासकी -------------------.

ग. तो ------------------- गेला होता तेव्हाच त्याने कुत्र्यालाही ------------ आणले.

घ. सखी खरंच खूप रुसली होती. ------------------- कितीही प्रयत्न केला, तरी ती ------------------- नाही.

८. **'जितका - तितका किंवा जेवढा - तेवढा' वापरून अर्थपूर्ण वाक्य तयार करा.** **(३)**

| | | |
|---|---|---|
| १. अभ्यास | | प्रदूषण |
| २. वाहने | | अडचणी |
| ३. लोकसंख्या | | मार्क |

## ३ शब्दसंपदा (एकूण गुण ५)

**छ, ज्ञ, भ, ळ, ण ह्या अक्षरांनी सुरुवात किंवा शेवट होणारे प्रत्येकी दोन शब्द लिहा.**

## ४ श्रुतलेखन (परीक्षकांसाठी उतारा शेवटी दिला आहे.) (एकूण गुण ३)

# परीक्षकांसाठी

**श्रुतलेखनासाठीचा उतारा**

हे एकविसावे शतक आहे, मने! माणसाने प्रगती बघ किती केली आहे! केवढी टोलेजंग बांधकामे होत आहेत! गाड्या धावत आहेत आणि त्यांना रस्ते अपुरे पडत आहेत. इथे हा झगमगता बाजार दिसतो आहे. खरेदी करणाऱ्यांची झुंबड उडते आहे. पैसे खर्च करण्यासाठी आपल्याला आणखी चार-दोन हात का नाहीत, अशी खंत त्यांना वाटत आहे.

मने, तिकडे कुठे बघते आहेस? तुला ना, नको त्या वेळी नको त्या गोष्टी दिसतात. काय म्हणते आहेस? जगात बरीचशी माणसे गरीब आहेत, अनेक मुलांना शिक्षण मिळत नाही, पर्यावरणाचा नाश होतो, प्रदूषण वाढते...? झाली हिची पिरपिर सुरू. मने, प्रगती करायची म्हणजे हे सगळे होतच असते. अगं, खूप लोक गरीब असतात म्हणून तर काही लोक श्रीमंत होतात, एवढी साधी गोष्ट तुला कळत कशी नाही? फारच हट्टी आहेस बुवा तू!

# तोंडी परीक्षा

एकूण गुण २५

१ वाचन आणि आकलन. (एकूण गुण ५)

१. **खाली दिलेली बातमी वाचून दाखवा आणि त्यावर विचारलेल्या कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे द्या. (तयारीसाठी एकूण ५ मिनिटे)**

**इच्छामरण हवे : मुंबईतील वृद्ध दाम्पत्याची विनवणी**

**आम्हाला फाशी द्या!**

**लोकमत न्यूज नेटवर्क**

**मुंबई :**'सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाचा दिलेला निर्णय आमच्यासाठी नाही. आम्ही राष्ट्रपतींना लिहिलेल्या पत्राचा ह्या प्रकरणात विचारच करण्यात आलेला नाही. आम्हाला मरण हवंय. कायद्याने आम्हाला फाशी द्या...' अशी विनवणी गिरगावातील लवाटे दाम्पत्याने राष्ट्रपती रामनाथ कोविंद ह्यांना केली आहे.

गिरगावात झावबावाडीतील लक्ष्मीचाळीत राहणारे नारायण लवाटे आणि इरावती लवाटे हे दोघे १९८७ सालापासून इच्छामरणासाठी सरकारदरबारी पाठपुरावा करत आहेत. "आमच्यासारख्या धडधाकट माणसांना इच्छामरण हवं असल्यास त्यांनी कोणाकडे जावे?", असा प्रश्न इरावती ह्यांनी शासकीय यंत्रणांना विचारला आहे. "अवयवदान करण्याची आम्हा दोघांची इच्छा आहे, आम्हाला कुठलाही आजार नाही. त्यामुळे अवयवदान करून वेळीच कोणाच्या तरी उपयोगी पडण्याची इच्छा आहे. दोन्ही पायांवर शस्त्रक्रिया झाल्यापासून आता आमचं बाहेर फिरणं बंद झालं आहे. त्यामुळे सार्वजनिक आयुष्य फारसं उरलेलं नाही. आम्हाला परावलंबन नको, म्हणून इच्छामरण हवंय", इरावती ह्यांनी 'लोकमत'ला सांगितले.

क. ह्या बातमीमध्ये कोणता विषय मांडला आहे? त्या विषयाबद्दल तुमचे मत काय आहे?

ख. 'सर्वोच्च न्यायालयाने इच्छामरणाचा दिलेला निर्णय आमच्यासाठी नाही' असे लवाटे दाम्पत्य का म्हणत आहे?

ग. लवाटे दाम्पत्याला अवयवदान कोणत्या कारणासाठी करायचे आहे?

## २ चित्रवर्णन

(एकूण गुण ५)

१. खाली काही चित्रांच्या जोड्या दिल्या आहेत. ह्या जोड्यांनुसार दोन परीक्षार्थ्यांच्या जोड्या करा. प्रत्येक परीक्षार्थ्याला चित्रांच्या जोडीतील एक चित्र मिळेल. पुढे दिलेल्या प्रश्नांच्या मदतीने आपल्याला मिळालेल्या चित्राचे वर्णन करून एकमेकांशी संभाषण करा.

परीक्षार्थी १

परीक्षार्थी २













**जोडीदाराला विचारण्यासाठी प्रश्न** : चित्रामध्ये काय दिसत आहे? चित्रामध्ये कोणता विषय मांडला आहे? ह्या विषयावर तुमचे मत काय आहे? ...

## ३ संवादकौशल्य (एकूण गुण ५)

१. संवादासाठी काही विषयांच्या चिठ्ठ्यांच्या जोड्या खाली दिल्या आहेत. परीक्षार्थ्यांच्या जोड्या करा. प्रत्येक परीक्षार्थ्याला दोनांपैकी एक चिठ्ठी मिळेल. चिठ्ठीमध्ये दिलेल्या सूचनेनुसार आपल्या जोडीदाराशी संवाद साधा. एकट्याने तयारी करण्यासाठी १० मिनिटे वेळ आहे. तुम्ही टिपणे काढू शकता, पण नंतर कागदाकडे न बघता बोला.

| परीक्षार्थी १ | परीक्षार्थी २ |
| --- | --- |
| तुमच्या घरी एक सण साजरा करतात, तो तुम्हाला अजिबात आवडत नाही. त्याविषयी तुमच्या जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : सणाचे नाव, तो साजरा करण्याची पद्धत, तो न आवडण्याची कारणे... | तुमच्या घरी एक सण साजरा करतात, तो तुम्हाला खूप आवडतो. त्याविषयी तुमच्या जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : सणाचे नाव, तो साजरा करण्याची पद्धत, तो आवडण्याची कारणे... |
| तुम्ही नुकतेच एका वेगळ्याच व्यक्तीला भेटलात. त्या व्यक्तीविषयी तुमच्या जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : कुठे आणि कशी भेट झाली?, त्या व्यक्तीचे वेगळेपण, ती व्यक्ती आवडण्याची कारणे... | तुम्ही नुकतेच एका वल्लीला भेटलात. त्या वल्लीविषयी जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : कुठे आणि कशी भेट झाली?, त्या व्यक्तीला तुम्ही ‘वल्ली’ का म्हणाल?... |
| एक नवी भाषा शिकण्याचा तुमचा अनुभव खूप चांगला आहे. तुमच्या भाषावर्गाच्या फायद्यांविषयी तुमच्या जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : नवी भाषा शिकण्याची कारणे, भाषा शिकण्याची गंमत, स्वतःच्या भाषेशी तुलना... | एक नवी भाषा शिकताना त्याचे काही तोटे तुमच्या लक्षात आले आहेत. त्याविषयी तुमच्या जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : नवी भाषा शिकण्याची कारणे, भाषा शिकताना आलेल्या समस्या, स्वतःच्या भाषेशी तुलना... |
| सरकारी कचेरीत तुम्हाला आलेल्या एका वाईट अनुभवाबद्दल तुमच्या जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : कचेरीत जाण्याचे कारण, तिथे अनुभवलेला गोंधळ, कर्मचाऱ्यांनी दिलेली वागणूक... | सरकारी कचेरीत तुम्हाला आलेल्या एका चांगल्या अनुभवाबद्दल तुमच्या जोडीदाराशी बोला.<br>मुद्दे : कचेरीत जाण्याचे कारण, तिथे अनुभवलेली शिस्त, कर्मचाऱ्यांनी दिलेली वागणूक... |

# ११ अंतिम चाचणी

## ४ शब्दसंपदा (एकूण गुण १०)

**१. परीक्षकाने खाली दिलेल्या शब्दांच्या चिठ्ठ्या कराव्यात आणि मग त्या मिसळून टेबलावर ठेवाव्यात. परीक्षार्थ्याने समोर ठेवलेल्या चिठ्ठ्यांच्या दहा योग्य जोड्या लावाव्यात.** **(५)**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| माल | देणे | पंचाईत | बसवणे | येणे | काढणे |
| अर्थ | उडणे | तंबू | पिच्छा | देणे | गोंधळ |
| वाटणे | रुची | राजीनामा | ठोकणे | पुरवणे | लावणे |
| नाटक | कळ | झोप | खपवणे | होणे | थवा |
| किल्ल्यांचा | चळत | पक्ष्यांचा | कळप | जुडगा | झुंड |
| केळ्यांचा | घड | पुस्तकांची | गव्यांची | गायींचा | |

**२. प्रत्येक परीक्षार्थ्याला एक सूचना मिळेल. परीक्षक खालील विधाने वाचतील, त्यावर तुम्हाला मिळालेल्या सूचनेनुसार योग्य प्रतिक्रिया द्या.** **(५)**

क. इंग्रजी माध्यमातून शिकण्याला आज दुसरा चांगला पर्याय नाही.

ख. पुरुषांनीच स्वयंपाक केला पाहिजे.

ग. मोठ्या शहरात राहायचे असेल, तर पर्यावरणाची पर्वा करून चालत नाही.

घ. धूम्रपान केल्याने कर्करोग होतो.

च. कोणालाही काही शिकवू नये.

सूचना

| | | |
|---|---|---|
| 'कडाडून', 'विरुद्ध', 'अशक्य' ह्यांपैकी एक शब्द वापरून एका वाक्यात विरोध दर्शवा. | 'दृष्टिकोन', 'अनुभव', 'सारासार विचार' ह्यांपैकी एक शब्द वापरून एका वाक्यात तुमचे मत सांगा. | 'सहमत', 'दुजोरा', 'तुमच्याच मताचा' ह्यांपैकी एक शब्द वापरून एका वाक्यात सहमती दर्शवा. |

# लेखी परीक्षा

एकूण १०० गुण

१ वाचन आणि आकलन. (एकूण गुण १०)

**मैत्री**

तुझी – माझी मैत्री व्हावी,
हो, खरंच 'मैत्री',
"पण मैत्री म्हणजे नक्की काय?" विचारतेस, तर मला जरा वेळ दे, म्हणजे मी ते सांगण्याचा प्रयत्न करतो :

मैत्री म्हणजे ... म्हणजे ...
म्हणजे, तुला माझ्याविषयी काहीतरी वाटत राहावं आपुलकीचं
आणि अर्थात मलाही तुझ्याविषयी, तसंच,
म्हणजे की, आपणास वाटत राहावी काळजी, एकमेकांची,
म्हणजे जशी काळजी घेतली जाते आपल्या शेताची,
राहत्या घराची,
किंवा काळजी घेतो आपण आपल्या शरीराची,
आपल्या मनाची,
आपली, आपली स्वतःची,
आपल्या कपड्यालत्त्यांची, वस्तूंची, चपलांची,
पाळण्यात झोपलेल्या मुलाची,
फुलदाणीत ठेवलेल्या फुलांची
घरात केवळ तांब्याभर उरलेल्या पाण्याची
आगपेटीत उरलेल्या शेवटच्या काडीची,

मैत्री म्हणजे, ... म्हणजे,
मला खूप आधार वाटावा तुझा;
जसा पक्ष्यास झाडाचा, रोपास कुंडीचा,
मी बोलतो माझ्याशी, माझ्या मनाशी, विचार करताना...
अनुभवताना,
तसंच बोलता यावं मला तुझ्याशी,
तू अस, तू नस, मी बोलत राहतोही तुझ्याशी
वाटतं, कधी फिरतो – वागतो, तू म्हणूनच जगात!
(...)

- शंकर वैद्य

**१. योग्य अर्थाच्या शब्दाभोवती वर्तुळ करा. (४ गुण)**

क. काळजी : चिंता, विचार, आठवण
ख. आधार : मदत, साहाय्य, पाठबळ
ग. आपुलकी : राग, आपलेपणा, गोडवा
घ. मैत्री : सहवास, सान्निध्य, शब्दांत न सांगता येणारे नाते

**२. कवितेतील ही वाक्ये अर्थ न बदलता वेगळ्या शब्दांत लिहा. (६ गुण)**

क. मैत्री म्हणजे, तुला माझ्याविषयी काहीतरी वाटत राहावं आपुलकीचं.

_______________________________________

_______________________________________

_______________________________________

तेव्हा त्याला मैत्री म्हणतात.

ख. तू अस, तू नस, मी बोलत राहतोही तुझ्याशी.

_______________________________________

किंवा

_______________________________________

ग. आपणास वाटत राहावी काळजी, एकमेकांची; म्हणजे जशी काळजी घेतली जाते आपल्या शेताची...

जितकी काळजी _______________________

_______________________________________

_______________________________________

## २ लेखन

(एकूण गुण १०)

१. तुम्ही 'मैत्री' ह्या नात्याची व्याख्या कशी कराल? मैत्रीशी संबंधित तुमचा अनुभव लिहा. (१५-२० ओळी)

किंवा

२. तुमच्या घरी चोरी झाली आहे. अनेक मौल्यवान वस्तू चोरीला गेल्या आहेत. तुमच्या परिसरातील पोलीस चौकीत तक्रार नोंदवण्यासाठी अर्ज लिहा. (८-१० ओळी)

किंवा

३. खालील चित्रांच्या मदतीने एक गोष्ट लिहा. (१५-२० ओळी)



## ३ व्याकरण

(एकूण गुण ६५)

१. खालील उताऱ्यातील कोणतीही पाच भाववाचक नामे शोधा आणि ती कोणत्या शब्दांपासून तयार झाली आहेत ते सांगा. (५)

### माझे लहानपण

आमच्या घराला आळशीपणा, कामचुकारपणा किंवा कंटाळा माहीत नव्हता, त्यामुळेच गरिबीही माहीत नव्हती. नेटकेपणा, शिस्त, वक्तशीरपणा ह्यांत ढिलेपणा अजिबात खपत नसे. सगळे कसे एका आखून दिलेल्या रेषेत चालत असे. नियम कुटुंबातील सर्वांसाठी सारखेच होते, पण मुलांसाठी ते विशेष कडक होते. माझ्यासारख्या हळव्या वृत्तीच्या मुलाच्या बाबतीत तर हा कडकपणा अधिकच काटेरी होत असे. मुलगा होतो ना मी! प्रेमळपणा, गोडवा, नाजुकपणा, लाघव, वेंधळेपणा, स्वप्नाळूपणा असले 'दुर्गुण' माझ्यातून हुसकून काढून टाकण्याची आणि मला कणखर करण्याची जबाबदारीच जणू सगळ्या कुटुंबाने घेतली होती. माझा उपहास आणि अपमान करण्याचा सर्वांनाच अधिकार होता आणि ते मुक्तपणे त्या अधिकाराचा वापर करत असत. अशा वातावरणात मला माझे लहानपण अगदी नकोसे झाले होते.

| भाववाचक नामे | मूळ शब्द |
|---|---|
| क. | |
| ख. | |
| ग. | |
| घ. | |
| च. | |

**२. कंसात दिलेल्या क्रियापदांची योग्य रूपे वापरून वाक्ये पूर्ण करा.** **(५)**

(नाचणे / नाचवणे, झोपणे / झोपवणे, रडणे / रडवणे, बसणे / बसवणे, जागणे / जागवणे)

क. नमिताचा मुलगा रात्री नीट झोपत नाही. तो तिला ------------------ आणि स्वतःही ------------------.

ख. अंकिता खूप छान ------------------ आणि स्वतःच्या तालावर नवऱ्यालाही ------------------------.

ग. सर्व पाहुण्यांना सभागृहात त्यांच्या जागांवर ------------------ त्यानंतर सर्व स्वयंसेवक आपापल्या जागांवर ------------------.

घ. शोकांतिका पाहून मनीषा नेहमीच ढसाढसा ------------------. त्यामुळे असे ------------------णारे सिनेमे बघायला हेमंत कधीच तिच्याबरोबर जात नाही.

च. समीर आधी बाळाला ------------------ नंतर स्वतः ------------------.

**३. योग्य ते उत्तर निवडून त्यावर बरोबरची खूण करा.** **(५)**

क. ------------------ वेगाने धावणे कासवाला जमले नाही. (ससाइतक्या / सशाइतक्या)

ख. संदीपला ----------------- पोचायला उशीरच झाला होता. (ऑफिसात / ऑफिशात)

ग. ----------------- प्रश्नाचे हे उत्तर नाही. (तोच्या / त्याच्या)

घ. ह्या प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी शाळेच्या ------------------ स्वीकारली होती. (मुख्याध्यापकनी / मुख्याध्यापकांनी)

च. ----------------- पहिली मुलींची शाळा सुरू झाली. (भिडेचा वाडेत / भिड्यांच्या वाड्यात)

**४. चौकटीतील योग्य क्रियापद निवडून कोणत्याही पाच रिकाम्या जागा भरा. (५)**

आठवण्याचा, घेण्याचा, करण्याची, जिंकण्याचा, खेळण्याची, शिकण्याची,
हरण्याचा, शिकवण्याची, जिंकल्याचा, भेटायचं

प्रिय धनश्री,

कालचं मराठी वर्तमानपत्र वाचलंस का? बहुतेक नाही. बघ, पहिल्याच पानावर आपल्या शाळेत नव्याने बांधलेल्या बॅडमिंटन हॉलचा फोटो आहे. नीट बघ, मी दिसतेय खेळताना. हो, मला स्पर्धेचा पहिला सामना -------------- संधी मिळाली.

शाळेत असताना आपला काय मस्त संघ होता ना! दरवर्षी आपण जोरदार तयारी करायचो. विजेतेपद मिळवण्यासाठी कितीही कष्ट -------------- आपली तयारी असायची. अपार कष्ट करणे हाच एक हमखास -------------- मार्ग आहे हे आपल्याला माहीत होते. आपण प्रशिक्षकाकडून नवे डावपेच -------------- आणि इतरांना ते -------------- धडपड करायचो. -------------- विचारही कधी मनात आणला नाही. मग सामना -------------- आनंद, चषक हातात -------------- तो थरार! विसरलीस का गं!

-------------- नुसता प्रयत्न तर कर! फोन कर मला, मग आपण -------------- ठरवू. मेलचं उत्तर लगेच दे.

विदुला.

**५. पुढील शब्दांना तून / मधून प्रत्यय लावून रिकाम्या जागा भरा. (५)**

**घर, अंगण, आकाश, फांदी (अ॰व॰), स्वयंपाकघर, पेला, विहीर, बाग, जाळी, बैलगाडी, आमराई**

गावचं आजोळचं घर किती छान होतं. आणि सुट्टीत तर किती मजा यायची तिथे राहायला. दिवसभर ------------ अंगणात आणि ------------ घरात असा नुसता धुमाकूळ चालायचा आमचा. आम्ही एकूण २६ आते-मामे भावंडं. पुढच्या चौकात सलग गाद्या घालून झोपायचो. रात्री भुतांच्या गोष्टी सांगून लहानांना घाबरवायचो. झाडांच्या ------------ अंगावर पडणाऱ्या सूर्याच्या किरणांनी सकाळी जाग यायची. डोळे उघडतायत, इतक्यात ------------ आजीची हाक यायची, “या रे पोरांनो, बत्तासा घालून गरम गरम दूध ठेवलंय. आधी येईल त्याला चांदीच्या ------------ मिळेल हं!” मग ही गडबड उडायची आमची. दुपारी आजोबांबरोबर ------------ बाजारात जाणे, ------------ पाणी काढणे,

घरामागच्या ------------ पूजेसाठी फुले आणणे, डोंगरावरच्या करवंदाच्या ------------ करवंदे तोडून आणणे आणि ------------ आणलेले घरचे आंबे पिकून कधी खायला मिळतात ह्याची वाट बघत बसणे, अशा आम्हा भावंडांच्या आजोळच्या सुंदर आठवणी!

**६. दिलेल्या क्रियापदांची '-णे, -ताना, -ऊन, -त, -ने' असे प्रत्यय लावून कृदन्ते तयार करून खालील मुद्द्यांच्या मदतीने उतारा पूर्ण लिहा. (५)**

उदा॰ सकाळी उठणे – अंघोळ करणे : मनोज सकाळी उठून आधी अंघोळ करतो. ...

अंघोळ करणे – गाणे म्हणणे, चहा पिणे – वर्तमानपत्र वाचणे, औषध घेणे – ताप जाणे, ऑफिसातून येणे – भाजी आणणे, आधी नाश्ता करणे – स्वयंपाक करणे, रेडिओ ऐकणे व भाजी चिरणे

**७. खाली दिलेल्या कोणत्याही पाच नाम + क्रियापदांच्या जोड्या वापरून एकूण पाच वाक्ये लिहा. (५)**

उदा॰ उबग येणे : रोज तेच तेच काम करण्याचा उबग आला आहे मला!

क. वेळ लागणे : ------------------------------------------------------------

ख. कळ येणे : ------------------------------------------------------------

ग. संरक्षण करणे : ------------------------------------------------------------

घ. संकल्प सोडणे : ------------------------------------------------------------

च. भूक लागणे : ------------------------------------------------------------

छ. आवर घालणे : ------------------------------------------------------------

ज. मार्ग दाखवणे : ------------------------------------------------------------

झ. भांडवल करणे : ------------------------------------------------------------

**८. खाली दिलेल्या शब्दांबरोबर कोणते क्रियापद येते ते लिहा. (कोणतेही पाच) (५)**

क. पाठ ------------------

ख. हुसकावून ------------------

ग. गुरफटत ------------------

घ. उत्सुक ------------------

च. नामशेष ------------------

छ. आत्मसात ------------------

ज. मनावर ------------------

झ. लक्षात ------------------

**९. खाली दिलेली गोष्ट नीट समजून घ्या आणि कंसातील क्रियापदाचे योग्य काळातील योग्य रूप वापरून रिकाम्या जागा भरा. (१५)**

एकदा एका युवकाने बुद्धांकडून दीक्षा घेतली. तो युवक (असणे) ---------- एक राजपुत्र. चैनीतच त्याचा जन्म (जाणे) -------------------. नंतर तो संन्यासी (होणे) ----------------. ते म्हणाले, “हा कधी राजवाड्याच्या बाहेरही (न पडणे) -------------------------. कधी रथातून उतरला नाही. ज्या रस्त्यावरून तो चालत असे, त्यावर मखमली गालिचे पसरले (जाणे) -------------------. हा भिक्षू बनेल अशी त्याच्या आई-वडिलांनी कधी कल्पनाही (न करणे) --------------------------. त्यांना वाटले, ह्याला वेड (लागणे) ------------------- का?”

किमती गालिच्यांखेरीज कुठे पायही न ठेवणारा तो राजपुत्र आता भिक्षूंसह रस्त्यावरून जाऊ (लागणे) ----------------. इतर सारे भिक्षू जेव्हा राजमार्गावरून चालत असत, तेव्हा तो मात्र काट्यांनी भरलेल्या पायवाटांवरून (जाणे) ------------. सहा महिन्यांतच त्याचे शरीर सुकून काडीसारखे झाले. त्याच्या पावलांना जखमा (होणे) ------------. सहा महिन्यांनी बुद्ध त्याच्यापाशी आले आणि त्याला म्हणाले, “वीणेच्या तारा जर अतिशय सैल पडल्या तर संगीत निर्माण होईल का?” श्रमणक म्हणाला, “वीणेच्या तारा फार सैल पडल्या, तर त्यांतून संगीत निर्माण (न होणे) ---------------------.” तेव्हा बुद्ध म्हणाले, “आणि तारा फार ताणल्या गेल्या तर?” श्रमणक उत्तरला, “अतिशय ताणून धरलेल्या तारांतूनही संगीत निर्माण होणार नाही. खूप ताणलेली तार छेडताक्षणीच तुटून (जाणे) ----------------.” बुद्ध म्हणाले, “तर मग संगीत कधी निर्माण होते?” श्रमणक म्हणाला, “फार ताणलेल्या नाहीत आणि फार सैल नाहीत अशा अवस्थेत जेव्हा तारा (असणे) ----------------, तेव्हाच संगीत निर्माण होईल.” त्यावर बुद्ध म्हणाले, “बस! मला उत्तर (मिळणे) ----------------. मी हेच तुला सांगायला (येणे) ---------------- - जो नियम त्या वीणेच्या बाबतीत, तोच जीवनाच्या वीणेबाबत आहे.”

**१०. योग्य शब्द निवडून खाली दिलेल्या मुलाखतीतील रिकाम्या जागा भरा. (१०)**

**कडं, विषयी, सारखा, पूर्वी, बाहेर, च, केवळ, बद्दल, ही, तसं**

महिला नेहमी सुंदर दिसण्याचं दडपण का घेतात, असं अमला ह्या दक्षिण भारतीय अभिनेत्रीला विचारल्यावर त्या म्हणाल्या, "महिलांचं वय वाढू नये अशी एक मानसिकता आहे. तरुण असताना प्रत्येक जण सुंदरच दिसतो. वय वाढू लागतं -------------



आजूबाजूचे लोक तुमचे तरुणपणीचे फोटो काढून तुलना सुरू करतात. तुम्ही कसे होतात आणि आता कसे झालात, अशी तुलनाही सुरू होते. पण माणूस दोन वेगवेगळ्या वयांमध्ये ------------- च कसा दिसू शकेल?" सेलिब्रेटी स्वत:हून ------------- दडपण आणतात की प्रसारमाध्यमांकडून दबाव आणला जातो? ह्या ------------- अमला सांगतात, "मी कुठेही ------------- गेले तरी लोक माझ्या ------------- काय बोलत आहेत ह्या ------------- माझं लक्ष असतं. लोक काही ------------- बोलू शकतात. बोलण्या ------------- ते विचार करत नाहीत. 'तुमचा रंग काळा होऊ लागला आहे का?', 'तुमचं वजन वाढलं आहे का?' असं काहीबाही विचारतात. ही ------------- माझी अवस्था नाही, हे सगळ्यांबाबत घडतं," असं त्या म्हणाल्या.

## ४ शब्दसंपदा (एकूण गुण ५)

**१. खाली दिलेल्या सूचनेनुसार कोणत्याही एका अक्षरापासून तयार होणारे शब्द लिहा. (५)**

| अक्षर | नाव | फळ / फूल किंवा भाजी | गावाचे नाव | प्राणी / पक्षी | खाद्यपदार्थ |
|---|---|---|---|---|---|
| अ | अक्षय | अननस | अमरावती | अजगर | अळूवडी |
| क | | | | | |
| म | | | | | |
| न | | | | | |
| ल | | | | | |

**२. योग्य पर्याय लिहा.** **(५)**

क. इतकी वादावादी होऊनही काही ------------------ निघाला नाही.

(उत्कर्ष / हर्ष / निष्कर्ष)

ख. सायबेरियातील क्रेन हिवाळ्यात कित्येक मैल ------------------ करून भारतात येतात.

(भाषांतर / हस्तांतर / स्थलांतर )

ग. ------------------ म्हणून तो गाणे शिकतो.

(विरंगुळा / सवड / वेळ )

घ. "बातमीदारांनी आपल्या भावना उघड करू नयेत. त्यांच्याकडून ------------------ ची अपेक्षा असते."

(तटस्थपणा / चांगुलपणा / कणखरपणा)

च. मानवासाठी निसर्गातील उपयुक्त असलेल्या घटकांना किंवा पदार्थांना नैसर्गिक ------------------ म्हणतात.

(साधने / संसाधने / उत्पादने)

**३. जोडशब्दातील राहिलेला भाग लिहून खालील शब्द पूर्ण करा.** **(५)**

क. उडवा ----------------------------------------

ख. चिड ----------------------------------------

ग. टोलवा ----------------------------------------

घ. कळत ----------------------------------------

च. वाजत ----------------------------------------

# दृक्-श्राव्य परीक्षा

एकूण गुण २५

## १ श्रवणकौशल्य (एकूण गुण १५)

**१. ध्वनिफीत ऐका आणि खालील विधानांमधील चुकीचा शब्द असल्यास तो अधोरेखित करा.** (६)

क. गाडीतून केळी बाहेर फेकू नका.

ख. शिलाई कामगार आहेत ना?

ग. साहेब, मला चोरीची तक्रार नोंदवायची आहे.

घ. तक्रार नोंदवण्यासाठी अर्ज लिहा.

च. पोट कमी करण्यासाठी मी काय करू?

छ. तुमच्या सगळ्याच अवयवांना काही ना काही होतंय.

**२. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** (६)

क. वजन कमी करण्यासाठी डॉक्टर कोणते उपाय सांगतात?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

ख. पोलीस कोणते पुरावे मागत आहेत?

---------------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------------

**३. श्रुतलेखन (परीक्षकांसाठी उतारा शेवटी दिला आहे.)** (५)

## २ दृक्-श्राव्य (एकूण गुण १०)

**१. चित्रफीत पाहा आणि योग्य पर्याय अधोरेखित करा.** (४)

क. गोपूकाकांना कामात काय केलेलं आवडत नाही?

१. कामचुकारपणा २. स्वच्छता ३. उशीर

ख. गोपूकाका कोणाला शोधत आहेत?

१. सखूला २. काशीरामला ३. नरसूला

ग. घरातले सगळे रोज किती वाजता उठतात?

१. आठ २. सात ३. सहा

घ. सखूने नरसूला कशात मदत करणे अपेक्षित आहे?

१. साफसफाईत २. स्वयंपाकात ३. हिशोबात

**२. चित्रफीत पुन्हा पाहा आणि खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.** **(५)**

क. गोपूकाकांची ओळख कोण म्हणून करून दिली जाते?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

ख. नोकर कशासाठी आणला आहे?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

ग. गोपूकाका नरसूला काय काय सूचना देतात?

------------------------------------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------------------------------------

# परीक्षकांसाठी

**श्रुतलेखनासाठीचा उतारा.**

**शहरीकरण आणि पर्यावरण**

परिसरातील ग्रामीण जीवनावर शहरानं केव्हाच कबजा मिळवलेला असतो. शहरातील उद्योगांना–बाजारपेठेला मजूर, कच्चा माल, शेतमाल पुरवणं हेच खेड्यांचं काम बनतं. खेड्यातल्या माणसाच्या स्वत:च्या प्राथमिक गरजांकडे दुर्लक्ष होतं. शहरात पाठवण्यासाठी स्वत:च्या मुलांचं दूध तोडावं लागतं. परिणामी, खेड्यांतही प्राथमिक गरजेच्या वस्तू महाग होतात. शहरही त्या पुरवू शकत नाही. उलट पुष्कळदा फक्त चैनीच्या वस्तू पुरवू शकतं; ते शहरही असंच त्याहूनही मोठ्या देशव्यापी बाजारपेठेशी जखडलेलं असतं आणि ती बाजारपेठ जागतिक बाजारपेठेचा भाग म्हणून कार्यरत होण्यासाठी धडपडत असते. मग विचार येतो – हा मोठ्या माशांनी छोट्यांना गिळण्याचा तर प्रकार नव्हे? यात सर्वसामान्य माणूस हरवला तर नाही? कुठे गेलं त्याचं व्यक्तिस्वातंत्र्य, त्याच्या प्राथमिक गरजा? त्याची अस्मिता? सारं बाजारपेठेच्या विळख्यात अगतिक तर नाही बनलं?

## पाठ्यपुस्तक व अभ्यासपुस्तकात आलेले ध्वनिमुद्रित उतारे व संवाद यांचे अनुलेखन

**पाठ्यपुस्तक - पाठ १ : व्यक्ती आणि वल्ली**

### ३. स्त्री, पुरुष आणि घरकाम

२.

रमा : हॅलो!

सौरभ : बोल, कसा चाललाय सेमिनार? जयपूर कसंय?

रमा : मी तुला न सांगता एक उद्योग करून ठेवलाय, सौरभ.

सौरभ : अच्छा? काही इंटरेस्टिंग?

रमा : चूप रे! ऐक ना! इथे एका ब्रिटिश संशोधकाशी ओळख झाली. म्हणजे माझं प्रेझेंटेशन झाल्यावर त्यांनीच स्वत:हून करून घेतली. ते माझ्याच विषयातले आहेत. त्यांच्या विद्यापीठातर्फे काही शिष्यवृत्ती दिल्या जातात. ...संशोधनासाठी. माझा विषय त्यात बसतोय. म्हणजे ... माझं सादरीकरण त्यांना खूप आवडलेलं दिसलं ...'एक्सलंट' असं म्हणाले ते.

सौरभ : मग?

रमा : मला ती स्कॉलरशिप मिळू शकेल ... एका वर्षासाठी.

सौरभ : मग अडचण काय आहे?

रमा : ते तिकडच्या विभागप्रमुखांना मेल पाठवणार आहेत. ...त्याआधी, म्हणजे अर्ध्या तासात माझा निर्णय त्यांना सांगायचाय ...काय करू, सौरभ?

सौरभ : तुला जावंसं वाटतंय की नाही?

रमा : खरं तर.... हो, वाटतंय. खूप चांगली संधी आहे. पण सायूचं काय?

सौरभ : सायूचं काय! मी आहे नं, तिचा बाप?

रमा : तुला जमेल?

सौरभ : हे बघ, रमा, आणखी एक मूल जन्माला घाल असं म्हणालीस तर ते तेवढं मला जमणार नाही. पण जन्माला आलेलं मूल मला सांभाळता येणार नाही? आत्ताही मीच करतोय ना सगळं?

रमा : अरे, पण पूर्ण वेळ! रोज, चोवीस तास! शिवाय घरातलंही बघायचंय. तुझं काम...

सौरभ : रमा, अर्धा तास संपत आला! पळ लवकर!

रमा : सौरभ!

सौरभ : बाय!!

**अभ्यासपुस्तक - पाठ १ : व्यक्ती आणि वल्ली**

**१. व्यक्ती आणि वल्ली**

३.

उदाहरण - निःसंकोच

क. स्वत: ख. अंत:करण ग. दु:ख घ. मन:पूर्वक च. नि:स्वार्थीपणा

**अभ्यासपुस्तक - पाठ १ : व्यक्ती आणि वल्ली**

**१. व्यक्ती आणि वल्ली**

४. ख.

१. सहिष्णुता २. सामंजस्य ३. पूर्वग्रह ४. बाह्यरेषा ५. बुद्धिमत्ता ६. प्रौढत्व
७. माधुर्य ८. वात्सल्य ९. निष्कर्ष

**अभ्यासपुस्तक - पाठ १ : व्यक्ती आणि वल्ली**

**३. उपेक्षित व्यक्ती**

**१. श्रुतलेखन**

आमच्या घरासमोरच्या रस्त्यावरून एक मनोरुग्ण रोज ठरावीक वेळी जात असतो. मोठमोठ्याने स्वत:शीच बोलत असतो. कोणी त्याच्याकडे दयेच्या नजरेने बघत असतात, कोणी त्याची टिंगल करत असतात, तर कोणी त्याला आपल्या घरासमोरून पुढे जायला सांगत असतात. पण त्याला मात्र कशानेच फरक पडत नसतो. तो स्वत:च्याच तंद्रीत काहीतरी बडबडत असतो. आमची आजी म्हणते, "त्याची बडबड वेडीवाकडी अजिबात नसते. अगदी सुसंगत असते." पण आम्हाला त्याच्याबद्दल काहीच माहीत नसल्याने ती विसंगत आणि वेड्यासारखी वाटत असते.

**पाठ्यपुस्तक - पाठ २ : कार्यक्षेत्र**

**२. शहरातील उद्योगविश्वाचे चित्र**

३.

श्रुती : तीन दिवस झाले, कामाच्या बाई येत नाहीयेत. शी! वैताग नुसता!

दीपक : त्यात वैतागायला काय झालं एवढं?

श्रुती : अरे, काय झालं म्हणजे काय? कामं कोण करणार घरातली? कपडे साठलेत ढीगभर. खुर्च्या, टेबलं, कपाटं, सगळं धुळीनं भरलंय. हे बघ, पाय किती काळे झालेत! तीन दिवसांपासून फरशी पुसलेली नाहीये. कालपासून जेवायला तर आम्ही बाहेरच जाताहोत.

दीपक : बाहेर? का?

श्रुती : घरी जेवायचं म्हणजे स्वयंपाक करावा लागतो! मग भांडी घासा, ती जागेवर पालथी घाला, ओटा धुवा-पुसा...हट्! त्यापेक्षा बाहेर गेलेलं बरं.

दीपक : किती दिवस येणार नाहीयेत बाई?

श्रुती : काय माहीत! आजारी आहे म्हणून निरोप आलाय. खरं की खोटं, कोणास ठाऊक!

दीपक : किती पगार देता गं तुम्ही त्यांना?

श्रुती : तुझा सूर कळतोय मला, पण महिन्याचे चांगले बाराशे रुपये देतो आम्ही.

दीपक : हो का? मग तूच का नाही करत सगळं घरकाम?

श्रुती : दीप्या!!

दीपक : तूच म्हणालीस नं, की पगार चांगला देतो आम्ही! मग तेवढ्या चांगल्या पगारात तू कर ना घरकाम!

श्रुती : मी खरकटी भांडी घासू? संडास-बाथरुम धुऊ? डोकं ठिकाणावर आहे का?

दीपक : का? घाण वाटते? भांडी खरकटी कोणामुळे होतात? संडास-बाथरूम घाण कोण करतं, बाई? साठलेले कपड्यांचे ढीग कोणाच्या कपड्यांचे असतात? आणि मी 'दुसऱ्यांच्या घरातली कामं' कर, असं तर म्हटलं नाही ना? माझं तर म्हणणं आहे, की घरातल्या प्रत्येकानं आपापलं काम केलं तरी प्रश्न सुटेल. काय असतं, श्रुती, आपल्याला उत्तम सेवा हवी असते; तीही कमी पैशांत हवी असते; पण सेवा करणारा नको असतो. बरोबर आहे ना?

**पाठ्यपुस्तक - पाठ २ : कार्यक्षेत्र**

**५. चहा सांडला...**

५.

क. मैत्रा :

मी ज्या कार्यक्षेत्रात काम करते ते आधी पुरुषप्रधान होते. पण आज जग बदलले आहे. हॉटेल उद्योगात आता स्त्री-पुरुष असा भेदभाव होत नाही. मी लहान होते तेव्हा न चुकता टीव्हीवरचा संजीव कपूरचा 'खाना खजाना' हा कार्यक्रम पाहायचे. मी मनाशी ठरवले होते, काही झाले तरी आपण शेफ व्हायचे. हॉटेल व्यवस्थापनाचा अभ्यासक्रम केला आणि मुंबईच्या एका मोठ्या हॉटेलात काम सुरू केले. आज पाच वर्षांनंतर मला बढती मिळाली आहे आणि मी चक्क मुख्य शेफ झाले आहे ह्याचा मला आनंद आणि अभिमान वाटतो.

ख. राजीव :

भूलशास्त्र हा वैद्यकशास्त्राचा महत्त्वाचा विभाग आहे. शस्त्रक्रिया करताना रुग्णाला वेदना जाणवू नयेत, म्हणून भूल दिली जाते. शहरी आणि ग्रामीण भागातही काम करण्याची भरपूर संधी असलेले हे क्षेत्र असून, ह्या महत्त्वपूर्ण शाखेत उत्तम करिअर करता येते. बारावी उत्तीर्ण झाल्यावर मी एका वैद्यकीय महाविद्यालयात भूलशास्त्रातील दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम पूर्ण केला. मला बंगळुरूमधल्या एका नामांकित सरकारी दवाखान्यात भूलतज्ज्ञाची नोकरी मिळालेली आहे आणि मी तिथे माझे काम सुरू केले आहे. मला माझ्या व्यवसायाचा अभिमान वाटतो.

ग. मनोज :

माझे नाव मनोज थोरात. मी पुण्यातल्या एका कॉल सेंटरमध्ये काम करतो. मी एका खूप छोट्या ठिकाणाहून मोठ्या शहरात आलो आहे. घरची परिस्थिती जेमतेम असल्यामुळे मित्रांच्या

सांगण्यावरून मी एका कॉल सेंटरमध्ये नोकरीसाठी अर्ज पाठवलेला होता. मला लवकरच नोकरी मिळाली. आधी मला रात्रीचे काम अवघड वाटत होते; पण आता सवय झालेली आहे. अमेरिकन क्लायंटसाठी आम्ही दूरध्वनीवरून अमेरिकेतल्या लोकांना आयुर्विम्याबद्दल माहिती देतो. माझे फारसे शिक्षण झालेले नव्हते, पण तरी मला चांगली नोकरी मिळालेली आहे, ह्याचा मला खूप आनंद वाटतो.

घ. प्राची :

मला लहानपणापासूनच शिकवण्याची फार आवड होती. शाळेतून घरी आले की मी माझ्या शिक्षिकेची नक्कल करायचे. वडिलांच्या इच्छेविरुद्ध मी गणित हा विषय घेऊन पदव्युत्तर शिक्षण घेतलेले होते, त्यामुळे मला माझे स्वप्न पूर्ण करता आले. गेली ५ वर्षे मी औरंगाबादमध्ये एका मोठ्या शाळेत गणित हा विषय शिकवते. माझ्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये उत्तुंग शिखर गाठताना मी जेव्हा पाहते, तेव्हा मला माझ्या व्यवसायाबद्दल जास्तच आदर वाटतो. कोणीतरी एक शिक्षक झाला, म्हणून पुढे एवढे इंजिनिअर, डॉक्टर होऊ शकले ना!

**अभ्यासपुस्तक - पाठ २ : कार्यक्षेत्र**

**१. कार्यक्षेत्र**

२. ख.

कार्यसंस्कृती, कार्यपद्धती, कार्यप्रणाली, कार्यक्षेत्र, कार्यक्रम, कार्यकक्ष, कार्यशाळा, कार्यक्षमता, कार्यदक्ष, कार्यकुशलता, कार्यप्रक्रिया, कार्यभार, कार्यतत्पर, कार्यवाही, कार्यकारी

**अभ्यासपुस्तक - पाठ २ : कार्यक्षेत्र**

**११. श्रुतलेखन**

किस्सा

सौ॰ घोरपड्यांनी एका चुणचुणीत तरुणाला स्वयंपाकी म्हणून कामावर ठेवले. पहिल्याच दिवशी त्या त्याला म्हणाल्या, “तुम्हाला मी अगोदरच कल्पना देऊन ठेवते. साहेबांचा मोठा व्यापार आहे, त्यामुळे घरी सारखी माणसं येतजात असतात. अनेकदा साहेब न कळवता पाहुण्यांना जेवायला घेऊन येतात. तुम्हाला त्यासाठी तयारीत राहावं लागेल.”
तरुण गोड हसून म्हणाला, “हरकत नाही, मॅडम. मी नेहमी माझं सामान बांधून तयारच ठेवत जाईन...”

**पाठ्यपुस्तक - पाठ ३ : राहणीमान**

**१. समृद्ध जीवन**

४. आंब्याची सावली...

दुपारची कडक उन्हाची वेळ होती. आंब्याच्या सावलीत तो छान पहुडला होता. वाऱ्याच्या झुळका अंगावर घेत आळसावला होता. शेजारीच शेत डुलत होते. तितक्यात लांबून एक आलिशान गाडी येताना त्याला दिसली आणि अगदी त्याच्यापाशीच येऊन ती थांबली. गाडीतून

सुटाबुटातला एक शहरी माणूस उतरला. तुच्छतेने झाडाखालच्या माणसाकडे बघत म्हणाला, "अरे, काय लोळत पडलायस ! काहीतरी काम कर!"
पहुडलेला माणूस म्हणाला, "काम कशाला करायचं?"
"अरे, काम केल्याशिवाय तुला खायलाप्यायला कसं मिळेल?" गाडीवाला म्हणाला.
"मग मी काय उपाशी आहे का? मस्त खातोय की झुणका भाकर!" सावलीतला माणूस म्हणाला.
"अरे, काम केलंस तर तुला भरपूर पैसे मिळतील, माझ्यासारखी गाडी घेशील," गाडीवाला काही पिच्छा सोडायला तयार नव्हता आणि सावलीतला माणूस तरीही आरामात पहुडलेलाच. घाम पुसत गाडीवाला म्हणाला, "अरे, ऊन बघ किती आहे. एसीत राहशील तू, पैसे मिळवलेस तर!"
झाडाखाली पहुडलेला म्हणाला, "एसी कशाला? मस्त वारं येतंय की इथं!"
पुन्हा गाडीवाला म्हणाला, "पैसे असतील तर तू आरामात राहशील."
झाडाखालचा माणूस अजूनच आडवा होऊन म्हणाला, "आत्ता तेच तर करतोय."
गाडीवाला निरुत्तर झाला. त्याला प्रश्न पडला, की आपली जगण्याची पद्धत चूक आहे की बरोबर आहे?

**अभ्यासपुस्तक - पाठ ३ : राहणीमान**

### ४. रीती भूतकाळ

२. व्हॉट्सॲप : काल आणि आज.

सागर : अरे, आपण एक नवा व्हॉट्सॲप ग्रुप बनवू या का?

तेजस : अरे हो, आपल्याला फार गरज आहे त्याची. आपल्या ग्रुपमधल्या सगळ्यांना एकाच वेळी चटकन संदेश पाठवता येईल. नाही तर किती गोंधळ होतो! काल पाहिलंस ना, निम्मे जण पोहोचलेच नाहीत सिनेमा हॉलवर.

सागर : हो रे! २१व्या शतकात आपली ही अवस्था! आपल्या आईवडिलांच्या वेळी ते काय करत असतील कोण जाणे?

तेजस : ते खूप स्मार्ट होते बरं! माझी आई सांगत होती, की ती आणि तिच्या मैत्रिणी फोनची साखळी करत असत. एक दुसरीला फोन करत असे आणि दुसरी तिसरीला. असं करूनच त्या निरोप पुढे पोहोचवत असत.

सागर : सही आयडिया होती रे! तेव्हा ना मोबाईल होते ना इंटरनेट. सॉलिड गोची होत असणार ना?

तेजस : अरे, हे तर काहीच नाही. आपले पूर्वज तसे भारीच होते. अगदी शिवाजी महाराजांच्या काळातपण त्यांनी तातडीने निरोप पोहोचवण्याचे वेगवेगळे मार्ग शोधून काढले होते.

सागर : ते कसे?

तेजस : ते काय करत असत माहितेय का? एक तर, ढोल वाजवून सांकेतिक तालामध्ये बातमी देत असत. रात्रीची वेळ असेल, तर आकाशात तोफेचे गोळे उडवत असत. कोंढाणा सर झाल्याची बातमी अशीच दिली म्हणे. आणि सगळ्यात सही काय माहितेय का? अरे, त्यावेळीपण महाराजांचे हेरांचे जबरदस्त जाळे होते. त्यावेळच्या लोककलाकारांचाही ह्यात मोठा सहभाग आहे. जसे वासुदेव गावोगाव फिरून निरोप आणि संदेश पोहोचवत असत. कीर्तनकार कीर्तनातून आणि शाहीर पोवाड्यातून लोकजागृतीचे काम करत असत!

सागर : तुला बरं सगळं माहीत असतं!

तेजस : अरे, माझी आई देते मला ही सगळी माहिती. शिवाय ती ना, तिच्या आठवणी लिहून ठेवते आणि कधीकधी मला वाचायला देते.

**पाठ्यपुस्तक - पाठ ४ : नखशिखान्त**

### ४. दोघी - दोन्ही, दोघे - दोन्ही, दोघं - दोन्ही

२. क. जुळ्यांची गंमत, 'जुळ्याचं दुखणं'!

जुळी मुलं होणं किंवा जुळी मुलं असणं ही गोष्ट काही दुर्मीळ नाही, पण तरीही जुळ्यांबाबत वाटणारी उत्सुकता आणि अचंबा जराही कमी झालेला नाही. ह्या विषयावर परतपरत सिनेमे निघतात आणि लोक ते आवडीने बघतात. रॉजर फेडररसारख्या ख्यातनाम व्यक्तीला जेव्हा दुसऱ्यांदा जुळे होते, तेव्हा ती मोठी बातमी होते.

कोडीन्ही हे केरळमधील गाव तिथे असलेल्या जुळ्या मुलांच्या संख्येमुळे प्रसिद्ध आहे. ह्या गावामध्ये राहणाऱ्या प्रत्येक दांपत्याला केवळ जुळी मुलेच होतात. हे असे का घडते ह्याचा शोध वैज्ञानिकही आजवर लावू शकलेले नाहीत. मूळच्या ह्या गावाच्या नसलेल्या, बाहेरून आलेल्या दांपत्यालादेखील गावामध्ये आल्यानंतर जुळी मुलेच झाली. हे नक्की कसे काय घडते, ह्याचे गूढ अजूनही कोणालाच उकललेले नाही.

**पाठ्यपुस्तक - पाठ ४ : नखशिखान्त**

### ५. "अरेरे!..."

३.

क. बाप रे! किती उंच इमारत आहे ही!

ख. अरे! माझा फोन इथे कोणी ठेवला?

ग. अरेरे! त्या एकेकाळच्या सुंदर घराची आता काय अवस्था झालीये!

घ. आई गं! बघवत नाहीये मला तुझ्याकडे!

च. उंहूं! पुढे काही बोलूच नकोस तू!

छ. आऽऽ! आता गप्प बसशील का?

ज. आई गं! फारच दुखतोय गं माझा पाय!

झ. अहाहा! किती सुंदर देखावा आहे!

ट. देवा! किती लागलंय तुला!

ठ. श्शी! बघ, फाटलं ना ते पत्र! तरी मी सांगत होते, ओढू नकोस!

**पाठ्यपुस्तक - पाठ ४ : नखशिखान्त**

### ८. भाषा तरुणाईची!

१.

प्राध्यापक : अरे, काय बोलताय तुम्ही? फंकी काय, जबराट काय, डोक्याचं खोबरं काय!

विद्यार्थी : सर, तुम्हाला नाही कळणार आमची ही भाषा. आम्ही असंच फाडत असतो – म्हणजे बोलत असतो. पण सर, तुमच्या वेळी नव्हती का तुमची अशी काही खास भाषा?

प्राध्यापक : अरे! नव्हती कशी? होती ना! पण तुमची नाही बुवा आम्हाला समजत.

विद्यार्थी : मी सांगतो ना, सर. काही खूप आवडलं की आम्ही 'जबरी', 'जबराट' किंवा 'ढिंच्यॅक' म्हणतो. काही गडबड झाली की 'लोचा झाला' म्हणतो. एखाद्या न आवडलेल्या गोष्टीला 'बकवास' म्हणतो, आणि कोणी जादापणा करायला लागलं, की 'आपल्या चड्डीत राहायचं हं' असं बजावतो. आणि फारच राग आला, तर 'आता माझी सटकली' म्हणतो. पण सर, आणखी काही नाही सांगणार. सगळंच तुम्हाला कळलं तर
आम्हाला काही बोलताच येणार नाही आणि इतर मुलं आम्हाला 'धुतील'.

**अभ्यासपुस्तक - पाठ ४ : नखशिखान्त**

### ५. सौंदर्यासाठी काहीही!

१.

'ईऽऽऽऽईई, आईऽऽगंऽऽऽ , शीः शीः' अशा जोरदार किंकाळ्या मंदिराच्या खोलीतून ऐकू आल्या आणि आई, भाई आणि बंटू धावतच तिथे पोचले. दार बंद होतं. मंदू अजूनही किंचाळतच होती. आई, भाई आणि बंटू, सगळे दार वाजवून थकले, पण मंदिरा काही दार उघडेना आणि तिचं किंचाळणं काही थांबेना.
"हे बघ, आता दार नाही उघडलंस तर भाई दार तोडेल हं!" आई ओरडली.
हा दम ऐकून मात्र मंदिरानं लगेच दार उघडलं. दारात ती उभी होती, दोन्ही हात तिनं गालांवर गच्च दाबून ठेवले होते, डोळ्यांतून घळाघळा अश्रू वाहत होते.
"अगं, काय झालं तरी काय? का अशी ओरडतेयस? आणि हात घे बरं आधी खाली!" आई ओरडली.
मंदिरानं कसेबसे हात खाली घेतले आणि भाई आणि बंटू चेव चढल्यासारखे हसायला लागले. त्याबरोबर मंदिरा नव्या जोमानं किंचाळायला लागली. आई मात्र नवलानं मंदिराच्या तारुण्यपीटिकांनी भरलेल्या गालांकडे पाहत होती.
"बघ ना, हे काय झालंय! आता कशी जाऊ मी कॉलेजला? वैताग आलाय नुसता! हातपाय आपटत मंदिरा हमसून हमसून रडत होती आणि भाई व बंटू चेव आल्यासारखे खिंकाळत होते. एकमेकांना टाळ्या देऊन, "फक्कड हं एकदम!", "वा वा! एकदम सही!" असं म्हणत तिला चिडवत होते.

**पाठ्यपुस्तक - पाठ ५ : पर्यावरण**

**१. पर्यावरण**

२. आम्ही आकाश बघू...

आम्ही आकाश बघू , आम्ही झाडं बघू
आम्ही पक्षी बघू, आम्ही पाऊस बघू
आम्ही आकाश बघू...
हे रंग , हे गंध, हे स्पर्श, आनंद
ज्यांनी दिले आम्ही त्याला स्मरू
आम्ही आकाश बघू...
तो देतो अन् देतच राहतो
देणारा तो अमुचा गुरू
आम्ही आकाश बघू...
हे नाही ते नाही, करणार नाही
दुःखावरही आम्ही प्रेमच करू
आम्ही आकाश बघू...

**पाठ्यपुस्तक - पाठ ५ : पर्यावरण**

**३. एक रेड इंडियन वचन**

६. अ.

शर्वरी : काय रे आनंद, कसं चाललंय तुझं पर्यावरण संवर्धनाचं काम?

आनंद : मस्त चाललंय. पुढच्या काही वर्षांत आमचं बरंच काम झालेलं असेल.

शर्वरी : अरे वा! मला सांग ना, तुम्ही नेमकं काय काय केलेलं असेल ते!

आनंद : म्हणजे बघ, आम्ही नागरिक, प्रशासन आणि इतर स्वयंसेवी संस्था, असे सगळे एकत्र येऊन एक सर्वसमावेशक आराखडा तयार करतोय. महिन्याभरात आमचा तो आराखडा तयार झालेला असेल. शिवाय, आम्ही ठिकठिकाणी जाऊन लोकांना पर्यावरणाचं महत्त्व समजावून सांगतो आहोतच. पुढील काही वर्षांत जनतेमधून पर्यावरण जनजागृतीची एक व्यापक चळवळ उभी राहिलेली असेल. जलप्रदूषण, वायुप्रदूषण आणि ध्वनिप्रदूषण आम्ही आटोक्यात आणलेलं असेल. आम्ही शाळांमधल्या मुलामुलींना झाडं लावण्यासाठी प्रोत्साहन देतोय. येत्या काही वर्षांत त्यांनी शहरभर लाखो झाडं लावलेली असतील.

शर्वरी : छान. तुमचं करावं तेवढं कौतुक कमीच आहे. मीपण वेळ काढून तुला मदत करायची असं ठरवलंय.

**अभ्यासपुस्तक - पाठ ५ : पर्यावरण**

**२. पर्यावरण : समस्या आणि उपाय**

१. कोरकूंची पर्यावरणपूरक जीवनशैली...

महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश ह्यांच्या सीमा जिथे मिळतात त्या मेळघाटच्या जंगलामध्ये शेकडो वर्षांपासून 'कोरकू' हे आदिवासी राहत आले आहेत. जंगलावर त्यांचे अतिशय प्रेम आहे. जंगलातून ते हिरडा, शिकेकाई, कंदमुळे, औषधी वनस्पती, मोहाची फुले गोळा करतात. त्यांची डोंगराळ भागात लहान लहान शेते असतात. शेतातून ते स्थानिक जातीचे भात पिकवतात आणि शेताच्या बांधावर कडधान्याचे पीक घेतात. त्यांचे संपूर्ण जीवन जंगलातून मिळणाऱ्या गोष्टींवर अवलंबून आहे, त्यामुळे ते जंगलाला अतिशय जपतात. विनाकारण शिकार करत नाहीत. पूर्वी संपूर्ण गावासाठी पंधरा दिवसांतून एकदा शिकार करून सगळ्यांनी एकत्र जेवायची त्यांची पद्धत असे. ते धनुष्यबाणाने शिकार करत असत. आजही मोहाची फुले वाळवून त्यांचे पीठ करून त्या पिठाची भाकरी करतात. सुंदर झोपड्या बांधून आनंदाने जीवन जगतात. जंगलातून मिळणाऱ्या वनस्पतींची त्यांना चांगली पारख असते. कुठल्या वनस्पतीतून कसले औषध मिळते ह्याचे परंपरागत ज्ञान त्यांना असते. वाघ, अस्वले, बिबटे ह्यांच्या बरोबरीने कोरकू अतिशय सामंजस्याने राहणारे लोक आहेत. जैवविविधतेचे महत्त्व ते चांगले ओळखतात आणि ह्या जैवविविधतेचे रक्षण कसे करायचे, हे ते कृतीतून दाखवून देतात. शहरी जीवनशैलीतून जे सुख आणि समाधान माणसाला मिळत नाही ते सुख आणि समाधान कोरकूंना निसर्गाशी जुळवून घेतलेल्या जीवनातून मिळते असे म्हणता येईल.

**पाठ्यपुस्तक - पाठ ६ : जागतिकीकरण**

**२. वाहतुकीची कोंडी**

२. भविष्यातील वाहतूक यंत्रणा – हायपरलूप वन प्रकल्प

तमिळनाडूमधील चेन्नई व कर्नाटकमधील बंगळुरू ह्या दोन शहरांमधील ३४५ किमीचे अंतर ३० मिनिटांत पूर्ण करणाऱ्या एका बुलेट ट्रेनचा महत्त्वाकांक्षी प्रस्ताव अमेरिकेमधील हायपरलूप वन ह्या कंपनीने केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्रालयासमोर मांडला आहे. एका शहरामधून दुसऱ्या शहरामध्ये प्रवास करण्यासाठी अस्तित्वात असलेल्या पारंपरिक दळणवळण व्यवस्थांमध्ये क्रांती घडवून आणण्याचे ह्या कंपनीचे ध्येय आहे. भारताच्या आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनामधून ही दोन्ही शहरे अत्यंत महत्त्वपूर्ण आहेत. 'हायपरलूप वन' ह्या प्रकल्पात काँक्रीटच्या पिलरवरून एक निर्वात ट्यूब जाते. ह्या ट्यूबमधून १२०० किलोमीटर प्रति तास इतक्या वेगात 'ट्रॅव्हलपॉड' सोडले जातील. ह्या ट्रॅव्हलपॉडमध्ये बसून प्रवास करता येणार आहे. ही ट्यूब निर्वात असल्याने हा वेग गाठता येणे शक्य आहे. ह्यासाठी बांधण्यात येणाऱ्या बोगद्यामध्ये तयार करण्यात आलेल्या पोकळीमध्ये किंवा व्हॅक्युममध्ये तरंगत ही बुलेट ट्रेन मार्गक्रमण करेल.

ही योजना यशस्वी झाल्यास चेन्नई-बंगळुरू अंतर ३० मिनिटांत, तर भारताची आर्थिक राजधानी असलेल्या मुंबईस जाण्यासाठी चेन्नई येथून सुमारे तासभराचा अवधी लागेल.

चेन्नई-बंगळुरूसह चेन्नई-मुंबई, पुणे-मुंबई, बंगळुरू-थिरुअनंतपुरम आणि मुंबई-दिल्ली ह्या शहरांना जोडणाऱ्या बुलेट ट्रेन्स सुरू होण्याची शक्यता आहे.

**पाठ्यपुस्तक - पाठ ६ : जागतिकीकरण**

५. बहुसांस्कृतिकता

२. फारसीने केला फार फेरफार

(एकदा सुशांत आणि अस्मिता 'जागतिकीकरण आणि भाषा' ह्या विषयावरचे व्याख्यान ऐकायला गेले होते. तिथे अस्मिताला वक्त्यांची मते मुळीच पटली नाहीत, म्हणून तिने त्यांच्याबरोबर चांगलाच वाद घातला.)

सुशांत : काय गं, अस्मिता? काय झालं होतं तुला? केवढी चिडली होतीस आजच्या त्या वक्त्यांवर!

अस्मिता : नाहीतर काय! मला ना, ह्या जागतिकीकरणाचा कंटाळा आलाय. त्याचा आपल्या रोजच्या आयुष्यावर केवढा प्रभाव पडतोय! आपल्याला आपल्या स्वदेशी संस्कृतीची काही किंमतच राहिलेली नाही. आंतरराष्ट्रीय वस्तू, आंतरराष्ट्रीय कपडे, आंतरराष्ट्रीय यंत्रे ... कुठे चाललोय आपण सगळे? आज बहुसांस्कृतिकतेमुळे इंग्रजी आणि इतर परकीय भाषांना केवढं महत्त्व आलंय! आणि भाषांच्या ह्या स्पर्धेत आपल्या मराठी भाषेचा मात्र ऱ्हास होतोय. ते काही नाही, मी आता ठरवूनच टाकलंय, आता आपण केवळ मराठीतूनच बोलायचं. परकीय शब्द वापरायचेच नाहीत.

सुशांत : वा, छान ! मला तुझा निर्णय ... आवडला. पण मला एक सांग, तुझी नेमकी कशाला ... आहे? असा काय ... पडतो? अगं, ही आजकालची ... आहे, तू ... विचार करतेयस, असं नाही का वाटत? चल, राग सोड आणि हे ... पी.

अस्मिता : काय? काय म्हणतोयस तू? मला काहीही समजलं नाही.

सुशांत : ओहो! तुला नाही समजलं? पुन्हा सांगतो.
वा, छान! मला तुझा निर्णय फार आवडला. पण मला एक सांग, तुझी नेमकी कशाला हरकत आहे? असा काय फरक पडतो? अगं, ही आजकालची हवा आहे. तू फार विचार करतेयस, असं नाही का वाटत? चल, राग सोड आणि हे पाणी पी.

अस्मिता : आता नीट समजलं. काय फालतू विनोद करतोस रे उगीच?

सुशांत : अगं, विनोद नाही, मी तुझाच निर्णय अमलात आणून पाहिला. मी म्हटलं, चला, आपण बघू या तरी, मराठी भाषेतील परकीय शब्द वगळून कसं वाटेल ते.

अस्मिता : म्हणजे?

सुशांत : हो. तुला कल्पना नसेल, पण अगदी तुझ्या रोजच्या वापरातले, तुला वाटत असलेले 'अस्सल मराठी' शब्दसुद्धा मराठी नाहीत. मूळ फारसी, उर्दू, कानडी इत्यादी भाषांतून आलेले शब्द आहेत ते. आता बघ ना, असे शब्दसुद्धा आपण वापरायचेच नाहीत, असं ठरवलं तर काय होईल, असा विचार माझ्या मनात आला. म्हणून एक प्रयोग करून पाहिला.

अस्मिता : अच्छा! समजले हो तुला काय म्हणायचे आहे ते. डामरट कुठला!

सुशांत : डामरट? म्हणजे काय?

अस्मिता : डामरट म्हणजे इंग्रजीतला डॅम रॅट, म्हणजे नालायक उंदीर!

**अभ्यासपुस्तक - पाठ ६ : जागतिकीकरण**

**१. जागतिकीकरण**

२. ख.

१. धोरणात्मक, २. नकारात्मक, ३. तंत्रज्ञानात्मक, ४. संवादात्मक, ५. रचनात्मक,
६. अपवादात्मक, ७. होकारात्मक, ८. संस्थात्मक, ९. सकारात्मक

**अभ्यासपुस्तक - पाठ ६ : जागतिकीकरण**

**१. जागतिकीकरण**

३. ख.

१. आंतरराष्ट्रीयीकरण, २. औद्योगिकीकरण, ३. खाजगीकरण, ४. उदारीकरण,
५. जागतिकीकरण

**अभ्यासपुस्तक - पाठ ६ : जागतिकीकरण**

**८. जाहिरातींचे जग**

१. श्रुतलेखन

आपल्या खऱ्या गरजा कोणत्या? स्वत:लाच हा प्रश्न विचारा बरं! काय उत्तर मिळालं? आपण तर सारखी खरेदी करतच असतो. गाड्या घेतो, त्या सतत बदलत राहतो, ब्रँडेड कपडे घेतो, आणि कपाट भरलं तरी नवीन घ्यावेसे वाटतातच. प्रत्येकाकडे चपला-बुटांचे अनेक जोड असतातच.
हॉटेलमध्ये जातो तेव्हा आंतरराष्ट्रीय खाद्यपदार्थ खाणं आपल्याला प्रतिष्ठेचं वाटतं. घरातील प्रत्येक कामासाठी आपण नवनवीन यंत्रं घेत राहतो. सतत येणाऱ्या नव्या तंत्रज्ञानानुसार नवे मोबाईल, लॅपटॉप अशा गोष्टी घेत असतो. त्यातील कित्येक आपण वापरतही नाही, पण तरीही त्या वस्तू आपल्याकडे असतात.
का असं होतं, ह्याचा विचार आपण करतो का? कशामुळे आपण आपलं राहणीमान एवढं बदललं आहे? हा तर जाहिरातींचा प्रभाव! जगभर होणाऱ्या वस्तूंच्या प्रचंड उत्पादनांमुळे त्या वस्तूंच्या विक्रीचा रेटा इतका आहे, की जर विक्री झाली नाही तर अर्थकारण कोलमडेल. त्यामुळे अतिशय आकर्षक जाहिराती करणं हे या जागतिकीकरणाचं वैशिष्ट्य झालं आहे. त्याशिवाय माणूस वस्तू घेण्यासाठी प्रवृत्त होणार नाही; गरज नसलेल्या वस्तू त्याला गरजेच्या वाटणार नाहीत.

**पाठ्यपुस्तक - पाठ ७ : विज्ञान, तंत्र, मंत्र**

**२. यंत्रे : उपयोग आणि समस्या**

३. यंत्रांचं व्यसन

अवनी : मी माझ्या आयफोनशिवाय राहू शकत नाही. अँड्रॉईड छान आहे, पण आय॰ओ॰एस॰ तर अजूनच मस्त.

सुमित : मला जगायला गाणी लागतात. संगीत माझा जीव की प्राण आहे. खाताना, पिताना, झोपताना, अभ्यास करताना स्पीकरवर संगीत चालू असलंच पाहिजे!

श्री。 लेले : मला बातम्या बघायच्याच असतात. राजकारणाशिवाय मला दुसरं काही आवडत नाही. मला रोजचा पेपर आणि माझ्या वेळेत टीव्ही हवा असतो.

सौ。 मंजूषा : पूर्वी मालिका बघितल्याशिवाय चैनच पडत नसे मला. पण आता व्हॉट्सॲप, फेसबुकमुळे कशाचीही गरज वाटत नाही. माझा मित्रवर्गही खूप वाढलाय आता. मला फोन बघू नकोस असं सांगितलेलं आवडत नाही, बरं का!

**पाठ्यपुस्तक - पाठ ७ : विज्ञान, तंत्र, मंत्र**

**७. असो, असू दे...**

२. असू दे

क. मिनू प्रत्येक बाबतीत अगदी हट्टी, जराही तडजोड खपवून घेणार नाही. पण तिच्या आवडीची गोष्ट असेल, तर मग आपणहूनच म्हणते, 'असू दे, चालेल मला'.
आई : मिनू, पिझ्झा गार झाला आता, नको खाऊस तो.
...
आई : मिनू, सिनेमा पाच वाजताच सुरू होतोय, तू पोचणार नाहीस वेळेवर. रद्द कर बेत.
...
आई : मिनू, मित्रांना बोलवून ठेवलंयस. सगळ्यांचं चहापाणी करावं लागेल आणि मी तर बाहेर चाललेय.
...
आई : घरी तू एकटीच आहेस. कोणी नाही तुझ्या सोबतीला.
...

**अभ्यासपुस्तक - पाठ ७ : विज्ञान, तंत्र, मंत्र**

**१. विज्ञान**

२. ख.

१. संगीत २. चांगला ३. जंगल ४. रांगोळी ५. यंत्र ६. तंत्र ७. मंत्र ८. अंधश्रद्धा ९. संशोधन १०. फुंकर ११. सिद्धांत १२. सबंध / संबंध १३. नियंत्रण १४. केंद्रबिंदू १५. उत्क्रांती १६. स्वयंपाक

**अभ्यासपुस्तक - पाठ ७ : विज्ञान, तंत्र, मंत्र**

**१. विज्ञान**

३. ख.

१. तंत्रज्ञ, २. कल्पना, ३. किरणोत्सार, ४. उत्क्रांती, ५. समस्या, ६. विक्रीपश्चात, ७. पिल्लू, ८. आदरार्थी, ९. व्यासपीठ, १०. महत्त्व, ११. इच्छा, १२. मुद्दा

**अभ्यासपुस्तक - पाठ ७ : विज्ञान, तंत्र, मंत्र**

**१०. शब्दयोगी पदे (साठी / करता)**

२. क. श्रुतलेखन

कशासाठी?
मला ना, कधी कधी स्वतःचाच खूप राग येतो. ज्या गोष्टी करू नकोस असं स्वतःला सांगितलेलं असतं, नेमक्या त्याच गोष्टी मी करत राहते. आता बघा ना, लोकांना उगीच सल्ले देण्याची माझी सवय अगदीच मोडली पाहिजे असं मी ठरवलं होतं. तरी मी मित्रांना सल्ले देतच असते. का देते मी सल्ले? बरं, मित्रसुद्धा शेवटी त्यांना जे करायचंय, तेच करतात. ज्या केल्यानं माझा मलाच त्रास होत राहतो, अशा बऱ्याच गोष्टी मी करते. मग कशासाठी करते मी हे सगळं?

**पाठ्यपुस्तक - पाठ ८ : सणवार**

**३. सण आणि पक्वान्ने**

१.

अनन्या : काय मजा आली ना ह्या दिवाळीत! खाद्यपदार्थांची नुसती रेलचेल होती ना! लाडू, करंज्या, अनारसे, चिवडा, चिरोटे, चकल्या, शंकरपाळे. शिवाय जेवणात रोज एक वेगळं पक्वान्न! काय काय गं? मला तर नावंही आठवत नाहीत. सांग ना, पिहू.

पिहू : तू खूप वर्षांनी आलीस नं पुण्याला म्हणून तुला गंमत वाटतेय. मला तर बाहेर जाऊन काहीतरी छान भेळ, पाव भाजी, मिसळ, बटाटेवडा असं खावंसं वाटतंय. बासुंदी, श्रीखंड, फ्रूटसलाड आणि खव्याच्या पोळ्या खाऊन ना, मला कंटाळा आलाय!

अनन्या : ए, पण काकूनी पुरणपोळ्या का नाही केल्या गं? आणि शेवयाची खीर आणि खोबऱ्याच्या वड्या? हो, आठवलं मला. पाकातल्या पुऱ्याही करायची ना ती?

पिहू : अगं वेडी आहेस का? कुठल्या सणाला कुठलं पक्वान्नं करायचं ते ठरलेलं असतं. उगाच केव्हाही काहीही करत नसतात. म्हणजे पुरणपोळी होळीलाच, तर गुळाच्या पोळ्या संक्रांतीलाच. खीर किंवा पाकातल्या पुऱ्या रंगपंचमीला आणि नारळीभात आणि खोबऱ्याच्या वड्या नारळीपौर्णिमेलाच करतात. शिरखुर्मा ईदला करतात ना, तसंच!

अनन्या : आणि ख्रिसमस केक ख्रिसमसला! पण किती वेळ लागतो गं हे पदार्थ करायला! त्या दिवशी काका तासभर बासुंदी आटवत बसला होता. दिवाळीच्या आधी तर काकूचा अख्खा दिवस गेला निगुतीनं करंज्या करण्यात. पण काहीही म्हण, मला तर हे ताजे, घरी केलेले पदार्थ फार आवडले, त्या फ्रीझमध्ये साठवून ठेवलेल्या डबाबंद पदार्थांपेक्षा.

पिहू : बरोबर आहे तुझं. पण मला नाही वाटत की लोक ह्यापुढे एवढे पदार्थ घरी करत राहतील. पूर्वी करत असायचे, पण आता कुणाला वेळ आहे?

अनन्या : पण आयतं आणून खाणं म्हणजे आरोग्याचा प्रश्न! मी तर शिकणारेय बुवा, हे पदार्थ करायला. तू मला काही पदार्थांचं साहित्य आणि कृती लिहून तरी दे. बघ मी करते की नाही ते!

पिहू : कुठल्या पदार्थांची कृती हवीये तुला? झटपट पदार्थांची की निगुतीने करायच्या पदार्थांची?

अनन्या : आत्ता तरी दोन्ही प्रकारातल्या एकेका पदार्थाची दे. ते जमले, तर पुढे तुझ्याकडून वेगवेगळे पदार्थ शिकत राहीन.

**अभ्यासपुस्तक - पाठ ८ : सणवार**

### ३. अक्षरांची गंमत

१. क.

'च' ची भाषा

चलाम चकए चप्रस्व चलंडप. चमी चटीकए चलेलचा चतेहो. चणिआ चकए चतमगं चलीझा. चनडूकति चलाआ चलईबामो, चनडूकति चलाआ चपटॉपलॅ. चनरूमोस चलाआ चटबोरो. चटमोरि चताहो चडेकझ्यामा.

**पाठ्यपुस्तक - पाठ ९ : महाराष्ट्र आणि त्यातील प्रमुख शहरे**

### ३. फिरण्याची हौस

दीपक : श्रुती, तुला महाराष्ट्रात कुठं राहायला आवडेल? म्हणजे कायमचं हं!

श्रुती : मला ना, पुण्यात राहायला खूप आवडेल. तिथलं विद्यापीठ नामांकित आहे आणि पुण्यातले हवामानही छान आहे. आणि तुला रे?

दीपक : मला कोकणात राहायला फार आवडेल. माझे एक काका तिथं राहतात. मोठी वाडी आहे त्यांची.

श्रुती : अरे वा! मस्तच की! मग तू भातशेती करणार आणि आंब्याची झाडं लावणार तर.

दीपक : हो, तसंच काहीसं. कोकणातली शांतता मला आवडते. पुण्या-मुंबईसारखं पळावं लागत नाही तिथं. आणि तिथला निसर्ग, आणि समुद्र...आ हा हा!

श्रुती : बरोबर आहे. मोठ्या शहरांसारखं धकाधकीचं आयुष्य नाही तिथं.

दीपक : पण अगदी सुखाचं वगैरेपण नाही, बरं का! वाडीत स्वतः मेहनतही खूप करावी लागते. कामासाठी गडीमाणसं मिळत नाहीत. पावसाळ्यात तर घराबाहेर पडणं अशक्य होतं.

श्रुती : तेही आहेच. राहणं कुठंच सोपं नाही. तसं पाहायला गेलं, तर कोल्हापूरही छान आहे बरं का! माझं आजोळ आहे तिथं. उन्हाळ्याच्या सर्व सुट्ट्या मी तिथं घालवलेल्या आहेत.

दीपक : मग तरीही तुला पुण्यातच का राहायचं आहे?

श्रुती : अरे, काय नाहीये पुण्यात? ज्यांना फिरण्याची हौस आहे, त्यांच्यासाठी पुण्यात सिंहगड आहे, मुळशी परिसर आहे, टेकड्या आहेत. खाण्यापिण्याची आवड असलेल्या माझ्यासारख्या लोकांसाठी तर पुणं स्वर्गच म्हणावं लागेल. ज्यांना वेगवेगळ्या भाषा शिकण्याची इच्छा आहे त्यांच्यासाठी पुण्यात खूप संधी उपलब्ध आहेत. हं, आता पुण्याची माणसं थोडी शिष्ट असतात असं ऐकलंय खरं, पण ते अनुभवल्याशिवाय

नक्की कसं सांगणार ना!

दीपक : तुला कोल्हापूरकरांच्या रांगड्या स्वभावाची सवय असेलच की!

श्रुती : हो, थोडीफार आहे. पण प्रत्येक शहराची, गावाची खासियत वेगळी असते, नाही का?

दीपक : हो, ते मात्र खरं.

**पाठ्यपुस्तक - पाठ ९ : महाराष्ट्र आणि त्यातील प्रमुख शहरे**

**५. ऐकू या.**

शहर पुणे

फक्त पुणेकर माणसाची अगदी खास वाटावी अशी काही जगण्यावागण्याची तऱ्हा आहे का? ह्या प्रश्नाचे उत्तर तात्यासाहेब केळकर ह्यांच्या शैलीत सांगायचे म्हणजे – 'म्हटलं तर असेल ... म्हटलं तर नसेलही.' मला वाटते, माणसाप्रमाणे शहरालाही स्वभाव असतो. काही खास तऱ्हा असतात. तशीच पुणेकरांची वागण्याची, बोलण्याची एक विशिष्ट तऱ्हा आहे. पुण्याने आपल्या काहीशा तऱ्हेवाईक वागण्याने बाहेरच्या लोकांची तशी बरीच करमणूक केली हे खरे आहे. 'पुण्यानं देशाला असं काय दिलं?' असा प्रश्नही कधी कधी विचारला जातो. पुण्याने अनेक गोष्टी दिल्याच, पण एक अतिशय महत्त्वाची गोष्ट लोकांना दिली, ती म्हणजे लोकशाही. लोकशाही विचाराचा पाया ह्या देशात पुण्याने घातला. लोकशाहीचा गाडा मतांवर चालतो. पुण्यात प्रत्येकाला प्रत्येक विषयावर मत आहे. विषय कुठलाही असो, चर्चा कुणाचीही चाललेली असो; अस्सल पुणेकर त्यात आपल्या मताची पिंक टाकल्याशिवाय पुढे जायचा नाही. पुणेरी संस्कृती ही लोकशाहीची नर्सरी आहे. रोपवाटिका आहे (आणि आरोपवाटिकाही आहे). पुणे शहरात लोकशाही खऱ्या अर्थाने रुजली आणि फोफावली. आपण बरे की आपले काम बरे अशा वृत्तीने जगणे, हे पुणेरी संस्कृतीतच बसत नाही. आपण माणूस म्हणून स्वतंत्र आहोत आणि समाजाचे घटकही आहोत, ह्याची पुणेकराला पक्की जाणीव आहे. देशाच्या कारभारात लक्ष घालणे हे आपले कर्तव्य आहे असे तो मानतो; मग तो व्यवसायाने कोणी का असेना. मत द्यायला पूर्वतयारी, व्यासंग वगैरे लागतो ह्यावर पुणेकराचा विश्वास नाही. कुणीतरी म्हटल्याप्रमाणे 'मते' ही मिश्यांसारखी आपोआप फुटतात. 'पुणेकर' ह्या संज्ञेचा 'पृथ्वीच्या पाठीवरच्या प्रत्येक घटनेच्या बाबतीत मत देण्याचा जन्मसिद्ध हक्क घेऊन आलेला माणूस' असा व्यापक अर्थ करता येईल.

पुण्यात परंपरेचे पालन आणि परंपरेचा अव्हेर तितक्याच तीव्रतेने होतो. मताला चिकटून राहणारी आणि पूर्वापार चालत आलेली मते झुगारून देणारी, अशी दोन्ही प्रकारची माणसे मनाने कणखर असावी लागतात. तशी माणसे पुण्यात निर्माण झाली. त्यातून पुणेरी संस्कृतीने समाजाला एक मोठी वृत्ती दिली. ती म्हणजे 'सार्वजनिक असंतोषाची'. प्रत्येक क्षेत्रात सुधारणा व्हावी म्हणून झटणारे सार्वजनिक असंतोषाचे जनक ह्या शहराने – पुण्याने – आपल्या देशाला दिले आहेत. ज्या काळात मुलींना शाळेत घालावे की घालू नये ह्याची चर्चा भारतातल्या इतर प्रांतांत चालू होती, त्या वेळी आमच्या पोरी सायकल हाणीत शाळा-कॉलेजात जात होत्या. आता त्या स्कूटरवरून जायला लागल्या आहेत. पण सुरुवातीला स्कूटर चालवणाऱ्या आपल्या नवऱ्याच्या खांद्यावर हात ठेवून बायकांनी

मागल्या सीटवर बसणे, ह्या गोष्टीला सनातन पुणेकरांचा जाम विरोधही झाला होता. पुणे शहराची प्रगती अशा बळकट ओढाताणीतून समन्वय साधून होत आली आहे.

ह्या प्रगतीला अनेकांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत. प्रत्येक काळात नव्या विचारांना पोषक अशी द्रव्ये मिळवीत पुणेरी संस्कृती जोपासली गेली आहे. 'आमच्या वेळचं पुणं राहिलं नाही' असा एक उसासाही ऐकू येतो. प्रत्येक काळात हा उसासा असतोच. प्रश्न असणारच. कारण प्रश्नांची उत्तरे म्हणजे नव्या प्रश्नांना जन्म देणे हेच असते. अशा ह्या, सतत नवे प्रश्न निर्माण करून उत्तरासाठी धडपडणाऱ्या पुण्यात राहणे, हा एक निराळाच आनंद आहे.

- पु. ल. देशपांडे

**अभ्यासपुस्तक - पाठ ९ : महाराष्ट्र आणि त्यातील प्रमुख शहरे**

### १. महाराष्ट्र राज्य व त्यातील शहरे

५. मुंबई

वर्तमानकाळात जगण्याचे धैर्य असलेली मोजकीच शहरे जगात आहेत. भारतात अशा मानसिकतेचे मुंबई हे एकच शहर असावे. त्याला भूतकाळात फार रमता येत नाही.
मी इथे वीस वर्षांपूर्वी राहायला आलो. मला पुण्यातील माझ्या घरातून बाहेर पडायचे होते; आणि भारतात स्वतःचे शहर सोडल्याशिवाय तुम्हाला स्वतःचे घर सोडता येत नाही. माझ्यातील 'मी'ला जिथे जगू दिले जाईल, जिथे मला एकटे आणि स्वतंत्र राहता येईल अशा शहरात मला जायचे होते. त्यामुळे मी मुंबईला आलो, कारण असे जगण्यासाठी जे जे हवे ते इथेच आहे. हे शहर काम करणाऱ्या माणसांचे आहे. तुम्ही तुमच्या कामात उत्तम असलात, तर ते तुम्हाला पटकन आपलेसे करते. मग तुम्ही कपडे कोणते घालता, कोणते वाहन वापरता, तुमची ऊठबस कोणत्या वर्तुळात असते वगैरे चौकश्या कुणी करत नाही. मात्र, जेव्हा तुम्हाला तुमच्या कामाचा दर्जा सांभाळता येईनासा होतो, तुमच्या जाणिवा जेव्हा काळाच्या मागे पडू लागतात, तेव्हा हे शहर तुमची दखल घेईनासे होते. ते तुम्हाला फेकून देत नाही; ते अजून तेवढे क्रूर झालेले नाही आहे; पण ते तुम्हाला दूर एका कोपऱ्यात सारून ठेवते.
तशी मुंबई सतत बदलत असतेच. तोच तिचा स्वभाव आहे. १९९३मध्ये झालेले बॉम्बस्फोट हा मात्र तिच्या वर्मी बसलेला घाव होता. त्यानंतरही ती बदलली, पण जे मुंबईकर आधीची मुंबई जगले होते, ज्यांनी तिच्यावर प्रेम केले होते, त्यांना मात्र आजची बदलेली मुंबई अजूनही स्वीकारता येत नाही आहे. आज मुंबईकरांचा परस्परांवरील विश्वास कमी झाला आहे, आणि ह्या जाणीवेनेही ते घायाळ झालेले आहेत. धनिकांची जुनी 'ब्रिटिश मुंबई' ह्या बदलांपासून अलिप्त, दूर असल्यासारखी भासते. तिथे काळ थांबून राहिलेला आहे.
मी जिथे राहतो तो उपनगरी भाग माझ्यासारख्या स्थलांतरितांचा आहे. मुंबईचा वर्तमानकाळ तिथे आहे. माणसांची सहनशीलता, पुन्हा पुन्हा कोसळल्यानंतरही पुन्हा पुन्हा उभे राहण्याची क्षमता सतत तपासून पाहणारा वर्तमानकाळ. पण तरीही, भारतात मुंबईला पर्याय नाही. काहीतरी जादू अजूनही इथल्या वातावरणात आहे.

- सचिन कुंडलकर

**पाठ्यपुस्तक - पाठ १० : सामाजिक समस्या आणि सामाजिक मूल्ये**

### ४. शासकीय कारभार

१. प्रमोद काकडे सरकारी कार्यालयात त्यांच्या एका कामासाठी येतात. त्यांच्यात आणि तेथील कर्मचाऱ्यांमध्ये घडलेला संवाद ऐकू या.

काकडे : नमस्कार. मला जोशीसाहेबांना भेटायचे आहे. एका अर्जावर त्यांची सही हवी आहे.

कदम : जोशी का? ते कदाचित आज आले नसावेत.

काकडे : का बरं? आज तर बुधवार आहे. त्यांची रजा आहे का?

कदम : ते मला नक्की माहीत नाही. तुम्ही असं करा, दुसऱ्या मजल्यावर राणे म्हणून एक साहेब आहेत. त्यांना जाऊन भेटा. बहुधा त्यांना माहीत असेल.

काकडे : ठीक आहे.
(काकडे दुसऱ्या मजल्यावर राणेंकडे जातात.)

काकडे : नमस्कार. आपण राणेसाहेब का?

राणे : हो. बोला, काय काम आहे?

काकडे : मला या अर्जावर जोशीसाहेबांची सही हवी आहे. खालच्या कदमसाहेबांनी तुम्हाला भेटायला सांगितलंय.

राणे : जोशीसाहेब होय, ते चौथ्या मजल्यावर बसतात. तुमचा अर्ज दाखवा बरं जरा.
(काकडे अर्ज दाखवतात.)

राणे : हं... ठीक आहे अर्ज. पण एकंदरीत असं दिसतंय, की ह्या अर्जावर जोशीसाहेबांची सही होण्याआधी लोबोमॅडमची सही घ्यावी लागेल. त्यांनी अर्ज पाहिला की मग जोशीसाहेब सही करतील.

काकडे : अरे बाप रे! म्हणजे आता ह्या मॅडमना आधी भेटावं लागणार! त्या कुठे भेटतील सांगू शकाल का?

राणे : लोबोमॅडम आत्ता कदाचित तिसऱ्या मजल्यावर असण्याची शक्यता आहे. तुम्हाला जाऊन पाहावं लागेल.

काकडे : ठीक आहे. आता काही पर्यायच नाही.
(काकडे तिसऱ्या मजल्यावर जातात)

काकडे : नमस्कार. आपण लोबोमॅडम का?

लोबो : हो. काही काम होतं का? मी आत्ता खूप घाईत आहे.

काकडे : हा अर्ज कृपया एकदा पाहता का? ह्यावर तुमची सही लागेल असं मला सांगण्यात आलं आहे.

लोबो : मला वेळ नाही हो आत्ता. इतर कामं आहेत मला.

काकडे : अहो, तुम्ही असं कसं म्हणता? मी कधीचा इथे हा अर्ज घेऊन फिरतो आहे. नुसती टोलवाटोलवी चालली आहे तुमची. अशानं तक्रार करावी लागेल मला तुमची.

लोबो : अहो, लगेच तक्रारीची भाषा कशाला करता? दाखवा बघू तुमचा अर्ज. (अर्ज वाचून) हं. ठीक आहे सर्व. ही घ्या सही आणि आता जोशीसाहेबांकडे जा. ते चौथ्या मजल्यावर असतात. इथून वर जा.

काकडे : धन्यवाद, मॅडम. जोशीसाहेब आज आले असतील ना? की रजेवर असतील?

लोबो : आता ते मी कसं सांगू? आले असतील, पण मी खात्रीनं सांगू शकत नाही.

काकडे : अशक्यच आहे सगळं!
(चौथा मजला)

काकडे : नमस्कार. आपण जोशी का? मला ह्या अर्जावर ताबडतोब सही द्या बघू. वैतागलो आहे तुमचं कार्यालय फिरून!

जोशी : काय झालं साहेब? तुम्ही बसा बघू जरा इथे. हे पाणी घ्या. काय काम आहे?

काकडे : ह्या अर्जावर तुमची सही हवी आहे. पण निव्वळ त्यासाठी सगळीकडे टल्ले खातो आहे सकाळपासून. छे! कसला कारभार हा तुमचा!

जोशी : तुम्हाला झालेल्या त्रासाबद्दल मी खरंच दिलगीर आहे. पण सरकारी कामात थोडी दिरंगाई होतेच, ह्याची कल्पना तुम्हाला असेलच. मला अर्ज दाखवता का तुमचा? (अर्ज वाचून) माफ करा काकडेसाहेब. पण ह्या अर्जावर तुम्हाला माझी नाही, तर पहिल्या मजल्यावर असणाऱ्या कदमसाहेबांची सही लागेल.

काकडे : अरे देवा! परत पहिला मजला!!!!

**पदविका परीक्षा पातळी ३**

**श्रवणकौशल्य संवाद १**

मीना : अहो! अहो गाडीतून कचरा बाहेर फेकू नका.

राम : सफाई कामगार आहेत ना.

मीना : अच्छा! म्हणजे तुमच्याकडे झाडलोट करणारा माणूस तुमचा जायचा यायचा रस्ताही झाडतो का?

**संवाद २**

राम : साहेब, मला चोरीची तक्रार नोंदवायचीये.

साहेब : कागदावर लिहून द्या सविस्तर.

राम : हं! हा घ्या अर्ज.

साहेब : हं! बसा जरा. हं! आता पुरावा द्या तुमच्याकडे चोरी झाली त्याचा.

राम : अहो, चोर काय पुरावा सोडून जातो का?

साहेब : चोरीला गेलेल्या वस्तू तुमच्याच होत्या त्याचा पुरावा पाहिजे.

राम : अं... अशा पावत्या नाहीयेत माझ्याकडे, तशा जुन्याच आहेत त्या वस्तू.

साहेब : जुन्या आहेत, तर मग कशाला तक्रार करताय?

### संवाद ३

**(फोन ची रिंग)**

डॉक्टर : हॅलो.

गणेश : हॅलो डॉक्टर.

डॉक्टर: हं!

गणेश : मला तुम्हाला असं विचारायचंय की, वजन कमी करण्यासाठी मी काय करू.

डॉक्टर : अहो, जरा कमी खा. रोज नियमित व्यायाम करा.

गणेश : हं! आणि डॉक्टर माझी पोटाची तक्रार असते हो.

डॉक्टर : अहो, बाहेरचं खात असाल तर ते बंद करा. आणि घरचंच जेवण घेत जा.

गणेश : हं! आणि हा रात्री ना मला झोपच लागत नाही. त्यासाठी काय करू.

डॉक्टर : अहो, तुमच्या सगळ्याच अवयवांना काहीना काही तरी होतंय.

गणेश : हं.

डॉक्टर : मग दाखवायला या ना! तुम्हाला नीट तपासायला लागेल. (फोन बंद झाल्याचा आवाज)

## उत्तरसंच

### मागील भागात

१. १ – ग  २ – ग  ३ – ख

२. १. क. लागली  ख. पाहिले  ग. दिसली  घ. गेली  च. मागवला  छ. प्यायली
ज. दिले  झ. गेली

२. क. नव्हती  ख. होत्या  ग. नव्हती  घ. होते  च. होती  छ. होती  ज. नव्हती
झ. नव्हती  ट. होती  ठ. होते

३. १. क. जेव्हा - तेव्हा  ख. जरी - तरी  ग. जसं - तसं  घ. जेव्हा - तेव्हा
च. जशी - तशी  छ. ज्याला – त्याला

२. क. जिथे  ख. तिथे  ग. जो  घ. तो  च. जिथे  छ. तिथे  ज. ज्याने
झ. त्याने  ट. जर  ठ. तर  ड. ज्याच्या  ढ. त्याच्या

५. १. क. – ३  ख. – ६  ग. – ४  घ. – ५  च. – १  छ. – ७

६. १. शशीला पुण्यात नोकरी लागली, म्हणून ती भारी खूश झाली. पण पुण्यात मराठीशिवाय थोडं अवघड होणार, या विचारांमुळे तिने मराठी भाषा शिकण्याचे ठरवले. मग तिने ऑनलाईन मराठी वर्गांची माहिती मिळवली. भरपूर वाचन आणि सराव करून तिने वर्षभरात मराठी भाषेवर प्रभुत्व मिळवले. तिच्या या मेहनतीमुळेच ती आता अस्खलित मराठी बोलू लागली आहे.

२. रामाच्या दुकानात उत्तम चिवडा मिळतो.

३. क. तील  ख. ला  ग. ला  घ. ना  च. च्या  छ. च्या  ज. त  झ. ला

४. क. अभ्यासाला, त्याच्या, आईला  ख. सखीच्या, आईला, तिने, आईला, दवाखान्यात
ग. माझी, दिवाळीत, आमच्या, चाळीतल्या, लोकांना  घ. तिने  च. ज्याचं, त्यानं / त्याने
छ. रस्त्यात  ज. देवळात  झ. ईदला  ट. त्यांचा, त्यांनी, कानाचे, कानाला
ठ. ज्याचा, त्याचा

७. १. क. घर साफ ठेवीन / ठेवेन.  ख. स्वयंपाकाच्या बाईंना रोज भाजी आणून देईन.
ग. अभ्यास करीन / करेन.  घ. शाळेत वेळेवर जाईन.  च. मधल्या वेळचा डबा न विसरता नेईन.
छ. सकाळी आणि दुपारी दूध पिईन.  ज. चंदाशी भांडणार नाही.  झ. खूप टीव्ही बघणार नाही.
ट. तुला पत्र लिहीन.

२. क. शहरात दूषित हवा झाल्याने लोक तोंडावर मास्क लावूनच फिरतील.
ख. माणसे जेवणाऐवजी व्हिटॅमिन खाऊन राहतील.  ग. मोकळा श्वास घेण्यासाठी लोक प्राणवायू विकत घेतील.  घ. सध्या अत्याधुनिक मानला जाणारा संगणक रद्दीत जमा होईल.
च. त्या काळात दुकान ही संकल्पना नाहीशी झालेली असेल.

८. २. क. पाण्याला वाटलं  ख. झाडाला, आपल्या, सावलीत  ग. रस्ता, खड्ड्याच्या
घ. दाराला, घर

३. क. गाईला  ख. घोड्याला  ग. गुराढोरांना  घ. त्याला  च. वाघाला  छ. बबनने
ज. गायीम्हशींना  झ. घोड्याला  ट. त्याला ठ. लक्ष्मीला  ड. बायकोला  ढ. शेळीला
ण. बबनला  त. बबनला  थ. त्याला  द. त्याला

४. क. गाय गोठ्यात राहते. ख. घोडा पागेत राहतो. ग. शेळी झोपडीत होती.
घ. वाघ रानात होता. च. बबन आज जंगलात राहणार होता. छ. गायीम्हशी कडबा खातात.
ज. घोडा चारा खातो. झ. बबननं भाकरी खाल्ली. ट. घोड्याच्या ओरडण्याला खिंकाळणं म्हणतात.
ठ. गायीच्या ओरडण्याला हंबरणं म्हणतात. ड. शेळी बें बें करत ओरडते.

५. क – १ ख – ३ ग – २ घ – २

९. १. क. खूप, हून, सर्वात ख. हून ग. सर्वात जास्त, हून, जवळजवळ तेवढीच
घ. सर्वात, जवळजवळ तेवढाच, सर्वात च. हून, हून, सर्वात

१०. १. रोजच्यारोज २. आजच्याआज ३. वेळच्यावेळी ४. आत्ताच्याआत्ता ५. जसंच्यातसं
६. वेळच्यावेळी ७. मागच्यामागे ८. जिथल्यातिथे

११. १. हाती २. पायी ३. हाती ४. हातीपायी ५. हाती ६. हाती ७. हाती
८. पायी

१२.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| श्री | था | लि | पी | ठ | म | शे | व | ला | डू |
| खं | च | क | ली | पो | खि | च | डी | आ | क |
| ड | ट | द | पो | हे | र | ता | क | म | ठ्ठा |
| सा | ख | र | ळी | र | भा | क | री | टी | कॉ |
| जि | ल | बी | मा | स | र | ब | त | मा | फी |
| मी | ठ | दू | पा | व | भा | जी | लो | ण | च |
| भ | जी | ध | न | मी | सो | ल | क | ढी | हा |
| जी | पे | र | गी | ट | को | शिं | बी | र | बा |
| गो | ज | स | ठे | व | डा | चि | व | डा | सुं |
| कों | ब | डी | चा | र | स्सा | व | र | ण | दी |

१३. १. तुझ्यात, माझ्यात २. त्याच्यात ३. ज्यातत्यात ४. ज्याच्यात ५. माझ्यात, आपल्यात
६. आपल्यात ७. त्याच्यात ८. ज्यांच्यात ९. ह्यांच्यात

१४. १.

| करणे | होणे | वाटणे |
|---|---|---|
| टिंगल | आजार | उत्साह |
| उशीर | टिंगल | लाज |
| दुरुस्ती | उशीर | आश्चर्य |
| गोंधळ | दुरुस्ती | काळजी |

| | | |
|---|---|---|
| स्वयंपाक | स्वयंपाक | अभिमान |
| फजिती | फजिती | आदर |
| नट्टापट्टा | आश्चर्य | कौतुक |
| पोपट | पोपट | आनंद |
| काळजी | ओढाताण | |
| नमस्कार | दमछाक | |
| दमछाक | स्वागत | |
| अभिनंदन | सर्दी | |
| स्वागत | खोकला | |
| आदर | कौतुक | |
| कौतुक | आनंद | |

२. वाटणे : उत्साह, लाज, काळजी
होणे : उशीर, गोंधळ, ओढाताण, दमछाक, रोग
करणे : गंमत, टिंगल, आदर, पाठ, माफ
लावणे : कुंकू, रंग, पाल्हाळ

३. क. सत्कार ख. अभिनंदन, राग ग. विचार घ. राग

४. क. काम : घालणे/ वळणे/ चालणे/ पळणे/ उठणे/ होणे/ विकणे/ दिसणे/ लिहिणे

ख. आनंद : करणे/ दिसणे/ ठरवणे/ लावणे/ काढणे/ चालणे/ विकणे/ तपासणे/ उठणे/ पळणे/ सांगणे/ लिहिणे

५. क. झाला / वाटला ख. उडाला / झाला ग. लावले / जगवले घ. दिले / घेतले / बनवले

६. टिंगल करणे, आदर करणे

## पाठ १



१. १.

| कामाचे टेबल | व्यक्ती | कार्यक्षेत्र | व्यक्तींचे अपेक्षित गुणधर्म |
|---|---|---|---|
| क. | ३ | ख. विभागप्रमुख / कारखानदार | श्रीमंती, शिस्तप्रियता, हुशारी, तरतरीतपणा |
| ख. | १ | ग. कवी / कलाकार / लेखक | कल्पकता |
| ग. | २ | क. लिपिक/ कर्मचारी / अभियंता | व्यवस्थितपणा, नीटनेटकेपणा, बुद्धिमत्ता, कामसूपणा |

३. क. स्वत:   ख. अंत:करण   ग. दु:ख   घ. मन:पूर्वक   च. नि:स्वार्थीपणा

४. क. १. सहिष्णुता   २. सामंजस्य   ३. पूर्वग्रह   ४. बाह्यरेषा   ५. बुद्धिमत्ता   ६. प्रौढत्व
७. माधुर्य   ८. वात्सल्य   ९. निष्कर्ष

२. १.

| शब्द | अर्थ |
|---|---|
| क. हिरवाई | ६. दाट, हिरवागार निसर्ग. |
| ख. आळशीपणा | ७. आवश्यक काम करण्याचाही कंटाळा. |
| ग. शौर्य | २. शूर असण्याचा, साहसी असण्याचा गुण. |
| घ. श्रीमंती | ३. पैसा, संपत्ती, विचार, कल्पना खूप असणे. |
| च. रखरखीतपणा | १०. पाण्याअभावी, अतिकडक उन्हाने झालेली स्थिती. |
| छ. कामसूपणा | ८. काम करत राहण्याची आवड. |
| ज. डरपोकपणा | ९. भित्रेपणा, भित्रा स्वभाव, साहसी वृत्तीचा अभाव. |
| झ. निरक्षरता | ४. भाषा लिहिता-वाचता न येणे. |
| ट. दारिद्र्य | ३. पैसा, संपत्ती इ. खूपच कमी असणे. |
| ठ. पांडित्य | १. खूप अभ्यास करून मिळवलेले ज्ञान. |

२. क. हिरवाई   ख. कामसूपणा   ग. रखरखीतपणा   घ. शौर्य   च. निरक्षरता
छ. आळशीपणा   ज. डरपोकपणा   झ. श्रीमंती आणि दारिद्र्य

३. क. तो गोडवा / ती गोडी   ख. ती नवलाई   ग. ती गुलामगिरी
घ. तो शांतपणा / ती शांतता   च. ती सुंदरता / ते सौंदर्य   छ. ते गांभीर्य / ती गंभीरता
ज. ती महानता   झ. ते मित्रत्व / ती मैत्री   ट. ती भिक्षुकी

४. क. कडूपणा   ख. सातत्य   ग. कंटाळा   घ. तुसडेपणा, खोटारडेपणा आणि तणाव, अपमान, सोशिकपणा   च. बंडखोरी, बेइमानी

५.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| बं | ड | खो | री | |
| | कं | टा | ळा | |
| | गा | र | वा | |
| तु | स | डे | प | णा |
| | अ | प | मा | न |
| | त | णा | व | |

३. १. उत्तरांसाठी ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे अनुलेखन पाहा.

४. १. क. चूक ख. बरोबर ग. बरोबर घ. चूक च. चूक छ. बरोबर

२. क. परंपरेतून कामांची आणि जबाबदाऱ्यांची स्त्री-पुरुषांमध्ये झालेली वाटणी

ख. घरातील आणि आसपासचे वातावरण

ग. कुटुंब लहान असल्याने घरकामासाठी नोकरमाणसे आणि यंत्रे असतात.

घ. ग्रामीण भागातील शाळांमध्ये ह्या समानतेच्या विषयाबद्दल संवेदनशीलतेने सतत बोलले जाते.

३. क. अंतराळवीर ख. स्त्रीरोगतज्ज्ञ ग. खाणकामगार घ. पाणबुड्या च. पाळणाघरचालक
छ. भरतकामतज्ज्ञ ज. आचारी झ. नर्तकी

५. क. जेवढा ख. तेवढा ग.जसेजसे घ. तसेतसे च. ज्यांनी छ.त्यांनी
ज. जेव्हा झ. तेव्हा ट. ज्या ठ. त्या

५. १. क. उतरतो आहे / उतरतोय ख. दिसतायत ग. चालत आहे. घ. जात आहे.
च. बांधत आहे छ. करत आहे ज. येत आहेत झ. करीत / करत आहे
ट. करीत / करत आहेत ठ. होत आहे

६. १. क. देत असते ख. खिदळत असतात ग. होत असतो घ. वाटत नाही
क. पडत असतो ख. कडाडत असतात ग. गडगडत असतात घ. वाहत असतो
च. जात असतो छ. दिसत नाही

२. क. नाश्त्याची वेळ असते ख. डुलकी काढत असतो ग. जेवत असतो
घ. पत्ते खेळत असतो च. बागेत फिरत असतो छ. गप्पा मारत असतो
ज. दूरदर्शनमालिका बघत असतो झ. औषध घेत असतो ट. झोपण्याची वेळ असते.

७. १. क. सारखी ख. सारखा ग. योग्य घ. लायक
च. योग्य छ. योग्य

२. क. सारखी ख. सारखं ग. लायक / योग्य घ. लायक / योग्य च. सारखं

८. १. क. असते, नसतो ख. असतं, नसतं ग. असतो, नसतं घ. असतात, नसतात
च. असतो, नसतं

२. क. कोण, असतं, नसतो, असतो ख. काय, असतो, नसतो, असतं ग. का, असते, कसं नसतं
घ. असतो, कशाला, असतोस च. काय, असतो, कोण, असतं

९. १. क. ताट ख. काट ग. ताठ घ. उटणे च. पाट छ. काठ ज. आटवायचं
झ. उठणे ट. आठवायचा

२. क. ट, ठ, ठी, ट ख. ट, ठ ग. ठ, ठ घ. ट, ठ, टी, टी च. टां, ठी, ट, ट, ट, ट

३. क. शिक्षक अनेक प्रकारे मुलांना सांगत होते, पण मुलांना काही बोध होत नव्हता.

ख. आजारी पडल्याचे नाटक करून स्पर्धेला येण्याचे त्याने टाळले.

ग. सकाळपासून संध्याकाळपर्यंत गिऱ्हाइके शोधून आपला माल खपवण्याचा तो प्रयत्न करत होता.

घ. गळाला लागलेला मासा ओढून किनाऱ्यावर वाळूत टाकल्यावर त्याने एकदम हवेत उसळी मारली.

च. तुझे मत मांडायला तू अजिबात घाबरू नकोस.

४. क. सचिन तेंडुलकरला भारतरत्न हा किताब बहाल केल्यावर भारतीयांना अतिशय आनंद झाला.

ख. अजिंठा – वेरूळची लेणी पाहून परदेशी पर्यटक अचंबित झाले.

ग. प्राणीसंग्रहालयात फिरताना पिंजऱ्यातील माकड आमच्याकडे एकसारखे टवकारून बघत होते.

५. क. उडणे ख. लढवणे ग. घेणे घ. घालणे च. देणे छ. वाटणे

६. क. करणे ख. लागणे ग. लावणे

## पाठ २



१. १. क. सहकारी — माझ्या कार्यालयातील सारे सहकारी आत्मविश्वासाने वावरतात.

ख. आकर्षक — आकर्षक पगाराची नोकरी सर्वांनाच हवी असते.

ग. कल्पनाशक्ती — जाहिरातक्षेत्रात अचाट कल्पनाशक्ती वापरून निरनिराळ्या उत्पादनाच्या जाहिराती बनवतात.

घ. करार — नोकरी स्वीकारताना मला दोन वर्षांचा करार करावा लागला.

च. निवड — उत्तम शैक्षणिक पाठबळ असल्यावर आवडत्या नोकरीची निवड करता येते.

अशा प्रकारे इतर शब्दांनाही अनेक उत्तरे शक्य

२. क. १. कार्यसंस्कृती २. कार्यप्रणाली ३. कार्यपद्धती ४. समाजकार्य ५.कार्यप्रक्रिया
६. कार्यतत्पर ७. कार्यक्षमता ८. देशकार्य ९. कार्यक्षेत्र / क्षेत्रकार्य १०. कार्यक्रम
११. जीवितकार्य १२. कार्यकक्ष १३. कार्यदक्ष १४. कार्यभार १५. कार्यवाही
१६. कार्यकारी १७. लग्नकार्य १८. कार्यशाळा १९. कार्यकुशलता २०. गृहकार्य

२. १. क. जड सामान उचलणे / चोख हिशोब ठेवणे / विद्युतयंत्रणा तपासणे /...
ख. निर्णय घेणे / पैशांचा व्यवहार सांभाळणे / रोख रकमेसह प्रवास करणे / उंचावर चढून कामे करणे / खाणीत काम करणे /...
ग. ठरावीक वेळेत काम करणे / सतत एकच गोष्ट तपासणे / तेच तेच काम करणे / विद्युतयंत्रणा दुरुस्त करणे /...
घ. शेंबूड पुसून देणे /...
च.कविता लिहिणे / संकल्पना मांडणे / छायाचित्रण करणे /...
छ. युद्ध करणे / टारगेट गाठणे / वरिष्ठांना पटवून देणे / कार्यक्रमपत्रिका तयार करणे /...

२. क. १३ ख. ११ ग. १० घ. १५ च. २१ छ. १६ ज. १२ झ. १४
ट. १७ ठ. २२ ड. २४ ढ. २३ ण. १८ त. ८ थ. १९ द. २०
ध. ९ न. ६ प. ३ फ. ४ ब. ७ भ. १ य. २ र. ५

३. २.

दिनांक – २०-०३-२०१८

प्रति,
श्रीमती सुजाता सहस्रबुद्धे
संचालिका
वंचित विकास मंच

विषय : लेखाधिकाऱ्याच्या पदासाठी नोकरीचा अर्ज

महोदय,
मी सुमेध सप्तर्षी, राहणार पुणे, आपल्या संस्थेत लेखाधिकारी म्हणून काम करू इच्छितो. अकाऊंटन्सी हा विषय घेऊन मी नुकतेच एम.कॉम. केले आहे. मला लेखाधिकाऱ्याच्या कामाचा अनुभव नसला, तरी अनुभवाने मी सारे चटकन शिकून घेईन, आपल्याला तक्रार करण्यास जागा ठेवणार नाही, असे सांगू इच्छितो. आपल्या संस्थेत काम करण्यास मी उत्सुक आहे. मला लवकरात लवकर उत्तराची अपेक्षा आहे. या अर्जासोबत मी माझे रेझ्युमे जोडले आहे. कळावे.

आपला विश्वासू
सुमेध सप्तर्षी

३. क. ३ ख. ४ ग. १ घ. ७ च. ६ छ. ५ ज. २

४. क. माने ह्यांच्या बॉस खूप शिस्तप्रिय आहेत. त्यांना गंमत करत काम करणे आवडत नाहीत. कामगारांनी उशिरा येणे आणि गिऱ्हाइकांना वाट बघायला लावणे त्यांना आवडत नाही.
ख. माने हे बेशिस्तपणे वागतात आणि वेळेवर कामाला येत नाहीत, असे बॉसचे मत आहे.
ग. मान्यांचा बेशिस्तपणा बॉसला आवडत नाही.

४. १. क. माणसाकडून ख. नाटकावरून ग. अनुभवातून / अनुभवामधून / अनुभवावरून
घ. हाताखालून च. वागण्यामधून / वागण्यातून / वागण्यावरून

५. १. क. १. खाल्ली होती २. खात होती ३. खाल्ले ग. १. वाळत होते २. वाळले होते
३. वाळले

ख. १. चावले २. चावला होता ३. चावला घ. १. जाणार होते, गेली २. जात होते

२. क. १. पुकारला २. झाले नाहीत ३. केला ४. दिला ५. राहिला नव्हता ६. होते
७. मागितली ८. केला ९. दिली नाही १०. लागले ११. झाल्या १२. आले
१३. घेतले

ख. १. पुकारला होता २. झाले नव्हते ३. केला होता ४. दिला होता ५. राहिला नव्हता ६. होते ७. मागितली होती ८. केला होता ९. दिली नव्हती
१०. लागले नव्हते ११. झाल्या होत्या १२. आले होते १३. घेतले होते

ग. ऐकुनी येतो भरुनी ऊर. (अनेक उत्तरे शक्य)

पाठ ८

६. १. क. साड्या विकत घेत असलेली / विकत घेणारी गृहिणी
गृहिणीने विकत घेतलेल्या साड्या
ख. व्याकरण छान शिकवणारी / शिकवत असलेली शिक्षिका
शिक्षिकेने शिकवलेले / शिक्षिका शिकवत असलेले व्याकरण
ग. स्वस्त भाजी विकणारा / विकत असलेला भाजीवाला
भाजीवाल्याने विकलेली / भाजीवाला विकत असलेली भाजी
घ. सुवर्णपदक जिंकणारी खेळाडू / खेळाडूने जिंकलेले सुवर्णपदक
च. श्लोक समजावणारा / समजावत असलेला साधू
साधूने समजावलेला / साधू समजावत असलेला श्लोक
छ. खूप विड्या ओढणारा / ओढत असलेला कर्मचारी
कर्मचाऱ्याने ओढलेल्या / कर्मचारी ओढत असलेल्या विड्या

२. क. केलेली ख. केलेले ग. सोडवलेलं घ. काढलेलं च. काढलेले छ. बसवलेलं

३. क. भीत भीत विचारल्याने कधी कधी उत्तर मिळत नाही.
ख. लाजत लाजत बोलल्याने लोक हसतात.
ग. गाणी ऐकत ऐकत स्वयंपाक केल्याने कंटाळा येत नाही.
घ. अंधारात चाचपडत चाचपडत शोधल्याने वस्तू सापडते.
च. धावत धावत गाडी पकडल्याने मी दमलो.
छ. हसत हसत उत्तर दिल्याने ताण नाहीसा होतो.



४. क. सोनालीने चहा पिऊन नव्या जोमाने काम सुरू केले.
ख. प्रथमेश अभ्यास करून खेळायला गेला.
ग. आयेशा साडी नेसून कार्यक्रमाला गेली.
घ. स्मिता सापाला पाहून घाबरली.
च. गौरी आणि तिचा नवरा बाहेर फिरून घरी आले.

५. क. असल्यास ख. नसल्यास ग. ठरल्यास घ. असल्यास च. ठरल्यास

६. क. बोलणे ख. येणे ग. मारणे घ. घेणे च. रागावणे

७. क. हसत हसत ख. ऐकत ऐकत ग. सांगत सांगत घ. घाबरत घाबरत
च. हसत-खेळत

८. क. करता करता ख. सुधारता सुधारता ग. झाडता झाडता घ. बोलता बोलता
च. येताजाता

९. क. येताना ख. करताना ग. जेवताना घ. पाठवताना च. वाचताना

१०. क. रागवू ख. खाऊ ग. बोलू घ. वाचू च. टाकू

११. उत्तरांसाठी ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे अनुलेखन पहा.

१२. क. निघून ख. घेऊन ग. बनवून घ. करून च. करून छ. नेऊन

१३. क. सांगितलेली ख. केलेलं ग. हरवलेली घ. दिलेलं च. झालेल्या

१४. क. उलटून ख. हरवून ग. उसवून घ. फसवून च. निसटून छ. उचलून
ज. सुचवून

८. १. करणे – धडपड करणे, टीका करणे, आत्मसात करणे

२. काढणे – टिपणे काढणे, कुरापत काढणे, चित्र काढणे

३. असणे – तत्पर असणे, माहीत असणे, सराव असणे

४. पडणे – विसर पडणे, खाली पडणे, भारी पडणे

५. उडणे – लक्ष उडणे, त्रेधा उडणे, पाणी उडणे

६. मारणे – ताव मारणे, गप्पा मारणे, थाप मारणे

७. घालणे – नजरेखालून घालणे, मीठ घालणे, पाणी घालणे

८. बसणे – धंदा बसणे, चेहरा पाडून बसणे, खाली बसणे

९. वाटणे – रुची वाटणे, भीती वाटणे, लाज वाटणे

१०. सुटणे – प्रश्न सुटणे, कार्यालय सुटणे, पोट सुटणे

## पाठ ३



१. १. क - २ ख - १ ग - ५ घ - ३ च – ४

३. क. १. बेधडक २. ऐहिक ३. धाटणी ४. प्रवाह

२. १. (अनेक उत्तरे शक्य)

| शहर | गाव | दोन्ही |
|---|---|---|
| सांस्कृतिक कार्यक्रम | झोपाळा | मोकाट कुत्री |
| शिक्षणाच्या संधी | नद्या | डांबरी रस्ते |
| नोकरी – व्यवसायाच्या संधी | जंगल | खानावळी |
| बावरलेपण | भ्रमंती | हॉटेले |
| ... | ... | ... |

२. (अनेक उत्तरे शक्य) क. कारण तो खूप वाचन करतो. ख. कारण तो आळशी आहे. ग. कारण तो झोपाळू आहे. घ. कारण ती गाणे शिकली आहे. च. कारण त्या खूप पुस्तकं वाचत असतात. छ. कारण ते उत्तम खवय्ये आहेत. ज. कारण तो गणितांचा सतत सराव करीत असतो. झ. कारण तिचे रंगज्ञान उत्तम आहे. ट. कारण ती प्राण्यांवर फार माया करते.

३. (अनेक उत्तरे शक्य) नमस्कार, मित्रा, तू कसा आहेस? मी इतिहास विषयात पदवी घेतली आहे हे तुला माहीत आहेच. सध्या मी त्या विषयात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण करण्याच्या विचारात आहे. त्यासाठी मुंबईत जावे असे ठरवत आहे. आमच्या या आडगावातील आयुष्य शहरातल्या मानाने शांत आहे. इथले बहुतांश गावकरी शेतीचा एखादा हंगाम सोडल्यास त्यानंतर उरल्या वर्षभराच्या काळात तसे निरुद्योगी असतात. गावकऱ्यांची दिनचर्या फारच निवांत आहे. गावातला परिसर निसर्गरम्य असला तरी उद्योगधंद्यासाठी फारसा उपयुक्त नाही.

६. क. मग तू महात्मा फुले मंडईतील धान्य बाजारात जा. धान्य बाजारात वस्तूंचे दर घाऊक असतात त्यामुळे स्वस्त दरात किराणामाल खरेदी करता येईल.
ख. मग तू नाक्यावरच्या 'मोदक' ह्या उपाहारगृहात जा. तिथे फक्त शाकाहारीच जेवण मिळते.
ग. मग तू कुलाब्याला दादूमियांमध्ये जेवायला जा. तिथे तुला चविष्ट मांसाहारी जेवण करता येईल.
घ. मग तू परळला पीव्हीआरमध्ये जा. तिथे तुला हमखास एखादा चांगला चित्रपट पहाता येईल.
च. मग तू दादरला जा. तिथे तुला शिवाजी मंदिर, यशवंत नाट्यगृह येथे चांगले नाटक पाहता येईल. तिथे नसल्यास थोड्याच अंतरावर रविंद्र नाट्यमंदिरही आहे.
छ. मग तू मस्जिदबंदरच्या कापड बाजारात जा. तिथे खूप स्वस्त आणि मस्त कपडे मिळतात.
ज. मग तू सीसीडीमध्ये जा. तिथे कॉफी थोडी महाग असते, पण निवांतपणे पिता येईल.
झ. मग तू लोअर परळला जा. कदाचित तिथे डिस्कोथेक असेल.
ट. मग तू जवळच असणाऱ्या पाच बगीच्यात जा. तिथे तुला शांतपणे फेऱ्या मारता येतील.

३. १. क. (अनेक उत्तरे शक्य)

दुसरा परिच्छेद : गैरसमज तिसरा परिच्छेद : पुरुषांबद्दलचे पूर्वग्रह
चौथा परिच्छेद : नियमांचा अतिरेक

ख. १. घ २. ग ३. ख ४. क

ग. १. कारण त्यांना घर स्वतः चालवायला आवडते. शिवाय ते सहजपणाने स्वयंपाक आणि घरातली छोटी कामे करू शकतात. राहते घर शांत, नीटनेटके आणि प्रसन्न ठेवण्याची कला त्यांनी आत्मसात केली आहे.

२. फक्त कुटुंबासोबत राहणाऱ्याला म्हणजे विवाहितालाच जागा देण्याचा सोसायटीचा नियम होता. सचिन कुंडलकर मात्र अविवाहित असल्याने त्यांना एकदा भाड्याचे घर सोडावे लागले. ते चाळीशी पार केलेले असल्याने ते विवाहित असावेत असा घरमालकिणीचा गैरसमज झाला होता.

३. सगळीच अविवाहित माणसं सिगरेट फुंकत, लुंग्या वर करून बाल्कनीत येऊन बायकांवर नजर ठेवतात.
त्यांना घर शांत, नीटनेटके आणि प्रसन्न ठेवता येत नाही.

४. नेहमीच पुरुष अव्यवस्थित, गोंधळ करणारे, अस्ताव्यस्त राहणारे असतात का?
स्त्रीने घराबाहेर पडून काम करणे आणि पुरुषाने घरी राहून घर सांभाळणे हे समाज स्वीकारेल का?
अशा कुटुंबांना समाज सार्वत्रिकपणे स्वीकारेल का?

२. क. १. आंबेडकरनगर २. रात्री ३. पूर
ख. १. नदीतला गाळ न काढल्यामुळे या वर्षी पूर आला.

२. रात्री लोक झोपल्यावर पूर आल्याने मोठ्या प्रमाणावर लोक मरण्याची भीती जाणवते आहे.

३. रात्री पूर आल्याने लगेच स्थलांतर करणे अंधारामुळे अवघड होते. शिवाय ज्यांच्या घरात जास्त माणसे राहतात, त्यांना घेऊन स्थलांतर करणे किंवा लहान मुले, म्हातारी माणसे यांना हलवणे कठीण जात आहे.

ग. १. मंगळवारी, बुधवारी २. दोन, नव्हता

३. दूरदेशीची पाखरे
माझ्या बागेत खेळली
शीळ घालता घालता
पहाटेला दूर गेली

एक बापुडे सकाळी
होउनीया सैरभैर
चोच मिटून शोधते
सोबत्यांना बागभर

इवलाल्या पावलांनी
इथेतिथे डोकावले
कुठेतरी पानाआड
काकडून थबकले

४. क. अमिताभ बच्चन रोज सकाळी लवकर उठतात. त्यानंतर ते दोन ग्लास पाणी आणि आवळ्याचा रस पितात. त्यानंतर चालायला जातात. त्यानंतर ते व्यायाम करतात आणि मगच नाश्ता करतात. नाश्त्यानंतर ते ग्रीन टी घेतात. त्यानंतर ते एखादे फळ खातात. त्यानंतर काम नसेल तर दुपारी घरीच जेवतात. दुपारच्या जेवणात ते सलाड खातात आणि त्यानंतर विविध धान्यांची पोळी, भात, डाळ आणि एखादी भाजी असे जेवण घेतात. त्यानंतर रात्रीचे जेवण घेतात त्यात कधीकधी पनीर असते. त्यानंतर ते न विसरता दूध पितात. त्यानंतर ते झोपतात.

ख. अमिताभ बच्चन रोज रात्री झोपण्याआधी न विसरता दूध पितात. त्याआधी ते रात्रीचे जेवण घेतात त्यात कधी कधी पनीर असते. त्याआधी, काम नसेल तर, दुपारी घरीच जेवतात. दुपारच्या जेवणात विविध धान्यांची पोळी, भात, डाळ आणि एखादी भाजी असते, पण त्याआधी ते सलाड खातात. जेवणाआधी ते एखादे फळ खातात. त्याआधी ग्रीन टी घेतात. सकाळी नाश्ता करण्याआधी ते व्यायाम करतात. ते रोज सकाळी लवकर उठतात आणि सकाळची फेरी मारतात, परंतु त्याआधी ते दोन ग्लास पाणी आणि आवळ्याचा रस पितात.

च. १. ताईला जेवणाच्या वेळी बडबड केलेली चालत नाही.
२. आईला स्वयंपाकाच्या वेळी टीव्ही पाहिलेला चालत नाही.
३. सुशांतला अभ्यासाच्या वेळी गप्पा मारलेल्या चालत नाहीत.
४. कश्मीराला गाताना फोन आलेला चालत नाही.
५. आजीला दुपारच्या झोपेच्या वेळी लहान मुलांचा आवाज आलेला चालत नाही.


५. क. १. शिवाय / वाचून २. शिवाय / व्यतिरिक्त ३. व्यतिरिक्त, शिवाय / वाचून
४. शिवाय / वाचून ५. शिवाय / वाचून

४. २. क. करत असे ख. पोहोचवत असत ग. देत असत घ. उडवत असत
च. पोहोचवत असत छ. करत असत

३. क. पिच्छा सोडणे / पुरवणे ख. पुरवणे ग. विस्तार होणे, राग अनावर होणे, समाविष्ट होणे
घ. १. व्याख्या करणे २. गुरफटत जाणे ३. वागणूक मिळणे ४. तंबू ठोकणे
५. कामी येणे.

## पाठ ४

१.




२. १. क. १. बायका डोक्यावरून ओझी वाहत होत्या. २. माणसे तीनचाकी सायकलवरून सामान विकत होती. ३. बायका बकऱ्या चरायला नेत होत्या. ४. मुले शाळेत जात नव्हती. ५. मुले रस्त्यावर खेळत होती. ६. बायका फक्त साड्या नेसत होत्या.

ख. १. लोक रस्त्यावर थांबून बोलत आहेत. २. मुलगी रस्त्याच्या मधून चालत आहे. ३. दुकानात दिवे चमकत आहेत. ४. लोक रिक्षा जास्त वापरत आहेत. ५. शहर बदलत आहे.

ग. १. आकाशात ड्रोन उडत असेल. २. वाहने जमिनीवरून फिरत नसतील. ३. माणसे कमी काम करत असतील. ४. काचांची घरे बांधत असतील. ५. सर्व शहर स्वच्छ दिसत असेल.

२. क. १. पुस्तक वाचत होता २. चहा करत होती ३. दरवळत होता ४. अभ्यास करत होता ५. होत नव्हता ६. होत नव्हते ७. खेळत नव्हते

ख. १. पुस्तक वाचत आहे २. चहा करत आहे ३. दरवळत आहे ४. अभ्यास करत आहे ५. होत नाही आहे ६. होत नाही आहे ७. खेळत नाही आहेत

ग. १. पुस्तक वाचत असेल २. चहा करत असेल ३. दरवळत असेल ४. मित्रांशी बोलत असेल ५. रंगत असेल ६. काम होत नसेल ७. बघत असेल

३. १. क. दोघी ख. दोन्ही ग. दोन्ही, दोन्ही घ. दोन्ही च. दोघींचे छ. दोघे
ज. दोघांत झ. दोन्ही, दोन्ही ट. दोघी ठ. दोघांचे ड. दोन्ही ढ. दोन्ही

३. क. बरोबर ख. चूक ग. चूक

४. १. क. अरे वा! मिश्र वंशांच्या संबंधांतून होणाऱ्या संततीत दोन्ही वंशांचे गुणधर्म येऊ शकतात!
ख. अहाहा! पामेला आपल्या मुलींच्या जन्मामुळे मात्र भलतीच खूश आहे!
ग. ऑ! पामेलाच्या आईमध्ये जमैकन, आयरिश आणि आफ्रिकन वंशांचे अंश आहेत, तर वडील युरोपिअन आणि गोरे आहेत!
घ. अरे वा! सध्याच्या 'डिजिटल' आणि 'बायोमेट्रिक' युगात हातांचे ठसे खूपच महत्त्वाचे ठरणार आहेत!
च. छे, छे! 'आयडेंटिकल' जुळ्यांत दिसण्यामध्ये साम्य असले, त्यांचा रक्तगट आणि त्यांच्यामधील जनुकीय रचनादेखील तंतोतंत असल्या, तरी त्यांच्या हातांच्या ठशांमध्ये फरक असतो.

२. क. अरे वा ख. अरेरे ग. शी घ. बाप रे च. शाब्बास छ. अरेरे ज. ओहो
झ. ऑ ट. छे छे ठ. अरे ए

३. क. शाबास! सलोनी तुझा वर्गात पहिला क्रमांक आला.
ख. अबब! नदीला हा केवढा मोठा पूर आलाय.
ग. श्शी! मी चुकून चिखलात पाय टाकला.
घ. बाप रे! जोगिंदरला काल कुत्रा चावला.
च. अरेरे! सिमरन इतकी झुंज देऊन अखेर सामना हरली.
छ. अरेरे! बलविंदर जास्त ताकदवान असला तरी तो कुस्तीचा सामना हरला.
ज. अरे! आता कोणी काहीच का बोलत नाही?

४. क. – ४ ख. - ३. ग. – २ घ. – ५ च. – १

५. क. – ३ ख. - २ ग. - ३ घ. - ३ च. - ३ छ. – २

६. क. अरेरे ख. बाप रे ग. आई गं घ. ओहो च. अरे व्वा छ. अबब

५. १. क. १. चूक २. चूक ३. बरोबर ४. बरोबर
ख. १. ई २. आई गं ३. शी: शी: ४. वा वा

७. १. पुरेसा, पुरता २. पुरते ३.पुरता ४. पुरते ५. पुरेसे ६. पुरेशा
७. पुरेशी ८. पुरेशा, पुरते ९. पुरते १०. पुरते

८. २. क. ५ ख. ४ ग. २ घ. १ च. ३

३. क. झोप काढली ख. लचक भरली ग. धाड भरली घ. जमली होती
च. घृणा वाटली छ. आरोग्य लाभलं ज. व्याधी जडली झ. व्याधी जडली
ट. गप्प बसली ठ. गळा दाटून

## पाठ ५

१. १.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पृ | | | का | र | खा | ना | | प्रा | ण | वा | यू |
| थ्वी | | ह | | | | | पा | णी | | द | |
| | | वा | ता | व | र | ण | | | | ळ | |
| भू | | | प | | | | प्ला | स्टि | क | | वृ |
| कं | | | मा | | प | शू | | | | वृ | क्ष |
| प | क्षी | | न | | र्या | | ई | | ऊ | | तो |
| | | | | | व | | क | | न | | ड |
| पा | रा | | | | र | | च | | | | |
| ऊ | | प्र | दू | ष | ण | | रा | | इं | ध | न |
| स | | | | | | धु | | | | | त्र |
| | ओ | झो | न | | | के | र | | ओ | ला | वा |
| | | | | | | | | झा | | | यू |
| का | र्ब | न | डा | य | ऑ | क्सा | इ | ड | | | |

२. क. २. ख. १. ग. ३. घ. २. च. ३.

३. क. गजबजाट ख. ऱ्हास ग. उकाडा घ. हव्यास च. गरिबी छ. चालना
ज. सामंजस्य झ. खबरदारी ट. जागृती ठ. वणवण ड. तीव्रता ढ. शिडकावा
ण. निळाई त. प्रोत्साहन थ. सातत्य

२. १. क. १. ग २. क ३. ख ४. ग
ख. १. घ २. च ३. क ४. ग ५. ख.

२. ख. १. समृद्ध पर्यावरण २. नाही ३. निसर्गचक्रावरील नाटकांचे
ग. १. ग २. क ३. ख ४. च ५. घ
घ. १९८२ साली 'इकॉलॉजिकल सोसायटी'ची स्थापना केली. १९९७ पासून 'इकॉलॉजिकल सोसायटी'मध्ये त्यांनी पर्यावरणशास्त्र हा विषय शिकवण्यासाठी 'नैसर्गिक संसाधनांचे शाश्वत व्यवस्थापन' हा कोर्स सुरू केला. ठिकठिकाणच्या पडीक जमिनींवर त्यांनी निसर्गाच्या पुनरुज्जीवनाचे यशस्वी प्रयोग केले.

३. १. ख. दूषित पाण्यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होत राहिल्यामुळे अनेक आरोग्यसमस्या निर्माण झाल्या / झालेल्या असतील.
ग. लोकसंख्येत वाढ होत राहिल्यामुळे निसर्गाचा समतोल ढळलेला असेल.
घ. जंगले नष्ट होत राहिल्यामुळे जीवसृष्टीला धोका निर्माण झालेला असेल.
च. कार्बन डायऑक्साईडचे पाण्यातील प्रमाण असेच वाढत राहिल्यामुळे पृथ्वीवरील जीवसृष्टी असाध्य रोगांनी पीडित झाली असेल.
छ. ओझोनचा थर कमी होत राहिल्यामुळे वातावरणात सल्फर डायऑक्साइड व नायट्रोजन डायऑक्साइडसारखे घातक वायू मिसळलेले असतील.
ज. जागतिक तापमानात वाढ होत राहिल्यामुळे संपूर्ण पृथ्वीचे वाळवंट झालेले असेल.
झ. जीवाष्म इंधनांचे ज्वलन होत राहिल्यामुळे पृथ्वीवरील संसाधने संपून गेलेली असतील.
ट. ध्वनिप्रदूषण होत राहिल्यामुळे मानसिक शांती बिघडलेली असेल.
ठ. कीटकनाशके व रासायनिक खतांचा वापर होत राहिल्यामुळे जमिनीचा कस नष्ट झालेला असेल. (अनेक उत्तरे शक्य)

२. क. १. पावसाळ्यापर्यंत वृक्षारोपणाची कामं झालेली असतील. २. सगळ्यांनी खूपच मनापासून काम केले असेल. ३. सकाळपासून सतत काम केल्यास सगळ्यांना खूप भूक लागली असेल. ४. जेवण आल्याबरोबर एकदम गडबड उडाली असेल. ५. ताटात पदार्थ पडल्याबरोबर सगळे फक्त खाण्यात मग्न झाले असतील. ६. एकदम शांतता पसरली असेल. ७. स्वयंपाकही चविष्ट झाला असेल. ८. गरमागरम जेवणावर सगळ्यांनी ताव मारला असेल.

ख. १. ह्या सुट्टीत आम्ही कोकणात गेलो असू. २. आंबे पिकले असतील. ३. बाहेरच्या पडवीत कोकमांचा ढीग लागला असेल, तर कोपऱ्यात नारळांची रास लावली असेल. ४. बघता बघता सुट्टी संपली असेल. ५. मोठ्यांच्या रजा संपलेल्या असतील आणि लहानांच्या शाळा सुरू झाल्या असतील. ६. नेहमीचा दिनक्रम पुन्हा सुरू झाला असेल.

३. क. तुझ्या मैत्रिणी घरी येतील तेव्हा मी गावाला गेलो असेन. ख. हा पर्यावरणशास्त्राचा अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत मी पुढे काय करायचं ते ठरवलं असेल. ग. पर्यायी ऊर्जेचा शोध त्याने लावला असेल. थोड्याच दिवसात तो कीर्तीच्या शिखरावर पोचला असेल.
घ. सर्पमित्र म्हणून आज त्यांचा सत्कार झाला असेल. उद्या ह्या वेळेला ते परतीच्या गाडीत बसले असतील.

४. क. आत्ता रोपाला दोनच पाने आली आहेत, पण चारच दिवसांनी अजून चार पाने आली असतील.
ख. जरा थांब, दहाच मिनिटांत माझा पतंग आकाशात उंच उडाला असेल.
ग. पावसाळ्यापूर्वी पक्ष्यांची घरटी बांधून झाली असतील.
घ. ह्या तळ्याचे पाणी असेच स्वच्छ राहिले, तर पुढच्या मोसमात तळ्यात कमळे फुलली असतील.

५. क. आम्ही / आपण पळालो असू. ख. तू गडावर चढला असशील. ग. तुम्ही / आपण जेवायला बसला असाल. घ. तो पक्ष्यांसाठी खूप रडला असेल. च. ती पावसात चिंब भिजली असेल. छ. ते बाळ गवतात खेळले असेल. ज. ते पक्षी बेघर झाले असतील. झ. त्या चिमण्या उडाल्या असतील. ट. ती पाखरे घरी परतली असतील.

४. १. ख. निरभ्र दिवस ग. रात्रीचा पाऊस घ. वादळ च. हिमवर्षाव
छ. गारांचा पाऊस ज. विजा झ. निरभ्र रात्र ट. ढगाळ / अभ्राच्छादित दिवस
ठ. पाऊस आणि सूर्यप्रकाश

५. क. खेळण्यांऐवजी ख. ह्यांपैकी ग. तुझ्या पुस्तकांपैकी घ. खाण्याऐवजी
च. मार्केटिंग ह्या विषयाऐवजी छ. ह्यांपैकी ज. भाजीवाल्याकडच्या भाज्यांपैकी
झ. दाखवल्या जाणाऱ्या चित्रपटांपैकी ट. ह्यांपैकी ठ. करण्याऐवजी
ड. ह्या पारंपरिक उर्जेच्या स्रोतांऐवजी

६. क. रिमझिम ख. धो धो / मुसळधार ग. लवंडलं घ. सांडू च. झेपावतो, धबधबा
छ. धो धो / मुसळधार, वेगाने

७. १. घरातून बाहेर पडून तो चालू लागला. कितीतरी वेळ तो चालतच होता. खाचखळग्यांतूनही त्याची पावलं झपाझप अंतर कापत होती. ज्या कामाला तो निघाला होता, ते आपल्या हातून होईल की नाही अशी शंका त्याच्या मनात डोकावत होती, पण तो निर्धाराने चालला होता. त्याला येताना बघून पलीकडच्या शेतातून एक माणूस आला आणि त्याचा घामाघूम झालेला चेहरा बघून त्याला आपल्या झोपडीत घेऊन गेला. कोपऱ्यातल्या मडक्यातून लोटाभर पाणी त्याला प्यायला दिलं. बसायला सांगितलं. झोपडीमधल्या चुलीतून ज्वाळा येत होत्या. चुलीवरच्या पातेल्यातून खमंग वास दरवळत होता. पोटातून भुकेने हाक दिली. केसातून ठिबकणारे घामाचे थेंब त्याने पुसले आणि झोपडीत नजर टाकली. उन्हातून आल्यामुळे डोळ्यांपुढे आधी अंधारच होता, पण आता जरा दिसू लागले होते. चुलीजवळच्या अंधारातून त्याला हालचाल दिसू लागली आणि बांगड्यांचा आवाजही ऐकू आला. नाही म्हटलं तरी त्याच्या मनात विचार चमकून गेला, की आपली जेवणाची सोय इथे होऊ शकेल. इतक्यात तो शेतकरी दारातून आत आला आणि त्याला म्हणाला, “अरे वाटसरा, बस की आरामात! आता जेवून उन्हं उतरल्यावरच जा की!” क्षणभर त्याची चलबिचल झाली. मग निर्धाराने तो उठला आणि झोपडीतून बाहेर पडून, वाट पकडून पुन्हा चालू लागला.

३. क. गुरगुरीतून ख. आकाशातून, चोचीतून ग.मुठीतून घ. शिक्षणातून
च. नदीतून, तळ्यातून छ. हालचालीतून, खेळण्यातून ज. हास्यातून झ. रस्त्यातून
ट. दुकानातून



८. १. क. लहानशी ख. छोटीशी ग. छोट्याशा घ. लहानशा च. हलक्याशा
छ. हवासा ज. थोडासा झ. हलकीशी ट. इवलीशी ठ. इवलेसे ड. इवलीशी
ढ. नाजूकशा त. छानशा थ. लहानशा द. लहानसा ध. इवलीशी
न. लहानशी

९. १. क. उपमा देणे ख. समावेश करणे ग. आजार जडणे घ. नजर टाळणे
च. चालना देणे छ. विल्हेवाट लावणे ज. आवर घालणे झ. तलखी होणे
ट. अंदाज वर्तवणे

२. क. होणे : ऱ्हास होणे, समावेश होणे, तलखी होणे, सहभागी होणे, नामशेष होणे
ख. जाणे : सामोरे जाणे, विचार चमकून जाणे

## पाठ ६

१. १. क. साहजिक ख. स्थानिक ग. आर्थिक घ. औद्योगिक च. सामाजिक
छ. सांस्कृतिक ज. सार्वजनिक झ. प्रातिनिधिक ट. भाषिक ठ. शैक्षणिक
ड. तौलनिक ढ. नैसर्गिक ण. प्राकृतिक त. जैविक थ. आयुर्वेदिक
द. बौद्धिक ध. स्वाभाविक न. क्षणिक प. चमत्कारिक

२. क. १. धोरणात्मक २. नकारात्मक ३. तंत्रज्ञानात्मक ४. संवादात्मक ५. रचनात्मक
६. अपवादात्मक ७. होकारात्मक ८. संस्थात्मक

३. क. १. आंतरराष्ट्रीयीकरण २. औद्योगिकीकरण ३. खाजगीकरण ४. उदारीकरण

४. क. १. गैरसमज २. जुनी ३. करावा ४. येईल ५. गरज
ख. १ – ग २ – च ३ – घ ४ – क ५ – ख

२. १. क. करत राहशील ख. करत राहशील ग. वाढत जाईल घ. धरशील
च. लागतील छ. होईल ज. चिडत राहशील झ. सुटत जातील ट. होईन
ठ. गात राहशील

४. १. क. असा संकल्प केला आहे ख. असं ठरवलं आहे ग. योजना आखली आहे
घ. मनावर घेतलं आहे च. ठरवलं आहे छ. ठरवलं आहे ज. मनावर घेतलं आहे
झ. निश्चय केला आहे ट. योजना आखली आहे ठ. निर्धार केला आहे.
(अनेक उत्तरे शक्य)

२. क. योजना आखणे ख. संकल्प करणे ग. निश्चय करणे घ. योजना आखणे
च. निश्चय करणे छ. संकल्प करणे ज. निश्चय करणे झ. योजना आखली आहे
ट. निश्चय करणे (अनेक उत्तरे शक्य)

६. १. क. पाशी ख. आसपास ग. बाजूने घ. भोवती च. शेजारी छ. पाठीमागे
ज. बाजूला

२. क. आसपास ख. बाजूला ग. पाठीमागे घ. अवतीभोवती च. भोवती
छ. शेजारी ज. बाजूने झ. बाजूला

७. १. क. देशोदेशी ख. गावोगावी ग. घरोघरी घ. क्षणोक्षणी च. गल्लोगल्ली
छ. पावलोपावली ज. प्रांतोप्रांती

२. क. घरोघरी ख. क्षणोक्षणी ग. दारोदारी घ. देशोदेशी च. गावोगावी
छ. गल्लोगल्ली ज. मनोमनी

८. १. (उत्तरांसाठी ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे अनुलेखन पाहा.)

९. १. क. त्या काळी सर्वसाधारण लोक आपल्या घरातल्या मुलींना इतक्या लांब पाठवत नव्हते.
ख. अगदी लहानपणी वेणूनं आई-वडील गमावले. मोठ्या भावंडांनीच तिची काळजी घेतली.
ग. मॅट्रिक झाल्यानंतर त्या कोल्हापूरला त्यांच्या कुटुंबियांबरोबर गेल्या.
घ. ज्योतिष्यांनी सांगितलं होतं, ह्यांचं लग्न झालं, तर ह्यांच्या बहिणीला वाईट काळ आहे.
च. त्यामुळे वेणू चितळे ह्यांनी लग्न न करण्याचा निश्चय केला.

२. क. १९३४ साली वेणू चितळे ह्या ब्रिटनला रवाना झाल्या, तिथेच मॉण्टेसरीची पदविका घेतल्यावर त्या विद्यापीठात दाखल झाल्या. १९३९ साली दुसरे महायुद्ध सुरू झाल्याने त्यांना इंग्लडमध्येच राहावे लागले आणि मग त्याना ब्रिटिश नभोवाणीमध्ये म्हणजेच बी॰बी॰सी॰मध्ये नोकरी मिळाली.
ख. वेणू चितळे ह्या इंग्लंडमध्ये कायमस्वरूपी स्थायिक झाल्या नाहीत.

११. १. क. की ख. की ग. का घ. की च. की छ. की

२. डॉक्टर : आपण कोणती पेस्ट वापरता का?
गण्या : हो, पांडुरंगाची आयुर्वेदिक पेस्ट.
डॉक्टर : शाम्पू वापरता का?
गण्या : हो, पांडुरंगाचा हर्बल शाम्पू.
डॉक्टर : हेयर ऑईल वापरता का?
गण्या : हो, पांडुरंगाचं आवळ्याचं तेल.
डॉक्टर : हे पांडुरंग मल्टीनॅशनल कंपनी ब्रॅन्ड आहे की पॉप्युलर लोकल ब्रॅन्ड?
गण्या : नाही, पांडुरंग माझा रूम पार्टनर आहे.

१२. १. ढिला x घट्ट २. वाकडी x सरळ ३. लांब x जवळ ४. सुंदर x कुरूप
५. आळस x हुरूप ६. प्रखर x मंद ७. उघडे x बंद ८. वाईट x छान ९. मोठा x लहान
१०. सामान्य x महान ११. भेकड x साहसी १२. भित्रा x धाडसी १३. गरीब x श्रीमंत
१४. दुर्भागी x भाग्यवंत

१३. १. योजना आखणे, संकल्प सोडणे, दुजोरा देणे

२. निश्चय करणे, निर्धार करणे, संकल्प करणे, विधान करणे, विरोध करणे, फस्त करणे

३. क – ५ ख – ६ ग – ८ घ – २ च – ७ ज – १ छ – ४ झ – ३

४. मार्ग बदलणे, मार्ग धरणे, मार्ग दाखवणे

## पाठ ७

१. १. क. अशास्त्रीय ख. अविश्वास ग. अवैज्ञानिक घ. अवैध च. अस्वस्थ
छ. अव्यावहारिक ज. अनियंत्रित झ. अप्रगत

२. क. १. संगीत २. चांगला ३. जंगल ४. रांगोळी ५. यंत्र ६. तंत्र ७. मंत्र
८. अंधश्रद्धा ९. संशोधन १०. फुंकर ११. सिद्धांत १२. सबंध / संबंध
१३. नियंत्रण १४. केंद्रबिंदू १५. उत्क्रांती १६. स्वयंपाक

३. क. १. तंत्रज्ञ २. कल्पना ३. किरणोत्सार ४. उत्क्रांती ५. समस्या ६. विक्रीपश्चात
७. पिल्लू ८. आदरार्थी ९. व्यासपीठ १०. महत्त्व ११. इच्छा १२. मुद्दा

४.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ तं | त्र | २ ज्ञा | न | | | | ३ वे |
| | ४ मं | त्र | | न | | ५ अं | त | ६ रा | ळ |
| | | | | | | ध | | त्र | |
| | ७ भों | | ८ उ | द्या | | ९ श्र | द्धा | | |
| १० जा | दू | | | | | द्धा | | | ११ वि |
| | बा | | १२ यं | दा | | | | | ज्ञा |
| | बा | | त्र | | १३ का | | १३ अ | ज्ञा | न |
| | | | | | ल | | शा | | |
| १५ प | र | १६ ग्र | ह | | | | स्त्री | | १७ म |
| र | | ह | | | १८ शा | स्त्री | य | | गा |
| वा | | | १९ पू | र्वी | | | | | शी |

२. २. क. जर झिपचा शोध लागला नसता, तर कपडे, पिशव्या, पर्स अशा अनेक गोष्टी नीट बंद करता आल्या नसत्या.

ख. जर काडेपेट्यांनी मेणबत्त्या, कंदील, दिवे, स्टोव्ह इ० पेटवले नसते, तर जगभरात वर्षाकाठी ५० हजार कोटी काडेपेट्या विकल्या गेल्या नसत्या.

ग. जर झटपट वापरता येणारे बँड-एड लोकप्रिय झाले नसते, तर आजपर्यंत एक हजार कोटी बँड-एड विकली गेली नसती.

घ. जर वेलक्रोचा शोध लागला नसता तर अंतराळात वापरण्यासाठी नव्या वस्तूचा शोध घ्यावा लागला असता.

च. जर विचारांत गढलेल्या वॉल्टर हंटने बसल्या बसल्या हातातील तांब्याच्या तारेला पीळ दिला नसता, तर पिन हा अत्यंत उपयुक्त आविष्कार जगापुढे आला नसता.

छ. जर घड्याळाला तासाचा आणि मिनिटाचा काटाच नसता तर आपल्याला वेळ कळली नसती.

३. १. क. बोलवत ख. पिववत ग. उठवत घ. उठवत च. करवत छ. सांगवत ज. जाववतं झ. करवतात ट. पसरवत

५. १. मुलांनो २. प्रिय सैनिकांनो ३. लोकहो / बंधू आणि भगिनींनो ४. ग्राहकहो ५. बाळांनो, मुलांनो ६. अरे बाळा ७. अगं / ए आई ८. अगं / ए ...

६. २. क. २. स्मशानाच्या वाटेवर ख. ३. डोंगराखाली ग. १. काळी मनीमाऊ घ. २. आठवड्यातून एकदा

३.

पिशी मावशी अमेरिकेला
नुकती नुकती जाऊन आली;
अटलांटिकच्या मध्यावरती
वादळ झाले बोट बुडाली.

बोट बुडाली तरी राहिली
एक बायकी हॅट तरंगत
पिशी मावशी तिच्यात बसली
आणि म्हणाली,“आली गंमत”

पिशी मावशी हसली ख्यॅ ख्यॅ
तिने अंगठा उलटा केला;
तोच देवमासा आला वर
तिने जुंपला तो हॅटेला.

हॅट पोचली बोटीआधी
अमेरिकेच्या धक्क्यावरती;
तीच हॅट डोक्यावर घालून
पिशी मावशी झाली पुढती.

पिशी मावशी झाली पुढती.
परंतु भ्याली पाहून गर्दी:
अमेरिकेचे गुप्तहेर ते!
त्यांना यंत्रावरून वर्दी!

“मंत्राहूनही यंत्र भयंकर”
पिशी म्हणाली सरला ताठा,
“चल गं बाई, चल रे बाबा,
पुन्हा आपला भारत गाठा!”

७. २. क. ठीक आहे ख. हो ग. असेल, तरी घ. जे झाले ते झाले

८. १. क. बरोबर ख. बरोबर ग. चूक घ. चूक च. बरोबर छ. चूक

३. क. हो. जर परीक्षा जवळ आली, तर मी अभ्यास करतो. ख. हो. झोप आली, तर मी चहा पितो. ग. हो. कंटाळा आला, तर मी कॉलेजला दांडी मारतो. घ. हो. दुसरा उपाय नसला, तर मी खोटं बोलतो. च. हो. भूमिका आवडली, तर मी शाळेत असताना नाटकात काम करायचो.
छ. हो. अभ्यासाचा कंटाळा आला, तर मी शाळेत असताना खूप खोड्या करायचो.
ज. हो. माझं म्हणणं कोणी ऐकलं नाही, तर मी लहानपणी हट्ट करायचो. झ. हो. सकाळी लवकर जाग आली, तर मी पूर्वी नेहमी योगासनं करायचो. ट. हो. पुरेसे पैसे जमल्यास मी मोठेपणी जगप्रवास करेन. ठ. हो. पुरेशी तयारी झाल्यास मी पुढच्या वर्षी मॅरेथॉनमध्ये भाग घेईन.
ड. हो. मनासारखी मुलगी / मुलगा न मिळाल्यास मी कायम अविवाहित राहीन.
ढ. हो. मोठे कर्तृत्व गाजवल्यास मी पुढे कधी आत्मचरित्र लिहीन.

९. १. क. दुसऱ्या दिवशी ख. संध्याकाळी ग. वेळीअवेळी घ. अलीकडे च. आजही
छ. नुकताच ज. पूर्वी झ. आता ट. मघाशी

२. क. नुकताच ख. आदल्या दिवशी ग. पूर्वी घ. अलीकडे च. वेळीअवेळी
छ. दुसऱ्या दिवशी ज. यंदा

१०. १. क. घरासाठी / घराकरता ख. आमच्यासाठी / आमच्याकरता ग. घरासाठी / घराकरता
घ. मुलांसाठी / मुलांकरता च. सजावटीसाठी / सजावटीकरता छ. स्वच्छतेसाठी / स्वच्छतेकरता
ज. वाढदिवसासाठी / वाढदिवसाकरता झ. तोरणासाठी / तोरणाकरता
ट. मदतीसाठी / मदतीकरता ठ. अमोलसाठी / अमोलकरता ड. घरासाठी / घराकरता
ढ. आपणासाठी / आपणाकरता ण. घरासाठी / घराकरता त. आनंदसाठी / आनंदकरता
थ. घरासाठी / घराकरता

२. क. (उत्तरांसाठी ध्वनिमुद्रित उताऱ्यांचे अनुलेखन पाहा.)

११. १. ग. फडशा पाडला २. ख. मागोवा घेतला ३. ख. दृष्टिक्षेप टाकला ४. सामना करावा
५. ख. निरसन करतात ६. क. कवटाळून बसलास / बसलीस

## पाठ ८



१. २. क. शिरखुर्मा, बिर्याणी, मटण दालचा ख. करंज्या, लाडू, चकली, पाकातल्या पुऱ्या
ग. केक घ. सेव च. श्रीखंड, बासुंदी, आम्रखंड, खीर छ. पुरणाच्या पोळ्या
ज. नारळीभात, खोबऱ्याच्या वड्या झ. गुळाच्या पोळ्या ट. मोदक, मांगशो, माशांचे पदार्थ
ठ. माछेर झोल ड. पोर्क विंदाळू

२. १. क. लाटणे, भाजणे ख. फोडणे, खवणे ग. निवडणे, चिरणे घ. चिरणे, मिसळणे
च. भाजणे, सोलणे छ. चिरणे, तळणे ज. कापणे, पिळणे झ. भिजवणे, भाजणे
ट. भाजणे, तळणे ठ. कापणे, शिजवणे ड. कापणे, तळणे

२. क. चविष्ट ख. रुचकर ग. खारट घ. खमंग च. जळजळीत छ. झणझणीत
ज. अळणी झ. मसालेदार ट. मिळमिळीत ठ. खुसखुशीत ड. गोड
ढ. तिखट

३. क. श्रीखंड : गोड ख. थालीपीठ : तिखट / खमंग ग. चकली : तिखट / खुसखुशीत
घ. कोल्हापुरी तांबडा रस्सा : तिखट / झणझणीत च. आमरस : गोड छ. भेळ : तिखट
ज. लसूण चटणी : तिखट

३. १. ग. मला एक स्वप्न पडलंय. मी एकटी चालले होते. आणि एक गंमत झाली. इकडून आला मोबाईल, तिकडून आला लॅपटॉप. समोरून आला रोबोट. रिमोट होता माझ्याकडे.

२. क. सुषमा, शाल, अक्षरशः, नाशिक, अवकाश, जराशा
ख. शुकशुकाट, पुरुषमाणूस, पिशवी, शूऽऽ
ग. शीर्षक, शाबास
घ. भाषा, शिकायची, दुभाषा, शकेल
च. शिल्प, पाषाण, प्रदेशात, प्रदूषणाने, प्रवेश
छ. षटकात, अर्धशतक

४. १. क. ते चिडणे / ते चिडणं, ती चिडचिड ख. ते रुसणे / ते रुसणं, तो रुसवा
ग. ते धावणे / ते धावणं, ती धाव घ. ते शिवणे / ते शिवणं, ती शिलाई, ती शिवण
च. ते पकडणे / ते पकडणं, ती पकड छ. ते झोपणे / ते झोपणं, ती झोप
ज. ते हसणे / ते हसणं, ते हास्य, ते हासू झ. ते चढणे / ते चढणं, ती चढण, तो चढ
ट. ते उतरणे / ते उतरणं, ती उतरण / तो उतार ठ. ते मारणे / ते मारणं, तो मार

२. क. व्याख्यान चालू असताना अचानक पाऊस आल्यामुळे सगळ्यांची पळापळ झाली.
ख. आई दिसताच तिने आईकडे धाव घेतली. ग. पाच मजले चढून जाईपर्यंत आजीला दम लागला. घ. अंधार पडला तरी मुलांचा खेळ सुरूच होता. च. अरे मुलांनो, भांडण करू नका. छ. तुझं जेवण झालं का? ज. ऑफिसमध्ये आल्यावर त्याने माझी भेट घेतली.
झ. सकाळचं फिरणं ती कधी चुकवत नाही. ट. तो गोड बोलला तरी माझी फसगत होणार नाही. ठ. माझ्यासमोरच तो घसरून पडल्यामुळे मला हसू आले.

५. १. क. विरुद्ध ख. उलट ग. उलट घ. समक्ष च. उलट छ. उलट ज. विरुद्ध

२. क. समक्ष ख. सह ग. विरुद्ध घ. सह च. विरुद्ध छ. सह

६. २. क. वरच्या ख. खालून ग. वर घ. वरून च. खाली छ. समोर ज. शेजारून झ. शेजारी ट. आत ठ. मध्ये ड. वरच्या ढ. समोर त. मागे थ. मागे द. खालच्या ध. समोरून न. मधल्या प. मागच्या

८. १. क. लाकडाची मोळी ख. गायींचा कळप ग. पुस्तकांची चळत घ. वारकऱ्यांची दिंडी च. गव्यांच्या झुंडी छ. फुलांचे गुच्छ ज. केळ्यांचा घड

१०. २. क. हृदय ख. पंख ग. मिठी

३. गरज भासणे, मिठी मारणे, ताशेरे ओढणे, मटकावून टाकणे

११. १. क. वाढत जाईल ख. मिळत राहील ग. पडत जातील घ. मिळत जातील च. करत जाईन छ. फिरत राहील ज. करत राहील झ. बघत राहतील ट. येत राहील ठ. नेसत जाईन ड. वाचत जाईन

२. क. राहणीमान जितके साधे तितके जीवन सोपे असे / असायचे. ख. आम्ही वर्गात आलेल्या शिक्षकांना उभे राहून नमस्ते म्हणत असू / म्हणायचो. ग. तो रोज ठरावीक वेळी सूर्यनमस्कार घालत असे / घालायचा. घ. आजीच्या बटव्यात नेहमी काहीतरी खाऊ असे / असायचा. च. तू चपला इथे काढून (ठेवत असस /) ठेवायचास का? छ. हो, तुम्हाला ओळखतो आम्ही. तुम्ही पूर्वी इथे कामासाठी येत असा / यायचात. ज. आम्ही मकरसंक्रांतीला पतंग उडवत असू / उडवायचो आणि रंगपंचमीला रंग खेळत असू / खेळायचो. झ. आपण लहानपणी मोठं होण्याचं स्वप्न बघत असू / बघायचो. ट. मला खूप चालायला आवडत असे / आवडायचे.
ठ. ती सतत गाण्याचा सराव करत असे / करायची, म्हणून ती मोठी गायिका झाली.
ड. वारा वाहत असे / वाहायचा, तेव्हा झाडाची पाने सळसळत असत / सळसळायची.

## पाठ ९

१. ५. क. ६, ३, १, २, ५, ४

ख. १. तर ते तुम्हाला पटकन आपलेसे करते. २. हे शहर तुमची दखल घेईनासे होते.
३. बदलत असतेच. तोच तिचा स्वभाव आहे. ४. स्थलांतरितांचा आहे.
५. अजूनही काहीतरी जादू आहे.
६. पुन्हा पुन्हा उभे राहण्याची क्षमता सतत तपासून पाहणारा वर्तमानकाळ.

६. क. महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या साधारण अकरा कोटी आहे. ख. महाराष्ट्र राज्याची अधिकृत भाषा मराठी असून इथे मराठीच्या मालवणी, अहिराणी, वऱ्हाडी या प्रमुख बोलीभाषा अस्तित्वात आहेत. ग. मुंबई ही महाराष्ट्र राज्याची राजधानी आहे. घ. पुण्याला महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी म्हटले जाते कारण येथूनच महाराष्ट्रात त्या त्या काळातल्या निरनिराळ्या सामाजिक सुधारणांच्या चळवळी उभ्या राहिल्या. च. महाराष्ट्रात प्रामुख्याने गणेशोत्सव, गुढीपाडवा, होळी (शिमगा), दसरा, दिवाळी हे सण साजरे केले जातात.

२. १. क. सांगण्याची ख. विसरण्याचा ग. घालण्याची घ. आवरण्याची च. घालण्याची छ. देण्याची

२. क. फिरण्याचा फायदा ख. चालण्याची हौस ग. बनवण्याचे तंत्र घ. झोपण्याची वेळ च. शिकवण्याची आवड छ. जिंकण्याची इच्छा ज. गाण्याची आवड

३. ३. करत - करत असत / करायचे, होई - होत असे / व्हायचे, येई - येत असे / यायचे, आवडे - आवडत असे / आवडायचे, दिसे - दिसत असे, दिसायचे

४. १. पण २. च ३. फक्त, च ४. ही ५. केवळ

५. १. क. कमी ऐकू येते. ख. गाव सुरू होते. ग. एक एटीएम आहे. घ. बसने प्रवास करतो.

३. क. लेखकाला नानावटी हॉस्पिटलच्या अलीकडे उतरायचे होते. पण तो उतरला पुढच्या थांब्यावर पलीकडे.
ख. लेखकाच्या मनात सध्या काही दिवसांपूर्वी पाहिलेल्या मुलीचे विचार येत आहेत.

६. १. क. जितकी / जेवढी, तितके / तेवढे ख. एवढेच नव्हे / इतकेच नव्हे
ग. तितकी / तेवढी, इतका / एवढा, जितकी / जेवढी, तितकी / तेवढी
घ. तेवढे नसले / तितके नसले, तेवढा / तितका, एवढेच नव्हे / इतकेच नव्हे, एवढे नाही / इतके नाही च. जितके / जेवढे, तितका / तेवढा, जेवढी / जितकी, तेवढी / तितकी, एवढंच नाही / इतकेच नाही, इतकी / एवढी

७. १. क. ताण ख. मन ग. सण घ. वन च. वण छ. कोण ज. पेन झ. मन, धन, तन ट. मान ठ. सन

३. क. लौकिक मिळवला ख. खुंटाला बांधलेले ग. प्रयोग करायचा घ. वाळवी लागेल
च. नशीब फळफळले छ. उत्साहाने सळसळत ज. आपलंसं करेल
झ. समन्वय साधेल ट. आकाराला आणेल

## पाठ १०

२. १. क. बरोबर  ख. चूक  ग. चूक  घ. चूक

२. क. व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने दरवर्षी वात्सल्य फाउंडेशन संस्थेतील सर्व मुलांचा वाढदिवस एकत्रित साजरा केला जातो. त्यांच्याबद्दल प्रेम व्यक्त करण्याची ही संधी या संस्थेमार्फत सगळ्यांनाच मिळू शकते. ह्यावेळी धमाल-मस्ती ह्याबरोबरच खूप खेळ व गाणी होतात.

ख. वात्सल्य फाउंडेशन ही संस्था वंचित, दुर्लक्षित मुलांसाठी काम करते.

ग. ही संस्था वंचित, दुर्लक्षित मुलांसाठी काम करते. त्यांना निवारा पुरवणे, त्यांना आरोग्याच्या सुविधा पुरवणे ह्या कामांबरोबरच त्यांचे शिक्षण, त्यांचे भावी आयुष्य ह्यांचा विचारही ही संस्था करते.

५. क. वाहतूक नियमांचे पालन केले पाहिजे. ते मोडता कामा नयेत.

ख. कायद्यांचे पालन करावे. ते मोडता कामा नयेत.

ग. पर्यावरणाचे रक्षण करावे, ते नष्ट करता कामा नये.

घ. स्त्रियांचा आदर करावा. त्यांचा अनादर करू नये.

च. गरिबांना मदत करावी.

६. क. १, ४, ३, २

ख. १. क. – १  ख. – २  ग. – १

२. क. हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्प महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात आहे.

ख. मोनॅको देशाने ‘श्वाइट्झर कपल ऑफ इंडिया’ या नावाने पोस्टाचे तिकीट काढून आमटे दाम्पत्याचा सन्मान केला.

ग. भगवान अरविंद घोष ह्यांनी बाबांना दिलेल्या पुरस्कारावर लिहिले होते, “जगाकडे पाठ फिरव, जग तुझ्यामागे उभे राहील.”

३. १. तुला उद्या जिममध्ये / पोहायला / नाटकाला / जेवायला जायला जमेल का?
कदाचित जमेल / कदाचित नाही.
बहुधा नाही.
उद्या? छे! अशक्य.
बहुतेक जाईन.
एकंदरीत असं दिसतंय, की जमेल.

५. १. क. थोडासा  ख. किंचित  ग. दुप्पट  घ. चौपदरी  च. कोट्यवधी

२. क. एकेरी  ख. दुप्पट  ग. चौपदरी  घ. दुहेरी  च. चौपट

६. १. घुसला, घुसवली  २. बसली, बसवून  ३. झोपली, झोपवून  ४. तापले, तापवावे
५. म्हणून, म्हणवून  ६. हरवले, हरले  ७. फसवतील, फसेल  ८. उठला, उठवले
९. ऐकवली, ऐकण्याची

७. १. क. – ८  ख. – ३  ग. – ७  घ. – १  च. – ९  छ. – ६  ज. – ५
झ. – २  ट. – ४  ठ. – १०

२. क. आग्रह करणे, सूर सापडणे  ख. सुरू होणे / सुरुवात करणे  ग. रुजू होणे
घ. वाईट वाटणे  च. मळमळणे  छ. वाटणे, शी येणे  ज. बिनसणे / फजिती होणे

८. १. क.

| सर्वनाम | साधा वर्तमानकाळ | | साधा भूतकाळ | | साधा भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळतो<br>खेळते | खेळत नाही | खेळलो<br>खेळले | खेळलो नाही<br>खेळले नाही | खेळेन | खेळणार<br>नाही |
| आम्ही /<br>आपण | खेळतो | खेळत नाही | खेळलो | खेळलो नाही | खेळू | खेळणार<br>नाही |
| तू | खेळतोस<br>खेळतेस | खेळत<br>नाहीस | खेळलास<br>खेळलीस | खेळला<br>नाहीस<br>खेळली<br>नाहीस | खेळशील | खेळणार<br>नाहीस |
| तुम्ही /<br>आपण | खेळता | खेळत नाही | खेळलात | खेळला नाहीत | खेळाल | खेळणार<br>नाही |
| तो | खेळतो | खेळत नाही | खेळला | खेळला नाही | खेळेल | खेळणार<br>नाही |
| ती | खेळते | खेळत नाही | खेळली | खेळली नाही | खेळेल | खेळणार<br>नाही |
| ते | खेळते /<br>खेळतं | खेळत नाही | खेळले /<br>खेळलं | खेळले नाही /<br>खेळलं नाही | खेळेल | खेळणार<br>नाही |
| ते | खेळतात | खेळत<br>नाहीत | खेळले | खेळले नाही | खेळतील | खेळणार<br>नाहीत |
| त्या | खेळतात | खेळत<br>नाहीत | खेळल्या | खेळल्या<br>नाहीत | खेळतील | खेळणार<br>नाहीत |
| ती | खेळतात | खेळत<br>नाहीत | खेळली | खेळली नाहीत | खेळतील | खेळणार<br>नाहीत |

ख.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहितो कविता लिहिते | कविता लिहीत नाही | कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहीन | कविता लिहिणार नाही |
| आम्ही / आपण | कविता लिहितो | कविता लिहीत नाही | कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहू | कविता लिहिणार नाही |
| तू | कविता लिहितोस कविता लिहितेस | कविता लिहीत नाहीस | कविता लिहिलीस | कविता लिहिली नाहीस | कविता लिहिशील | कविता लिहिणार नाहीस. |
| तुम्ही / आपण | कविता लिहिता | कविता लिहीत नाही | कविता लिहिली | कविता लिहिली नाहीत | कविता लिहाल | कविता लिहिणार नाही |
| तो | कविता लिहितो | कविता लिहीत नाही | त्याने कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहील | कविता लिहिणार नाही |
| ती | कविता लिहिते | कविता लिहीत नाही | तिने कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहील | कविता लिहिणार नाही |
| ते | कविता लिहिते / लिहितं | कविता लिहीत नाही | त्याने कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहील | कविता लिहिणार नाही |
| ते | कविता लिहितात | कविता लिहीत नाहीत | त्यांनी कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहितील | कविता लिहिणार नाहीत |
| त्या | कविता लिहितात | कविता लिहीत नाहीत | त्यांनी कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहितील | कविता लिहिणार नाही |
| ती | कविता लिहितात | कविता लिहीत नाहीत | त्यांनी कविता लिहिली | कविता लिहिली नाही | कविता लिहितील | कविता लिहिणार नाहीत |

घ. १. विचारले  २. म्हणाले  ३. लावला  ४. होतो  ५. भासते  ६. होता
७. लागत नाही  ८. नसतो  ९. पाहिले  १०. आले  ११. येतो  १२. केला  १३. केल्या
१४. आले  १५. गेले  १६. होणार नाहीत  १७. शकतो  १८. राहतील  १९. करतील
२०. कमावतील  २१. सांभाळतील  २२. झाला  २३. म्हणाला  २४. देईन  २५. घेईन

च.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळत आहे | खेळत नाही आहे | खेळलो आहे / खेळले आहे | खेळलो नाही आहे खेळले नाही आहे | खेळत असतो खेळत असते | खेळत नसतो खेळत नसते |
| आम्ही / आपण | खेळत आहोत | खेळत नाही आहोत | खेळलो आहोत | खेळलो नाही आहोत | खेळत असतो | खेळत नसतो |
| तू | खेळत आहेस | खेळत नाही आहेस | खेळला आहेस खेळली आहेस | खेळला नाही आहेस खेळली नाही आहेस | खेळत असतोस खेळत असतेस | खेळत नसतोस खेळत नसतेस |
| तुम्ही / आपण | खेळत आहात | खेळत नाही आहात | खेळला / खेळल्या आहात | खेळला / खेळल्या नाही आहात | खेळत असता | खेळत नसता |
| तो | खेळत आहे | खेळत नाही आहे | खेळला आहे | खेळला नाही आहे | खेळत असतो | खेळत नसतो |
| ती | खेळत आहे | खेळत नाही आहे | खेळली आहे | खेळली नाही आहे | खेळत असते | खेळत नसते |
| ते | खेळत आहे | खेळत नाही आहे | खेळले / खेळलं आहे | खेळले / खेळलं नाही आहे | खेळत असते / असतं | खेळत नसते / नसतं |
| ते | खेळत आहेत | खेळत नाही आहेत | खेळले आहेत | खेळले नाही आहेत | खेळत असतात | खेळत नसतात |
| त्या | खेळत आहेत | खेळत नाही आहेत | खेळल्या आहेत | खेळल्या नाही आहेत | खेळत असतात | खेळत नसतात |
| ती | खेळत आहेत | खेळत नाही आहेत | खेळली आहेत | खेळली नाही आहेत | खेळत असतात | खेळत नसतात |

छ.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहीत आहे | कविता लिहीत नाही आहे | कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असतो कविता लिहीत असते | कविता लिहीत नसतो / कविता लिहीत नसते |
| आम्ही / आपण | कविता लिहीत आहोत | कविता लिहीत नाही आहोत | कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असतो | कविता लिहीत नसतो |
| तू | कविता लिहितोस / लिहितेस | कविता लिहीत नाहीस | कविता लिहिली आहेस | कविता लिहिली नाही आहेस | कविता लिहीत असतोस / असतेस | कविता लिहीत नसतोस / नसतेस |
| तुम्ही / आपण | कविता लिहिता | कविता लिहीत नाही | कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असता | कविता लिहीत नसता |
| तो | कविता लिहितो | कविता लिहीत नाही | त्याने कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असतो | कविता लिहीत नसतो |
| ती | कविता लिहिते | कविता लिहीत नाही | तिने कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असते | कविता लिहीत नसते |
| ते | कविता लिहिते / लिहितं | कविता लिहीत नाही | त्याने कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असते / असतं | कविता लिहीत नसते / नसतं |
| ते | कविता लिहितात | कविता लिहीत नाहीत | त्यांनी कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असतात | कविता लिहीत नसतात |
| त्या | कविता लिहितात | कविता लिहीत नाहीत | त्यांनी कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असतात | कविता लिहीत नसतात |
| ती | कविता लिहितात | कविता लिहीत नाहीत | त्यांनी कविता लिहिली आहे | कविता लिहिली नाही आहे | कविता लिहीत असतात | कविता लिहीत नसतात |

झ. १. घेतली आहे २. पोहोचले आहे ३. झाल्या आहेत ४. पोहत आहेत ५. मारत आहेत
६. पहात आहेत ७. खेळत आहेत ८. होत असतात ९. झटत असतात १०. उठवतात
११. देतात १२. सांगतात १३. शिकवतो १४. आवडली नाही आहे १५. केला आहे
१६. पोहला आहात १७. मारल्या आहेत १८. राबत असतो १९. पोहत असतो २०. खेळत असतात
२१. लोंबकळत असतात २२. घेत असतात

ट.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळत होतो खेळत होते | खेळत नव्हतो खेळत नव्हते | खेळलो होतो खेळले होते | खेळलो नव्हतो खेळले नव्हते | खेळत असे / खेळायचो खेळत असे / खेळायचे | खेळत नसे / खेळायचो नाही, खेळत नसे / खेळायचे नाही |
| आम्ही / आपण | खेळत होतो | खेळत नव्हतो | खेळलो होतो | खेळलो नव्हतो | खेळत असू / खेळायचो | खेळत नसू / खेळायचो नाही |
| तू | खेळत होतास / होतीस | खेळत नव्हतास / खेळत नव्हतीस | खेळला होतास / खेळली होतीस | खेळला नव्हतास / खेळली नव्हतीस | खेळत असस / खेळायचास / खेळायचीस | खेळत नसस / खेळायचा नाहीस / खेळायची नाहीस |
| तुम्ही / आपण | खेळत होता / त | खेळत नव्हता / त | खेळला होता / त | खेळला नव्हता / त | खेळत असा / खेळायचात | खेळत नसा / खेळायचा नाहीत |
| तो | खेळत होता | खेळत नव्हता | खेळला होता | खेळला नव्हता | खेळत असे / खेळायचा | खेळत नसे / खेळायचा नाही |
| ती | खेळत होती | खेळत नव्हती | खेळली होती | खेळली नव्हती | खेळत असे / खेळायची | खेळत नसे / खेळायची नाही |
| ते | खेळत होते / होतं | खेळत नव्हते / नव्हतं | खेळले होते / खेळलं होतं | खेळले नव्हते / खेळलं नव्हतं | खेळत असे / खेळायचे / खेळायचं | खेळत नसे / खेळायचे नाही / खेळायचं नाही |
| ते | खेळत होते | खेळत नव्हते | खेळले होते | खेळले नव्हते | खेळत असत / खेळायचे | खेळत नसत / खेळायचे नाहीत |
| त्या | खेळत होत्या | खेळत नव्हत्या | खेळल्या होत्या | खेळल्या नव्हत्या | खेळत असत / खेळायच्या | खेळत नसत / खेळायच्या नाहीत |
| ती | खेळत होती | खेळत नव्हती | खेळली होती | खेळली नव्हती | खेळत असत / खेळायची | खेळत नसत / खेळायची नाहीत |

ठ.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भूतकाळ | | पूर्ण भूतकाळ | | | रीती भूतकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहीत होतो / कविता लिहीत होते | कविता लिहीत नव्हतो / कविता लिहीत नव्हते | कविता लिहिली होती | | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असे / कविता लिहायचो / चे | कविता लिहीत नसे / कविता लिहायचो / चे नाही |
| आम्ही / आपण | कविता लिहीत होतो | कविता लिहीत नव्हतो | कविता लिहिली होती | | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असू / कविता लिहायचो | कविता लिहीत नसू / कविता लिहायचो नाही |
| तू | कविता लिहीत होतास / होतीस | कविता लिहीत नव्हतास / नव्हतीस | कविता लिहिली होतीस | | कविता लिहिली नव्हतीस | कविता लिहीत असस / लिहायचास / लिहायचीस | कविता लिहीत नसस / लिहायचा नाहीस / लिहायची नाहीस |
| तुम्ही / आपण | कविता लिहीत होता / त | कविता लिहीत नव्हता / त | कविता लिहिली होतीस | | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असा / लिहायचा/त | कविता लिहीत नसा / लिहायचा नाहीत |
| तो | कविता लिहीत होता | कविता लिहीत नव्हता | त्याने | कविता लिहिली होती | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असे / लिहायचा | कविता लिहीत नसे / लिहायचा नाही |
| ती | कविता लिहीत होती | कविता लिहीत नव्हती | तिने | कविता लिहिली होती | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असे / लिहायची | कविता लिहीत नसे / लिहायची नाही |
| ते | कविता लिहीत होते / होतं | कविता लिहीत नव्हते / नव्हतं | त्याने | कविता लिहिली होती | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असे / लिहायचे / लिहायचं | कविता लिहीत नसे / लिहायचे / चं नाही |
| ते | कविता लिहीत होते | कविता लिहीत नव्हते | त्यांनी | कविता लिहिली होती | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असत / लिहायचे | कविता लिहीत नसत / लिहायचे नाहीत |
| त्या | कविता लिहीत होत्या | कविता लिहीत नव्हत्या | त्यांनी | कविता लिहिली होती | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असत / लिहायच्या | कविता लिहीत नसत / लिहायच्या नाहीत |
| ती | कविता लिहीत होती | कविता लिहीत नव्हती | त्यांनी | कविता लिहिली होती | कविता लिहिली नव्हती | कविता लिहीत असत / लिहायची | कविता लिहीत नसत / लिहायची नाहीत |

ढ. १. सांगितले होते  २. सापडला होता  ३. होत नव्हता  ४. झाले होते  ५. राहात होता
६. दिली होती  ७. म्हणत नव्हता  ८. जाणवत होते  ९. समजत नव्हती
१०. मिळाल्या होत्या  ११. झोपत असे  १२. फिरत असे  १३. शकत असे  १४. शकत नसे
१५. शकत नसे  १६. आली होती  १७. वाटत असे  १८. झाला

ण.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भविष्यकाळ | | पूर्ण भविष्यकाळ | | रीती भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | खेळत असेन | खेळत नसेन | खेळलो असेन खेळले असेन | खेळलो नसेन खेळले नसेन | खेळत जाईन / राहीन | खेळत जाणार नाही / राहणार नाही |
| आम्ही / आपण | खेळत असू | खेळत नसू | खेळलो असू | खेळलो नसू | खेळत जाऊ / राहू | खेळत जाणार नाही / राहणार नाही |
| तू | खेळत असशील | खेळत नसशील | खेळला / खेळली असशील | खेळला / खेळली नसशील | खेळत जाशील / राहशील | खेळत जाणार नाहीस / राहणार नाहीस |
| तुम्ही / आपण | खेळत असाल | खेळत नसाल | खेळले / खेळल्या असाल | खेळले / खेळल्या नसाल | खेळत जाल / राहाल | खेळत जाणार नाही / राहणार नाही |
| तो | खेळत असेल | खेळत नसेल | खेळला असेल | खेळला नसेल | खेळत जाईल / राहील | खेळत जाणार नाही / राहणार नाही |
| ती | खेळत असेल | खेळत नसेल | खेळली असेल | खेळली नसेल | खेळत जाईल / राहील | खेळत जाणार नाही / राहणार नाही |
| ते | खेळत असेल | खेळत नसेल | खेळले / खेळलं असेल | खेळले / खेळलं नसेल | खेळत जाईल / राहील | खेळत जाणार नाही / राहणार नाही |
| ते | खेळत असतील | खेळत नसतील | खेळले असतील | खेळले नसतील | खेळत जातील / राहतील | खेळत जाणार नाहीत / राहणार नाहीत |
| त्या | खेळत असतील | खेळत नसतील | खेळल्या असतील | खेळल्या नसतील | खेळत जातील / राहतील | खेळत जाणार नाहीत / राहणार नाहीत |
| ती | खेळत असतील | खेळत नसतील | खेळली असतील | खेळली नसतील | खेळत जातील / राहतील | खेळत जाणार नाहीत / राहणार नाहीत |

त.

| सर्वनाम | अपूर्ण / चालू भविष्यकाळ | | पूर्ण भविष्यकाळ | | रीती भविष्यकाळ | |
|---|---|---|---|---|---|---|
| मी | कविता लिहीत असेन | कविता लिहीत नसेन | कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जाईन | कविता लिहीत राहीन |
| आम्ही / आपण | कविता लिहीत असू | कविता लिहीत नसू | कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जाऊ / राहू | कविता लिहीत जाणार नाही / राहणार नाही |
| तू | कविता लिहीत असशील | कविता लिहीत नसशील | कविता लिहिली / लिहिलेली असशील | कविता लिहिली / लिहिलेली नसशील | कविता लिहीत जाशील / राहशील | कविता लिहीत जाणार नाहीस / राहणार नाहीस |
| तुम्ही / आपण | कविता लिहीत असाल | कविता लिहीत नसाल | कविता लिहिली / लिहिलेली असाल | कविता लिहिली / लिहिलेली नसाल | कविता लिहीत जाल / राहाल | कविता लिहीत जाणार नाही / राहणार नाही |
| तो | कविता लिहीत असेल | कविता लिहीत नसेल | त्याने कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जाईल / राहील | कविता लिहीत जाणार नाही / राहणार नाही |
| ती | कविता लिहीत असेल | कविता लिहीत नसेल | तिने कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जाईल / राहील | कविता लिहीत जाणार नाही / राहणार नाही |
| ते | कविता लिहीत असेल | कविता लिहीत नसेल | त्याने कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जाईल / राहील | कविता लिहीत जाणार नाही / राहणार नाही |
| ते | कविता लिहीत असतील | कविता लिहीत नसतील | त्यांनी कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जातील / राहतील | कविता लिहीत जाणार नाहीत / राहणार नाहीत |
| त्या | कविता लिहीत असतील | कविता लिहीत नसतील | त्यांनी कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जातील / राहतील | कविता लिहीत जाणार नाहीत / राहणार नाहीत |
| ती | कविता लिहीत असतील | कविता लिहीत नसतील | त्यांनी कविता लिहिली / लिहिलेली असेल | कविता लिहिली / लिहिलेली नसेल | कविता लिहीत जातील / राहतील | कविता लिहीत जाणार नाहीत / राहणार नाहीत |

द. १. केले असेल  २. गेले असतील  ३. संपले असेल  ४. सोडले असेल
५. शोधत असतील  ६. येईल  ७. पाहात राहतील  ८. जगत राहतील
९. सांगत राहतील

२. क. मालिकेपुरती  ख. अस्वच्छतेवर  ग. भाषेच्या, शिक्षिकांना, शिक्षिकेला शिकवताना
घ. अफवेमुळे  च. महत्त्वाकांक्षेपुढे, चिंतेमुळे, तज्ज्ञांनी

३. क. कुंडी-, कुंड्यां-  ख. पिढ्यां-, पिढी-  ग. गल्ली-, गल्ल्यां-  घ. उशी-, उश्या-
च. मिश्यां-, मिश्या-

४. क. – ७  ख. – ३  ग. – १  घ. – ५  च. – ८  छ. – ४  ज. – २
झ. – ६  ट. – ९

## Marathi Workbook for Level 3

- Creative exercises, tests, glossary and answer key
- An integrated communicative approach
- Systematic and effective learning of the language
- For young and adult learners
- For classroom study as well as for self learners
- Language skills: Understanding, speaking, reading, writing Marathi

**The set contains:**

1. A Textbook
2. A Workbook
3. A Glossary
4. DVD (With audio & audio-visual content)
   https://mu.ac.in/mymarathi3

**Visit us:** www.rmvs.marathi.gov.in


मुंबई विद्यापीठ
UNIVERSITY OF MUMBAI

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्था, मुंबई
RAJYA MARATHI VIKAS SANSTHA, MUMBAI

9 789353 518233

**Price:** Rs. 1250 | 25 USD | 20 EUR